म. ग्रं. म. ठाणें
विषय
विषय
सं. नं.

२।७।१९८२
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
(ठाणे जिल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा

मोरोपंती वेचे

संपादक - श्री. ल. रा. पांगारकर

१९०५

REFBK-0002154
REFBK-0002154

श्रीरामसमर्थ.

# मोरोपंती वेंचे.

आर्याछंदें जोडुनि रामायणभारतादि आयकवी ।
नायकवीर कवींचा ऐसा होईल अन्य काय कवी? ॥१॥

—विठोबा आण्णा.

हें पुस्तक

## लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.

यांनीं तयार केलें

तें

पुणें येथें रावजी श्रीधर गोंधळेकर यांचे "जगद्धितेच्छु"
छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

REFBK-0002154

( सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें सर्व हक्क कर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत १। रुपया.

२१५४

## चुकीची दुरुस्ती

पृष्ठ ५४ च्या पुढील पृष्ठावर ५५ बद्दल ५७ हा आंकडा चुकून पडला आहे.

# प्रस्तावना.

धर्मार्थकाममोक्षेषु वैचक्षण्यं कलासु च ।
प्रीतिं करोति कीर्तिं च साधुकाव्यनिबंधनम् ॥ १ ॥

—भामहालंकार.

१. श्रीमहाकवि मोरोपंत यांच्या कवितेची त्यांच्या जिवंतपणींच इतकी प्रसिद्धि झाली होती कीं त्यांचे स्नेही व व्याही बाबा पाध्ये एकदां विनोदानें त्यांस ह्मणाले, ' पंत, ज्या तुमच्या आर्या जन्मतांच काशीरामेश्वर नमायला गेल्या, त्यांना प्रौढपण आल्यावर हें सारें जगतीतल सुद्धां वावरायला पुरणार नाहीं ! '[1] पंतांची कविता त्यांच्या जिवंतपणींच लोकमान्य झाली, व त्यांच्या पश्चात्ही तिनें हजारों रसिकांस चटका लावला आहे. या दोन्ही गोष्टी खऱ्या आहेत. पंतांच्या आर्या बारामतीस तयार होत असतांनाच त्यांच्या नकला करून घेण्यास ठिकठिकाणच्या लोकांच्या उड्या पडत असत; त्यांना अनेक विषयांवर काव्यें करण्याच्या सूचना अनेकांकडून येत असत; हरिदास कथोपयोगी आख्यानें करून द्या ह्मणून त्यांच्या विनवण्या करीत असत; व मैराळबोवा, रामजोशी वगैरे कीर्तनकार त्यांच्या आर्यांचीं कीर्तनें करीत महाराष्ट्रभर हिंडत असत. पंत इ. स. १७९० मध्यें काशीं यात्रेस गेले तेव्हां काशीकर पंडितांनीं त्यांच्या कवितेची शलाकापरीक्षा भरून ती मान्य केली; पंतांनीं अनेक साधुसंतांवर सुंदर आर्या केल्या, आपल्या जगत्प्रसिद्ध पित्यावर आर्या केल्या नाहींत हें बरें न वाटून दिपांचें गोसावी ताहराबादकर यांनीं पंतांस पत्र लिहून महिपतबावावर कांहीं आकरण्याची विनंति केली; पुणें शहरीं पंतांची आर्या इतकी गाजली कीं आहेत. रावास मोरोपंतांवरचा राग ' पंतांची आर्या कीर्तनांत कोणीही ह्मोरोपंत ह्मणतां कामा नये ' अशी सर्व हरिदासांस नोटीस देऊन काढावा, ज्याला भोजनप्रसंगीं पंतांच्या निवडक आर्या ह्मणण्याची चाल पडली; मुख्यतः यांचा जास्त फैलाव झाल्याचेंच एक प्रमाण आहे. बापु गोखल्— —णकर वगैरे.

---

१ ज्या उपजतांचि गेल्या काशीरामेश्वरा नमायाला ।
आर्यांना प्रौढपणीं जगतीतल हें पुरे न मायाला

तिनिधींच्या तेलिणीनें सहा महिने दाद दिली नाहीं याबद्दलची ‘ तेलिण मारी सोटा बापु गोखल्या संभाळ कासोटा ’ ही सर्वप्रसिद्ध आर्याही बापु गोखल्याच्या पंक्तींत तरुण मुलें ह्मणत; पुण्याच्या तुळशीबागेंतल्या राममूर्तीवरची ‘ श्रीरामाच्या मूर्ती तुळशीबागेमध्यें सदा रमल्या ’ हीही आर्या पंतांनीं प्रसिद्धीस आणलेल्या आर्यावृत्तांतच झाली. ‘ ओवी ज्ञानेशाची किंवा आर्या मयूरपंतांची ’ हा सर्वसंमत झालेला अभिप्राय ही पंतांच्या जिवंतपणींच त्यांच्या पुढें येऊन पडला होता. पंतांच्या मागून आर्यावृत्तांत अनेक कवींनी कविता केली आहेच, पण त्यांच्या आर्यावृत्ताचें अनुकरण करून त्यांच्या कित्येक भक्तांनीं त्यांच्याच आर्यावृत्तांत त्यांना पत्रेंही पाठविलीं आहेत ! आपल्याच कविता घेऊन आपल्यापुढें हरिदास कीर्तन करीत आहेत व सर्व लोक त्या कवितेचा प्रेमपुरस्सर आदर करीत आहेत हें पाहण्याचें भाग्य पंतांचें होतें. त्यांच्या आर्येशिवाय कीर्तनाला रंग भरेनासा झाळा अशी स्थिति त्यांच्याच हयातींत झाली होती. कवीची त्याच्या ह-.तींत इतकी चहा झाल्याचीं उदाहरणें आपल्या इकडे तरी थोडींच सांपडतील.

२. इंग्रजी झाल्यापासून ही मोरोपंतांच्या कवितेची प्रसिद्धी फार ज्ञपाख्यानें झाली आहे व पंतांचा भक्तवर्गही मोठा झाला आहे. पंतांच्या एकट्या केकावलीवर टीपा देऊन पांच सहाजणांनीं ती छापून काढली आहे. केकावलीवर एक संस्कृत टीकाही माझ्या पहाण्यांत आहे. माधवचंद्रोबाच्या र्वसंग्रहांत प्रथम पंतांची कविता बहुतेक छापून निघाली, नंतर तेंडुलकरीं ‘ मयूर कवि ’ या मासिक पुस्तकांत, कै० ज० बा० मोडक यांनीं ेतिहाससंग्रहांत, व वामनरावजी ओक यांनीं काव्यसंग्रहांत थोड्याबहुत ारांनीं व थोडींबहुत प्रकरणें कमजास्त घालून ती पुन्हां छापली. अद्याप ो पांच हजार कविता अप्रसिद्ध आहे व सुमारें दहा हजार कविता काबुडाल्यासारखी दिसते. पंतांची कविता छापण्याचें कामही विद्वान् केलें आहे व पंतांचे भक्तही नामांकित विद्वान् मंडळींत होऊन गेले. ांडुरंग, विठोबा आण्णा कऱ्हाडकर, परशुरामपंत तात्या गोडबोले, ळाजी मोडक, शंकर पांडुरंग पंडित, विष्णुशास्त्री चिपळोणकर, ल्हार हंस, हरि माधव पंडित, राजारामशास्त्री भागवत व वाअसले भक्त ज्या मोरोपंतांच्या कवितेला मिळाले तिचे गुणेकोत्तर असले पाहिजेत आणि ते तसे आहेतही. आज

दीडशें वर्षांत मोरोपंतांची कविता प्रेमानें व रसिकपणानें वाचणारे हजारों वाचक होऊन गेले. तेव्हां बाबा पाध्ये यांनीं भविष्य केल्याप्रमाणें पंतांच्या कवितेला वावरायला हें जगतीतल पुरेनासें झालें आहे व तिचा उत्कर्षही उत्तरोत्तर अधिक होणार यांत तिळमात्र शंका नाहीं.

३. पंतांच्या कवितेचे दूषकही त्यांचेच वेळीं तयार झाले होते. त्यांचा भक्त रामचंद्र बडवे यानें ‘ कठिण ग्रंथ ह्मणुनि या आर्यांतें निंदिती न सुकवी ते ’ याप्रमाणें या दूषकांच्या मुख्य आक्षेपाचा उल्लेख केला आहे. पंतांची कविता दुर्बोध आहे, व संस्कृत शब्दप्राचुर्यामुळें ती क्लिष्ट झाली आहे, हा पंतांच्या कवितेवर सर्व दूषकांचा मुख्य आक्षेप आहे. बाकीचे आक्षेप इंग्रजी झाल्यानंतरचे इंग्रजी कविता वाचणाऱ्या पंडितांचे आहेत. ते फारच विलक्षण आहेत. मोरोपंत मुळींच कवि नव्हते इतकेंच काय पण तादृश रसिकही नव्हते; ते केवळ भाषांतरकार होते; ‘ कांहीं तरी लिहावें, मात्र [illegible]
यमक साधले ह्मणजे झालें; किंबहुना मात्रा, यमक व अप्रासि आपली कविता केवळ
तच्च कायतो रस आहे असें त्यांला वा[illegible] स्तुतीसाठीं नाहीं इतकेंच काय पण
वळ कीर्तीसाठीं [illegible] ‘ राधाप्राप्त्यर्थ जसा ’ अशा आर्यांत
ईश्वरभक्ति त्यांचे मनांत असती तर
त्यांच्या तोंडून निघाल्या नसत्या; त्यांनीं फार गर्वोक्ति प्रकट केली आहे
यावरूनही त्यांचे ठिकाणीं भक्ति दिसत नाहीं; त्यांनीं आपल्या यजमानाच्या
स्तवनाप्रीत्यर्थ साऱ्या ४१९ च आर्या लिहिल्या आहेत यावरून त्यांचेठायीं
कृतज्ञताही नव्हती; परमेश्वर व भक्त यांतलें महदंतर लक्षांत न घेतां त्यांनीं
देवाशीं फार फाजील सलगी व लगट केली आहे वगैरे अनेक अक्षेपांचे भडिमार बिचाऱ्या कवीवर व त्याचे कवितेवर इंग्रजी पंडितांनीं केले.

४. यांपैकीं बरेच आक्षेप अपाप नाहींसे झाले आहेत, कांहीं आक्षेपांचें निबंधमालाकार व हंस यांनीं आपापल्या निबंधांत उत्कृष्ट खंडन केलें आहे व कांहीं आक्षेप पंतांची कविता वाचल्याबरोबर नाहींसे होणार आहेत. एक क्लिष्टतेचा आक्षेप मात्र अंशतः कबूल करावा लागणार आहे. मोरोपंत मोठे भगवद्भक्त होते ही गोष्ट त्यांची कविता व चरित्र यांची अंमळ ज्याला माहिती आहे त्याला सांगायला नकोच. त्यांनीं आपली कविता मुख्यत

१ विविधज्ञानविस्तारकर्ते, कै० माधवराव रानडे, कृष्णशास्त्री चिपळोणकर वगैरे.

' वाङ्मन पूत कराया ' केली आहे. आपलें ' तनुवाक्कर्ममनःपाप सर्वथा हरण ' व्हावें, चित्तशुद्धि होऊन आपण भगवत्प्रसादाला पात्र व्हावें यासाठीं ईश्वरीलीला-वर्णन करण्यांत त्यांनीं आपली वाणी खर्चिली आहे. कीर्तीची अपेक्षा त्यांना नव्हती असें नाहीं. ' मद्ग्रंथ असावा बहुमत ' असें त्यांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे. पण कीर्तीसाठीं, ग्रंथ लिहिणें हा कांहीं दोष नाहीं. मम्मटानें काव्य रचनेचे हेतु ' काव्यं यशसेऽर्थकृते ' या श्लोकांत सांगितले आहेत त्यांत यशःप्राप्तीची वांछा हा पहिला हेतु दिला आहे. त्यांनीं कीर्तीसाठीं कविता केली असें गृहीत धरिलें तरी पंतांवर दोषारोप होत नाहीं. वस्तुतः त्यांचा मुख्य हेतु यशःप्राप्तीचा नसून ईश्वरप्राप्तीचा होता. पंतांच्या रसिकतेबद्दल शंका घेणें वेडेपणाचें आहे. पंता इतका रसिक कवि विरळाच सांपडेल. त्यांचीं काव्येंच त्यांच्या श्रेष्ठ रसिकत्वाची साक्ष देतील. पंत भाषांतरकार होते हाही आक्षेप असाच चमत्कारिक आहे. त्यांनीं रामायण, भारत व भागवत हे ग्रंथ मूळांस धरून केले आहेत तरी ते स्वतंत्रबुद्धानें रचल्यासारखे मनोवेधक व रसाळ उतरले आहेत. ठिकठिकाणचीं वर्णनें, कल्पना, अलंकार, अर्थांतरन्यास, विस्तारसंक्षेपकुशलतेनें मुख्य कथाभाग सरस होण्यासाठीं केलेलीं वर्णनें, वगैरे प्रकार अशा चातुर्यानें, सफाईनें व रसिकपणानें प्रस्तुत कवीनें प्रत्येक ग्रंथांत साधले आहेत कीं त्याला निव्वळ भाषांतरकार ह्मणणें ह्मणजे मोठें अरसिकपणाचें लक्षण होय. कांहीं प्रसंगीं मूळ संस्कृत श्लोकांचीं निव्वळ भाषांतरें त्यांनीं वठविलीं आहेत खरीं, पण तीं इतकीं उत्तम भाषांतरें झालीं आहेत कीं भाषांतरकार हा या पुरता तरी पंतांचा मोठाच गुण वानिला पाहिजे असें मी ह्मणतों. पंत देवाशीं सलगी करितात हा एक आक्षेप त्यांच्या भक्तिपर कवितेवर आहे. यासही उत्तर सोपेंच आहे. पंतांचे जे धर्मविचार होते तेच त्यांच्या काव्यांत उतरले आहेत, हें साहजिक आहे. वाचकाचा धर्म किंवा धर्मविचार कवीचा धर्म व धर्मविचार याहून जेव्हां भिन्न असतील तेव्हां कवीचें मर्म समजण्या पुरता वाचकानें आपला धर्म बाजूला ठेवला पाहिजे. पंताचे धर्मविचार महाराष्ट्रांतल्या भागवतधर्मास उर्फ भक्तिपंथास अगदीं धरून आहेत. पंत पूर्ण भागवतधर्मानुयायी होते. ते रामोपासक होते तरी उपास्यामध्यें एकात्मता आहे असें त्यांची श्रद्धा होती. राम, कृष्ण, विष्णु, शिव, विठ्ठल, व्यंकटेश, गणपति, देवी इ० कोणत्याही देवतेच्या नांवानें त्यांनीं स्तोत्रें व स्तवनें केलीं

असलीं तरी तीं सर्व रामालाच पावत अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. पंत अद्वैतमतानुयायी होते तरी सगुणोपासक होते; ते भागवतधर्मसांप्रदायी होते तरी कर्मनिष्ठ होते. तीर्थें, क्षेत्रें, संतमहंत, जयंत्यादि पर्वें, संध्यावैश्वदेवादि नित्य कर्में व श्राद्धपक्षादि नैमित्तिक कर्में यांवर त्यांचा पूर्ण विश्वास होता; हीं सर्व चित्तशुद्धीचीं साधनें म्हणून त्यांनीं या सर्वांचा जन्मभर आदर केला होता. पंतांचे धर्मसंबंधी आचारविचार या प्रकारचे होते. एखाद्या वाचकाचे धर्मविचार याहून भिन्न असल्यास त्यानें पंतांचीं काव्यें वाचतांना ते दूरच ठेविले पाहिजेत, एरवीं त्यास त्यांच्या कवितेचें रहस्य कळणार नाहीं व रसानुभवही होणार नाहीं.

९. पंतांच्या कवितेवर आलेल्या दूषणांचें सविस्तर खंडण करण्याचें हें स्थळ नव्हे म्हणून त्याबद्दल येथें कांहीं अधिक लिहीत नाहीं. फक्त दुर्बोधत्वाचा मात्र थोडा विचार करितों. ‘ माझ्या कवितेला प्राकृत म्हणून हंसणारे कांहीं अतज्ज्ञ पुरुष आहेत, ’ असें पंत एकदां ह्मणतात; व ‘ ती संस्कृतप्राकृतमिश्रित असल्यामुळें गीर्वाणशब्दमय कंथा आहे असेंही ह्मणणारे कांहीं पुरुष आहेत ’ असें दुसऱ्यांदां ह्मणतात. ह्मणजे एकीकडे जुने संस्कृताभिमानी व प्राकृतविद्वेषी पंडित, व दुसरीकडे केवळ प्राकृताभिमानी अशा दोन प्रकारच्या लोकांचा पंतांवर कटाक्ष होता. पहिल्या वर्गास जुन्या मराठी कवींप्रमाणें पंतांनीं उत्तर दिलें आहे; “ गोक्षीर स्वर्णपात्रांतून प्यालें काय, आणि पलाशद्रुमदलपटलांतून प्यालें काय, सारखेंच गोड लागतें; दिवा सुवर्णपात्रांत लावला काय, आणि विरूपशा खापरींत लावला काय, तो सारखाच प्रकाश देतो. ज्ञान, आनंद व परमार्थ कोणत्याही भाषेच्याद्वारें प्राप्त झाले तरी सारखेच. भाषाभिमान सोडून सुज्ञानें अर्थाकडे दृष्टि द्यावी. ” दुसऱ्या वर्गास पंतांनीं उत्तर दिलें आहे; “ संस्कृतभाषेंत शब्दभांडार फार मोठें आहे. मराठी भाषा अद्याप तितकी संपन्न झाली नाहीं; मी नाइलाजानें संस्कृत शब्दांची योजना करीत आहें. माझ्या संस्कृत प्राकृतमिश्रित कवितेची तुह्मीं गुणज्ञ हळू हळू गोडी घ्यायला लागलां ह्मणजे कालांतरानें तुह्मांस तिचा परिचय होऊन ती कठीण वाटणार नाहीं व प्राकृत भाषाही येणेंकरून सर्वांगपुष्ट होईल. ” पंतांचीं हीं उत्तरें समर्पक नाहींत असें कोण ह्मणेल ? पंतांची कविता अगदीं असंस्कृत मनुष्यास संस्कृतशब्दप्राचुर्यामुळें अंमळ क्लिष्ट वाटेल यांत संशय नाहीं. तथापि बेताबाताची व्युत्पत्ति, थोडेंसें

संस्कृताचें ज्ञान, व खरी रसिकता अंगीं असल्यास पंतांच्या कवितेची गोडी कोणासही लागेल असें मला वाटतें. पण दूषकांनीं खालील गोष्टीचा विचार करावा ह्मणजे पंतांना ते दोष द्यायला तयार होणार नाहींत. भाषाभिवृद्धि जी होत असते ती भाषेंत आहेत एवढ्याच शब्दसमूहावर व रचनाविशेषांवर अवलंबून राहून होणार नाहीं. खजिन्याची वाढ होते ती त्यांत निरनिराळीं नाणीं, ठिकठिकाणचें जवाहीर, देशोदेशींच्या अमूल्य चिजा येऊन पडल्याशिवाय किंवा आणून टाकल्याशिवाय कशी होणार ? नवीन नवीन वस्तु प्रथमदृष्टीला अपरिचित भासतात, पण नित्य परिचयानेंच त्यांचें परकीयत्व नाहींसें होतें. संस्कृतभाषा शेंकडों शतकांची कमावलेली भाषा होय ! तिच्या मदतीनें ज्या मराठी कवींनीं मराठी भाषा संपन्न करण्याचा अचाट उद्योग केला त्यांच्या उपकारभाराखालीं तर आपण वांकून जायला पाहिजे. पण आपणच जेव्हां त्यांवर घसरतों तेव्हां आपल्या कृतज्ञताबुद्धीस काय ह्मणावें ? संस्कृत भाषेंतलें शब्दभांडार; अलंकार, वृत्तसंख्या, विविधरस विविध तऱ्हेनें वर्णन करण्याच्या तऱ्हा, वगैरे प्रकार मराठींत आणून तिला अभियुक्त भाषेची योग्यता आणण्याचा उपक्रम वामनादि कवींनीं केलाच होता. हाच क्रम पुढें चालवून मोरोपंतांनीं मराठी भाषेला उत्तम प्रकारें सजवून तिची योग्यता फार वाढविली. संस्कृत शब्द, संस्कृत भाषाप्रकार, संस्कृतांतले अलंकार, वृत्तें व रस मराठींत आणण्याचा महदुद्योग करीत असतां क्वचित्प्रसंगीं पंतांच्या कवितेला क्लिष्टता आली आहे खरी; पण पंतांच्या कवितेंतला बहुतेक भाग अतिशय सोपा, सरळ व प्रासादिक आहे. पंत मोठे पंडित, मोठे रसिक व भगवद्भक्त असल्यामुळें पंडित, रसिक व भगवद्भक्त या तीनही प्रकारचे लोक त्यांच्या कवितेंत रमतील असा तिचा परिपाक उत्कृष्ट उतरला आहे. यमकानुप्रासांचे चमत्कार पाहून कित्येकांस असें वाटतें कीं, हा एवढा उपद्व्याप करायला पंतांना फार श्रम पडले असतील, व असे श्रम करून रचलेल्या काव्यांत प्रसाद कोठून येणार ? पंतांना प्रथम प्रथम यमकरचना साधतांना कदाचित् थोडेसे आयास पडले असतील, पण एकदां यमकरचनेची हातोटी साध्य झाल्यावर त्यांना या बाबतींत कांहीं श्रम पडत असतीलसें बिलकूल वाटत नाहीं. शिवाय त्यांचें विस्तृत वाचन, लेखन व अवलोकन हीं लक्षांत आणलीं ह्मणजे त्यांच्या यमकानुप्रासांच्या बाबतींत त्यांस जे श्रम पडले असतील ते ‘ हत्तीस आपल्या शुंडादंडावर पुष्पमाला खेळवि-

ण्यास जितके पडतात त्याहून यत्किंचित्‌ही अधिक नसतील !' प्रपंचांतल्या अनेक अडचणी संभाळून व आपलें नित्यकर्म आटोपून बैठकीला दोन दोनशें आर्या सहज रचणाऱ्या पंतांना काव्यरचना फार सुलभ झाली असली पाहिजे. त्यांचे ग्रंथ वरचेवर मार्मिकपणें वाचणाऱ्या रसिकाच्या हें लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं कीं कथावर्णनौघांत पंतांची लेखणी झपूझप् चालते. त्यांची बहुतेक कविता सहज "लिहिली होती, तीही लिहितां लिहितां क्षणांत योजूनी." काव्यरचनेस मांडी घालून बसल्यावर पंतांची लेखणी त्यांना प्रसंगीं अनावर होत असे ! पंत जाडे पंडित व स्मरणशक्तीचे मोठे घड असल्यामुळें त्यांना ज्या गोष्टी सहज लीलेनें साधत त्या व्युत्पत्तिहीन व संस्कारविहीन पुरुषाला श्रमसाध्य वाटतात ! तानाजी मालुसऱ्याला मोठमोठाले जड पदार्थ जसे फुलासारखे इकडून तिकडे ठेवतां येत, किंवा नाना फडणीसाला राज्यकारभारांतलीं लहान मोठीं कामें जातीनें पाहतांना बुद्धिबळें खेळणाऱ्या खेळाडूपेक्षां ज्यास्त त्रास घ्यावा लागत नसे, त्याप्रमाणें आमच्या भाषादेवीच्या राज्यांतल्या या कसलेल्या मल्लाला यमकानुप्रासांचे चमत्कार किंवा अष्टोत्तर शतरामायणांचे अद्भुत प्रकार हे नित्यपाठांत पडलेल्या कसरतीच्या सहज खेळासारखें परम सुकर होते. आक्षेपक आपल्या कुवतीवरून ठरवितो कीं संस्कृतशब्दप्रचुर, रसालंकारमय, विविधवृत्तघटित व शब्दचमत्कारवती अशी पंतांची कविता कवित्वाचा सहजोद्रेक नव्हे व जेथें श्रमसाध्यता आली तेथें प्रसाद कोठला ? रसिकत्व कोठलें ? व ती कविता तरी कसची !

६. पंतांच्या कवितेवर जीं दूषणें आलेलीं आहेत, तीं सर्व घालविण्याचा एक सुलभ उपाय आहे. हीं दुषणें बहुधा अज्ञानानें व गैर समजुतीनें आलेलीं आहेत. माझी अशी खात्री आहे कीं जे लोक पंतांच्या कवितेला नाक मुरडतात त्यांना तिच्यांतले सरस, सरळ व उत्तम भाग काढून दाखविले तर ते पंतांचे परम भक्त बनतील व परशुरामपंत गोडबोल्याप्रमाणें पंतांची थोडी तरी कविता प्रत्यहीं वाचल्यावांचून त्यांच्याच्यानें राहवणार नाहीं ! पंतांच्या कवितेचे जे स्वभावगुण आहेत तेच त्यांचें चित्त वेधतील. गोल्डस्मिथ कवीनें आपल्या ग्रामस्थ धर्मोपदेशकांविषयीं म्हटलें आहे कीं 'जे त्याची टर उडवायला आले ते त्याचे स्तुतिपाठक बनले.' अशीच पंतांच्या कवितेविषयीं दुराग्रह बाळगणाऱ्यांची अवस्था होईल. तेव्हां पंतांच्या कविता कमलिनीव-

रचें दुराग्रहरूप अभ्रपटल काढून टाकायला व तिची निसर्गरम्यता प्रकट-करायला तिच्या सुगुणसूर्याचा उदय झाला ह्मणजे झालें.

७. कोणताही कवि घेतला तरी त्याची सर्वच कविता सारखीच उत्तम असते असें नाहीं. त्यांत कांहीं भाग अधिक सरस, सरळ व सुबोध असतात. आणि मोठमोठालीं विविध काव्यें ज्यांनीं रचिलीं त्यांच्या काव्यांत तर अशी निवडानिवड करायला पुष्कळच सवड असते. पंतांनीं एका पत्रांत आपल्या स्नेह्यांस लिहिलें आहे. ' वर्षाकाल आला, आळस आला. काव्य राहिलें, वर्षाकाळीं असें बुद्धिमांद्य किंचित् येतें. ' यावरूनच कवीची प्रतिभा सर्वकाळ व सर्वप्रसंगीं सारखीच उज्ज्वल राहते असें दिसत नाहीं. मिल्टन् कवीची अशीच गोष्ट आहे. ज्या वेळेस त्याची प्रतिभा उज्ज्वल होई त्या वेळेस तो उपवनांत आपल्या मुलींस घेऊन जाई व मग त्यांचे तोंडून भराभर ज्या कविता येत त्या त्या लिहून घेत. तसेंच जे प्रसंग किंवा ज्या व्यक्ति कवीला विशेष प्रिय असतात त्यांच्या गुणवर्णनप्रसंगी त्यांची लेखणी जलद चालते. रामगुणवर्णनाचा प्रसंग आला कीं, पंतांचें हृदय प्रेमानें भरून येई. असो. तर मोठ्या कवीच्या काव्यांतले वेंचे काढायला सवड असते हें उघड झालें. पंतांच्या काव्यांतले असे सुंदर वेंचे काढले तर त्यांचा कवित्व-गुण अधिक प्रकट होईल, दूषकांचेंही चित्त त्यांकडे वेधेल, व त्यांच्या कवितेविषयींची भक्ति अधिक वाढून तिचा प्रसार अधिक होईल, असें वाटून हें काम मीं अंगावर घेतलें.

८. मोरोपंतांची पाऊण लाख कविता अनेक व्यवसायांमुळें व अनेक अडचणींमुळें वाचायची ज्यांना सवड नाहीं, पण ती थोडीबहुत वाचायची हौस आहे, असे हजारों वाचक महाराष्ट्रांत आहेत. अशांच्या सोयीकरितां प्रस्तुत सारख्या ग्रंथाची अवश्यकता आहे. तरुण विद्यार्थ्यांच्या हातांत प्रस्तुत ग्रंथ पडला तर त्यांना धर्मनीतिव्यवहाराचा उपदेश मिळून रसिकपणानें कविता वाचायची गोडी लागेल व ' नदीमुखेनैव समुद्रमाविशत् ' या न्यायानें मराठी कवितार्णवांत संचार करण्याची त्यांना प्रेरणा होईल. इंग्रजीकवितेचे इंग्लंडादि पाश्चात्य देशांत असे वेंचे काढून ते तरुणांच्या हातीं देण्याची चाल आहे. वर्ड्स्वर्थ, बायरन वगैरे कवींच्या कवितेचे असे वेंचे काढलेले आहेत. शेक्स्पीअरच्या कवितेंतलीं सुंदर स्थळें हें पुस्तक पुष्कळांच्या पाहण्यांत किंवा ऐकण्यांत असेलच. वेंचे काढण्याचें काम बरेंच कठीण आहे. कमलवनांत

शिरणारा रसिकसर्वच कमळें पाहून हर्षित होतो व त्यांतलीं कितीही कमळें घेतलीं तरी तीं थोडींच, असें त्यांस होऊन जातें. तशीच स्थिति कांहीं अंशीं वेंचे काढणाराची होते. मोरोपंतांच्या कवितेंतले जे वेंचे काढले आहेत त्या शिवायही त्यांत पुष्कळ सुंदर स्थळें आहेत. ाण कवीच्या वर्णनचातुर्याचे अनेक प्रकार वाचकांपुढें ठेवण्यासाठीं प्रत्येकाचे ासले काढले आहेत. शिवाय पुस्तक फार विस्तृत होऊं नये व प्रत्येकाला तें घेतां यावें यासाठीं वेंचे वेताचेच काढले आहेत. पण 'शितावरून भाताची रीक्षा,' या न्यायानें या पुस्तकावरून मोरोपंतांच्या कवितेची योग्यता लोकांच्या निदर्शनास चांगलीच येणार आहे. प्रस्तुत पुस्तकाची एकेक प्रत महाराष्ट्रांतील प्रत्येक कुटुंबांत असावी व स्त्रीपुरुषवृद्धबाल या सर्वांच्या ती वाचण्यांत यावी, असा माझा फार हेतु आहे, तो सफल करणार श्री भगवान् रामचंद्र समर्थ आहे.

३.

९. प्रस्तुत प्रसंगीं काव्यशास्त्राचा स्वतंत्रपणें अंमळ विचार करणें जरूर दिसतें. मराठी भाषेंत काव्यशास्त्रावर अगदीं स्वतंत्र असा एकही ग्रंथ झालेला नाहीं. कविता हें एक शास्त्र आहे हीच गोष्ट फार थोड्या लोकांना [illegible] आहे. मात्र हें शास्त्र फार सूक्ष्म विचाराचें व रसिकैकगम्य असल्यामुळें [illegible] हवें त्याला मत द्यायचा अधिकार नाहीं. या शास्त्राचा स्वतंत्रपणें विचार पु[illegible] कधीं स्वतंत्र ग्रंथांत करण्याचें माझे मनांत आहे. प्रस्तुत या विषयासंबंधानें कांहीं स्थूल गोष्टी वाचकांस सांगणें अवश्य वाटतें. कवितेची महती, कवितेचें लक्षण, उत्कृष्ट कवीला अवश्य लागणारे गुण, कवितेचे वर्णनीय विषय, काव्यरचनेचे सर्वसाधारण हेतु वगैरे महत्त्वाच्या उपविषयांचा विहंगमदृष्टीनें येथें विचार करण्याचें मीं योजिलें आहे.

१०. काव्य हा शब्द कानीं पडतांच मनुष्याच्या मनांत येतें कीं हा हृदयवृत्तींचा विषय आहे. काव्य प्रसवणारा कवि व काव्यरसास्वाद घेणारा रसिक या दोघांच्याही हृदयवृत्ति अत्यंत प्रबळ असतात. सागरास भरती येतांच ज्याप्रमाणें त्याच्या पर्वतप्राय लाटा किनाऱ्यावर येऊन आदळतात, त्याप्रमाणें कवीच्या हृदयवृत्ति खवळल्या कीं त्यांचा स्फोट होऊन त्या काव्यरूपानें बाहेर पडतात. क्रौंच-मिथुनाचा सुखभंग करणाऱ्या निषादास पाहतांच दया व क्रोध या वृत्तींच्या वादळानें खळबळून वाल्मीकीचा हृदय-

सागर उचंबळला व जगतास आदिकाव्याचा लाभ झाला! महत्काव्यें हीं कविहृदयसागरांतलीं उत्तमोत्तम रत्नें आहेत व मानवजातीचा लाभकाळ आला कीं तीं तिला अपाप प्राप्त होतात. हृदयवृत्ति प्रत्येक मनुष्यांत आहेत. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं कवि व रसिक हे अत्यंत दुर्मिळ आहेत. 'कवितारस मनांत झडकरि यावा । पुण्याचा ठेवा ।' हे रसिककविवर रामजोशांचें ह्मणणें खरें आहे. कवीश्वर बाह्य उपचारांनीं बनत नसतो, तो जन्मावा लागतो. प्रत्येक कवि रसिक असतो, पण प्रत्येक रसिक मात्र कवि नसतो. कवि हा कवितेचा जनक होय, रसिक हा तिचा उपभोक्ता होय. ऐहिक वस्तूंवर किंवा क्षुद्र फायद्यावर नजर ठेवून छंदोबद्ध कविता करणारे क्षुल्लक कवि शेंकडों असतात, पण दृश्यसृष्टीचा पूर्ण विसर पडून वर्ण्यविषयांशीं तादात्म्य पावणारे व आत्मरंगीं रंगणारे कवीश्वर फारच विरळ असतात. अशांच्या स्वैरालापालाच अमृत म्हणावें. काव्याला सर्व थोर पुरुष रस ह्मणतात. आणि खरोखरीच असा नितांत मधुर रस मृत्युलोकीं दुसरा नाहीं. सारस्वताच्या सर्व शाखांत काव्य हें अति प्राचीन, अति उदात्त, अति मोहक आहे. काव्य—मदानें तर्र झालेले पुरुष अत्यंत भाग्यशाली होत. काव्याचा ज्ञाता रसिक अत्यंत दुर्मिळ आहे. तरी काव्यांत अशी मोहनी आहे कीं अश्रेष्ठ व अत्यंत नीच, अत्यंत बुद्धिमान् व अत्यंत जड, अत्यंत सुधारलेला व अत्यंत रानटी—कसलाही मनुष्य असो, त्याला काव्यापासून आनंद होतो. दारिद्र्यदुःख विसरून काव्यरसांत निमग्न होणारा भारवि जसा कमलपत्रासन्निध सायंप्रभेंत काव्य गुणगुणतो तसा गुराखीही शेतांत वेडीं बोबडीं गाणीं गात तासचे तास आनंदांत घालवितो. जगांतल्या अनंत आपत्तींचें विस्मरण पाडण्याचें सामर्थ्य काव्यांत आहे. काव्य नित्य व्यवहारांतले श्रम हलके करितें. दळणवाल्या बायका पाहटेस जात्यावर गाणीं गातात. भाजीवाल्या माळणी डोक्यावर मोठमोठाले हारे घेऊन चार चार मैल गात नाचत जातात. त्यांचीं ओबडधोबड गाणीं त्यांचे श्रमपरिहार करितात इतकेंच काय, पण जाणाऱ्या येणाऱ्यांलाही तीं क्षणैक तल्लीन करितात. दुष्टाचा दुष्टपणा नाहींसा करण्याचें सामर्थ्य काव्यांत आहे. युरिपायडीज् नांवाचा एक विख्यात कवि ग्रीस देशांत होऊन गेला. सिसिलियन् लोकांनीं अथेन्सच्या लोकांचा युद्धांत पराजय केल्यावर त्यांना फार क्रूरपणानें वागाविलें व कित्येकांचें निरर्थक प्राणहि घेतले; पण युरिपायडीजच्या कवितेंतलें कांहीं भाग ज्यांना

मुखोद्गत होते त्यांना मात्र त्यांनीं वांचविलें व आपल्या मुलांना शिक्षक वगैरे नेमून त्यांचा थोडाबहुत गौरवही केला ! राष्ट्रीय वैराग्नि शमविण्याचें असें अद्भुत सामर्थ्य कवितेंत आहे ! यामुळें कवींची काव्यसंपत्ति हीं साऱ्या जगाची आहे. वाल्मीकिव्यासांचे ग्रंथ ख्रिस्ती राष्ट्रें व मुसलमान राष्ट्रेंही मोठ्या प्रेमानें वाचतात. शेक्स्पीअरचीं नाटकें आह्मीं मोठ्या आदरानें वाचतों. ज्या राष्ट्रांत कवि जन्मतो, त्या राष्ट्राचाच त्यावर हक्क असतो असें नाहीं, तर सर्व मनुष्यजातीचा त्यावर हक्क असतो. कवितादेवीच्या राज्यांत अवघ्या मनुष्यजातीचें एक राज्य समजलें जातें. उत्तम कवीचें मन देशकालादिकांनीं अपरिच्छिन्न असून ब्रह्मांडा एवढें विशाळ असतें. उत्तम काव्यें हीं महापुरुषांच्या बुद्धींत आविष्करून मनुष्यजातीच्या उन्नत्यर्थ जन्म घेतात. राष्ट्राला पडता काळ आला ह्मणजे संजीविनीमात्रा देऊन त्याचें पुनरुज्जीवन कोण करितें ? कवीच्या प्रतिभासंपन्न वाणीशिवाय असें सामर्थ्य अन्यत्र कोठें आहे ? ज्ञानेश्वर, एकनाथ, मुक्तेश्वर, तुकाराम, रामदास यांच्या पवित्र वाणीनें महाराष्ट्रभूमि शुद्ध झाली होती ह्मणूनच शिवाजीराजाला तींत स्वातंत्र्यवृक्ष लावतां आला. महाभारतांतल्या वीरांच्या कथा ऐकूनच शिवरायाला श्रेष्ठ कार्याची प्रेरणा झाली. बायरन् या इंग्रजी कवीची कविता वाचूनच ग्रीस, इटाली वगैरे देश अनेक शतकांच्या महानिद्रेंतून खडबडून जागे झाले व दास्यापासून मुक्त झाले. व्यवहार, राजकारण व परमार्थ या तीनही बाबतींत राष्ट्रांला पंक्तिप्रपंच न करितां उत्तम शिक्षण सर्वकाळ देणारे मनुष्यजातीचे खरे पुढारी कवीच होत. धर्मनीतींचीं श्रेष्ठ तत्त्वें सोपपत्तिक व सोदाहरण गोड वाणीनें मानवांना शिकविण्याचें महत्कार्य कवींवांचून कोणांसही करितां येत नाहीं. तत्त्वज्ञानीही सत्य वस्तूचेंच प्रतिपादन करितो, पण त्याला सत्यामृताची गोडी एकांतांत एकट्यालाच चाखावी लागते. कवि हा सत्याशीं—जसा मित्राशीं तसा—खेळतो, बागडतो; त्याच्या संगसुखानें आत्मरंगांत रंगतो, व त्याचीं गाणीं ऐकायला लक्षावधि लोक त्याच्या सभोंवार जमतात. तत्त्वज्ञानाला मोहक व रम्य पोषाख चढवून कवि जनांपुढें त्याला उभा करितो व जन त्याला भुलतात. कवि मिथ्या गोष्टी सांगत नाहीं. तत्त्वज्ञाप्रमाणें सत्य–प्रतिपादन हेंच कवीचें ब्रीद असतें, मात्र कडु औषध तूपसाखरेंत घोळून त्याची गोड गोळी करून बाळाच्या हातीं देणाऱ्या चतुर वैद्याप्रमाणें कवि सत्याला मोहक रूप देतो, कथावर्णनाच्या भरांत अलंकारांचा थाटमाट करितो, विविध रसवर्णनप्रसंगीं अद्भुत कल्पनाश-

क्तीनें व उज्ज्वल प्रतिभाप्रभेनें सम्यक् व प्रेमळ शब्दरचना करितो व अखिल जनांच्या चित्तवृत्ति आपणाकडे आकर्षून घेतो. असें अद्भुत सामर्थ्य काव्यांशिवाय इतर ग्रंथांत नसतें. ह्मणून काव्यांइतकी लोकप्रियता व जगदुपकारित्व इतर ग्रंथांत नसतात. व्यक्तीची, समाजाची, राष्ट्राची व मनुष्यजातीची उन्नत्ति कवींमुळें होते. कवींच्या वाणींत जी जादू भरलेली असते; जें माधुर्य, जो जोम, जो निश्चय, जी कार्यप्रवर्तकता, जो प्रसाद, जी प्रतिभा, जी ईश्वरी शक्ति असते, ती अन्य कोणत्याही ग्रंथकारांत नसते; ह्मणूनच काव्यांचें महत्त्व अनन्यसाधारण आहे. व्यास, वाल्मीकि, ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, रामदास, मुक्तेश्वर, मोरोपंत, शेक्सपीअर, डॉण्टी, व्हर्जिल, होमर, गेटी वगैरेंच्या काव्यग्रंथांनीं लक्षावधि लोकांना उच्चपदीं नेऊन बसविलें आहे. स्वतः कवि आपल्या काव्यरचनाप्रसंगीं तल्लीन होऊन जातात. इंग्रजी कवि कोलरिज् हा अगदीं खालच्या प्रतीचा कवि आहे. तरी आपली कविता प्रसिद्ध करितांना म्हणाला कीं, " या काव्यांच्या प्रसिद्धीपासून मी द्रव्याची किंवा कीर्तीची अपेक्षा करीत नाहीं. दोन्ही मला मिळालीं नाहींत तरी माझ्या श्रमाचा मोबदला मला मिळाला असें मीं समजतों. काव्यरचनेच्या व्यवसायांतच माझ्या सर्व श्रमांचें चीज झालें; त्यामुळें माझीं दुःखें सुसह्य झालीं, माझें सुख व आनंद वाढलीं, मला एकांताची गोडी लागली, अंतर्बाह्य सृष्टींत जें जें ह्मणून रम्य व उदात्त आहे त्याचा शोध करण्याची मला संवय लागली. " काव्यरचनेचा व्यासंग चित्तशुद्धीला फार पोषक आहे. " यांहीं माझें तनुवाक्कर्ममनःपाप सर्वथा हरलें " असें मोरोपंतांनीं म्हटलें आहे. त्यांनीं व इतर कित्येक कवींनीं ' वाङ्मन पूत कराया ' काव्य रचना केली आहे. काव्यवाचकांची हीं अशीं काव्यें वाचल्यापासून चित्तशुद्धि झाल्याशिवाय रहात नाहीं. कवींची व काव्यांची योग्यता अशा अनेक कारणांमुळें फारच मोठी आहे. रामदास स्वामींनीं " कवि शब्दसृष्टीचे ईश्वर, कवि नानाकळांचें जीवन, कवि स्वधर्माचा आश्रय, कवि सृष्टीचा अळंकार " याप्रमाणें कवींचें यथार्थ वर्णन केलें आहे.

समर्थ आणखी म्हणतातः—

कवि देवाचे रूपकर्ते । कवि ऋषींचें महत्त्व वर्णिते ॥
नाना शास्त्रांचें सामर्थ्यांतें । कवि वाखाणिती ॥ १ ॥

कीं हे अमृताचे मेघ वोळले । कीं हे नवरसांचे वोघ लोटले ॥
नाना सुखांचें उचंबळलें । सरोवर हें ॥ २ ॥
कीं हीं सुखाचीं तारवें लोटलीं । अक्षय आनंदें उतटलीं ॥
विश्वजनांशीं उपेगा आलीं । नाना प्रयोगा कारणें ॥ ३ ॥
नसता कवीचा व्यापार । तरी कैंचा असता जगदुद्धार ॥
ह्मणोनि कवि हे आधार । सकळ सृष्टीसी ॥ ४ ॥

कवींची महती यापेक्षां अधिक चांगल्या तऱ्हेनें कोणांस वर्णितां येणार आहे? सुंदर कविता ही ज्ञानानंदजलानें संतत वाहणारी एक महानदी आहे. कविता ही प्रापंचिक दुःखें सुसह्य करिते; दुर्विकार नाहींसे करून मनुष्याला धैर्य, बळ, व निश्चय देते; उदात्त नीतितत्त्वें त्याला शिकविते; हृदयांत उदात्त व प्रेमळ मनोवृत्ति जागृत करून यच्चयावत् जीवसृष्टीवर प्रेम करायला लावते, जडाजड वस्तूंच्या सौंदर्याची अद्भुत गोडी घ्यायला शिकविते; श्रेष्ठ पुरुषांच्या चरित्रांची रहस्यें सांगून कृतार्थ होण्याचा ह्मणजे इहपर लोक साधायचा मार्ग दाखविते. कविता ही मनुष्याच्या वांट्याला आलेली अमृतसंजीविनी मात्रा आहे; ही अमृतवल्ली आहे; ही इहलोकीं अवतरलेली परमेश्वराची परमकृपा आहे. संसारातपतप्तांना ही कल्पवृक्षाची छाया आहे. 'सुकविता यद्यस्ति राज्येन किम्' असें जें भर्तृहरीनें ह्मटलें आहे तें किती खरें आहे! सामान्य जनांच्या कल्पनेप्रमाणें सर्वसुखांचें आगर काय तें राज्य, व मोठा भाग्यवान् व सुखी म्हणजे काय तो राजा! पण जगांतली सारीं सुखें जरी एकवटलीं तरी कवितारसानुभवापासून होणाऱ्या आनंदापुढें तीं तुच्छ आहेत असा वरील चरणाचा आशय आहे. काव्य हें परमानंदाचें मूळ आहे. व ईश्वरदत्त रसिकता जर हृदयांत असेल तर रंकापासून रावापर्यंत हवें त्याला या परमानंदाची गोडी चाखतां येण्यासारखी आहे. मात्र ती रसिकता खरी पाहिजे. खरी रसिकता अंगीं असली ह्मणजे उदात्त, पावन व उत्कृष्ट वस्तु तेवढ्याच आवडतात. रसज्ञाला कविता भारलल्या सृष्टींत नेते. तेथील सर्व वस्तु सौन्दर्य व सत्य या गुणांनीं युक्त अशा दिसतात. व त्यांच्या दर्शनानें चित्ताला जो अनुपम आल्हाद होतो त्याची बरोबरी कसलींही पार्थिव सुखें करूं शकत नाहींत. कवितारसांत निमग्न असणाऱ्या भाग्यवंताला 'पूर आला आनंदाचा। लाटा उसळती प्रेमाच्या' या तुकोबाच्या उक्तीचा अनुभव पदोपदीं येतो.

११. कवितेचें लक्षण काय ? अनेक साहित्यशास्त्रकारांनीं व कवींनीं काव्याचीं अनेक लक्षणें बांधलीं आहेत. ‘ गुणालंकारांनीं युक्त असे शब्दार्थ ह्मणजे काव्य ’ असें वामनाचें मत आहे; ‘ रमणीयार्थप्रतिपादक शब्द ह्मणजे काव्य ’ असें जगन्नाथाचें मत आहे; ‘ अदोष असून सगुण असे शब्दार्थ ह्मणजे काव्य ’ असें मम्मटाचें मत आहे ( त्याच्या मतें अलंकार शब्दार्थासह असतील वा नसतील; ) ‘ रसादिमत् वाक्य ह्मणजे काव्य ’ असें शौद्धोदनीचें मत आहे; ‘ ध्वन्यात्मक वाक्य ह्मणजे काव्य ’ असें महिमभट्टाचें मत आहे. याप्रमाणें संस्कृत साहित्यशास्त्राकारांपैकीं कांहीं प्रसिद्ध पंडितांनीं काव्याचीं लक्षणें बांधलीं आहेत. तथापि संस्कृत कवितेविषयीं विचार करितां ‘ रसात्मकं काव्यम् ’ ही व्याख्या बहुजनसमंत अशी दिसते. रस हा कवितेचा आत्मा आहे. छंद, गुण, दोष, अलंकार, वगैरे काव्यरूप देहाचे अवयव आहेत. शृंगारादि नवरसांपैकीं कोणताही एक प्रधानरस असून बाकीचे गौणरस तदंगभूत असले ह्मणजे काव्य होतें असा संस्कृत साहित्यशास्त्रकारांचा आशय दिसतो. मराठींत साहित्यशास्त्रावर स्वतंत्र ग्रंथ नाहीं तथापि मराठी कवितेचें एकंदर स्वरूप ध्यानांत आणून काव्याचें लक्षण मराठी काव्यानुरोधानें बसविणें कठीण आहे असें नाहीं. ‘ रूपीं जडलें लोचन । पायीं स्थिरावलें मन । देहभाव हरपला । तुज पाहतां विठ्ठला ’ अशी सर्वकाळ ज्यांची स्थिति असते त्यांचे सहजोद्गार ह्मणजे उत्तम ( प्रासादिक ) कविता होय अशी मराठी कवींची काव्यविषयक व्याख्या दिसते.

वैभव कांता कांचन । जयासी वाटे हें वमन ।
अंतरीं लागलें ध्यान । सर्वोत्तमाचें ॥ १ ॥
जो भगवद्भजनेंवीण । जाऊं नेदी एक क्षण ।
सर्वकाळ अंतःकरण । भक्तिरंगें रंगलें ॥ २ ॥

अशा प्रकारच्या पुरुषांचें ‘ भक्तीचें कौतुक ’ ह्मणजे उत्तम कविता असें कवितेचें लक्षण रामदासस्वामींनीं केलें आहे. ज्यांना ‘ राममय सृष्टी झाली ’ त्यांचे सहजोद्गार ह्मणजे प्रासादिक कविता असें समर्थांनीं काव्यलक्षण केलें आहे. त्यांनीं कवींचे तीन वर्ग केले आहेत. धीट कवि, पाठकवि, व प्रासादिक कवि, ‘ जें जें आपुल्या मनास आलें, दृष्टी पडलें तें शीघ्र वर्णिलें ’ असे जे कवि ते धीटकवि; व्युत्पत्तीच्या जोरावर काव्य करणारे ते पाठक-

वि. हे दोनी प्रकारचे कवि ' कामिक, रसिक, शृंगारिक, वीर, हास्य, प्रास्ताविक, कौतुक विनोद अनेक ' प्रकारचें वर्णन करणारे असतात, म्हणून यांना धीटपाठ कवि असें समर्थ म्हणतात. प्रासादिक कवि अर्थात् याहून वरच्या पायरीचे. ' भक्तिहीन जें कवित्व। या नांव ढोंगमत ' असा त्यांचा सिद्धांत आहे. एकंदरींत " ईश्वरनिष्ठ स्वानुभवी सत्पुरुषांचे स्वैरालाप म्हणजे उत्तम प्रासादिक कविता होय " असें मराठी कवींचें एकमत आहे. आतां इंग्रजी कवि कवितेचें लक्षण कसें बांधतात तें पाहूं. शेक्स्पीअर[1] यानें ' प्रतिभेच्या दिव्यतेजानें अदृष्ट वस्तूंचें चिंतन करितां करितां कवीनें त्यांना नांवरूप देऊन वर्णिलें कीं उत्तम काव्य होतें ' असें लक्षण केलें आहे. त्याच्या मतें प्रतिभावान् पुरुष म्हणजे कवि व प्रतिभाजन्य तें उत्तम काव्य. ' उत्शृंखळ वा प्रबळ होणाऱ्या मनोवृत्तींचा सहज स्फोट म्हणजे काव्य ' असें वर्डस्वर्थ कवि यानें काव्यलक्षण केलें आहे. ' मनुष्य समाजाच्या मूळाशीं असलेल्या नीतितत्त्वांचें उदाहरणांसह ज्यांत विवेचन केलें असतें तें काव्य ' असें लक्षण रसिक कवि आर्नाल्ड[3] यानें केलें आहे. ' थोर विभूतींच्या श्रेष्ठ व आनंदमय स्थितींतले उद्गार म्हणजे कविता ' असें काव्यलक्षण शेले[4] यानें केलें आहे. या चारही व्याख्यांचा विचार करितां शेक्स्पीअरनें प्रतिभेला, वर्डस्वर्थनें प्रबळ मनोवृत्तींना, आर्नाल्डनें नीतिकल्पनांना, व शेलेनें खुद्द कवी-

---

1 As Imagination bodies forth
The forms of things unknown, the poets pen
Turns them to shape and gives to airy nothing
A local habitation and a name.

—Shakespeare.

2 Poetry is the Spontaneous overflow of powerful feelings.

—Wordsworth.

3 Poetry is the criticism of life ( ie. of moral ideas ).

—Mathew Arnold.

4 Poetry is the record of the best and happiest
moments of the best and happiest minds.

—Shelley.

च्या आनंदमय वृत्तीला याप्रमाणें एकेकानें एकेका विशिष्ट गोष्टीला अधिक महत्त्व दिलें आहे.

१२. याप्रमाणें अनेकांनीं काव्याचीं अनेक लक्षणें बांधलीं आहेत. पण वस्तुतः तीं सारीं अंशतः मात्र खरीं आहेत. रसिक कवीच्या, भगवद्भक्ताच्या, किंवा प्रतिभावान् पुरुषाच्या चित्तवृत्तींची मीमांसा करणें जर शक्य असेल तर काव्याचें खरें लक्षण देतां येईल. खरें पाहिलें तर कविता हा विषय शास्त्रीय-विचिकित्सेचा नसून केवळ रसिकहृदयगम्य आहे. शब्दार्थालंकारांचे चमत्कार, रसवत्व, तन्मयत्व, प्रतिभावत्व हे सारे शब्द काव्याचें स्वरूप आपल्या मनांत आणतात; पण काव्याचें खरें लक्षण या सर्वांना व्यापून उरणारें आहे. ‘ लक्षणानें काव्याची मर्यादा संकुचित करूं पाहणें ह्मणजे आपल्या मनाचा संकुचितपणा दाखविणें आहे ’ असें जें डा. जॉन्सन यानें ह्मटलें आहे तें अगदीं यथार्थ आहे. कवितेच्या अनेक लक्षणांचा विचार केला तर असें दिसून येतें कीं एकाचें लक्ष प्रतिभेकडे किंवा काव्यशक्तीकडे असतें; दुसऱ्याचें शब्दार्थांकडे ह्मणजे भाषेकडे असतें, तिसऱ्याचें वर्णनीय विषयाकडे असतें; एकाच्या डोळ्यापुढें सृष्टिदेवता असते, दुसऱ्याच्या पुढें परमेश्वर असतो, तिसऱ्याच्या पुढें अनेक प्रकारच्या कामद्वेषादि वृत्ति, महत्त्वाकांक्षा, कर्तृत्व यांनीं खवळलेला मनुष्यप्राणी व मनुष्यसमाज असतो. काव्यदेवता ही सर्व काळीं व सर्व देशांत परिस्थित्यनुरूप वेष घेऊन क्रीडा करीत असतें. ती कधीं होमर किंवा व्यास यांच्या हृदयांत संचार करून शस्त्रास्त्रांच्या खणखणाटांत चमकते; कधीं शेक्स्पीअर, भवभूती किंवा मोरोपंत यांच्या बुद्धींत शिरून मनुष्यसमाजाचीं व व्यक्तींचीं भिन्न भिन्न रूपें पृथक्त्वानें वर्णिते; कधीं ज्ञानेश्वर, तुकाराम इत्यादिकांच्या जिव्हाग्रावर बसून परमेश्वराचे गुणानुवाद गाते; कधीं लहान लहान कवींच्या मनांत शिरून मनोरंजनपर व विनोदात्मक काव्यें निर्माण करिते; व कधीं कालिदास, मुक्तेश्वर, वर्डस्वर्थ यांच्या नेत्रांत बसून सृष्टिसौंदर्यानुभव घेते; कधीं जगन्नाथराय, रामजोशी व बायरन यांच्या चित्तांत शिरून रंगेल होते. कवितादेवी फार स्वच्छंदी आहे. ह्या त्या देशांत शिरून हवा तो अवतार तिला धारण करितां येतो. तिचा जन्म प्रतिभावान् रसिक कवीच्या हृदयांत असतो. प्रत्येक देशांतल्या चालीरीती, आचारविचार-धर्मकल्पना व एकंदर परिस्थिति ज्या प्रकारची असेल त्याप्रमाणें ती आपला वेष बदलते, पण सर्वकाळीं, सर्व देशांत, कवितादेवीचा आत्मा एकरूपच अ-

सतो. ती कधीं हंसेल, कधीं रडेल, कधीं वीरश्री दाखवील, कधीं गंभीर होईल, कधीं विनोदी असेल, कधीं स्थितप्रज्ञ योग्याप्रमाणें समाधिस्थ राहून परमेश्वरस्वरूपीं तल्लीन होईल, तर कधीं सामान्य चंचलचित्त विषयी पुरुषाप्रमाणें नानाविध सुखविलास उपभोगील. कोणत्याही वेषांत व वृत्तींत ती असली, तरी एकदां तिचा दाट परिचय झाल्यावर, तिला कोठेंही ओळखतां येईल. प्रतिभायुक्त रसिकता ज्याच्या जवळ असेल त्याच्याशीं ती दोस्ती करील; मनाचा कोमलपणा, प्रेमळपणा व उदात्त कल्पना हे गुण ज्याच्या हृदयांत नाहींत त्याच्या ती वाऱ्यालाही उभी राहणारी नाहीं. ती मोठी मानी आहे. सहजगुणांस तेव्हांच भुलते, वरपंगी डामडौलाचा तिटकारा करिते. तिला आराधनेनें वश करून घेणें सोपें नाहीं. ती दुराराध्य आहे. कवितादेवीची उत्पत्ति मनुष्याच्या हृदयांत आहे व मनुष्याला जोंपर्यंत हृदय आहे तोंपर्यंत तिचा नाश होणें शक्य नाहीं. तिचें स्वरूप इतकें मोहक आहे, तिची वाणी इतकी चित्ताकर्षक आहे, तिचें वशीकरणसामर्थ्य इतकें अप्रतिहत आहे, कीं अनुसूयेनें सीतेला दिलेला अंगराग जसा चिरकाळ ओला होता व तत्सौरभीं भ्रमरपंक्ति जशी सदैव लोला होती, त्याप्रमाणें तिचें माधुर्य चिरंतन टिकणारें आहे व तिला रसिकभक्तांची कधींही उणीव पडणार नाहीं. देश जसजसा सुधारत जाईल, नानाविधकलांची त्यांत प्रगति होत जाईल, व आधिभौतिक शास्त्रांचा जसजसा उत्कर्ष होत जाईल तसतसा कवितेचा ऱ्हास होत जाईल हें मत मेकॉले साहेबांनीं काढलें, व आमच्या निबंधमालाकारांनींही त्याचा अनुवाद केला आहे. वस्तुतः असें होणें दुरापास्त आहे. कवितेचा ऱ्हास एकदांच होईल आणि तो मनुष्याच्या हृदयांतल्या उच्चतम मनोवृत्ति ज्यावेळीं नष्ट होतील; कल्पकता, प्रतिभा, रसवत्ता, वगैरे गुण जेव्हां स्मृतिशेष होतील, तेव्हां कवितेचा लय होईल; आणि मला वाटतें असा दुर्धर प्रसंग मनुष्यावर युगक्षयाचे वेळीं मात्र येईल; तेथपर्यंत कवितेचें मनुष्यमात्रावरचें साम्राज्य व सत्ता इतर कोणत्याही शास्त्राला केव्हांही मिळणार नाहीं.

१३ कवितेचे वर्णनीय विषय कोणते असावेत याविषयीं आतां विचार करूं. कित्येकांच्या मतें हा विषय ऊहापोह करण्यासारखाच नाहीं. कवीची कल्पना जिकडे धांवेल तिकडे ती काव्यच प्रसवेल, ब्रह्मांडांतली कोणतीही वस्तु काव्यविषयक होऊं शकते, असें त्यांचें मत आहे. कवीची कल्पना स्वैरपणानें धांवेल तिकडे काव्यच प्रसवेल हें खरें, पण काव्यविषय ज्या योग्य-

तेचे असतात त्या योग्यतेची ती कविता गणायला पाहिजे. “ जें जें आपुल्या मनासि आलें । दृष्टी पडलें तें वर्णिलें ” अशा कवींना समर्थ खालच्या पायरीचे समजतात, तें अगदीं रास्त आहे. खरें काव्य आणि साधें पद्य यांतला भेद नीट लक्षांत ठेविला पाहिजे. ‘ उष्टया पत्रावळी करूनियां गोळा । कवित्वाची कळा दाखवीती ’ ‘ मोडुनि संतांचीं वचनें । करिती आपणां भूषणें ’ ‘घरोघरीं झाले कवि । नेणे प्रसादाची चवी ’ इत्यादि अभंगपादांत तुकोबांनीं ज्यांचा उल्लेख केला आहे अशा क्षुद्र पद्यकारांना कवि ही श्रेष्ठ पदवी वस्तुतः शोभत नाहीं, त्यांना हवें तर पद्यकर्ते ह्मणावे. अशा पद्यकारांचा सर्वकाळीं मोठा सुळसुळाट असतो, व सामान्य जनांना काव्यांचें खरें मर्म कळत नसल्यामुळें त्यांचीं भिकार पद्यें कधी कधी सुज्ञ लोकही काव्यांत गणतात. ज्यांच्या बुद्धींत प्रतिभा नाहीं, ज्यांच्या वाणींत प्रसाद नाहीं, ज्यांच्या हृदयांत प्रेम नाहीं, त्यांना कवि ही संज्ञा देऊं नये. **प्रसाद, प्रतिभा** व **प्रेम** या तीन लोकोत्तर गुणांनीं कवि होतो. कवीच्या अंगीं हे तीन गुण उपजत असतात, व ते अभ्यासानें वाढतात. पहिल्या प्रतीचे कवि हे लोकोत्तर पंडित असतात, त्यांचें वाचन व अवलोकन अत्यंत व्यापक असतें. काव्यादर्शकार दण्डी यानें ह्मटल्याप्रमाणें नैसर्गिकी प्रतिभा, बहुनिर्मल श्रुत व अमन्दाभियोग या तीन गुणसमुच्चयापासून काव्य होतें. मम्मट, विद्याधर वगैरे साहित्यशास्त्रकारांचेंही असेंच मत आहे. उत्कृष्ट कवीचें काव्यशास्त्राध्ययन व व्यवहारावलोकन अत्यंत विस्तृत असल्यामुळें या सर्व गुणांच्या मिश्रणापासून उत्कृष्ट काव्य निर्माण होतें. प्राचीन काव्यांत कवीचें मन मुरलेलें असतें. पूर्वी झालेल्या कवींच्या सत्काव्याशीं त्याचा दृढतम परिचय झालेला असतो, तीं काव्यें त्यानें ‘ विश्वासानें व आदरानें ’ वाचलेलीं असतात. उत्तम ग्रंथकार होण्यास प्राचीन वाङ्मयाचा निरंतर अभ्यास, सतत मनन व तदाकारवृत्ति हे गुण पाहिजेत. प्राचीन वाङ्मयरूप पवित्रनदीच्या प्रवाहाबरोबर पुष्पासारखें ज्याचें मन वाहवत जातें त्याच्याच मनबुद्धींत त्या वाङ्मयांतले गुण मुरतात व अशा प्रकारें त्याच्या वृत्तीला तन्मयता प्राप्त झाली कीं त्याच्या वाणींत प्रसाद येतो. उत्तम काव्यांत प्रसाद हा असायचाच. उत्तम कविता ही सूर्यप्रकाशाप्रमाणें स्वच्छ ह्म. उत्तानार्थ असते. ती जाणत्या नेणत्या सकळांना वाचतां वाचतां कळत जाते. शब्द अर्थानुयायी असतो. शब्दसौंदर्य, पदलालित्य हे गुण प्रसादाला अवश्य नाहींत, पण यामुळें प्रसादाची हानी होते असेंही नाहीं. ज्यांच्या हृदयांत उदात्त मनोवृत्ति प्रबळ होतात व ज्यां-

च्या वाणीला अभ्यासानें संस्कार झालेले असतात त्यांच्या वाणींत प्रसाद येतोच. त्यांच्या मनांतील अर्थ अनुरूप शब्दांनींच प्रकट होत असतो. कवीं-च्या हृदयांत उत्तानर्थ असेल तर 'वाचमर्थोनुऽधावति' या न्यायानें त्याला आधीं वाणी फुटते व अर्थ मागें धांवत येतो; त्याच्या वाणींत यामुळें-च 'पाकस्तु रसोचितशब्दार्थनिबंधनम्' या व्याख्येप्रमाणें उत्तम परिपा-क उतरतो. कवीचा दुसरा लोकोत्तर गुण ह्मणजे प्रतिभा हा होय. नवनवो-न्मेषशालिनी प्रज्ञा ह्मणजे प्रतिभा होय. वर्षाऋतूंत भूमींतून नवे कोंभ जसे बाहेर येतात, तसे नवे नवे उन्नत विचारतरंग प्रसविणारी बुद्धि ह्मणजे प्रतिभा होय. प्रतिभा ही फार दुर्मिळ आहे. शिवाजीसारख्या व्याप-कबुद्धीच्या थोर पुरुषांना ही प्रतिभा असते. कवीचें कार्य एकट्या प्रतिभेनेंच होत नाहीं. सत्कवीची प्रतिभा शुचि असायला पाहिजे. पवित्र सु-दर वस्तूंच्या उदात्त स्वरूपाला जी भुलते ती शुचि प्रतिभा. एखाद्या धनि-काची मर्जी संपादण्यासाठीं, वैर उगवण्यासाठीं, आत्मप्रौढी गाण्यासाठीं क्षुद्र विषयांचें क्षुद्र वर्णन ज्या काव्यांत केलेलें असतें तीं काव्यें शुचिप्रतिभेचीं फ-ळें नव्हत. सारे ऐहिक विचार व मनाचे यच्चयावत् पार्थिव विकार यापासून शुचि प्रतिभा फार दूर असते. शुचि प्रतिभा व्यासाच्या महामतीला आविष्क-रून भारतग्रंथ प्रसविते, वाल्मीकीच्या तपानें पावन झालेल्या दयार्द्र बुद्धींत शिरून श्रीरामलीला गाते; शुकाची ब्रह्मनिष्ठा, सीतेचें पातिव्रत्य, रामाचें सत्य-व्रत, श्रीकृष्णाची भक्तवत्सलता, भीष्माचा करारीपणा, हरिश्चंद्राची सोशिकता, परमेश्वराच्या अनंत अवतारांचीं अनंत पुण्यकृत्यें शुचिप्रतिभेला वर्णावीशीं वाटतात. कुत्रीं, मांजरें, आगगाडी, आगपेटी, केरसुणी, केश, नख, असले रु-क्ष व क्षुद्र विषय शुचिप्रतिभावान् पुरुष वर्णीत नाहीं. असल्या क्षुद्र विषयां-वरच्या पद्यांत प्रसंगीं मनोहारित्व, कल्पनाचातुर्य व थोडेंसें कवित्वही असे-ल, पण हीं पद्यें पहिल्या वर्गात घालण्याची कोणी हांव बांधणें योग्य होणार नाहीं. शुचि प्रतिभा ही अग्निसारखी दैदीप्यमान असते, वायूसारखी वेगवान् असते, जलासारखी निर्मल असते, ब्रह्मांडाएवढी व्यापक असते, यामुळें दि-व्य तेज, विलक्षण सामर्थ्य, पावनता व व्यापकता हे गुण तिच्यांत असतात-तिला दिव्य वस्तूंचेंच वर्णन करावेंसें वाटतें. प्रतिभावान् पुरुष लहान वस्तु तु-च्छ मानतो असें नाहीं. लहान वस्तूंतही शुचित्व, सौंदर्य व मनोहारित्व अ-सेल तर ती वस्तु सत्कवीला वर्णावीशी वाटतें. कोमल व मधुर फूल, व को-

मल आणि मधुर मूल यांचें गोड वर्णन कोणा प्रतिभावान् कवीनें केलें नाहीं? स्कॉटलंडांत बर्न्स नांवाचा एक लोकप्रिय कवि होऊन गेला. त्यानें 'डेसी' नांवाच्या फुलाचें सुंदर वर्णन केलें आहे. त्याच्या पानांत व पाकळ्यांत त्याला रत्नें दिसलीं, व त्या प्रेम व दया या सद्गुणांनीं व्याप्त आहेत असें त्याला वाटलें. सामान्य दृष्टीला नित्य परिचयामुळें जी वस्तु सामान्य दिसते त्याच वस्तूंत कविकल्पनेला अद्भुतपण दिसतें. अंतर्बाह्य सृष्टींतलें गुप्त सौंदर्य कविता प्रकट करिते. कवीच्या दृष्टीला अगोचर अशी वस्तु ब्रह्मांडांत नाहीं. रंगनाथ स्वामी म्हणतातः—

रवी दाखवी तें कवी पूर्ण जाणे। कवी दाखवी तें रवी तो न जाणे।
कवी तोचि रे जो रवीतें प्रकाशी। रवी लोपला पूर्ण ज्याचे प्रकाशीं ॥ १ ॥

१४. हें जरी खरें आहे तरी कवि काव्यविषयाची जी निवड करितो तीवरून त्याच्या प्रतिभेची किंमत करितां येते असें मला वाटतें. कवि हा ग्रीक लोकांच्या व्याख्येप्रमाणें कर्ता—करणारा, रचणारा, निर्माण करणारा—आहे. हें निर्मातृत्व ज्याचे ठिकाणीं नाहीं त्याचें नांव कविमंडळांतून बेलाशक काढून टाकावें असें अरिस्टॉटल व ड्रायडन म्हणतात. कवि हा निःसंशय निर्माता होय. तसाच तो द्रष्टाही आहे. ईश्वर व जीव या दोन्ही अवस्था एकसमयावच्छेदेंकरून पहाणारा महापुरुष कविच होय. हें द्रष्टेपण ज्याच्या अंगीं आहे त्या शुचिप्रतिभावान् कवीची साम्यता सामान्य पद्यकारांनाच नव्हे तर बऱ्याच कवींनाही ही येणार नाहीं. प्रतिभा हा शब्द जितका व्यापक आहे तितका तो सामान्य कल्पनेच्या आटोक्याबाहेरचा आहे. प्रसाद व प्रतिभा यांशिवाय तिसरा मोठा गुण सत्कवीजवळ असतो तो प्रेम होय. कविहृदय निरंतर प्रेमपूर्ण असतें. परमेश्वराविषयीं उत्कट भक्ति; स्त्रीपुत्रबंधुजनांविषयीं प्रेम, जीवमात्रांविषयीं प्रेम; सौंदर्य, सौहार्द व सत्य या गुणांविषयीं नैसर्गिक आदर; सृष्टींतली रम्यता जाणण्याइतकी रसज्ञता; हे सर्व प्रेमाचेच तरंग आहेत. ईश्वर, जीव व सृष्टि या तिघांविषयीं अतुल प्रेम सत्कवीच्या हृदयांत वागत असतें. आमच्या वेदांतमताप्रमाणें जीव व सृष्टि यांचा अंतर्भाव ईश्वरांत होत असल्यामुळें ईश्वरी प्रेमाचा उत्कर्ष सत्कवीच्या हृदयांत झालेला असतो. यासाठींच भगवद्भक्त कवींची सर्व कवींत श्रेष्ठत्वानें गणना आहे. भगवद्भक्ताला

सर्व जग ईश्वररूप भावत असल्यामुळें त्याला जीवाच्या आत्यंतिक हिताचा कळवळा येतो. तुकोबा म्हणतातः—

जग तरी आह्मां देव । परि हें निंदितो स्वभाव ॥ १ ॥

येतो हिताचा कळवळा । पडती हातीं ह्मणोनि काळा ॥ २ ॥

ढोंगी, लबाड नीच माणसांवर प्रहार उडवितांना सुद्धां कवीचें हृदय त्याविषयीं प्रेमपूर्ण असतें. कवीला सत्याची चाड असते, असत्याचा तिटकारा असतो. कवीला सद्गुण व सद्गुणी मनुष्यें यांजविषयीं सहजप्रेम वाटतें. खऱ्या कवीच्या बुद्धीची समता ढळत नाहीं, प्राणिमात्रांविषयीं त्याला समप्रेम असतें, त्याचे ठिकाणीं स्वपरभेद नसतो. स्वदेश, स्वभाषा यांविषयीं अभिमान बाळगून तो जागृत ठेवणारे कवि मोठ्याच पदवीचे असतात, पण ज्यांचा मानसार्णव देशकालादिकल्पनांनीं परिच्छिन्न नसतो ते कवि निःसंशय पहिल्या प्रतीचे होत. उत्तम कवि व्यवहार, राजकारण व परमार्थ चांगल्या-प्रकारें जाणतोच, पण त्याचें मुख्य लक्षण तो आत्मस्वरूपाविषयीं निरंतर जागृत असतो, व सर्व जीव असेच जागृत रहावेत अशाविषयीं त्यांचा उद्योग असतो. स्वतः निरंतर जागृत राहून जीवांना जागृति देण्याच्या थोर हेतूनें काव्य करणारा कवि पहिल्या प्रतीचा होय. व्यास, वाल्मीकि, ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास, तुकाराम हे अशा प्रकारें पहातां पहिल्या प्रतीचे कवि होत. शेक्सपीअर, कालिदास वगैरे कवींच्या ठायीं यांच्यासारखी निरंतर जागृति होती असें मला वाटत नाहीं. ते लक्षावधि बुद्धिमंत जीवांहून व अन्य कवींहून श्रेष्ठ खरे.

१५. असो. तर विमल प्रसाद, प्रतिभा व प्रेम हे तीन प्रधान गुण ज्या जागृत कवीच्या हृदयांत निरंतर वास करितात त्यालाच कविमंडळांत पहिल्या रांगेची योग्यता येते. सत्कवीच्या शुचि प्रतिभेला क्षुद्र विषय प्रमुखत्वानें वर्णावेसे वाटत नाहींत ह्मणून वर सांगितलेंच आहे. मग काव्यविषय कोणते होत हा मुख्य प्रश्न राहिलाच. पंत ह्मणतात. " कवि ह्मणति ' वाणि ! र्णुनि देवां कीं सुज्ञ मानवां वेंच " ( द्रोण. अ. १२ ). सर्वलक्षणसंपन्न असा परमात्मा किंवा परमात्म्याचे उदार गुण ज्यांत आहेत अशा महाविभूति हेच काव्याचे वर्णनीय विषय होत, असा पंतांचा नव्हे,—सर्व हिंदुराष्ट्राचा—सिद्धांत आहे. मात्र महाविभूतींच्या वर्णनांत त्यांचे प्रतिपक्षीही येतात. राम ह्मटला

कीं रावण आलाच. श्रीकृष्ण आणि कंस, पांडव आणि कौरव, मिल्टन कवीचा ईश्वर आणि सैतान अशा दिवस आणि रात्र याप्रमाणें नेहमीं जोड्या असायच्या. मात्र सत्पक्षाची महती वर्णीत असतांना असत्पक्षाचे ही खरे गुण वर्णायला कवीची वाणी कचरत नाहीं. वाल्मीकीनें भगवान् श्रीरामाचें चरित्र गातांना रावणाचें अतुल सामर्थ्य, अनुपम शिवभक्ति, परगुणानुग्राहकता व निश्चय हे गुणही विमल बुद्धीनें वर्णिले आहेत. मिल्टन कवीनेंही आपल्या महाकाव्यांत ईश्वराच्या तोलाचे गुण सैतानांत दाखविले आहेत; ( याबद्दल कित्येक टीकाकारांचा निष्कारण रोषही त्या उदार कवीवर झाला आहे. ) श्रीव्यासांनीं आपल्या महाभारतांत पांडवगुण यथार्थ वर्णिले आहेतच. पण दुर्योधनाचा करारीपणा, कर्णशल्यादि स्वपक्षियांचें चित्त वेधण्याचें सामर्थ्य, दृढ मैत्री वगैरे गुणही दाखविले आहेत. सत्पक्षाचे गुण वर्णायचे हा व्यासांचा मुख्य हेतु असूनही असत्पक्षाचे गुण व सत्पक्षाचे दोष हेही वर्णून त्यांनीं आपल्या मनाचें निष्पक्षत्व दाखविलें आहे. पांडवांचा सत्पक्ष होता, तरी असत्पक्षिय वीर जे भीष्म, द्रोण, कर्ण यांचे वध अन्यायानें, कपटानें व क्रूरपणानें झाले ही गोष्ट श्रीव्यासांनीं स्पष्ट सांगितली आहे. यावरून सदसत्पक्षांचे गुणदोष दाखविण्यापेक्षांही सत्यवर्णन उदार कवींना अधिक प्रिय असतें असें दिसतें. त्यांचे ठायीं ईश्वरासारखें समचित्तत्व असतें. थोर विभूतींचीं चरित्रें गाण्यांत ईश्वरी सूत्रांचें अगर नियमांचें यथार्थ ज्ञान प्राणिमात्रांस करून द्यावें एवढाच सत्कवींचा हेतु असतो. एवंच परमेश्वर व पारमेश्वरी विभूति यांची अवतारकृत्यें गाऊन स्वपरहित साधणें हा प्रधानहेतु मनांत धरून कवीश्वर काव्यरचना करितात.

१६. प्रत्येक देशाच्या कवितेचें कांहीं विशिष्टपण असतें. तें विशिष्टपण त्या देशांतील तत्त्वज्ञान, धर्मविचार, लोकाचार, लोकस्वभाव वगैरेंच्या समुच्चयावरून बनत असतें. भारतीय सत्कवींच्या वर्णनांचे मुख्य विषय ईश्वर व ईश्वरी विभूती होत हें वर सांगितलेंच आहे. काव्यरचनेचे गुण काव्यांत कमी अस-

---

१ जरि हरिगुणरत्नीं गुंफिली होय वाणी ।
तरि परमसुखाला काय हो त्यास वाणी ? ॥
स्तवि इतर नरांतें जीभ ते दैन्यवाणी ।
मुठिहि भरि न देती पिष्ठ संतुष्ट वाणी ॥ १ ॥

—वामनपंडित.

ले तरी चालतील, पण हरियशप्रधान काव्य पाहिजे असा आमच्या हिंदुराष्ट्राचा स्वभाव आहे. वामनपंडितांचें एखादें सदोष व गुणरहितही काव्य रघुनाथपंडितांच्या सगुण व दोषरहित काव्यापेक्षां अधिक लोकप्रिय होतें. अनंत कवि ह्मणतोः—

.... .... .... .... .... .... .... ....

गोष्टी नावडती अनंत कविला त्या लौकिकी वागळा ।

गातां रामकथा निरंतर तुटे संसारमोहार्गळा ॥ १ ॥

हा हिंदु राष्ट्राच्या कित्येक शतकांच्या संस्कृतीचा परिणाम होय. पाश्चात्य कवितेंत 'मनुष्यप्राणी, त्याचा स्वभाव व सृष्टी' हे कवीच्या वर्णनाचे सामान्यतः मुख्य विषय ठरले आहेत. ईश्वरी सूत्रांचें ज्ञान देण्यासाठीं मिल्टन कवीनें आपलें महाकाव्य रचिलें आहे व त्याच्या आणि कौपर, वर्डस्वर्थ वगैरे कांहीं कवींच्या काव्यांत ईश्वरविषयक वर्णनें किंवा कल्पना आहेत, पण इंग्रजी कवितेचें तें मुख्यांग नव्हे. शुचिप्रतिभेला ईश्वर व ईश्वरी विभूती यांशिवाय सृष्टि हाही एक तिसरा वर्णनीय विषय आहे. इंग्रजी पंडितांचा भारती कवितेवर एक मोठा आक्षेप आहे कीं तींत सृष्टिवर्णनें नाहींत. त्यांचें ह्मणणें असें असें आहे कीं थॉम्सन, ग्रे, वर्डस्वर्थ या इंग्रजी कवींप्रमाणें भारती कवींनीं सृष्टिवर्णनें केलीं नाहींत. हें ह्मणणें सर्वांशीं खरें नाहीं. त्यांनीं ईश्वर व संत हे जरी काव्याचे दोनच विषय ठाम ठरविले आहेत तरी सृष्टि अगर निसर्ग हा विषय त्यांनीं अगदींच गाळला आहे असें नाहीं. रामायणांतलें अयोध्यावर्णन; कालिदासाचीं ऋतुवर्णनें व कुंभारसंभवांतलीं वर्णनें; कादंबरींतला जाबालीचा आश्रम, अच्छोदसरोवर, वगैरेंचीं वर्णनें; किरातार्जुनीयांतलीं सृष्टिवर्णनें; वगैरे पाहिलीं म्हणजे संस्कृत कवि सृष्टिवर्णनें कशीं करितात तें समजतें. मराठी कवि सुद्धां सृष्टिवर्णनें करण्यांत मोठे चतुर आहेत. बहुतेक मराठी कवि साधुवृत्त असल्यामुळें तीर्थयात्रोद्देशानें भरतखंडभर फिरत असत. समर्थांनीं ह्मटल्याप्रमाणें: 'गिरीकंदरें देश नानापरीचे । तटाकें नद्या ओघ जाती नदीचे '—हे देखावे पाहून त्यांना उल्हास वाटे; निर्मनुष्य अशा भंडारा डोंगरावर ईश्वरचिंतन

---

२ On man, on nature and on human life.

—Wordsworth.

करीत हिंडणाऱ्या तुकोबानें ह्मटल्याप्रमाणें ‘ वृक्षवल्ली आह्मां सोयरीं वनचरें। पक्षीही सुस्वरें आळवीती ’–या पशुपक्ष्यांच्या सहजलीला पाहून त्यांना कौतुक वाटे. सृष्टींतली निसर्गरम्यता जाणण्याची शक्ति सर्व मराठी सत्कवींत होती. ज्ञानेश्वरमहाराजांनीं ‘ नात्युच्छ्रितं नातिनीचं ’ या गीताश्लोकावर टीका करितांना एकांतस्थानाचें जें बहारीचें वर्णन केलें आहे तें प्रत्येकानें एकवार वाचून पहावें. मुक्तेश्वराचीं सृष्टिवर्णनें जगांतल्या कोणत्याहीं कवीच्या वर्णनाशीं ताडून पाहिल्यास अतिसरस वठतील असा माझा अभिप्राय आहे. राजा, सभा, ऋषि, मल्लयुद्ध, भोजनसमारंभ, विवाहप्रसंग, रात्रीची भयानकता, वनश्री वगैरे अनेक विषयांवर वर्णनें देण्यांत व मानवी स्वभावाचीं चित्रें यथार्थपणें रेखाटण्यांत मुक्तेश्वराचा हात धरणारा कवि जगतांतही विरळाच सांपडेल असें मला वाटतें. संस्कृत पद्धतीवर मनोहर उठलेलें मराठी काव्य पाहिजे असल्यास नलोपाख्यान हें एकच सुंदर काव्य साग्र वाचावें. वामनाची वेणुसुधा व राधाविलास, निरंजनमाधवाचें वर्षाऋतूचें वर्णन, होनाजीबाळाची प्रसिद्ध भूपाळी, पोवाड्यांत वर्णिलेले वीररसप्रसंग व लावण्यांतले शृंगारिक भाग–वगैरे प्रकार अवश्य वाचण्यालायख आहेत. मराठी कवितेंत भक्तिरसाच्या खालोखाल वीररसाला मान आहे. पंतांच्या भारती आख्यानांत व श्रीधराच्या कथांत वीररसाचीच कमाल झालेली आढळते. मराठी कवींनीं इंग्रजी कवींप्रमाणें सृष्टिवर्णन करायचें ह्मणून मुद्दाम केलेलें नाहीं, कथौघांत तें सहज जेथें आलें तेथें तें त्यांनीं येऊं दिलें आहे एवढेंच. सृष्टिदेवतेच्या मूळाशीं जाण्यांत ज्यांना आनंद वाटे ते जडसृष्टीचें वर्णन करावयाच्या भानगडींत फारसे पडले नाहींत हें साहजिक आहे. इंग्रजी कवींनीं सृष्टिवर्णन स्वतंत्रपणें ज्या पद्धतीनें व जसें केलें आहे तसें आमच्याकडे बहुधा कोणीं केलें नाहीं हें खरें आहे, पण आमच्या कवींनीं प्रसंगोपात्त जीं वर्णनें केलीं आहेत, तीं उत्तमांत गणण्याच्या लायखीचीं आहेत. तथापि या बाबतींत इंग्रजी कवींचीं तारीफ करायला पाहिजे. एकंदरींत कवितेचे वर्णनीय विषय परमेश्वर, पारमेश्वरी विभूती, व सृष्टि हे तीन आहेत व असावेत एवढं खरें आहे.

१७. कविता–रचनेचे हेतु अनेक आहेत. मम्मटानें हे हेतु पांच सहा प्रकारचे असतात ह्मणून सांगितलें आहे. कांहीं कवि कीर्तीसाठीं कविता करितात, कांहीं द्रव्यासाठीं करितात, कांहीं अमंगल टाकण्यासाठीं करितात, कांहीं सद्यःपरनिर्वृतीसाठीं ह्मणजे काव्यरचनेपासून जो आनंदानुभव होतो

त्यासाठीं करितात, कांहीं व्यवहार शिकविण्यासाठीं करितात, व कांहीं गोडसा उपदेश देण्यासाठीं करितात. द्रव्यादिकांची अपेक्षा धरून कविता करणारे कवि अगदींच कनिष्ठ दर्जाचे समजावे. वरच्या सहा हेतूंतही तीन हेतु मुख्य दिसतात. १ मनोरंजन, २ कीर्तिलाभ व ३ व्यवहारनीतिशिक्षण. कविता रचतांना कवीला व वाचतांना रसिकाला आनंद होतो, त्यांचें मनोरंजन होतें, ही गोष्ट उघड आहे. कवीला आपलें व आपल्या वाचकांचें मनोरंजन करायचें असतें ह्मणून तो सम्यगर्थवाहक शब्दांची निवड करितो; उत्कृष्ट उपमा, सरस दृष्टांत किंवा बहारीचा अर्थांतरन्यास योजून भाषेला डौल आणतो; व शब्दार्थांची समर्पक रचना करण्यांत आपलें चातुर्य खर्च करितो. तेव्हां मनोरंजन हा काव्याचा एक हेतु आहे, हें स्पष्ट आहे पण तो गौण आहे, मुख्य नाहीं. कीर्तीसाठीं बरेच कवि कविता करितात, पण हाही श्रेष्ठ कवींचीं चरित्रें व त्यांच्या कवितेचें एकंदर धोरण लक्षांत आणतां त्यांचा प्रधान हेतु दिसत नाहीं. लोकांना नानाप्रकारचें व्यवहारशिक्षण व नीतिशिक्षण देऊन त्यांना सन्मार्गवर्ती करणें, हा वरच्या तीनही हेतूंतला प्रधान हेतु दिसतो. श्रीव्यासांचें भारत किंवा समर्थांचा दासबोध असले ग्रंथ याच हेतूनें लिहिलेले असतात. बहुतेक मोठमोठे कवि हाच लोकशिक्षणाचा प्रधान हेतु मनांत धरून काव्यरचना करितात. इंग्रजी कवि बेनजान्सन हा ह्मणतो कीं कवितेचा मुख्य हेतु मनुष्याला आपलें आयुष्य उत्तम प्रकारें घालवितां येईल अशा तऱ्हेचें शिक्षण-देणें हा होय. बायरन कवीनें आपली पुष्कळ कविता स्वतःच्या उच्चनीच मनोवृत्ति प्रकट करून चित्त हलकें करण्यासाठीं रचली आहे, तरी कांहीं काव्यें ग्रीस, इटाली वगैरे पुराणप्रसिद्ध राष्ट्रांचें पुनरुज्जीवन व्हावें व त्यांत नवी ज्योत उत्पन्न होऊन त्यांनीं स्वतंत्र व्हावें या उदात्त हेतूनें रचलीं आहेत. कालिदासादि कवींची काव्यें मुख्यतः स्वतःच्या व राजमंडळांच्या करमणुकीसाठीं व कीर्तीसाठीं रचलेलीं दिसतात. मराठी कवींपैकीं कांहींनीं मनोरंजनासाठीं, कांहींनीं स्वतःच्या चित्तशुद्धीसाठीं व बहुतांनीं धर्मप्रसारासाठीं कविता रचली आहे. मराठी कवितेचा उगम व उत्कर्ष भागवतधर्माच्या प्रसारासाठीं झालेला उघड दिसतो. रघुनाथ पंडित, विठ्ठलादि शिवकालीन कांहीं कवि व सारे लावणीकार कवि यांच्या कवितेचा मुख्य हेतु जनमनोरंजन हाच दिसतो. बाकीच्या

१ 'to inform men in the just reason of living.'

धर्मपर कवींत कांहीं मोरोपंतासारखे चित्तशुद्धीसाठीं कविता करणारे कवि; कांहीं समाजांत नवा जोम येऊन व्यवहारराजकारणधर्म यांच्या शिक्षणानें राष्ट्र ऊर्जितावस्थेस यावें या हेतूनें रामदासमुक्तेश्वरादि समाजहितपर कविता करणारे कवि; व कांहीं केवळ जीवांचे प्रपंचबंध सुटून त्यांचें आत्यंतिक क्षेम व्हावें या केवळ धर्मपर बुद्धीनें कविता करणारे ज्ञानेश्वरएकनाथतुकारामादि कवि. असे निरनिराळ्या कोटींतले कवि आहेत. पण एकंदर मराठी कवितेचें धोरण जीवांनीं विषयपराङ्मुख व्हावें; सर्वांनीं भेदभाव विसरून जगदीश्वराचें अखंड भजन चालवावें; नामस्मरणानें, साधुसहवासानें व सद्गुरुसेवनानें ईश्वरप्राप्ति करावी व इहपर साधून भवसागरांतून सर्वांसह तरून जावें हेंच आहे. ' धर्मरक्षावयासाठीं। करणें आटी आह्मांसी, ' असें तुकाराम म्हणतात. भक्तीचा डांगोरा पिटण्यासाठीं, भागवतधर्मप्रसारासाठीं मराठी कवितेचा अवतार आहे. इंग्रजी कविता मुख्यतः प्रवृत्तिपर आहे, मराठी कविता मुख्यतः निवृत्तिपर आहे. इंग्रजींत मिल्टन, वर्डस्वर्थ, ब्राउनिंग, काउपर असें कांहीं निवृत्तिमार्गाला अनुलक्षून कविता करणारे कवि आहेत, मराठी कवितेंतही रामदास मुक्तेश्वर, पोवाडेवाले कवि यासारखे कांहीं प्रवृत्तिपर कविता करणारे व व्यवहार राजकारणावर कविता करणारे कवि आहेत. पण सामान्य नियम असा कीं मराठी कविता निवृत्तिप्रधान आहे. एकंदरींत मनुष्यजातीच्या धार्मिक, राजकीय, सामाजिक, उन्नतीसाठीं कवितादेवीचा अवतार आहे. धर्मनीतिव्यवहारांचें मनुष्यजातींला शिक्षण देणें हा प्रत्येक सत्काव्याचा कमजास्त प्रमाणानें हेतु व प्रयत्न असतो.

१८. येथवर कविताशास्त्राविषयीं सामान्यतः विचार झाला. कवितेचें महत्त्व किती, कवितेचें लक्षण काय, काव्यरचनेला अवश्य गुण कोणते, कवितेचे वर्णनीय विषय कोणते, व काव्यरचनेचे हेतु कोणते याविषयीं अगदीं संक्षेपानें ऊहापोह केला आहे. साहित्यशास्त्रावर मराठींत स्वतंत्र बुद्धीनें लिहिलेला एकही ग्रंथ नसल्यामुळें व अशा तऱ्हेनें कविताशास्त्राचा कोणीं विचार केला नसल्यामुळें मराठी कवितेच्या वाचकांना कविताशास्त्रासंबंधीं ठोकळ तत्वें सांगितलीं आहेत. यामुळें ही प्रस्तावना थोडी वाढली आहे, पण कवितेचें रहस्य समजायला माझ्या मतें कविताशास्त्राच्या मूलतत्वांचें स्थूल ज्ञान तरी

असणें अवश्य आहे व याच साठीं हा विस्तार केला आहे. अशा कविताशास्त्राच्या व्यापक दृष्टीनें मोरोपंतांच्या कवितेकडे पाहिलें ह्मणजे जगांतल्या व मुख्यतः महाराष्ट्रांतल्या सत्कविमालिकेंत पंतांना कोणतें स्थान मिळेल याचा निकाल होणार आहे. माझ्या मतें जगांतल्या थोर कवींत पंतांचा नंबर पुष्कळच वर लागेल व महाराष्ट्रकवींत एका दृष्टीनें पंत केवळ अद्वितीय आहेत. प्रसाद, प्रतिभा व प्रेम हे सत्कवीचे मुख्य गुण पंतांत उत्तम प्रकारें वसत होते! समाजांत धर्मनीतितत्त्वांचा प्रसार होऊन त्यांत आत्महितैकदक्षता व जागरूकता रहावी यासाठीं त्यांनीं कविता केली आहे. धर्म, नीति व व्यवहार यांपैकीं कोणत्याही विषयावर खल चालला असतां पंतांची समर्पक आर्या निघते यावरून त्यांच्या बुद्धीची व्यापकता दिसून येते. धर्म व नीति यांपैकीं प्रत्येकीं तीन अंगें आहेत. धर्माला ज्ञान, भक्ति व आचार अशीं तीन अंगें आहेत. ज्ञानेश्वरी व एकनाथी भागवत हे भागवतधर्माचें ज्ञान व भक्ति यांचा प्रसार करणारे दोन मुख्य मराठी ग्रंथ आहेत. पंतांनीं भक्ति व आचार उर्फ कर्म याला धरूनच धर्मविचार केला आहे. भक्ति व भक्त यांची महती वाढविण्यासाठीं पंतांनी लेखणी हातीं धरली होती. धर्माप्रमाणें नीतिलाही तीन अंगें आहेत. कौटुंबिक नीति, समाजनीति व राष्ट्रनीति. या तिहींतही बिलकूल विरोध नाहीं, तर ह्या एकमेकांच्या पोषक आहे. पंतांच्या आख्यानोपाख्यानवर्णनाचें मुख्य धोरण पाहिलें, व नीतिपर सहस्रावधि अर्थांतरन्यास पाहिले ह्मणजे राष्ट्राचें नीतिशिक्षक या नात्यानें पंतांची योग्यता केवढी मोठी आहे हें कळणार आहे. पंत स्वतः कित्ता घेण्यासारखे कुटुंबवत्सल असल्यामुळें कौटुंबिक नीतीचीं रहस्यें पंतांप्रमाणें उत्तम प्रकारें स्पष्ट करून दाखविणारे कवि फारच थोडे सांपडतील. पंत तत्कालीन राजकारणाविषयीं बहुधा उदासीन होते तरी त्यांचीं आख्यानें वाचलीं ह्मणजे पंतांना राजनीतीचीं तत्त्वें चांगलींच कळत होतीं असें दिसून येतें. तथापि कौटुंबिक नीति व समाजनीति पंतांनीं आपल्या कवितेंत परोपरीनें व्यक्त करून दाखविली आहे. माता पिता, गुरु, बंधु, पति, पत्नी, राजा, प्रजा इत्यादिकांचीं श्रेष्ठ कर्तव्यें काय आहेत तीं त्यांनीं अगदीं स्पष्ट करून सांगितलीं आहेत. साचार भक्ति व उत्तम कुटुंबसमाजनीति यांचा प्रसार कर्तव्य असेल तर पंतांच्या कवितेचें त्याला फार साहाय्य होणार आहे. याप्रमाणें आपल्या समाजाला धर्मनीति शिकवून त्यांत उदात्त चित्तवृत्ति जागृत ठेवणारे मोरोपंत श्रेष्ठ कवींपैकीं एक

होत यांत संशय रहात नाहीं. पंतांची कविता प्रेमरसानें थबथबलेली आहे. त्यांचें हृदय नेहमीं प्रेमपूर्ण असे, त्यांची आप्तेष्टांशीं वागणूक फार प्रेमाची असे. ईश्वरविषयक प्रेम त्यांच्या सर्वांगांत भिनून गेलें होतें व यामुळें त्यांच्या वाणींत वाचकांच्या चित्तवृत्ति प्रेमरसानें आर्द्र करण्याची अद्भुत शक्ति आहे. त्यांची प्रतिभा उज्ज्वल होती. त्यांचें वेदाध्ययन व षट्शास्त्राध्ययन कितपत होतें हें सांगवत नाहीं; पण साहित्यशास्त्र, छंदःशास्त्र यांत ते पारंगत होते. त्यांच्या इतका शब्दशास्त्रनिष्णात असा कवि दुसरा विरळाच सांपडेल, व शब्दचमत्कार त्यांनीं आपल्या काव्यांत बरेंच केले आहेत तरी त्यांच्या काव्यांच्या मुळाशीं प्रेमरसाचा जो शुचिप्रवाह आहे त्यांत मज्जन केलेलें चित्त अत्यंत पवित्र व प्रेमळ होतें. त्यांची शब्दशास्त्रनिपुणता त्यांच्या प्रतिभेच्या बिलकूल आड येत नाहीं. भवभूतीनें ह्मटलें आहेः—

॥ शास्त्रे प्रतिष्ठा सहजश्च बोधः प्रागल्भ्यमभ्यस्तगुणा च वाणी ॥
॥ कालावबोधः प्रतिभानवत्वमेते गुणाः कामदुघाः क्रियासु ॥ १ ॥

हे सारे गुण पंतांच्या अंगीं होते व ते त्यांच्या कवितेंत प्रतिबिंबित झाले आहेत. पंतांच्या कवितेचें जें हें स्तोत्र गायिलें त्याची सत्यता ज्याला पहावयाची असेल त्यानें पुढील वेंचे लक्षपूर्वक वाचावेत.

१९. आतां प्रस्तुत वेंच्यांविषयीं दोन शब्द सांगतों. या पुस्तकांत इंग्रजी वेंच्यांच्या पद्धतीप्रमाणें सात निरनिराळे भाग पाडले आहेत.

**१ ईश्वरभक्तिपर.**—पंतांची कविता मुख्यतः भक्तिपर असल्यामुळें व वृद्धतरुणांस नित्यपाठाच्या हीं उपयोगाचीं यांतलीं सर्व प्रकरणें असल्यामुळें हा भाग प्रथम घातला आहे. यांतील सर्व प्रकरणें केवळ स्वतःच्या प्रेरणेनें स्वतंत्र बुद्धीनें रचलेलीं असल्यामुळेंही यांचें महत्त्व फार आहे. पहिलें प्रकरण आर्याकेकावली हें आहे. हें स्तोत्र पंत कांहीं तरी मोठ्या संकटांत पडले होते तेव्हां ईश्वरास आळविण्यासाठीं लिहिलेलें दिसतें. हें फार सरळ व प्रेमळ आहे. पंताची ईश्वरभक्ति मोठी अलौकिक होती; ‘ तुझिया गुणसागरांत माझें मन हें सैंधव माधवा! विरावें ’ हीच त्यांची मुख्य प्रार्थना आहे. पंतांनीं संतस्तवनें केलीं आहेत तीं, आशंसाष्टक, स्मरणी, नाममाहात्म्य, सद्गुरुस्तव, रा-

माची साधी गोड आरती व इतर अभंग पदें वगैरे सर्वच प्रकरणें भक्तीचा जिव्हाळा जाणणाऱ्या दैवाच्या पुतळ्याला वेडावून सोडतील यांत मुळींच शंका नाहीं. संशयरत्नमाला, सन्मनोरथराजि हीं प्रकरणें सुरसकल्पनामय व मोठीं चमत्कृतिजनक आहेत.

**२ कवि आणि कविता.**–या भागांतीलहीं सर्व प्रकरणें स्वतंत्र बुद्धीनें रचिलेलीं आहेत. व्यासवाल्मीक्यादि संस्कृत कवि, ज्ञानेश्वरादि मराठी कवि व तुळसीदासादि हिंदुस्थानी कवि यांची कविता पंतांनीं सप्रेम वाचली होती, तेव्हां त्यांजविषयीं त्यांना सहज प्रेमोद्गार सुचले हें ठीकच आहे. आपल्या पूर्वजांचें आनृण्य जोडायचें पंतांसारख्या निर्मत्सर व थोर गुणज्ञाच्या मनांत आलें हें साहजिक आहे. वामनादि मराठी कवींवरचे त्यांचे अभिप्राय फार मार्मिक आहेत त्याबद्दल अधिक चर्चा करायला येथें अवकाश नाहीं. ‘ सुयश न जयांत हरिचें चित्रहि गुणभवन कवन तें अशुचि ’ हा पंतांच सिद्धांत विचारणीय आहे. केवळ लौकिक विषयांवर आपली कविताशक्ति त्यांनीं खर्चिली नाहीं, तर ती परमेश्वर व संत यांच्या गुणवर्णनांत खर्चून आत्मशुद्धि करून घेतली. कविवर्णनांत त्यानीं कालिदासादि कवींचा नामोच्चारही कोठें केला नाहीं याचें कारणही हेंच होय. कालिदासादि मध्यकालीन सर्व कवींचीं नाटकें वगैरे त्यांनीं वाचलीं होतीं, व ‘ धातूंत जसें हाटक नाटक वर सर्व सुप्रबंधांत ’ याप्रमाणें नाटकग्रंथांचें त्यांनीं गौरव केलें आहे. ते मोठे रसिक होते व वृद्धपणींही मला रसिक ग्रंथ व रसिक जन यांची संगति सुखावह वाटते असें ते ह्मणतात. त्यांनीं केलेली गीतास्तुति व गीताटीकाकारांची स्तुति मार्मिक आहे. गीतेच्या संस्कृत टीकाग्रंथापेक्षांही त्यांना ज्ञानेश्वरी फार पूज्य व प्रिय होती. आर्यावृत्तावरच्या त्यांच्या आर्या व आपल्या कवितेवरचे अभिप्राय फार सहृदयपणानें त्यांनीं दिले आहेत. ‘ जरि हा मयूर नाहीं तरि लोकांना न दीसती आर्या ’ ही गर्वोक्ति किती सत्य व हृदयंगम आहे! श्लोक, साक्या, ओंव्या, दोहे वगैरे पूर्वींच्या वृत्तांतल्या कवितेचा आदर बाळगून माझ्या आर्येचाही स्वीकार करा ही कवीची सविनय प्रार्थना रसिकांनीं मान्य केली आहे. आपल्या कवितेच्या गुणांविषयीं पंतांना योग्य अभिमान होता. ‘प्रेम, प्रतिभा, शिक्षा, रीति’ वगैरे गुण आपल्या काव्यांत आहेत; हरियश वर्णून आपण अर्थचमत्कार केले आहेत; आपली सुरस आ-

र्या पाहून रसिक माना डोलावतील याबद्दलही त्यांचे उद्गार प्रेमळपणानें वाचण्यासारखे आहेत.

३ उपदेशपर कविता.–यांत एकच प्रकरण वेदांतपर आहे. बाकीची प्रकरणें धर्मनीतिव्यवहारपर आहेत. तरुण राजपुत्रास बोध, स्त्रीधर्म, वधुवरांस बोध, निंदक, वीरपुत्रांस निरोप, वगैरे प्रकरणें केवळ अप्रातिम आहेत. पंतांच्या लिहिण्यांत कोठें कोठें खोंचा असतात, व त्या समजल्या कीं चित्तास फार आनंद वाटतो. अशा उत्कृष्ट व खोंचदार उताऱ्यांपैकीं निंदकावरचा उतारा आहे. सामान्यनीति प्रापंचिकांस उपयुक्त आहे. तरुण विद्यार्थ्यांना हा सर्वच भाग चांगला बोधप्रद होईल.

४. वर्णनपर[1] कविता.–या प्रकरणाचें महत्त्व अलीकडील रुचीच्या रसिकांस विशेष वाटेल. मराठी कवितेंत वर्णनपर कविता नाहीं असें ह्मणणाऱ्यांनीं हा भाग काळजीपूर्वक वाचावा. रामाच्या बाललीला, गायींची वत्सलता, श्रीकृष्णाचा गुरुगृहवास या प्रकरणांतलें अंधाऱ्या रात्रीचें वर्णन, सवित्रीची दिनचर्या, रामराज्य वगैरे प्रकरणें वाचावीं ह्मणजे पंतांच्या वर्णनचातुर्याचें मोठें कौतुक वाटल्याशिवाय राहणार नाहीं. याशिवाय वीररस व करुणरस यांचींही कांहीं वर्णनें फारच हृदयंगम आहेत. हे दोन्ही रस पंतांना उत्तम साधतात. कुंभकर्णी झोंप हें प्रकरण विनोदात्मक आहे. श्रीकृष्णाच्या मुरलीचें व गोपीप्रेमाचें वर्णन, अयोध्येचा विलाप हेही उतारे फार उत्तम आहेत.

५. कथानकपर प्रकरणें–हीं अधिक काढतां आलीं असतीं पण स्थळसंकोचास्तव तीं काढलीं नाहींत. रुक्मिणीनें स्वविवाहाची कथा द्रौपदीस सांगितली ती पंतांनीं किती स्वाभाविकपणें स्त्रीस्वभावभाषणसांप्रदायानुरूप वर्णिली आहे! ब्रह्मदत्तराजा व चिमणी यांची लहानशी सुंदर गोष्ट व तिच्यापासून घेण्यासारखा बोध कवीनें साऱ्या १९ आर्यांत आणलीं आ-

---

1 उपमादि दृष्टांतांतही सृष्टिसौंदर्य पंत कसें वर्णितात तें पहा:—

( १ ) सेना सर्व मिळाल्या धांवुनि अत्यंत शीघ्र दोघांतें ।
जैशा तटिनी गंगायमुनांच्या श्रावणांत ओघांतें ॥ १ ॥ ( द्रोण १६ )

( २ ) सहदेव नकुळ दोघे दों भागीं त्यांत धर्मरथ चाले ।
भासति जाणों क्षितिवरि पूर्णेंदुसमेत शुक्र गुरु आले ॥ २ ॥ ( कर्ण २८ )

( ३ ) त्या गहनांच्या दूर्वा मरकतमणिपुंजदीप्तिच्या सवती ॥३॥ (कुशलवच०)

हेत. एका कुटुंबावरची पाळी या प्रकरणांतला पति, पत्नी, कन्या व पुत्र यांचा संवाद फारच बहारीचा आहे. पंतांच्या कवितेंतला एक विशेष ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. कुटुंबनीति पंतांसारखी थोड्यांना वर्णितां येते. पंत कुलीन होते. कुलीन घराणांतल्या चालीरीति, आचारविचार व भाषणसांप्रदाय पंतांच्या काव्यांत सर्वत्र सांपडतात. याचें उत्कृष्ट उदाहरण वरील उतारा होय. बकासुरास बळी कोण द्यावा हा कठीण प्रसंग आला तेव्हां चौघांपैकीं मरण्यास प्रत्येकजण तयार झाला तेव्हांचा हा संवाद आहे. स्त्री संसारार्णवांतून तारून नेणारी नौका आहे, अज्ञ जन कन्येपेक्षां पुत्र श्रेष्ठ समजतात, पण तें खरें नव्हे वगैरे उच्चतम कल्पना या उताऱ्यांत पाहण्यासारख्या आहेत.

६. **चक्रीरामायण.**–हें तयार करण्यास मला बराच वेळ लागला. पंतांच्या १०८ रामायणांपैकीं विशिष्ट रामायणांचें सार काढून हें एक स्वतंत्र रामायण बनवलें आहे. पुष्कळ रामायणांचीं नामें त्यांच्या वृत्तांवरून पडलीं आहेत. पंत वृत्तशास्त्रनिष्णात होते. त्यांनीं बहुतेक वृत्तांचा अवलंब केला आहे. तेव्हां त्यांनीं आदरिलेल्या अनेक वृत्तांचा व रचनाविशेषांचा वाचकांस परिचय व्हावा, पण सुसंबद्ध अशा एका रामायणाच्या कथेच्या रूपानें तो झाल्यास कंटाळवाणा न होतां मनोरंजक होईल असें मनांत आणून पंतांच्या ५०।६० चांगल्या रामायणांतून उत्तम उतारे काढून हें एकशें नवें स्वतंत्र रामायण मीं रचिलें आहे. शब्द पंतांचे, जुळणी माझी. फुलें त्यांचीं, गुंफणारा माळी मी. पंतांचीं रामायणें वाचल्याचें श्रेय वाचकांस हें चक्रीरामायण वांचून येणार आहे. पंतांना विविध वृत्तांत अनेक चमत्कार करून काव्य करण्याची हौस होती व ती त्यांनीं पुरवून घेण्यासाठीं हीं रामायणें रचिलीं. तीं रचण्यांत त्यांनीं दुसरेंही कार्य साधलें. आपल्या उपास्य देवतेच्या अनंत लीला परोपरीनें वर्णायला त्यांना सांपडलें. आधीं रामचरित्र नितांतमधुर, त्यांत तें वर्णन करणारा पंतांसारखा परम सत्वस्थ, उदारधी व भगवद्भक्त. रामचरित्र पुनः पुनः गाण्यांत त्यांना फार उल्हास वाटे. "श्रीरामायण गायिलें तरि पुन्हां गावेंचि ऐसें करी" असें त्यांचें श्रीरामास मागणें होतें. चक्रीरामायणांत भरतकैयेयींचा संवाद, भरतभेट वगैरे अनेक प्रसंग फार सरस उतरले आहेत. १०८ रामायणांची चित्रकाव्य म्हणून हेळणा करणाऱ्यांनीं हें चक्रीरामायण तरी एकवार वांचून पहावें ह्मणजे चित्रकाव्यही उत्तम कवीला किती सरस करितां येतें हें त्यास कळून येईल.

७. **विविधविषयपर प्रकरणें.**—यांत अवांतर कांहीं प्रकरणें गोंविलीं आहेत. श्रीकृष्णाचा रुक्मिणीशीं विनोद मोठा मजेदार आहे. पंतांना शृंगाररसही चांगला वर्णिता येतो हें दाखविण्यासाठीं पांच चार उतारे या पुस्तकांत घेतले आहेत. 'विनोदरससागरीं रमति मीनसे दंपती । अशा कलहसांत्वनीं दिवसयामिनी संपती ' हा गोड श्लोकार्थ वरील विनोदांतच आहे. 'वरपुरुषसंग बाई! ब्रह्मानंद स्त्रियांसि जाणावा, ' 'जनककुळाहुनि पतिकुळ अधिक असावें असा वधूकाम ' याप्रकारें स्त्रियांचीं हृद्गतें पंतांनीं मार्मिकपणानें वर्णिलीं आहेत. प्रेमळपणा त्यांच्या हृदयांत भरला होता, 'अमृताची प्रेमभाव ही खाणी ' हें त्यांचेंच वाक्य आहे. या शेवटल्या भागांत दोन चार प्रकरणें मुद्दाम संवादपर घेतलीं आहेत. शेवटलें प्रकरण पंतांचे यजमान व इष्टमित्र यांजविषयीं आहे. तें कविचरित्रपर आहे. पंतांची आपल्या आप्तेष्टांशीं वर्तणूक किती साधेपणाची व प्रेमाची होती हें या प्रकरणावरून समजून घेणार आहे. त्यांचे मित्र त्यांच्या काव्याला भुलून जात होते व ' प्रेमें सिंचित होते या कवना ते सखे जसे वेला. '

एकंदर सर्व सातही प्रकरणें काळजीपूर्वक वाचणाऱ्यास पंतांच्या प्रेमळ, उदार व भाविक स्वभावाची, त्यांच्या उदात्त प्रतिमेची व जन्मसिद्ध रसिकतेची चांगली कल्पना येईल व त्यांच्या कवितेविषयीं त्याला प्रेमादर वाटल्याशिवाय कधींही राहणार नाहीं अशी माझी खात्री आहे. श्रेष्ठ कवीचे सर्व अद्भुत गुण त्यांच्या कवितेंत दृष्टीस पडतात व कोणीही निःपक्षपाती मनुष्य मोरोपंतांस जगांतल्या श्रेष्ठ कविमालिकेंत गोंवायला तिळमात्र कचरणार नाहीं असा माझा दृढविश्वास आहे. आतां हें पुस्तक वाचण्यापूर्वी वाचकांनीं खालील महत्त्वाच्या सूचनांकडे अवश्य लक्ष पुरवावें एवढी प्रार्थना आहे.

## महत्त्वाच्या सूचना.

( १ ) आजवर अप्रसिद्ध अशी पंतांची कविता अद्याप पुष्कळ आहे. ती लवकर छापावयाची सोय करण्यांत येईलच. परंतु प्रस्तुत पुस्तकांत अशा **अप्रसिद्ध काव्यांतले कांहीं उतारे** घेतले आहेत. आर्या केकावलीच्या ६१ च आर्या आजवर छापल्या आहेत, पण पंतगृहीं त्यांच्या हातची या काव्याची जी प्रत आहे तिच्यांत १७४ आर्या आहेत. श्लोककेकावलीच्या तोलाचें पण

अधिक सोपें व मनोहर असें हें लहानसें स्तोत्र आहे. यांतील कांहीं आर्या पहिल्या प्रथमच दिल्या आहेत. याशिवाय आशंसाष्टक, स्मरणी, आरती, पदें, अभंग, निंदक, रामाच्या बाललीला, राम वनवासास निघाले तेव्हांचा अयोध्येचा विलाप व चक्रीरामायणांतले कांहीं श्लोक हीं प्रकरणें अगदीं प्रथमच प्रसिद्ध होत आहेत.

( २ ) स्वतः कवि आपल्या काव्यावर ज्या टीपा देतो त्या फारच महत्त्वाच्या गणल्या पाहिजेत. या पुस्तकांत बहुतेक टीपा मींच दिल्या आहेत. तथापि जेथें जेथें पंतांची टीप मिळाली व दिली तेथें तेथें '**पंतांची टीप**' असें ह्मटलें आहे. पंतांनीं एका काव्यावर मात्र स्वतः विपुल टीपा दिल्या आहेत. **संशयरत्नमाला या चटकदार काव्यावरच्या सर्व टीपा खुद्द पंतांच्या हातच्या आहेत.** हें काव्य व यावरच्या पंतांच्या टीपा वाचल्या ह्मणजे कवि टीकाकार कसा असतो हें समजतें.

( ३ ) पंतांच्या लेखनपद्धतीची वाचकांस माहिती व्हावी ह्मणून **मूळ प्रतीशीं ताडून पाहून कांहीं प्रकरणें लिहिलीं आहेत.** सर्वच प्रकरणें मूळाशीं ताडून पाहण्याला सवड झाली नाहीं. दुसऱ्या आवृत्तीचा योग आला ह्मणजे तसें करीन.

( ४ ) मोरोपंतांची बहुतेक कविता आर्यावृत्तांत आहे. त्यांची प्रसिद्धि त्यांच्या आर्येवरून आहे व त्यांना 'आर्यापति' व आर्या उकलण्यांत चतुर अशा पंतभक्तांना 'आर्यापंडित' अशा संज्ञाही आहेत. तथापि **पंतांची बरीचशी कविता आर्येतरवृत्तांतही आहे** हें या पुस्तकांतल्या अनेक उताऱ्यांवरून व मुख्यतः चक्रीरामायणावरून वाचकांच्या लक्षांत येईल. त्यांच्या काव्यांत रसालंकारांची इतकीं उदाहरणें सांपडतील कीं बहुधा साहित्यशास्त्रावर मराठी ग्रंथ लिहिणारास या प्रकरणापुरतें दुसऱ्या कवीच्या तोंडाकडे पाहायला नको आहे. साहित्यशास्त्राप्रमाणें छंदःशास्त्रही पंतांना करतलामलकवत् होतें ही गोष्ट बहुधा कोणास ठाऊक नाहीं. वामनादि कवींनीं संस्कृतांतलीं अनेक वृत्तें मराठींत आणलींच होतीं, पण पंतांप्रमाणें बहुतेक साऱ्या वृत्तांचा अवलंब दुसऱ्या कोणत्याही मराठी कवीनें केलेला नाहीं.

( ५ ) या पुस्तकांतल्या कांहीं उताऱ्यांतले श्लोक एकाच प्रकरणांतले आहेत असें नाहींत. उपरिनिर्दिष्ट विषयावर पंतांच्या काव्यांत जेथें जेथें ज्या

ज्या आर्या किंवा श्लोक सांपडले ते ते एकत्र केले आहेत. जसे निंदक या प्रकरणांतल्या ९।१० आर्या पांच काव्यांतल्या आहेत. त्या विषयाची पूर्तता करण्यासाठीं तसे करावें लागलें. रामराज्य, सामान्यनीति, आर्यावृत्त, वगैरे दहा पंधरा प्रकरणें अशा प्रकारचीं आहेत. अवश्य तेथें कोणतीं पद्यें कोठून घेतलीं हें सांगितलें आहे. तसेंच कांहीं ठिकाणीं कथासंदर्भ दिले आहेत. उतारे घेतांना अति विस्तार होऊं नये म्हणून, कथाभागास किंवा मुख्य विषयास बाध न येई अशा तऱ्हेनें मधले काहीं श्लोक किंवा आर्या गाळल्या आहेत.

ही प्रस्तावना वाचल्यानंतर व वरच्या सूचना लक्षांत ठेवून वाचकांनीं वेंचे वाचावेत. वेंचे काढण्यांत, प्रस्तावनेंत किंवा टीपा देण्यांत कोठें प्रमाद झाले असतील तर शुद्ध करून वाचावें, व या दिशेचा हा मराठी भाषेंत पहिलाच प्रयत्न आहे हें लक्षांत आणून वाचकांनीं क्षमा करावी अशी मी त्यांची सविनय प्रार्थना करितो. व पुनः एकवार पंतांच्याच शब्दांनीं त्यांना विनंति करितों कीं:—

पुरुषाचा धर्म भ्रम ह्मणउनि कांहीं पडेल येथ उणें ।
पूर्ण करावें शोधुनि भगवत्प्रीत्यर्थ सज्जनें निपुणें ॥ १ ॥

पुणें, शनिवार ५०२,
नागपञ्चमी शके १८२७.

**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर.**

# अनुक्रमणिका.

## १ ईश्वरविषयक कविता.

पृष्ठ.


१ आर्याकेकावली ... १
२ श्रीविठ्ठलस्तोत्र ... ५
३ आशंसाष्टक ... ५
४ साधुसंतांची महती ... ६
५ स्मरणी ... ८
६ महाजनप्रार्थना ... ९
७ पंढरीमाहात्म्य ... १०
८ गंगेची प्रार्थना ... १३
९ रामस्तव ... १४
१० वाङ्मनःप्रार्थना ... १५
११ सद्गुरूची महती ... १६
१२ गुरुशिष्यसंवाद ... १८
१३ नाममाहात्म्य ... १९
१४ संशयरत्नमाला ... २१
१५ सन्मनोरथराजि ... २४
१६ श्लोककेकावलि ... २७
१७ शेवटची प्रार्थना ... ३०
१८ आरती, अभंग, पदें ... ३१


## २ कविता आणि कवि.


१ कविता व कवितारसज्ञ ... ३६
२ संस्कृत कवि ... ३७
३ मराठी कवि... ... ३९

पृष्ठ.


४ हिंदुस्थानी कवि ... ... ... ... ... ... ... ... ... ४४

५ भगवद्गीता व॰ तिचे टिकाकार ... ... ... ... ... ... ... ४५

६ आर्यावृत्त ... ... ... ... ... ... ... ... ... ... ४६

७ मोरोपंतांचे आपल्या काव्यांविषयीं विचार ... ... ... ... ... ... ४७


## ३ उपदेशपर कविता.


१ तरुण राजपुत्रास बोध ... ... ... ... ... ... ... ... ५२

२ स्त्रीधर्म ... ... ... ... ... ... ... ... ... ... ५४

३ प्रल्हादाचा असुरपुत्रांस उपदेश ... ... ... ... ... ... ... ५४

४ वधूवरांस बोध ... ... ... ... ... ... ... ... ... ५७

५ गाधांरीचा दुर्योधनास बोध ... ... ... ... ... ... ... ५८

६ निंदक ... ... ... ... ... ... ... ... ... ... ५९

७ वीरमातेचा वीरपुत्रांस निरोप ... ... ... ... ... ... ... ६०

८ शहाणा राजा ... ... ... ... ... ... ... ... ... ६३

९ श्रीकृष्णाचा उद्धवास वेदांतोपदेश... ... ... ... ... ... ... ६३

१० पिता, माता व देव ... ... ... ... ... ... ... ... ६७

११ अंगदशिष्टाई ... ... ... ... ... ... ... ... ... ६७

१२ पतिवशीकरण ... ... ... ... ... ... ... ... ... ६९

१३ सामान्यनीति ... ... ... ... ... ... ... ... ... ७०


## ४ वर्णनपर कविता.


१ अंबरीष राजा ... ... ... ... ... ... ... ... ... ७७

२ अर्जुनाचा पुत्रशोक ... ... ... ... ... ... ... ... ७७

३ श्रीकृष्णाचा गुरुगृहवास ... ... ... ... ... ... ... ... ८०

४ सावित्रीची दिनचर्या ... ... ... ... ... ... ... ... ८१

५ कुंभकर्णी झोंप ... ... ... ... ... ... ... ... ... ८१

६ काळ ... ... ... ... ... ... ... ... ... ... ८२

७ द्रौपदी ... ... ... ... ... ... ... ... ... ... ८३

पृष्ठ.
८ रामास वनांत धाडल्यामुळें भरत आईवर रागावतो... ... ... ... ८३
९ रामराज्य ... ... ... ... ... ... ... ... ... ... ८४
१० कुशलवांचें लक्ष्मणाशीं युद्ध ... ... ... ... ... ... ... ८५
११ रामेश्वरचा सेतु ... ... ... ... ... ... ... ... ... ८६
१२ भीम आणि दुःशासन ... ... ... ... ... ... ... ... ८७
१३ गायींची वत्सलता ... ... ... ... ... ... ... ... ... ८९
१४ श्रीकृष्ण, गोपी आणि मुरली ... ... ... ... ... ... ... ८९
१५ रामाच्या बाललीला ... ... ... ... ... ... ... ... ९१
१६ मद्यपी आणि भगवद्भक्त ... ... ... ... ... ... ... ... ९२
१७ राम वनवनास निघाले तेव्हांचा अयोध्येंतला विलाप ... ... ... ... ९२
१८ भाषादेवीच्या राज्यांतला अद्भुत चमत्कार ... ... ... ... ... ९८
१९ रंगभूमि ... ... ... ... ... ... ... ... ... ... ९७
२० रावण व रामवानर यांचें युद्ध ... ... ... ... ... ... ... ९८
२१ भारती युद्धानंतरचा रणभूमीवरचा शोकप्रद देखावा ... ... ... ... ९९
२२ रामाचा सीतेसाठीं शोक ... ... ... ... ... ... ... ... १०४

---

## ५ कथानकपर कविता.

१ रुक्मिणीचें स्वविवाहवृत्तकथन ... ... ... ... ... ... ... १०८
२ कोल्ह्याचें शहाणपण ... ... ... ... ... ... ... ... १११
३ हंस व काक यांची स्पर्धा ... ... ... ... ... ... ... ... ११३
४ ब्रह्मदत्त राजा व चिमणी यांची गोष्ट ... ... ... ... ... ... ११६
५ आस्तीक जन्म ... ... ... ... ... ... ... ... ... ११८
६ वळीचें औदार्य ... ... ... ... ... ... ... ... ... १२०
७ उषा व अनिरुद्ध ... ... ... ... ... ... ... ... ... १२५
८ एका कुटुंबावरची पाळी ... ... ... ... ... ... ... ... १२९
९ परांगनाधर्षणाचा परिणाम ... ... ... ... ... ... ... ... १३२

---

पृष्ठ.

६ चक्रीरामायण. १३८

## ७ विविधविषयपर कविता.

१ द्रौपदीचें सत्व ... ... ... ... ... ... ... ... ... १५६
२ श्रीकृष्णाचा रुक्मिणीशीं विनोद ... ... ... ... ... ... ... १५८
३ लक्ष्मीचें स्वयंवर किंवा पतिशोध ... ... ... ... ... ... ... १६०
४ कुलीन सासरा ( सुनेचें गौरव ) ... ... ... ... ... ... १६२
५ टाकावी कीं न टाकावी हे शुद्धचरिता सती ... ... ... ... ... १६२
६ सूड कां क्षमा ... ... ... ... ... ... ... ... ... १६५
७ कर्णाचा थोरपणा ... ... ... ... ... ... ... ... ... १६८
८ राजकन्या व गुरुकन्या यांचें भांडण ... ... ... ... ... ... १७०
९ भीष्माचा निर्याणसमय ... ... ... ... ... ... ... ... १७१
१० पंतांचे आप्त, इष्ट, व समकालीन राजकीय पुरुष ... ... ... ... १७५

# ईश्वरविषयक कविता.

( आत्मोन्नतीसाठीं स्वतंत्रपणें रचलेली )

बहु गोड गुण तुझे ते ऐकावे, आदरें स्वयें गावे ।
यावेगळे मनोरथ नसती ते तूज काय सांगावे ? ॥ १ ॥

३९५८

# आर्या-केकावली.

श्रीरामा ! तूं स्वामी असती माज्या शिरावरी जागा ।
आम्हासि तुज्या पायांवांचुनि निर्भय नसे दुजा जागा ॥ १ ॥
बहु जन्म विसरलों तुज परि तूं आम्हासि विसरला नससी ।
अंतर्बाह्य, कृपाळा ! सर्वा जीवांसि वेष्टुनी असती ॥ २ ॥
कल्पद्रुम तूं रामा ! ज्याची जसि भावना, तसा फळसी ।
भोगिति दुःखें जीव स्वगुणें तूं निर्दयत्व नातळसी ॥ ३ ॥
आतां प्रभो ! दयाळा ! मज दीनावरि करूनियां करुणा, ।
स्वपदाब्जीं मन्मानसभृंग[1] रमो; उगवुं दे कृपाअरुणा ॥ ४ ॥
अपराध फार केले परि आतां हात जोडिले स्वामी ! ।
करुनि दया तारावें आवडि वाढो सदा तुज्या नामीं ॥ ५ ॥
सेवक तुजा ह्मणवितों श्रीरामा ! राघवा ! सख्या ! ह्मणतों ।
होसी उदास तरि हो, होत नसें मी उदास आपण तों ॥ ६ ॥
' संसारसागरीं तूं तारक ' ऐसेंचि संत वदतात ।
वदतां तदीय नामें देतो दासास तो स्वपद तात ॥ ७ ॥
ऐसें औदार्य तुजें प्रभुत्व करुणाकरत्व ऐकोनी ।
आलों शरण स्वामी ! जोडुनियां हस्त मस्तकीं दोनी ॥ ८ ॥
पायें मज दीनाला रामा ! लोटूं नकोचि बा दूर ।
उद्धरिले बहु पापी, याविषयीं तूं रघूत्तमा शूर ॥ ९ ॥
केवळ[2] भजनाचिकडे जरि ठेविसि दृष्टि तरि नसे थारा ।
आपलिया थोरपणावरि ठेवुनि दृष्टि दीन हा तारा ॥ १० ॥
धांव समर्था ! सदया ! भवपंकामाजि बुडतसे गाय ।
निकटस्था[3] ! धर्मज्ञा ! कौतुक अद्यापि पाहसी काय ॥ ११ ॥
करुणाघन तूं माथां, जाळितसे मज मृगास भववणवा ।
वृष्टि न करितां होतों उदास हें योग्य तूज न सकणवा[4] ॥ १२ ॥
संकट वारुनि रामा ! निजगुणकीर्तन करावया योजीं ।

---

१ या ठिकाणीं संधि करणें अवश्य असून कवीनें तो केला नाहीं. २ केवळ माझ्या भजनाकडे लक्ष देऊं नकोस; कारण तसें भजन माझ्या हातून होत नाहीं. ३ ' ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ' या गीतावचनप्रमाणें. ' ४ सदया.

आपलिया थोरपणें रामा ! मजला स्वकिंकरीं मोजीं ॥ १३ ॥
तूं जरि न पावसी तरि पाचारूं संकटांत मी कवणा ।
श्रवणारूढ करुनि हे विनती, रक्षीं मला पदप्रवणा[1] ॥ १४ ॥
सीतापते, रघुपते, विश्वपते, भूपते, वदान्यपते[2], ।
इंद्रादिकीर्ति, तुझिया किर्तिपुढें तुछ, सर्वदा लपते ॥ १५ ॥
त्वद्भक्त शुद्धकर्मा विभीषण प्राज्ञ रावणें छळिला ।
येतां शरण तुला त्वां हृदयीं स्वभुजीं धरूनि आवळिला ॥ १६ ॥
चरणविलोकनतत्पर वानर आप्तांत राघवा ! गणिले ।
साधुद्वेषी जे जे कुळ त्यांचें त्वां समूलही खणिलें ॥ १७ ॥
तूं बाप माय बंधू धणी सुहृन्मित्र जानकीज्यानें[3] ।
करुनि दया विलयाला अतिसत्वर संकटास माज्या ने ॥ १८ ॥
श्रीरामा ! सुखधामा ! पावननामा ! स्वभक्तविश्रामा ! ।
कामारिगीतकीर्ते[4] ! करुणामूर्ते नको त्यजूं आह्मा ॥ १९ ॥
रामा ! धांव, रघुपते ! धांव, विभो ! धांव, राघवा ! धांव; ।
कौतुक काय पहासी ? आळवितां यापरी तुझें नांव ॥ २० ॥
नांव तुझें नावचि या संसारांभोधिला तरायासी ।
तें हृदयीं धरुनीही मी कां अद्यापि सांग आयासी ? ॥ २१ ॥
दीनानें किति सद्गुणहीनानें विनविलें तुला आजी ? ।
वा जीवदान दे गा ! प्रभो ! उपेक्षा करूं नको माजी ॥ २२ ॥
हृद्गत तुजला कळतें हृदयस्था राघवा, जगज्जनका ! ।
जन काय तत्त्व जाणे प्रभो उपेक्षा करूंचि आज नका ॥ २३ ॥
सर्वां लाभांहुनि बहु लाभ असे त्वत्पदांबुरुहभजनीं ।
मज नीतिज्ञा ! भजतां संकट न पडों दिजेचि अशुभ जनीं ॥ २४ ॥
एकांतीं त्वन्नामें गायिन मधुरस्वरें स्थिरस्वांतें[5] ।
संकट वारुनि द्यावें हें मज वरदान जानकीकांतें ॥ २५ ॥
या संकटाबरोबर वारीं लोकेषणादि[6] अनिवार्य ।
म्हणजे हा दास तुजा जाला लोकत्रयांत कृतकार्य ॥ २६ ॥
अन्नाच्छादन देतें दुसरें वा कोण सांग विश्वास ।

---

१ पदलीना मला. २ दात्यांत श्रेष्ठतम अशा. ३ जानकीजानि ह्म० जानकी आहे जाया ज्याची तो राम. 'जा' च्या ठिकाणीं 'ज्या' लिहून पंतांनीं एक दोष केला तो अर्थात् यमकासाठीं केला आहे. ४ शंकर नेहमीं ज्याचे गुण गातात अशा. ५ स्थिरचित्तानें ६ मोठेपणाची आवड. पुत्रेषणा, लोकेषणा, वित्तेषणा अशा तीन मुख्य ईषण्या ह्म. इच्छा सर्व प्राण्यांच्या मागें लागलेल्या आहेत.

ह्मणताति ' आयुरन्नं प्रयच्छाति ' प्राज्ञ तेथ विश्वास ॥ २७ ॥
त्वद्गुणकीर्तन करितां लज्जा[1] हे पापिणी धरूं नं गळा ।
हे ताटकांतका ! हा परमार्थ इणेंच बुडविला सगळा ॥ २८ ॥
खळ हांसतील तेंही सोसाया सहनशीलता यावी ।
लावीन मस्तक तुज्या पदीं तुजी भक्ति आत्मविद्या[2] वी ॥ २९ ॥
केले म्या मनुजांचे आर्जव बहु चाटुकारही[3] जालों ।
परि तेथ ताप पाउनि पुनरपि तुजलागिं शरण मी आलों ॥ ३० ॥
त्वद्गुणकीर्तन करितां स्तंभादिक अष्ट भाव उपजावे ।
जावे अनात्मधर्म[4] क्रोधादि मनोविकार वरजावे[5] ॥ ३१ ॥
हा काम रामराया ! पुरवावा, कल्पवृक्ष तूं साचा ।
ज्ञाता, सर्वगत, प्रभु, आत्मा, प्रिय निर्निमित्त[6] दासाचा ॥ ३२ ॥
मन हेंचि फार इच्छी कीं आतां सेवणें तुझे पाय ।
तुजवांचुनि इतरांच्या भजनीं मजलागिं होय फळ काय ॥ ३३ ॥
शरण तरी तुज यावें नमन करावें तुलाचि सुज्ञानें ।
गावे तुजेचि गुण वा सेवावें तुजचि माद्दगज्ञानें[7] ॥ ३४ ॥
ह्मणवुनि तुमचें नामचि ' राम ' असें हें मुखीं सदा राहो ।
हा ज्ञानहीन दीन प्रसन्न होवूनि शीघ्र तारा हो ॥ ३५ ॥
पाळक तूं विश्वाचा बाळकसा तोंड पसरितों बा ! मी ।
व्याळकराळकठिणतर[8] काळ कसा वारिसी न हा स्वामी ! ॥ ३६ ॥
ज्ञाता तूं, दाता तूं, त्राता तूं, वीर धीर भर्ता तूं ।
जनपीडाहर्ता तूं, श्रीरामा ! मुख्य विश्वकर्ता तूं ॥ ३७ ॥
स्तुति करुनि तुजी तुजला आह्मीं अज्ञान काय बा रिझवूं ? ।
गाउनि अमृतगुणांतें हृदयींचे ताप आपले विझवूं ॥ ३८ ॥
परि भावें गुण गातां प्रसन्न होतोसि तूं असें ठावें ।
जालें सज्जनसंगें, प्रेम कसें तें मनांत सांठावें ॥ ३९ ॥
संतांच्या वदनें मीं आयकिलीं बा तुजीं जयीं चरितें ।
त्यजुनि विषय मन केलें भरावया गुणसुधा तयींच रितें ॥ ४० ॥

---

१ लज्जा या राक्षसीला तूं ताटकेला मारलेंस तसें मार. ही परमार्थाला विघ्न करणारी आहे. तुकोबाही संतांना स्वचरित्र सांगतांना ' लाज नाहीं मनीं येऊं दिली ' असें सांगतात. २ तुझी भक्ति आत्मज्ञान प्रसवते. जनाबाई, चोखामेळा वगैरेंना तुझ्या भक्तीनेंच आत्मज्ञान झालें. ३ तोंडपुजा. ४ आत्मा–चैतन्य, अनात्मा–चैतन्यव्यतिरिक्त जी प्रकृति तिचे धर्म, देहेंद्रियांचे धर्म. ५ त्यागावे ६ कारणावांचून ७ माझ्यासारख्या जड जीवानें ८ भयंकर सर्पापेक्षांही जास्त क्रूर असा.

चापशरधरा धीरा आपद्ग्रस्तासि मज नको विसरूं ।
या परम संकटीं मीं बा पद्र तुज्यापुढें किती पसरूं ॥ ४१ ॥
विश्व तुज्या ठायीं, तूं नामीं, तें नाम साधुच्याचि मुखीं ।
तत्संग दे मला मग गुंतेना मीं कदापि तुछ सुखीं ॥ ४२ ॥
संग धरुनि विषयांचा अंगाचि मन पावलें परी न विटे ।
साधुसमागम भेषज[1] साधुनि देशील तरिच मोह फिटे ॥ ४३ ॥
चित्त अनावर रामा ! वित्तस्त्रीपुत्रचिंतनींचि रते ।
मधुलिप्तक्षुरधारा[2] चाटी, ते जीभ तत्क्षणीं चिरते ॥ ४४ ॥
तनुनिर्वाहापुरता संग धरुनिही अनर्थ मज घडला ।
सावध तरी निसरड्या मार्गीं, विचकूनि दांत मुख, पडला ॥ ४५ ॥
मन हें घातक, वेडें, विषयव्याळासवें करी क्रीडा ।
पीडाहि पावतें परि सावध नोहे, न तें धरी व्रीडा ॥ ४६ ॥
या कोडग्या मनाला विषयांची काय वाटती गोडी ! ।
खोडी तुझ्या प्रतापावांचुनियां राघवा ! न हें सोडी ॥ ४७ ॥
दे अभयदान देवा ! सेवारत मी तुझा विभो भाट ।
त्यजितां अनादरानें करील लोकांत फार बोभाट ॥ ४८ ॥
आहे प्रसाद मजवरि, ह्मणुनिच वदनासि येतसे नाम ।
हें जरि मुखा न येतें, होता कैंचा मनासि विश्राम ॥ ४९ ॥
हें सर्व सत्य तोंवरि जोंवरि तुज शरण पातलों नाहीं ।
आतां थोरपणासचि आपुलिया मात्र राघवा ! पाहीं ॥ ५० ॥
तूं करुणाघन रामा ! भक्तमयूरासि तूंचि सुख देसी ।
संनिध असोनि बापा ! न करीं या किंकरासि परदेशी ॥ ५१ ॥
बहु गोड गुण तुझे ते ऐकावे आदरें, स्वयें गावे, ।
यावेगळे मनोरथ नसती, ते तूज काय सांगावे ! ॥ ५२ ॥
संत भगवंत साचे परि भगवंतापरीस हे थोर ।
हे आंगें अंधाची यष्टी होताति थोर बहु थोर ॥ ५३ ॥
ऐसे भगवत्तत्पर सदय हृदय संत पंत भेटावे ।
ते सच्छिक्षादाते[3] मुमुक्षुबुद्धीसि होति नेटावे ॥ ५४ ॥
हे भरत ! सुमित्रात्मज ! हे सीते माय ! आयका विनती ।
शिकवा साधुजनाला, कैशी शरणागतें करावि नती ॥ ५५ ॥
श्रीरामचंद्र ! राघव ! रघुवीर ! असोंचि आळविन तुजला ।

---

१ औषध. २ मधानें भरलेल्या शस्त्राची धार ३ संत हे चांगली शिक्षा ( वळण ) लावणारे आहेत व म्हणून मुमुक्षूची बुद्धि परमार्थांत स्थिर करावयाला साह्य करितात.

संकट वारुनि घडवी माझ्या हातून या महा क्रतुला ॥ ५६ ॥
भक्तमयूर दयाघन तूं रामा ! भवदवार्तविश्रामा ! ।
साष्टांग नमन तुजला भुजलालितनिजजना गुणग्रामा ॥ ५७ ॥

---

# श्रीविठ्ठलस्तोत्र.

तुझें पादपद्मद्वयध्यान कांहीं । न केलें क्षणार्धार्थहीं येथ पाहीं ॥
घडीही नसें पावलों साधुसंगा । मला रक्ष रक्ष प्रभो ! पांडुरंगा ! ॥ १ ॥
करावी तुझी मोक्षदा शुद्ध भक्ति । गृह-स्त्री-धनींही असावी विरक्ति ॥
असें हें ठसीं[1] सर्वदा अंतरंगा; । मला रक्ष रक्ष प्रभो ! पांडुरंगा ! ॥ २ ॥
तुझें नाम निर्लज्ज होऊनि गावें, । प्रपंचांतुनी शीघ्र वाटे निघावें; ॥
करीती परंतु स्मरक्रोध दंगा । मला रक्ष रक्ष प्रभो ! पांडुरंगा ! ॥ ३ ॥
न जाणोनि माहात्म्यही आत्मनाशी । तुझें नाम येतां, महापाप नाशी ॥
स्वमार्गच्युताजामिलाघौघभंगा[2] ! । मला रक्ष रक्ष प्रभो ! पांडुरंगा ! ॥ ४ ॥
गजेंद्रासि नक्रें धरीतां जळांत । तुला आठवीतां स्वयें त्वां पळांत ॥
तया रक्षिलें सन्मनाच्या पलंगा[3] । मला रक्ष रक्ष प्रभो ! पांडुरंगा ! ॥ ५ ॥
तुज्या वामनत्वीं[4] पदातें विधीनें । जयीं क्षाळिलें भक्तिपूजाविधीनें, ॥
जगद्दोषहंत्री[5] तधींहूनि गंगा । मला रक्ष रक्ष प्रभो ! पांडुरंगा ! ॥ ६ ॥
जरी लाविला तूजशीं नित्यदावा, । तयां तारिलें त्वां भवारण्यदावा ।
स्वभक्ताचिया खाजवीलें तुरंगा । मला रक्ष रक्ष प्रभो ! पांडुरंगा ! ॥ ७ ॥
खगेंद्रध्वजा ! क्रूरकर्मा सदर्प । गिळीतो महाभीम संसारसर्प ! ॥
पहा लागल्या वेदना लक्ष अंगा । मला रक्ष रक्ष प्रभो ! पांडुरंगा ! ॥ ८ ॥

---

# आशंसाष्टक.[6]

तव पादसरोरुहीं स्वचित्तभ्रमरातें रस चाखवूनि गोवूं ।
तुज भक्त तुजे सदैव गाती मृग आह्मीं गुणगीतसक्त होवूं ॥ १ ॥
मज वाटतसे सभाग्य मोठें, भगवद्भक्त तयांत म्यां जुडावें ।
तदधीन तुज्या यशः सुधेचा ऱ्हद गंभीर तयामधें बुडावें ॥ २ ॥

---

१ ठसीव, मनांत बिंबीव. २ आत्मप्राप्तीच्या उपायापासून चुकलेला जो अजामीळ त्याचें पापभंग करणाऱ्या ! ३ साधूंच्या मनाच्या आधारा ! ४ वामनावतारीं. ५ जगाचें पाप क्षालन करणारी. ६ या अष्टकांत कवीनें आपल्या आशंसा म्ह० इच्छा काय आहेत त्या सांगितल्या आहेत. हें प्रकरण आजवर कोठेंही छापलेलें नाहीं. हें पंतांच्या दप्तरीं पंत-लिखित सांपडलें, तसेंच हुबेहूब वर दिलें आहे.

तुज वर्णिति संत संगमुक्त प्रकृति-प्रेमळ तद्गुणीं शिरावें ।
तुझिया गुणसागरांत माजें मन हें सैंधव माधवा ! विरावें ॥ ३ ॥
गमतें भगवज्जनप्रसंगें मज टाकुनि गृहादि लोभ जावें ।
करुणावरुणालया ! मुकुंदा ! तुजला सादर सर्वदा भजावें ॥ ४ ॥
तुजला रघुनाथ, रामचंद्र, प्रभुजी, यापरि नित्य आळवावें ।
मन चंचळ हें त्वदंघ्रिपद्मीं जडतां न क्षणमात्र चाळवावें ॥ ५ ॥
मन हें विषयीं उडीच घाली, विष हें जाणुनि यावरी विटावें ।
तव किर्ति उदार कामधेनू तिस मीं होउनि वासरूं चिटावें ॥ ६ ॥
तुज एक अनेक भूतभेदीं घटतोयार्क अशेपरी पहावें ।
भजकार्पितभुक्तपादराजतुलसीदाम शिरीं सदा वहावें ॥ ७ ॥
त्रिजगन्नयनप्रमोदहेतु त्वदुदारांघ्रिसरोज म्यां नमावें ।
मधुपत्व धरूनियां रमावें स्वसुखें त्या भुवनत्रयीं नमावें ॥ ८ ॥

---

# साधुसंतांची महति.

## संतांची योग्यता.

### अभंग.

संतांची शाश्वतधर्मीं चित्तवृत्ती । अधर्मीं प्रवृत्ती स्वप्नीं नसे ॥ १ ॥
संतांची संसारनदीनौका कथा । त्या संतांसी व्यथा कायसाची ॥२॥
साधुसंत गंगायमुनांचे ओघ । हा संगम मोघ कधीं नाहीं ॥ ३ ॥
संतांपासुनीयां संतां भय झालें । असें कानां आलें नाहीं कधीं ॥ ४ ॥
संत चालवीती सत्यें तरणीतें । तपें धरणीतें धरिताती ॥ ५ ॥
किंबहुना संत सर्वांचीही गती । संत मुक्तिपती संत ज्ञान ॥ ६ ॥
व्रत चालवीते एक संतराय । नामें अंतराय जाती दूर ॥ ७ ॥
प्रसाद शाश्वत, अर्थ बहुमान । यांचें मूळस्थान संत तुम्ही ॥ ८ ॥

—सावित्रीगीत.

---

## सत्संगमाहात्म्य.

सत्संगति करिताहे लीलालेशें करूनि जेंवि हित ।
न तसें माता जाणे संसारामाजि मात्र जें विहित ॥ १ ॥
सत्संगचि हित इतरीं दिसतो प्रेमा, परंतु पातळ तो ।
जोंवरि कार्या येतो जन त्यातें तोंवरीच आतळतो ॥ २ ॥

सत्संग असें ह्मणतो कीं ' जें बालक करील आ म्यां तें ।
यावें अमृत प्राशुनि जें न पुन्हां आदरील ओम्यातें[1] ' ॥ ३ ॥
सत्संगतिप्रसादें बहु भगवद्भक्तिच्या भरीं भरले ।
सरले दोष; सकल जन न तरावे जे कधींहि ते तरले ॥ ४ ॥
जीं हरिहरप्रसादीं कल्याणें वसति साधुसंगीं तीं ।
अघ शमतें, सुख गमतें, मन रमतें, जेंवि दिव्य संगीतीं ॥ ५ ॥
सत्संगमींच नानादुःखार्त तथापि चित्त रंगतसे ।
जलनिधितरंग वातें सत्संगें उठति चित्तरंग तसे ॥ ६ ॥
स्पर्शमणि सुवर्ण करी दे स्पर्शमणित्व तो न लोहातें ।
हा साधुसंग करितो साधु असाधुसि हरूनि मोहातें ॥ ७ ॥
अघ तीर्थविशेष हरी तो साधूंचाचि होय बा चेला ।
ह्या चेला जळ जैसें करितो सत्संग शुद्ध वाचेला ॥ ८ ॥
जलद बलद सस्याला हरिभजना साधुसंग हा बळद ।
मुक्तिस मुमुक्षुस करें आपण सत्संग लावितो हळद ॥ ९ ॥
परमार्थव्यवहारीं करितो पटु साधुसंग हा पंत ।
अंत करुनि जाड्याचा येणें केलेचि सर्वही संत ॥ १० ॥
प्रभुसि जडोद्धृति, पसरुनि सत्संगति माउली करा, याची ।
हे स्वप्रसादपदरें तशावरि साउली करायाची ॥ ११ ॥

---

## साधूंचीं लक्षणें.

अनता अपवित्राही साधु हित जसा नता पवित्रास ।
साधु सुहृद्द सर्वांचा, कोणासहि दे न ताप, वित्रास ॥ १२ ॥
खळ निंदी साधु रडे पुसतां ' यास्तवचि मी ' ह्मणे ' रडलों ।
नरकीं पचेल निंदक, या दुःसह दुःखसागरीं पडलों ' ॥ १३ ॥
निःसीम छळा सोसी पोसी सत्वासि संकटीं धीट ।
साधु ह्मणे, ' याचक हा जन्मोजन्मीं असो, नसो वीट ' ॥ १४ ॥
मातेचे पाय जसे छळ करित्याचे तसेचि जो पाहे ।
साधु निवे, नच कोपे, न दुरुक्तक्षोभ मानसीं राहे ॥ १५ ॥
वाढवि अन्याणुगुणा साधु सदा वायु जेंवि फुणगीतें ।
सुयशानें जरि साजे लाजे परि फार आत्मगुणगीतें ॥ १६ ॥
ज्यासह घडतें दैवें सहज पथीं चालणें पदें सात ।
त्या ' मित्र ' साधु म्हणती देतीच व्यसनसागरीं हात ॥ १७ ॥

---

[1] जें मोक्षरूप अमृत प्राशन केलें असतां आईचें दूध पुन्हां प्यावें लागणार नाहीं.

प्रणत जनाचें जाया सिद्धिप्रति सर्व योजिलें कार्य ।
साधु मरण पथकरितीं ऐसी सद्रीति वर्णिती आर्य ॥ १८ ॥
साधु प्राणी पाहुनि संसारीं तापले असुख पावे ।
' व्हावें जग मुदित ' ह्मणे ' तद्दुःखें आपुले असु खपावे ' ॥ १९ ॥
निंदा शापहि घ्यावा परि ' हरिस भजा ' असेंचि सांगावें ।
हें सच्छील त्यागुनि कुशलें तीर्थादिं अन्य कां गावें ॥ २० ॥

## साधूंची प्रार्थना.

व्हा सुप्रसन्नमानस मज दीनावरि वळाचि सज्जन हो ।
दीनोद्धारींच हृदय तुमचें, इतरीं कदापि सज्ज न हो ॥ २१ ॥
हरितां दर्शनमात्रें सर्वांच्या पापताप दैन्यातें ।
भयद तुह्मी षडरींतें रामशर जसे पलाशसैन्यातें ॥ २२ ॥
तारावें दीनांतें वारुनि उग्राहि अंतरायांतें ।
श्रीरामातें ठावें कीं एक तुम्हांचि संतरायांतें ॥ २३ ॥
सर्वार्थपूरणव्रत तों चालविलें तुह्मींच संतांनीं ।
औदार्यसत्व चिंतामण्युपळीं काय ? काय संतांनीं ? ॥ २४ ॥
भगवंत भगवदनुगां आह्मां तों संत सदनुगां ठावे ।
बाळें प्रथम वयेचे बापाचे चरण तदनु गांठावे ॥ २५ ॥
आह्मां बाळांसि बळें स्वहित तुह्मीं संत पंत पढवीतां ।
आत्मपदीं कर धरुनी प्रेमें आग्रह करूनि चढवीतां ॥ २६ ॥
सुटले सत्संगेंचि व्यसनापासूनि जीव, साधूंनीं ।
दिधलें रंकासहि निजपद धरितां, मुक्तिपदहि साधूनी ॥ २७ ॥
देती फळ बहु दिवसां देव शिळाकाष्टमृण्मय प्रणतां ।
जळमय तीर्थेंहि तसी, संतचि फळती ' नमोस्तु ते ' म्हणतां ॥ २८ ॥
यष्टि जसी अंधाला, जीवाला साधु साधुगति हेतू ।
आश्रय इतर प्लव भवजलधींत, तुह्मींच संत दृढ सेतू[३] ॥ २९ ॥

## स्मरणी[४].

श्रीविठ्ठला ! साधुवृंदांत दे वास हें मागतों बा तुला देवदेवास ।
यावें मुखाला सदाही तुजें नाम चित्तीं नसो पांडुरंगा दुजा काम ॥ १ ॥

---

१ पत्करितात. २ कल्पवृक्षाच्या ठिकाणीं. ३ पहिल्या २६ आर्या संतस्तवन प्रकरणांतल्या व ३ मंत्र भागवत स्कंध १० यांतील आहेत. ४ हें प्रकरण पंतांच्या दप्तरीं मिळालें. आ-

श्रीज्ञानदेवा ! तुज्या सर्व ओवींस गातों, म्हणे तूंचि विश्वास होवीस । जैसी कृति स्पष्ट तैसी तुजी उक्ति देती समस्ता जडालाहि हे मुक्ति ॥ २ ॥
बा नामदेवा ! तुजे साजिरे बोल वित्तेश संपत्ति यांचे नव्हे मोल । येतोचि हें ऐकतां विठ्ठला डोल सद्वृंद होतेंचि सेवावया लोलें॥ ३ ॥
बापा तुकोबा ! अभंगीं तुज्या भक्ति वैराग्य, अन्यत्र ऐसी नसे शक्ति । केली समस्तीं जनीं त्वां दया फार दावी मलाही भवांभोधिचा पार ॥ ४ ॥
बा एकनाथा ! दयाळुंत तूं थोर दीना जनांचाचि भारी तुला घोर । त्वां अंत्यजाचें कडे घेतलें पोर तारी जसे कोटि तैसाचि हा मोर ॥ ५ ॥
दत्ता ! तुझी कीर्ति गाईन मी गोड सत्ता करी सत्य मत्ताप हा खोड । मत्तारि षड्वर्ग बा एकदा मोड लत्ता हरी कालियाची कसी खोड ॥ ६ ॥
श्रीपुंडरीका ! जगीं एक तूं धन्य भक्तांत न त्वत्सम श्रेष्ठ बा अन्य । केला उभा देव तारावया अज्ञ या त्वत्प्रतापासि गाती महायज्ञ ॥ ७ ॥
बा नारदा ! फार दास स्वयें मुक्त केले तुवां, मान्य देवा तुजें उक्त । ते नावडावे मना भोग जे भुक्त तारी दयाब्धे मला हें तुला युक्त ॥ ८ ॥
बा मारुते ! प्रेम रामीं तुजें फार सीतेसि शोकाब्धिचा दाविला पार । माहात्म्य रामायणीं वर्णिलें सार ऐकोनियां प्रार्थितों दीन हा तार ॥ ९ ॥
श्रीरामनामा ! तुजा अद्भुत व्याप आम्हां अनाथासि तूं माय तूं बाप । कर्णींहि येवोनि संहारिसी पाप बाधो न देशी कधीं लेशही ताप ॥ १० ॥
श्रीसाधुहो ! या यशोवर्णनीं धीर हा बोलवावा दयेनें जसा कीर । याला ह्मणा आत्मदासांत ' ये ' सीर पावो पर क्षिप्र मोहाब्धिचें तीर ॥ ११ ॥
बा सद्गुरो ! इष्टदात्यांत तूं शूर राहो न दे तात मातें जसा सूर । गातां भवभ्रांतितें घालिसी दूर वाहो मयूरावरी त्वद्दयापूर ॥ १२ ॥
श्रीरामाचे करिती जैसे अहितांसि भल्ल भस्म रणीं ।
श्लोक तसे तेरा हे धरुत रसिक विष्णुवल्लभ स्मरणीं ॥ १३ ॥

---

# महाजनप्रार्थना.

श्रीरामभरतलक्ष्मणशत्रुघ्न महादयाळु हो पावा ।
ओपावा अभयवर प्रणतीं, दानीं न सुज्ञ कोपावा ॥ १ ॥
तारावें दीनातें हें सदया मारुते मनावरि घे ।
काय जडाहि प्रेरिलि ताराया सागरीं न नाव रिघे ? ॥ २ ॥

---

जवर अप्रसिद्ध होतें. पंतांनीं आपल्या कंठीं कोणती ' जपमाळ ' धारण केली होती हें यावरून समजेल. १ पाहिजेस. २ उत्सुक.

तूतें स्वसमसमर्थ प्रख्यात सकृप म्हणोनि आर्यातें ।
चिरजीवी करुनि प्रभु गेला ठेवूनि याचि कार्यातें ॥ ३ ॥
बा पाव जामदग्न्या[1] ! रामा ! तूं शत्रुमृगकुळीं हरिसा ।
मज तव गोत्रोत्पन्ना पीडिति कामादि नित्य हे अरि सा[2] ॥ ४ ॥
माते अरुंधति ! तुवां मद्विषयीं एकदांचि बोलावें ।
गुरुचें, गुरुपत्नीचें वचन सुशिष्यें समान तोलावें ॥ ५ ॥
भक्त श्रीरामाचा मीं, हा झाला जगांत बोभाट ।
ज्या प्रभुतें जो वर्णी सत्कार्य प्राकृताहि तो भाट ॥ ६ ॥
गुण पुससिल, तरि पढला शास्त्रासि न मंद हा न वेदास ।
येतें नामचि; सर्वश्रेष्ठ म्हणुनि ज्यास मानवे दास ॥ ७ ॥
मज भागवतांचा, कीं नामाचा भरंवसा, न इतरांचा ।
बा ! अकलंका ! लंकानाथा ! बाळासि जेंवि पितरांचा ॥ ८ ॥
आदिकवे ! प्रभुचरितीं सुज्ञ, जडहि, पावतो हुरुप, रमतो ॥
श्रीरामचरणकमळीं लाविल जीवांसि जो, गुरु परम तो ॥ ९ ॥
झालासि पढविता प्रभुपुत्रांतें रचुनि तूं सुकाव्यास ।
देवर्षिवरें जैसें निववाया भागवत शुका व्यास ॥ १० ॥
प्रभुसि कथुनि मज तारीं; विश्व तुझें यश महाकवे ! गाय ॥
धर्मज्ञा वाल्मीके ! आली तृषिता न हाकवे गाय ॥ ११ ॥
बोलाना, भेटाना; भ्यालों पापासि नारदस्वामी ! ।
काय ह्मणेल तुह्मां ? जो ह्मणतो ' भवसिंधुपारद स्वां[3] मी ' ॥ १२ ॥
बा ! पापिजनोद्धारीं तुजचि सदा परम हर्ष देवर्षे ।
देसी प्रणतांसि जसा मेघ मयूरासि हर्ष दे वर्षे ॥ १३ ॥
फिरसि सदा उद्धरिसी प्राणी संसारसंकटीं पडला ।
अढला नुपेक्षिला त्वां. दीनजनोद्धार बहु तुला घडला ॥ १४ ॥
प्रऱ्हादा ! गुरुसि रुचे जी बोले परम लाडिका वाणी ।
मुनितें विनवुनि चिकटिव तच्चरणीं पर मला डिकावाणी ॥ १५ ॥
बा बलि ! उद्धरिव कसा, सांगुनि सद्वारपाळका[4] मातें ।
कार्य निरोपेंचि करिल; न चुके सद्द्वारपाळ कामातें ॥ १६ ॥
पाणी एकोपंत द्रवुनि विकळ तृषित रासभा पाजी ।
तें लक्षविप्रभोजनसम झालें ह्मणति साधु बापा ! जी ! ॥ १७ ॥
व्यासा बा ! साक्षात् तूं नारायण, जडजनासि ताराया ।

---

१ पराडकरांचें गोत्र जामदग्न्य आहे. २ सहा. ३ आपल्या भक्तांस, ४ संतांच्या समुदायाचा रक्षक जो श्रीविष्णु त्यास.

अवतरलासि दयार्णव बोधें अज्ञान सर्व साराया ॥ १८ ॥
पळही जसें स्वरूपा ज्ञाते विसरति न विप्र भागवता ।
ग्रंथ असा न पर; न दे दुर्भत्व वरुनि नवि प्रभा गवता[1] ॥ १९ ॥
करुनि कृपात्व नृपापरि तारावें तूंचि वा शुका ! मातें ।
पुरवी साधु नताच्या न तसा कल्पद्रु आशु कामातें ॥ २० ॥
कथिलें भागवत तुवां इंद्रप्रस्थाकडील विप्रासी ।
हे कीर्ति ' भक्तमाला ' कथिती, जिस सर्व सत्कवि प्रासी ॥ २१ ॥
हो सकृप पुंडरीका ! ज्ञानेशा ! पाव नामदेवा ! हूं ।
सांग तुकोबा ! प्रभुच्या चरणीं मन आठ याम दे वाहूं ॥ २२ ॥
नामें चोखामेळा वाटे बहु धन्य तो महार मला ।
कीं भगवद्भजनींच, त्यजुनि सकळ धामकाम, हा रमला ॥ २३ ॥
ज्ञानें काय हरिजना म्हणतात महार, यवन, कुणबी, जीं ।
उमटे तोचि तरुफळीं, असतो जो काय गुप्त गुण बीजीं ॥ २४ ॥
दामाजीचा होउनि हरि पाडेवार[2] बेदरा गेला ।
पंडित रागेले, परि नच तत्प्रेमज्ञ बेद[3] रागेला ॥ २५ ॥
एक जनी हरिभक्ता शिंप्याची , हरिहरी ' ' ह्मणे बटिक ।
तीस दळाया लागे भगवान्; वदतील साधु कां लटिक? ॥ २७ ॥
कोठें उष्टीं काढी, कोठें खटपट करी, भरी पाणी ।
त्याचा होय गुमास्ता, श्रीरामानंदशिष्य जो वाणी ॥ २७ ॥
तुमची भक्ति श्रीहुनि वन्यांहुनि जेंवि नागरी बरवी ।
भक्तिप्रताप कोठें ! कोठें हा अरितमा गरीब रवी ? ॥ २८ ॥
मागें झाले, असती आतां, होणार जे पुढें काय ।
त्या भागवतांचे म्यां भावें साष्टांग वंदिले पाय ॥ २९ ॥

—महद्विज्ञापना.

---

# पंढरीमाहात्म्य.

पंढरि ! तुजमाजि सदा भगवत्कीर्तन महोत्सव व्यक्त ।
भक्त स्त्री शूद्रजनहि बहु अंत्यज यवनही तदासक्त[4] ॥ १ ॥
अवशीं, रात्रिं, पहांटे, प्रातःकाळीं, दिसा, सदा सांजे ।
नवविध भक्तिरस करिति तुस निववुनी कधीं न दासां जे ॥ २ ॥
जिकडे तिकडे हरिहरनामांचा सर्वदा असे गजर ।

---

१ प्रभा गवता वरुनि दुर्भत्व न दे. २ महार. ३ बेद. ४ त्या कीर्तनमहोत्सवांत आसक्त.

पंढरि ! करिती नृत्य प्रेमळ जन सजरही जसे अजर[1] ॥ ३ ॥
वीणातालमृदंगध्वनि विठ्ठल रामकृष्ण हा घोष ।
तोष श्रवणीं देशी, श्री पंढरि ! हरिसि सर्वही दोष ॥ ४ ॥
पंढरि ! माय ! तुज्या जो वारकरी दुरित दर्शनीं हरितो ।
करितो धन्य प्रणता; मर्त्य नव्हे होय सर्वथा हरि तो ॥ ५ ॥
तुज सुकृतीजन पावे, इतरांचे तों न वाहती पाय ।
लोक प्रसिद्ध ह्मणती, हें कीं, ' पाप्यासि पंढरी काय ? ' ॥ ६ ॥
सेविसि कथासुधा बहु पंढरि ! तूं धरुनि मौन कानांहीं ।
वाटे श्रवणसुख तुला बहु, ऐसें त्याहि शौनका नाहीं ॥ ७ ॥
प्रेमळ, भोळे, भावुक, यांच्या पंढरि ! कथा तुला रुचती ।
देवहि उभाचि आजुन, नच गेली बहुसमाशतें शुचती ॥ ८ ॥
पंढरि ! कथा यथामति करि त्या दंडीही जोडिती पाणी ।
खळही तुज्या प्रसादें बहु नयनांतूनि सोडिती पाणी ॥ ९ ॥
पुंडलिकानें केला ऐसा कोणीहि धर्म नय नाहीं ।
कीं दीनबंधु घेती भेटुनि पाहोनि शर्म[2] नयनांहीं ॥ १० ॥
श्रीराम अहल्येतें तारी, यश त्याहि शुद्ध रायाचें ।
परि अत्यद्भुत याचें कलिजडजनतेसि उद्धरायाचें ॥ ११ ॥
शिंपी, माळी, वाणी, कुंभार, महार, यवन, चांभार ।
बहु जड तरले, व्हावा मग शेषाचा उणा न कां भार ? ॥ १२ ॥
भक्तिसुखनि[3] पंढरि तूं ! साधुसभेचें सभाग्य माहेर
बाहेर प्रेम जया, त्याच्या दैवीं सदैव आहे ' रें[4] ' ॥ १३ ॥
भक्तवश त्यक्तप्रभुभाव नव्हे पांडुरंग देव कसा ।
बारा वर्षें वसला एकोबाच्या गृहांत सेवकसा ॥ १४ ॥
न वहातांही धांवे त्या नाम्याच्या स्वयेंचि वटकीला ।
लागे देव दळाया, काय जनीनें तदर्थ हटकीला ? ॥ १५ ॥
जरि बोबडें पित्याचें मोहावें मन तथापि तोकानें ।
प्रभु साळ्याभोळ्याची वात्सल्यकथा तथा पितो कानें ॥ १६ ॥
भक्तयशःस्वयशातें गात्याच्या ठाकतो पुढें मागें ।
डोलतसे परमसुखें डोलावें सुस्वरें जसें नागें ॥ १७ ॥
दासें समर्पिलें जें, भक्तिरसें, पत्र पुष्प फळ तोय ।
या पुंडलीकवरदा तें परमप्रीतिकर सदा होय ॥ १८ ॥
वीणा, ताल, मृदंग, प्रेमें जन जे कथेंत वाजविती ॥

---

१ वृद्धही तरुणासारखे प्रेमभरानें नाचतात. २ कल्याण. ३ भक्तीची उत्तम खाण. ४ रड.

विठ्ठलदृष्टि, तयातें आलिंगुनि, योगियासि लाजविती ॥ १९ ॥
स्मरणें, नमनें, स्वयशःश्रवणें निःशेष दोष वारावे ।
हा पांडुरंगदंडक[1], जीव जड प्राज्ञ सर्व तारावे ॥ २० ॥

---

# गंगेची प्रार्थना.

पुरुषार्थांची शुद्धा गंगे ! तूं सद्रसा धुनीराजी[2] ।
तुज पंचप्राणांहीं, पाहुनि बहु भद्र[3], साधु नीरांजी[4]. ॥ १ ॥
श्रीकृष्णमूर्ति यमुना, गंगे ! श्रीशंभुमूर्ति तूं धवळा; ।
ब्रह्मसुखाचा देतां, द्रवुनि तुह्मी माय मावसी कवळा ॥ २ ॥
वाटे अश्वासि, तसें लोळावें कविजना तुज्या पुलिनीं ।
क्रीडावें मुक्तींनीं माहेरीं जेंवि लाडक्या मुलिनीं ॥ ३ ॥
गमनें, नमनें, स्वंवनें[5], पवनें स्तवनेंहि न व्यथा राहे ।
ऐसे अत्यद्भुत जे त्वद्गुण, विश्वासि भव्य थारा हे ॥ ४ ॥
देवि ! दयावति ! दवडिसि दासाची दुःख दुर्दशा दूर ।
पापातें पळवितसे परमपवित्रे ! तुझा पयःपूर ॥ ५ ॥
मंदाकिनी नभीं, नरलोकीं भागीरथी, स्वयें असमी ।
गंगे ! भुजंगलोकीं, भोगवती नाम धरुनि तूं वससी ॥ ६ ॥
माते ! गंगे ! बुडतो जो तुझिया परमपूत तोयांत ।
हा भवजलधि सुदुस्तर जरि, तरि न बुडे कदापि तो यांत ॥ ७ ॥
वारी हिमाद्रिचा, तवसंबंधें सर्व ताप, परिसर[6] तो ।
भोग, तव जना गरुडा पाहुनि, अत्युग्र सापपरि, सरतो ॥ ८ ॥
न उपासावें, गंगे ! देवि ! तुला अंतरोनि, पायसदा[7] ।
तुकडा शिळाहि खावा; जवळ करावे तुजेचि पाय सदा ॥ ९ ॥
तुवां मत्पत्राला[8] जननि ! दिधला मान, कळलें
तुजें, कारुण्यार्द्रे ! मन मजकडे स्पष्ट वळलें ।
सुखें येणें झालें, सकळहि पथीं विघ्न टळलें
प्रसू प्रक्षाळील त्वरित न कशी बाळ मळलें ? ॥ १० ॥
वदे ज्ञाता, ' मुक्त त्वरित तुज गंगा करिल गा ! '
मला नाहीं संतांहुनि इतर या भूवरि लगा[9] ।

---

१ न्याय, नियम. २ नदी. ३ कल्याण. ४ निरांजनविधीनें ओंवाळी. ५ आपल्या उदकानें. ६ समोंवतालचा भाग. ७ क्षीर देणाऱ्या ( तुला ) ८ ही प्रार्थना काशीस गंगेपुढें बसून केली. तेथें जाण्यापूर्वी त्यांनीं गंगेस एक विज्ञप्तिपत्र पाठविलें होतें. ९ आधार.

तुला आलों आहें जननि ! कर जोडूनि शरण
स्वतीरीं त्वां यावें द्रवुनि मज काशींत मरण ॥ ११ ॥
गळावा त्वत्तीरीं भगवति ! न हा देह सदनीं
पडो गंगे ! तूजें मरणसमयीं, तोय वदनीं ।
विवेकीं यावें, जें धवलपण हेरंबरदनीं[1]
भवीं हो त्वन्नेत्र, प्रभुनयन तें जेंवि मदनीं ॥ १२ ॥
पहातां दीनातें, सकरुण खरा तो कळकळे
द्रवेना तत्प्रेमा भगवति ! मना पोकळ कळे ।
तव स्नेहा नाहीं जननि ! उपमा, तापलि कडे
मुला घे जी साची, ढकलि उपमाता पलिकडे ॥ १३ ॥
तुज्या तीरीं नीरीं हृदय रमतें, दुःख शमतें
यशोगानें पानें कुमत गळतें, विघ्न टळतें ।
कळी भंगे गंगे ! धडरि स्फुरती दोष नुरती
दिली रामें, नामें तशिच जगतीला निजगती[2] ॥ १४ ॥
द्रवावें त्वां गंगे ! द्रवुनि भगवत्कीर्ति वळली
कृपा केली जी, ती बहु म्हणुनि सर्वत्र कळली ।
ह्मणें प्रेमें सेवीं प्रमुदित रहा मी नर मला
न कां यावें ? ओघीं तव मकर हा मीन रमला ॥ १५ ॥
अनेक शत पाळिसी अकृप जंतु जे घातकी
समुद्धरिसि जान्हवि ! त्रिपथगे ? महापातकी ।
नसे जड मयूर हा, द्रवुनि यासि दे आसरा
करील सुरभी सुखी, जवळ आलिया वासरा ॥ १६ ॥
श्रीभागीरथि ! शेवटीं निजतटीं दे वास या, हा किती ?
कोणीही शरणागता, सदय जे ज्ञाते, न ते हाकिती ।
माता, धांवुनि आलिया स्वनिकट, ग्रीष्मातपीं तापल्या
आधीं कीं कुरवाळिती, निववितो, स्नेहें, मुला आपल्या ॥ १७ ॥

---

# रामस्तव.

( अनुष्टुभ् वृत्त )

श्रीरामा ! नीरदश्यामा ! सुखधामा ! रघूत्तमा ! ।
त्वत्पादनखचंद्राची ज्योत्स्ना माझ्या हरू तमा ॥ १ ॥

---

१ गजाननाच्या दंताप्रमाणें माझा विवेक धवळ असो व शंकराच्या नेत्रानें मदनास जाळिलें तसें तुझा नेत्र भव ( संसार ) निरसो. २ मोक्ष.

ज्यास्तव स्मरतों नित्य स्वामी ! तुज दयाकरा ।
तापापासूनि हा दीन मुक्त होय असें करा ॥ २ ॥
सेवा करावया लावा देवा ! हा योग्य चाकर ।
या तप्ताच्या शिरीं आतपत्र[1] हो तुमचा कर ॥ ३ ॥
शरणागतसंत्राणीं रामा ! तूं बहु सादर ।
ऐसें असोनियां, दीन पावतो हा कसा दर ! ॥ ४ ॥
मायानदींत श्रीरामा ! तुझे चरण सांगडी ।
बहु आवडले हेची साधूंच्या मानसां गडी ॥ ५ ॥
मीनांचें जीवन जळ, दीनांचें तूंचि केवळ ।
मीं नाथा ! तापलों. यत्नहीनाचें मुख्य तूं बळ ॥ ६ ॥
आलों शरण्या[2] ! तुजला शरणागत पातकी ।
न होसि तूं दीनबंधो ! शरणागतघातकी ॥ ७ ॥
विश्वास विश्वास तुझा कीं तूं दीनासि रक्षिसी ।
कशाही संकटीं ' धांव ' ह्मणतां न उपेक्षिसी ॥ ८ ॥
तुझ्या प्रतापें आह्मांतें या काळीं जरि पाळिलें ।
तरी सांभाळिलें सर्व; यश नातरि वाळिलें ॥ ९ ॥
गाय पंकांत रुतली राय तो तीस उद्धरी ।
पाय दीनासि रक्षीना काय श्रेष्ठत्व तें तरी ? ॥ १० ॥

---

# वाङ्मन:प्रार्थना.[3]

श्रीरामनाम जपतां तरशील लाटीं[4] हूं, काय पाहसि ? असो भलतें ललाटीं ।
राहें घरींच, न शिरेंहि कडेकपाटीं; तें बैसवील तुज मुक्तिशि एकपाटीं[5] ॥ १ ॥
नैकाघकोटि[6] मग नाम पवि; त्रपा[7] हें तीर्थासि दे, परम नाम पवित्र पाहें ।
श्रीरामनाम गुरु संतत पावनांत त्यागूनियां, न करि संत तपा वनांत ॥ २ ॥
चित्ता ! धरीं न दुसरी तिळ आस, राहें, श्रीरामनामचि करीं दृढ आसरा हें ।
रक्षील पूरवुनि कामहि, मान गानीं स्वर्गी किजे, परि फिका महिमा नगांनीं ॥३॥
नासावया स्मरणिं मानस खेद येतें; नामापरी न करिती च सखे दयेतें ।
हे सत्सुधांबुनिधिची भजकास वीची; ते न्यून दृष्टि गमते मज कासवीची ॥ ४ ॥
नामींच, सोडुनि दुजा पथ, वावरावें; रामायणादिकृतिला अथवा वरावें ।
हे सूपदेश मनिं भव्य वहा रसाचे; त्याहूनियां इतर न व्यवहार साचे ॥ ५ ॥

---

१ छत्र, उष्णता ( ताप ) नाहींसा करणारा. २ शरणागतांचा आधार, पालक. ३ वाचा व मन यांची प्रार्थना. ४ लहर, लाट, प्रपंचलहरींत. ५ एका पाटावर बसवील, मुक्तीशीं तुझें लग्न लावील. ६ अनेक पापांचे कोट्यवधी ( पर्वत ) ७ लज्जा.

घाली भवांत रघुनायकनावनौके; गेले तरोनि सहजेंचि मना! वनौकें[१]।
तारी क्षणांतचि, न तें करवि प्रयास; साक्षी पुरातन दयाकर विप्र[२] यास ॥ ६ ॥
श्रीरामनाम तरि[३] अद्भुत; आढळेना ऐशी दुजी; स्वपद सोडुनियां ढळेना।
दावी सदा सुगति, हेचि नमज्जनातें दे; पावली बहु भरेंहि न मज्जनातें ॥ ७ ॥
वर्तो प्रपंचविषयांत अवासवा[४] ही; भी नामनिष्ठ न नृपास, न वासवा ही।
यावांचुनि श्रम सुनिष्फळ तापसांचे; तापक्षयार्थ तपतां मनिं ताप सांचे ॥ ८ ॥
ज्या रामनाम अमृतोत्तम नाचवीतें तो जाणतो शिवचि एक मना! चवीतें।
तैसेचि ते रसिक सेविति या रसा जे लोभी; रसज्ञपण त्यांसिच फार साजे ॥ ९ ॥
मूढासि नामचि, तदन्य अपाय साचे; बाळासि दे अशन पुष्टि न पायसाचें।
दुग्धें जसे शिशु; न तो नवनीतपानें; नामें तरे जन, तसा न वनीं तपानें ॥ १० ॥
यामाष्टकांतहि पळार्धहि आळसानें माता जसें न विसरे निज बाळ सानें,।
तैसेचि नामजननी बहु वत्सला हे; आनंद या सुरभिचा बहु वत्स लाहे ॥ ११ ॥
नामामृत, त्यजुनि साखर, ओरपीती; मानूनि दुर्लभ सुधाधिक थोर पीती।
स्त्री हाणिती जरि शिरींहि सकोप टांचा, लागे तथापि रस गोडचि खोपटाचा ॥ १२ ॥
ध्याया पलाशपतिच्या अरिला[६] जगावें; त्याचें यश, त्यजुनियां वरि लाज, गावें।
ऐकें मना! परिस तूंहि जिभे! कशाला व्यर्थोदितें करिसि हें मुख भेकशाला?॥ १३ ॥
हो स्तोत्रपात्र, रसने! प्रभुनाम गा गे! मान्या शुनी न, जरि आठहि याम गागे।
हे मान्य, पुण्य, पुरुषार्थ सुखादि; सोपी मुक्ती हि; नामरस दुर्बळसा दिसो, पी ॥ १४ ॥
संतासि वेड हरिनामनवासवाचें पीयूष तेंवि हरिना मन वासवाचें।
कीं तो तदन्य विषयांत रमे; न केला वेडा; भजे परम सादर मेनकेला! ॥ १५ ॥
ऐकोनि पाठ करिं दोनचि वर्ण वाचे! जे राम हे, प्लव महाविपदर्णवाचे।
तो सत्रकोरहित राघव इंदु बा! हे जें सद्ग्यामृत तदीय सुबिंदु वाहे ॥ १६ ॥

मोहीं श्रीरामनामा! निज मधुर गुणें सर्वदा या जिभेला।
माशीला शर्करेचा स्ववश करि जसा चाखण्यामाजि भेला ॥
गुंतो ही जीभ जैसी नव मधुसि जसी धांव घेऊनि हुंगी।
राहो गुंतोनि लोभें त्यजुनि मरणभी विस्मृतज्ञाति भुंगी ॥ १७ ॥

---

# सद्गुरूची महति.

श्रीगुरुचें चरणांबुजरज जें, तें मुख्य होय मंगल गा!।
अंगलगा[८] सिद्धि सदा याचया; याचाचि धरिति संगलगा[९] ॥ १ ॥

---

१ वनांत राहणारे मुनी. २ नारद. ३ नौका. ४ यथेष्ट. ५ पुष्ट होई. ६ राक्षसशत्रुला, रामाला. ७ हरिनामरूप नवमद्याचें. ८ अंगास लागलेल्या, चिकटलेल्या. ९ आश्रय.

श्रीगुरुकडे, भवमहाव्यसनीं गुरुभक्त चित्त पाठवुनी।
होय सुखी, हेमंतीं देउनि शीतार्त जेंवि पाठ उनीं ॥ २ ॥
श्रीगुरुनें लीलेनें सर्व श्रुतिशास्त्रसार पढवीलें।
ध्रुव बहुमत परम पदीं रंकातें कर धरूनि चढवीलें ॥ ३ ॥
श्रीगुरूच्या सोडावें न नता प्रेमें, जसें नभा वातें।
इष्टा मित्रा सुहृदा आप्ता सख्याहि ये न भावा तें ॥ ४ ॥
श्रीगुरुचे जे, त्यांच्या कामाद्यरि[1] साहती लत्ता।
गुरुभक्ताची चाले त्या काळावरिहि सर्वदा सत्ता ॥ ५ ॥
श्रीगुरु हा चतुरानन, चतुरासि नव्या नव्याचि सृष्टींत।
किति न चमत्कृति दावी ? प्रकटाया प्रेमबाष्प दृष्टींत ॥ ६ ॥
श्रीगुरु शंकर, येणें सुदृढ स्वानुभवभव्य चापधरें॥
भस्म क्षणांत केलें देहपुर[2]त्रय सुतीक्ष्ण बोधशरें ॥ ७ ॥
श्रीगुरु माय, श्रीगुरु तात, श्रीगुरु धणी परित्राण।
श्रीगुरु वित्त, श्रीगुरु विद्या, श्रीगुरुचि जीवन प्राण ॥ ८ ॥
श्रीगुरुचें व्हावें जें लोड, उशी, दार, सुत, पलंग डबा।
'सांनिध्यार्थ चरण घे मोडुनि' ह्मणेल सुतप 'लंगड बा!' ॥ ९ ॥
श्रीगुरुचे जो भगवद्गुणसे प्रेमें द्रवोनि गुण गातो।
श्रीचा, सुकीर्तिचा किंबहुना सन्मुक्तिचाहि कुणगा तो ॥ १० ॥
श्रीगुरुच्या भजनसुखें क्षण देहाचा जया पडे विसर।
त्याच्या षडरातींचा हा ! हा ! हा ! हा ! म्हणे, रडे विसर[3] ॥ ११ ॥
श्रीगुरुवचनासि, जसा चातक मेघोदकासि, आ पसरी।
न करील तद्यशाची त्या श्रीसुरसिंधुचेहि आप सरी[4] ॥ १२ ॥
श्रीगुरु पाहे, नुरवुनि तिळभरिही भेद, सारखे दास।
प्रणतांच्या शमवि श्रीगुरुचें वच वेदसार खेदास ॥ १३ ॥
श्रीगुरुपदप्रसादें ध्रुवबाळें सुपद जोडिलें अढळ।
इच्छितपदार्थदानीं कोणाचा हात बा ! असा सढळ ॥ १४ ॥
श्रीगुरुवांचुनि वाचुनि विफळ जिणें, यांत वांकडें काय ?।
शुक सांगे भागविला कृष्णें, वाहूनि लांकडें, काय ॥ १५ ॥
श्रीगुरु ज्यातें तारी संसाराब्धींत, संत तोचि तरे।
श्रीगुरुसि शरण जाणें चित्ता ! हें होय संततोचित रे ! ॥ १६ ॥
श्रीगुरुच्या शाश्वत सुखरूपी चरणींच, जेंवि पंगु, रहा।

---

१ कामक्रोधादि सहा उग्र शत्रु. २ स्थूल सूक्ष्म व कारण हे तीन देह हेच कोणी त्रिपुर यांचें दहन करणारा गुरु हाच शंकर. ३ समुदाय ( संबंध षड्रिपूंकडे ). ४ बरोबरी.

चित्ता ! भवविभवातें न भुले, अत्यल्प काळ भंगुर हा ॥ १७
श्रीगुरुदेवा ! सेवा घे वात्सल्येंकरूनि अनवरत ।
मन वर तव दासाचें हा पावुनि हो असेंचि अनव रत ॥ १८ ॥
श्रीगुरुवर्या ! दे तें, मर्यादेतें न शील जें मोडी ।
थोडीहि मनें विष या विषया जाणुनि धरूं नये गोडी ॥ १९ ॥
श्रीगुरुराया ! शुद्ध ब्रह्मचि तूं नर न, दिससि जर नरसा ।
तक्र तसें दुग्ध दिसे, दोहींच्या किमपि साम्य परि न रसा ॥ २० ॥
श्रीगुरुनाथा ! माथा लववुनि, हा दास बोलतो कांहीं ।
बोलावेंचि शिकविलें, हृदयविनोदार्थ, बोल तोकांहीं ॥ २१ ॥
श्रीगुरुराया ! अंतर्बाह्य न अन्यत्र सर्वथा नातें ।
आया बाया माया दाविति देती न सर्व थानातें ॥ २२ ॥
श्रीगुरुराया ! जाया आयासा या स्वजन्ममरणाच्या ।
स्मरणाच्या कासेला लागावें बा ! तुझ्याचि चरणाच्या ॥ २३ ॥
श्रीगुरुराया ! प्रेमें सेवावे म्यां तुझे सदा चरण ।
हे मात्र न सोडावे, जोडावें निश्चयें सदाचरण ॥ २४ ॥
श्रीगुरुराया ! ज्या या जायासुतवित्तसंपदा, साच्या ।
कृत्याशा अत्युग्रा देती हृदयासि कंप दासाच्या ॥ २५ ॥

गुरुस्तुतिमुक्तांजलि.

## गुरुशिष्यसंवाद.

' स्वामी ! काय ग्राह्य ? स्वमुखें सांगा, करा दया पूर्ण ' ।
' शिष्या ! स्वीकारावें गुरुवचन प्रणतिपूर्व अतितूर्ण ' ॥ १ ॥
' काय त्यागावें ? तें स्वामी ! सांगा अजाणत्यास मज ' ।
' शिष्या ! अकार्य सारें टाकावें, हें मनीं बरें समज ' ॥ २ ॥
' सत्वर काय करावें ! स्वामी ! तुमचाचि बोल मज वेद ' ।
' वत्सा ! शीघ्र करावा ज्ञानें संसारसंततिच्छेद ' ॥ ३ ॥
' स्वामी ! वैरी कोण ? ' ' छात्रा ! तो शत्रु जो अनुद्योग ।
ज्या उद्योगाभावें पावति विलयासि सर्व सुखभोग ' ॥ ४ ॥
' स्वामी ! शूर म्हणावें कोणाला ? हें मला तुम्ही बोधा ' ।
' शिष्या ! स्त्रीनेत्रशरें पावेना जो व्यथेसि, तो योधा ' ॥ ५ ॥
' गुरुतेचें मूळ मला स्वामी ! कांहींच ठाउकें नाहीं ' ।
' शिष्या ! न मागणें हें गौरवबीज स्वमानसीं पाहीं ' ॥ ६ ।
' दारिद्र्य कोण सांगा ? बहु पुसतों, कीं तुह्मा नसे रोष ' ।

'शिष्या ! बरवें पुशिलें; दारिद्र्यपण तेंचि जो असंतोष ' ॥ ७ ॥
'जाड्य कशास ह्मणावें ! हें सांगाजी ! मला सुड्डासास ' ।
'शिष्या ! जो कौशल्यप्राप्तीसाठीं नसेचि अभ्यास ' ॥ ८ ॥
'स्वामी ! कोण सुदुःसह सर्वां नरकांपरीसही नरक ? ' ।
'परवशताचि निरय, हें जाणुनि, तूं संग सोडुनी सरक ' ॥ ९ ॥
'स्वामी ! जे जे प्राणी, त्यांचें प्रिय वस्तु मुख्य तें काय ? ' ।
'शिष्या ? पंचप्राणचि लोकांचा प्रियपदार्थ समुदाय ' ॥ १० ॥
'मित्र कवण ? हें सांगा, संशय न तुझांविना दुजा छेदी ! ' ।
'तो मित्र होय बापा ! पापाचारांत जो बुडों नेदी ' ॥ ११ ॥
'शल्य असे कोण ? गुरो ! मरणापर्यंत ज्यामुळें ताप ' ।
'तें शल्य नेत्र झांकुनि, केलें असतें सुगुप्त जें पाप ' ॥ १२ ॥
'यत्न करावा कोठें ? हें सांगा जी ! तुह्मीं महा ज्ञानी ' ।
'शिष्या ! यत्न करावा विद्याभ्यासीं, सदौषधीं, दानीं ' ॥ १३ ॥
'कोण प्रिया करावी ? स्वामी ! करुणामृतद्रवन्हृदया ! ' ॥
'वत्सा ! प्रिया करावी सन्मैत्री, दक्षता, तशीच दया ' ॥ १४ ॥

प्रश्नोत्तररत्नमाला.

---

# नाममाहात्म्य.

भागवतांच्या सुहृदा ! नामा ! तूं हरिसि सर्व पापदर ।
यास्तव सदया ! वरदा ! दीनें म्यां पसरिला तुला पदर ॥ १ ॥
दैवें तुजशीं सत्सहवासांत नवीच ओळखी पडली ।
तुझ्या मधुरतरगुणीं अतिचंचल चित्तवृत्ति ही जडली ॥ २ ॥
नारदवाल्मीकिशुकव्यासादि सखे तुजे तुला भजती ।
मित्र तुजें ह्मणवाया, कैंची दीनासि योग्यता मज ती ॥ ३ ॥
सर्वत्र स्नेह तुझा सम, समयीं संकटीं पुढें होसी, ।
परमपदीं बैसविसी रंकाहि, वेडानि सुलभ तूं जोशी ॥ ४ ॥
तूं मात्र रामनामा ! कामा येसी न पाहसी दोष ।
दुसरे सखे सखेद त्यजती करिती नयच्युतीं[2] रोष ॥ ५ ॥
रामें निजप्रजातें बहु सुख दिधलें तसेंचि तद्राज्य ।
नामा ! त्या मागें त्वां विश्वाला दाविलें सुख प्राज्य ॥ ६ ॥
नामा ! या[3] मातांनीं तान्हीं[4] थानींहि लाविलीं मरती ।
त्वद्पत्यें दुस्तर भवसिंधूंत जडासि तारिती मरती ॥ ७ ॥

---

१ शुभमुहूर्त. २नीतिच्युत पुरुषाचे ठिकाणीं. ३ जगांतील सामान्य माता. ४ तान्हीं.

नामा ! रामाहुनि तूं सदय; स्तुतिवाक्य हें न दासाचें ।
न ह्मणें सत्य ह्मणों मन बापा ! करुणासुधानदा ! साचें ॥ ८ ॥
एक अयोध्या नेली तरि मागें पुष्कळ प्रजा उरली ।
तीची तवप्रसादें अमृतरसास्वादनस्पृहा पुरली ॥ ९ ॥
रामें तात त्यजिला शोकीं याहूनि कोण अत्याग[1] ? ।
नामें त्वां तद्धर्म[2]विन केलें, न करितांचि तत्त्याग ॥ १० ॥
श्रीरामें क्षत्रियकुलकाल, तुवां जिंकिला जगत्काळ ।
तो भवचापचि खंडी, तूं भव[3]भवपाशजाळ तात्काळ ॥ ११ ॥
श्रीरामाच्या कंठीं घाली जनकाख्यनृपतिची बाळा; ।
तुझिया गळां सुरासुरनरवरसद्वृत्ति घालिती माळा ॥ १२ ॥
विश्वस्तप्रतिपालन, दुर्जनचित्तप्रसादन स्वैर ।
केलें, आणि न केलें पुण्य[4]जनेश्वरकुळीं तुवां वैर ॥ १३ ॥
खलकृतदोषारोपें जरि तवपदसेवनासि अंतरती ।
प्राणसख्या ! नामा ! मग साध्वी सन्मंडळी कशी तरती ? ॥ १४ ॥
स्वल्पद वियोगघटिका युगशतगुर्वी तवाश्रितां होय ।
श्रीरामवानरांचें नाम नरापरिस धैर्य बहु होय ॥ १५ ॥
नामा ! सामात्य प्रभु गेला स्वपदांतरासि ज्या काळीं ।
दे अधिकार तुज निजप्रतिनिधिला कीं, सुखें प्रजा पाळीं ॥ १६ ॥
नामा ! जामाता तूं करिसी निजदास, आत्मजा मुक्ती ।
देसि, ह्मणूनचि पुष्कळ गौरविसी; सूचली भली युक्ती ॥ १७ ॥
तृष्णानदींत अधना तारिसि तूं नामराज नावाडी ।
तोचि उदार, सदन्नें जो क्षुधिता पामरा जना वाडी ॥ १८ ॥
नामा ! बा ! माहेरा न्याया आलासि काय तूं मूळ ।
न सुचेचि कामधाम, प्रकट स्वांतासि[6] लाविलें खूळ ॥ १९ ॥
प्रभुपदिं भवसिंधूध्दृत मुक्तांची नित्य एक लाखोली ।
वाहसि जाणसि कुशला ! भवाब्धिची तूंचि एकला खोली ॥ २० ॥
तूं अमृतशालि नामा ! भगवज्जनवदनपद्म तें चाँहें[7] ।
प्रेमळजनसुक्षेत्रें, भरिसि पिकें, मिळसि आपुल्या पाडें ॥ २१ ॥
कळिकाळीं मंत्रांचें तेज प्रतिवासर क्षया जाय ।
तेज चढे तुज नामा ! बहु माने काळ हा तुला काय ? ॥ २२ ॥

---

१ अति अपराध, पाप. २ त्या दशरथाचें रक्षण. ३ शंकराचें संसारपाशाचें जाळें. ४ रामानें रावणकुलीं वैर केलें तसें त्वां केलें नाहीं. ‘ पुण्यजना ’ वर श्लेष आहे. पुण्यजन म्हणजे राक्षस असाही अर्थ आहे. ५ आत्मस्वरूपस्थिति. ६ चित्त, मन. ७ वीं पेरतांना ज्यांतून शेनांत पडतें तें.

नामा ! मामाकाकादादाबाबादि आप्त जन्माप्त[1] ।
स्नेही तेही तूंही; त्वत्स्नेहें परि जगत्त्रय व्याप्त ॥ २३ ॥
दुष्टा कलिवांचुनि, तूं आवडसी फार साधुचित्तास ।
तुज जपति परमहंसहि नित्य, जसे कृपण लोक वित्तास ॥ २४ ॥
यद्रसनाग्रीं नाचसि तूं होउनि सुप्रसन्न नटसा रे ! ।
नाचों लागति त्याचे भवपाशविमुक्त पितर चट सारे ॥ २५ ॥
नामा स्वामात्या तुज, राज्यभरोद्वहनयोग्यशक्तीस ।
निजजनधनभवनपरित्राणाधिकृतिहि विशुद्ध भक्तीस ॥ २६ ॥
त्रिभुवनराज्य प्रभुचें प्रतिनिधिनें त्वां स्वहस्तगत केलें ।
भोळ्या दिगंबराचें आक्रमिलें वतन, जळ जसें तैलें ॥ २७ ॥
या काळांत भरभर स्वामी ! तूंचीच, कीं धणी हातीं; ।
घेसी आश्रितकामें एकामें करुनि तुलवती पातीं ॥ २८ ॥
सर्वाभीष्टपदार्थांमध्यें तूं फार मिष्ट नामरसा ! ।
पामर साच्युत सांबहि तुज सेविति, जेंवि भृंग तामरसा ॥ २९ ॥
सनकादि बंधु चवघे, नारद, शुक, शंभु, मारुती, चेले ।
नेले भुलवुनि, गेले संसारांतूनि, फार वश केले ॥ ३० ॥
भगवन्नामोच्चारें सकळेंहि अघें सवासनें जळती ।
मळती न नामधारक, पळती यमदूत विघ्नही टळती ॥ ३१ ॥
तुजें कुशळ नाम बा ! हळुहळू मना आकळी
दुरत्यय असा महा खळहि त्यास भी हा कळी ।
हरि व्यसन पाप हें; बहु कशास ? कायाधवा-[3]
परि त्वरित भेटवी तुजहि योगमायाधवा ! ॥ ३२ ॥
तुम्हांसमचि हें गुणें; अणु उणें नसे नाम, हा
दिसे अधिकहीं, तसा गुण तुला असेना महा ।
सदैव भलत्यासही सुलभ, आणखी गायका
छळी न, न अधोगति क्षणाहि दे जगन्नायका ॥ ३३ ॥

---

# संशयरत्नमाला.

संसारसागरांत बुडत असतां परमेश्वरानें आपणास तारावें म्हणून कर्वानें देवाचा धांवा केला. भक्ताविषयीं कनवाळू देव लवकर कां येईना म्हणून कर्वानें अनेक संशय घेतले

---

१ जन्मापासून जडलेले. २ एकसरा, डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच. ३ प्रल्हाद. ४ उत्तरार्धांत नामाचें रामाहूनही श्रेष्ठत्व कसें हें दाखविलें आहे. राम भक्तांना मात्र सुलभ आहे; नाम जडमूढपतितांसुद्धां सर्वांना आहे. ५ बळीला देवानें छळलें व पाताळ दाखविलें.

ते या रत्नमालेत गुंफले आहेत. खालीं दिलेल्या टीपा पंतांनीं स्वलिखित प्रतींत स्वहस्तानें समासांत जशा दिल्या आहेत तशाच घेतल्या आहेत.

उठतां बहु त्वरेनें 'कोठें जातां?' असें तुझां देवी।
पुसती झाली, जाणों पुसतां, ज्ञाता पुढें न पद ठेवी ॥ १ ॥
किंवा नारद आला आलापीत स्वकीय सच्चरितें।
प्रेमळ गीत तुझांला हरि! हरिणापरिस बहुत वश करितें ॥ २ ॥
कीं माझें दुर्दैव प्रभुच्या मार्गांत आडवें पडलें।
शरणागत भयशमना! यास्तव येणें तुजें नसे घडलें? ॥ ३ ॥
किंवा मजहुनि दुसरा कोणी बहु दीन दास आढळला।
तत्शुभदैवसमीरें त्यावरि करुणाघन प्रभू वळला ॥ ४ ॥
बहुधा बळिचें द्वार क्षणभरिही सोडितां नये देवा।
न चुकावी छलपापप्रायश्चित्तार्थ साधुची सेवा ॥ ५ ॥
प्रायः सुमुहूर्ताचा शोध करायासि लागला वेळ।
होय महत्कार्य परी प्रभुचा तों नित्य सहज हा खेळ ॥ ६ ॥
किंवा तुज एकाकी पाहुनि, खळ दैत्य आडवे आले।
फुटतां सागर सिकतासेतूचें काय त्यापुढें चाले? ॥ ७ ॥
किंवा तुज गुंतविलें भजकीं परि ते दयार्द्र या रंकीं।
उद्धरित्यासि न सज्जन गुंतविती, गाय कष्टतां पंकीं ॥ ८ ॥
किंवा चुकलें कांहीं रतवनीं, तेणेंचि मागुता बससी?।
तरि हें मन्मूर्खत्व, प्रभु तूं दोषज्ञही तसा नससी ॥ ९ ॥
हरिहर ह्मणतो यावें कोणें? यद्दास्य पथकरहि तो घे।
जपतों, अन्योन्याच्या कार्या जपतां जसे तुह्मी दोघे ॥ १० ॥
केंव्हीं असेल निद्रा, कानीं गेली नसेल ही हाक;।
तो समय होय हा भवदन्यप्रभुकोप जिष्णुचा नाक ॥ ११ ॥
'मीं द्विजराज मयूरत्राण न केलें' अशी धरो लाज।
प्रस्थानीं परि गरुडें सिद्ध असावेंचि, लागतां कांज ॥ १२ ॥

---

१ पर्यंकावरून. २ पुसल्यावर गेल्यास कार्यसिद्धि नाहीं असें जाणून. ३ गीतश्रवणीं कांहींच भान नसतें. ४ आपला समूळोच्छेद न व्हावा म्हणोन. ५ परमार्ताकडे आधीं जावें हें उचित. ६ सज्जन सेवेनें प्रसन्न होतो, अपराध क्षमा करितो. ७ शुभलग्नीं समर्थ महत्कार्य सुहृद्दर्शनादि करितात. ८ आमच्या दृष्टीनें. ९ खेळास मुहूर्त पाहणें नलगे. १० ते तुजपुढें तुच्छ. ११ मत्संदेह वृथा. १२ दोषग्राहक नव्हेस, गुणग्राहक आहेस. १३ एकाचा भक्त नव्हे. तुम्हां दोघांत भेद नाहीं म्हणोन दोघांसही भजतों. १४ जो धणी तो जपतो असें जरि म्हणाल. १५ निद्राभंगें प्राकृत कोपतात, तूं न तसा. १६ राजानें प्रजा न रक्षिली तरी लज्जा पावावी. १७ कांहीं असो; सेवकें स्वधर्म सर्वथा चालवावा.

देवर्षिपितृमनुष्यायासितांचें ऋण; न फेडिली कवडी ।
हें सत्य परि प्रभु अभिमानें सवड़ा न हातिचा दवडी ॥ १३ ॥
कीं 'भीतो भ्रांत वृथा, मृगजलमग्नासि काय तारावें ?' ।
ह्मणतां असें कसें ? शिशुभय जाया वाघुलांसि[2] मारावें ॥ १४ ॥
कीं कांहीं व्रतनियमीं बोलों चालों नये असें झालें ।
तरि दीनरक्षणाहुनि अधिक फलव्रत कधीं मनीं[3] आलें ? ॥ १५ ॥
कीं न श्रवणीं गेली ही माझी हाक, हा कसा तर्क ? ।
कशि[4] गुरुजनीं सतीची ? शिवला ज्या कुमुदिनीस असंदर्क[5] ॥ १६ ॥
कीं हाक ऐकतांचि, प्रभुला हा रक्षणार्हसें वाटे ।
वाटे[6] या दुःशीलग्रीष्मीं नवनव दयानदी आटे ॥ १७ ॥
कीं पावावें समयीं सदय मनांतूनि योजिलें जरि तें ।
तरि जेंवि रुक्मिणीचे चित्ता, माझें अधीर मन करितें ॥ १८ ॥
किंवा पुराणपुरुषा ! संप्रति बहु भागलासि या कामीं ।
तुज नीज लागली[7] तों सजलों मारावयासि हाका मीं ॥ १९ ॥
किंवा वरी परीक्षा केल्यावांचूनि न प्रसाद करा ।
तरि वरि तसाचि आंतहि उगाळितां कोळसा प्रयास[8] करा ॥ २० ॥
कीं आर्जविला नामप्रतिनिधि, हा अमृत उधळितो स्वैर ।
न पुसे, न भीं[9], न ऐके; यास्तव दोघांत लागलें वैर ॥ २१ ॥
किंवा ह्मणसि 'समर्थोहं कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम्' ।
दीनावनाविणें क्षण देहल दयितां[10]दया कशी वर्तूं ॥ २२ ॥
कीं वैकुंठीं पुष्कळ भक्त, तिळ स्थळ नसे, नसावेंची[11] ।
वसवा पुरें 'पुरे' कां ह्मणतां ? धनवंत कण कसा[12] वेची ? ॥ २३

---

१ थोरपणास बहु मूल्य देऊन घेणें तें व्याजेंच हें प्रभूचित. २ लटक्याही भयास तातें वारितो तसें करावें. ३ पूर्वी तों अत्युत्तम म्हणून धरिलें होतें तें कधीं टाकिलें ? ४ गुरुसमीप सभेंत अस्पृश्या सती राजसुता पतिसमक्ष वस्त्रमोक्षणीं मोठी हाक कशी मारील ? तशी ऐकिली माझी कां न ऐका ? ५ कुमुदिनी अर्क म्हणतां मृदुत्व उग्रत्व दिसते तेणें व्याकुळ. ६ प्रतिक्षणीं स्वनामोच्चारध्वनिश्रवणीं दया करावीसें म्हणतां; परंतु दुराचार सुटेनात म्हणोन दया करितां करितां राहतां. ग्रीष्मांत नदी वाटेलच आटेती तसी मजकडे येतां दया सरते. ७ निद्रामुखीं प्रबोध दुष्कर. ८ श्रम मात्र, लाभ नाहीं. ९ बद्धमूळ प्रधान स्वामीस मानीत नाहीं. १० स्वाधीन पतिका स्त्री वर्तविती तसे पती वर्तता. ११ भरलें असेल, भरावें हेंच उत्तम. शाखानगरें रचावीं तेथें भक्त ठेवावे. स्थळसंकोचें धनत्याग नीतिविरुद्ध. १२ मोठा साहुकारही धान्यकणांतें लंघीत नाहीं. मस्तकीं उचलून ठेवितो, तुच्छ म्हणत नाहीं, तेणें कल्याणच होतें.

४

कीं याचकांसि देतां सरले चारीहि मुक्तिधनराशी ।
भक्तिच मज द्या, द्यावें देवाला अमृत, योग्य न नरांसी ॥ २४ ॥
कीं हो कळानिधि द्विजराज नको, ज्यासि लागला डाग ।
तरि काय प्रभुवर्या ! चुकला तुमचा गुरू महाभाग ? ॥ २५ ॥
कीं वाटलें खळाला मुक्ति न द्यावी, जशी सुधा सर्पा ।
तरि घ्या अघादिकांच्या, या सुवरा, भक्तिमात्र मज अर्पा ॥ २६ ॥
कीं गमलें जरि आधीं म्हणतो दावा स्वपाद; या लोभी ।
जातां वांछिल जें जें तें द्यावें हें मुधा दयालो ! भी ॥ २७ ॥
कीं भेटि बहु दिसां, भय भेटाया दीनबंधुला वाटे ।
तरि भेटावें विधिनें, गेले जाताति साधु ज्या वाटे ॥ २८॥
कीं भीसी मज एका उद्धरितां, लागतील फार झटें ।
तरि, कोणाहि न कळतां, न्यावा झांकोनि दास पीतपटें ॥ २९ ॥
कीं एक मींच उरलों पापी; हें बीज ठेविलें जतन ।
वर्तन स्वकीय मज कां करितें त्वन्नाम मंगलायतन ॥ ३० ॥
कीं मागें गुप्त उभा असती, प्रेमें उभारुनी बाहे ।
तरि काय बाळकाचे तूं सादर बोल ऐकसी बा हे ॥ ३१ ॥

---

# सन्मनोरथराजि.

श्रीरामासि भजावें भक्तें म्यां जेंवि तेंवि संतातें, ।
राजासि उपासावें, तैसेंचि जनें प्रधानपंतातें ॥ १ ॥
कर्णयुगांत भरावें हें हरि ! हरिजनयश प्रचुर म्यां तें, ।
जैसा दोंदीं कोंदी गुर्जरदेशस्थ विप्र चुरम्यातें ॥ २ ॥

---

१ जें ज्याला योग्य तें त्याला द्यावें. २ चंद्र व मोरोपंत. २ शशिशेखर. ३ अघादिकांच्या घ्या; ( अघासुरादि जे पापी त्यांच्या ) दिली कन्या फिरोन घेऊं नये दुसरियास देऊं नये. ४ चरण दाखवायास या म्हणतो पण लोभी आहे. काय मागेल तें कळेना. गेल्यावर न देतां थोरपणास शब्द म्हणोन भीत असाल. तरि भय लटिकें धरूं नका. भेटी मात्र पाहिजे तीच द्यावी. लटिका भय धरितो खरा भय धरीना. भीतोसि तरि मुधा दयालोभी—योग्यच आहे इति कोपोक्ति. ५ बहुकाळें भाव भावास भेटला तरि नाश होतो. विधीनें भेटतां नाश नाहीं. उभयत्रही बरें. ६ निजवृत्ति, स्थळ. ७ ' सज्जनांच्या मनोरथांची माला. ' या काव्यांत सज्जनांना काय काय गोष्टी आवडतात, हें प्रतिचरणांत किंवा प्रत्यार्येंत एखादी घरगुती साधी उपमा योजून दाखविलें आहे. ८ दिवाण. मुख्यकारभारी. कवीच्या वेळीं ' प्रधानपंत ' असें पेशव्यांस म्हणत. ९ या व पुढील आर्येंत

हा हो सुतृप्त राघवनामें, सारेंचि जेंवि तेलिंगा ।
शीला जपो, बहु जपति जैसे अय्याख्य साधु ते लिंगा ॥ ३ ॥
मतिची पडो हरिगुणीं, पतिकंठीं मिठि जशी सुदारांची ।
नुच्चारू परमर्मा, जीभ नकारा जशी उदारांची ॥ ४ ॥
सत्संगतीं असावा प्रेमा, ग्रीष्मीं जसा असे व्यजनीं, ।
रम्यहि अभक्त हो मज, मधुपा चंपक तसा, असेव्य जनीं ॥ ५ ॥
काव्य करावें म्यां, नच वचकावें दूषितीं परि लघूस ।
न करावें काय सदन कीं त्यांत पुढें बिळें करिल घूस ॥ ६ ॥
गुरुभक्ति ते स्वमाता, भाऊ सत्संग, विषय तो बाऊ ।
- माझें मानसबाल श्रीरामकीर्तिनें खाऊ ॥ ७ ॥
कांपावें मन कुजनीं, वृद्धपणीं कांपतें जसें शिर तें ।
सत्संगींच शिरावें, बाळ जनन्यंचळीं[1] जसें शिरतें ॥ ८ ॥
नच सोडावें नारायणनामानें कदापि हें वदन ।
मेल्याही लोभ्याच्या चित्तें सोडूं नये जसें सदन ॥ ९ ॥
सद्भजन न त्यजावें, बहुकष्टीं संकटीं जसें वतन ।
सूक्त[2] करावें तैसें जैसें तपकीरतत्परें जतन ॥ १० ॥
भाग्यवतीला दुर्बळ कन्यासी सत्सभेसी हे उक्ति, ।
व्हावी परिपाल्या, कीं घेती शिशुचीहि जाणते युक्ति ॥ ११॥
प्रेमें नवीं नवीं तीं माझ्या रसनेसि सुकविकुलगीतें ।
गीतें यावीं, येती माहेरीं जेंवि बहुत मुलगीतें ॥ १२ ॥
हो सत्करप्रसादें कुब्जा तैसी मदीय मति सरळी, ।
खळकृतनिंदा सुखदा हो श्यालकृता जसीच मतिस रळी[3] ॥ १३ ॥
निश्चय करुनि, न मागें तिळही ठेवी पतिव्रता चरण ।
भगवद्भजनीं माझा तैसीच करूं मति व्रताचरण ॥ १४ ॥
हरिकीर्ति गीति जी म्यां देवा! व्हावें कुरंगरे! तींत, ।
लोळावा हा सत्पदधूळींत जसा तुरंग रेतींत ॥ १५ ॥

---

गुजराथ्यांचें चुरम्यावरचें प्रेम, तेलंग ब्राह्मणांचें सारावरचें प्रेम व्यक्त केलें आहे वं लिंगाईत लिंगाला किती जपतात हें दाखविलें आहे. या चिमुकल्या काव्यांत देशाचार, स्त्रियादिकांचे आचार व आवडी, व नित्य प्रतिगृहीं दिसणाऱ्या सामान्य गोष्टी उपमानांत योजून कवीनें आपली मार्मिक व सूक्ष्म दृष्टि व्यक्त केली आहे.
१ आईच्या चोळींत ( स्तनपानासाठीं ). २ सूक्त शब्द येथें श्लिष्ट आहे. ( १ ) सुजनांची आज्ञा ( २ ) तपकीर ठेवण्यासाठीं कोंकणप्रांतीं केळीचें वाळलेलें सोप घेतात तें. ३ मेव्हण्यानें केलेली रळी (थट्टा) जशी तरुणास आनंदविते तशी परकृत मन्निंदा मला सुखवो !

बहु साधूक्त रुचावें, लोभिप्रभुला जसें चहाडाचें ।
मज अन्य कलत्राचें स्पर्श न शिवू जसेंच हाडाचें ॥ १६ ॥
वत्स जसा स्तन्यातें[1] सादर पीतो धरूनि आम्यातें, ।
जें साधुमुखोद्गत यश तैसें प्यावें करूनि आ म्यां तें ॥ १७ ॥
हरिकीर्तनीं शिरावें, धनिकगृहीं जेंवि जपुनि चोरानें, ।
न उठावें बहुकार्यें, बहुभारें जेंवि कुंचर ढोरानें ॥ १८ ॥
निजदेहगेहभान प्रभुभक्तांच्या कथींहि मेळांत ।
मज कीर्तनीं नसावें जैसें शिरतां मुलांस खेळांत ॥ १९ ॥
म्यां कीर्तना टपावें, मार्जारें सर्वदा जसें दुग्धा, ।
मन्मति विनयादिगुणां वाहो, प्रेमें नगा जसी मुग्धा ॥ २० ॥
प्रिय हरिजन हो जैसा आला माहेरचा बहायाला ।
स्त्रीजन जसा विवाहा, जावें म्यां सज्जना पहायाला ॥ २१ ॥
हृदय हरिजना कांता मलिनें उघडें करूनि ओपावें, ।
सद्विरहीं बहु देहीं गोपीचित्तें तसेंचि कोपावें ॥ २२ ॥
उलटा[2] आंत स्पष्ट व्यवहार दहांत दाखवी कुलटा, ।
मन्मति हो तैसि परपुरुषासक्ता सदा जसी कुलटा ॥ २३ ॥
जैसे अंधें वृद्धें नसतां गतिहेतु हरतर्धी यष्टी, ।
तैसें व्हावें सज्जनसंगतिवांचुनि उदंड म्यां कष्टी ॥ २४ ॥
आवड असो कथेची, जसि बाळा फाल्गुनांत पुनवेची, ।
संतीं वेंचावें धन, तापसजन तप जसें तपुनि वेंची ॥ २५ ॥
रंगावें सद्वचनें मतिनें, चूर्णें जसेंचि हळदीनें, ।
भजन न सोडावें म्यां, जेंवि कधीं कर्षकें[3] न हळ दीनें ॥ २६ ॥
हळु हळु झडो अहंता सन्मनीं, वार्धकीं जशी शेंडी ।
कोंडू विवेक विषया, निःस्पृह जन वस्तुतें जसा कोंडी ॥ २७ ॥
वरि संकोच असावा, आंत बहुत कृष्णकीर्तनीं काम; ।
गुरुजनसमक्ष पतिचें घेतां आर्याग्रहें जसें नाम ॥ २८ ॥
सत्पदरजाहुनि अधिक मज चिंतामणि सुरद्रु न गमावे ।
सन्नतमतिमहिलागीं नवनव सेवाधिकार न गमावे ॥ २९ ॥
ताप शमाया अलिनीं नलिनीं म्यां सत्पदींच लोळावें ।
पोळावें चातकमन न दवीं जलदें द्रवोनि ओळावें ॥ ३० ॥

---

१ दूध. २ ह्या आर्येंतला श्लेष फार मजेदार आहे. व्यभिचारिणी जशी पर-( अन्य ) पुरुषासक्त होऊन आंत निंद्य आचरण करून बाहेर पतिव्रतेचा डौल मिरविते, त्याप्रमाणें माझी मति पर ( श्रेष्ठ ) पुरुषसक्त होऊन आंत ब्रह्मनिष्ठ होऊन बाहेरून लोकाचार पाळीत चारचौघांसारखी दिसो. ३ शेतकरी. ४ निंदो, त्यागो.

# श्लोक-केकावलि.

सदाश्रितपदा ! सदाशिवमनोविनोदास्पदा !
स्वदासवशमानसा ! कलिमलांतका ! कामदा ! ।
वदान्यजनसद्गुरो ! प्रणमितामितासम्मदा !
[1]गदारिदरनंदकांबुजधरा ! नमस्ते सदा ॥ १ ॥
पदाब्जरज जें तुझें सकलपावनाधार तें
[2]अघाचलहि तारिले बहु तुवांचि राधारतें ।
अजामिळ, अघासुर, व्रजवधु, बकी, पिंगळा
अशां गति दिली; उरे न तृण भेटतां इंगळा ॥ २ ॥
तसाचि उरलों कसा ? पतित मी नसे काय ? कीं
कृपाचि सरली ? असेंहि न घडे जगन्नायकीं ।
नसेन दिसलों कसा ? नयन सर्वसाक्षी रवी
विषाद धरिला ह्मणों ? न सुरभी विषक्षीर वी ॥ ३ ॥
नतावनधृतव्रत ! ज्वलन तूंचि वा[3]धावनीं;
पदप्रणतसंकटीं प्रजव तूंचि वा ! धावनीं; ।
दया प्रकट दाखवी कवण सांग त्या वार[4]णीं ?
[5]सतीव्यसनवारणीं ? जय[6]जयार्थ त्या वा रणीं ? ॥ ४ ॥
'अगा ! प्रणतवत्सला !' ह्मणति त्या जनां पावलां,
म्हणोन तुमच्याच मी स्मरतसें सदा पावलां, ।
'करूं हरि कृपा, हरूं व्यसन, दीन हा तापला'
असें मनिं धरा, खरा भरंवसा मला आपला ॥ ५ ॥
कळी करि सुनिर्मळीं परम उग्र दावा नळीं
तयांत अविशुद्ध मी, शलभ जेंवि दावानळीं ।
व्रणार्त पशुच्या शिरावरि वनीं उभे काकसे
स्मरादि रिपु मत्मनीं, अहि न काळ भेका कसे ? ॥ ६ ॥

---

१ कौमोदकी नामक गदा, सुदर्शन चक्र, पांचजन्य शंख, नंदक नांवाचें खड्ग, व कमल हीं धारण करणारा श्रीविष्णु. यावर चतुर्भुज विष्णूच्या हातांत पांच वस्तु कशा आल्या अशी शंका येते. कोणी ह्मणतात खड्ग कमरेस बांधलें, कोणी म्हणतात एकाच वेळीं पांचही वस्तु हातीं घेतल्या असें मानण्याचें कारण नाहीं. कदाचित् नंदक ( आनंद-दायक ) कमल असाही अर्थ घेतां येईल. २ येथें ' राधारत ' या विरुद्ध कारणापासून 'अघाचलहि तारिले' हें कार्य झालें म्हणून विभावनालंकार झाला आहे. ३ त्रिविध तापपरूवनांत. ४ गजेंद्र. ५ द्रौपदी. ६ अर्जुन.

तुझ्या गुणकथा महासुरभि त्यांत ही रासभी
शिरे विषयवासना; जसि शुका अहीरास भी ।
तसी न इतरांस भी; इस सदंडही[1] हाकिती
तथापि बहु लाथळी मग अदंड मी हा किती ? ॥ ७ ॥
खरासुर जसा, तसी विषयवासना हे खरी
हिचा वध करावया तुजचि शक्ति आहे खरी ।
बकी सुमति, ताटका लघु, न हे भली; लाजसी
उगाचि; तसि एक ही व्रजवनांत लीला जसी ॥ ८ ॥
'अतर्क्य महिमा तुझा, गुणहि फार, बा ! हे,' विधी
श्रुतिज्ञहि ह्मणे सदा, स्तविल आमुची केंवि धी ? ।
तरी जन यथामति स्तवुनि जाहले सन्मती
स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती ॥ ९ ॥
प्रभो ! शरण आलियावरि नव्हां कधीं वांकडे
ह्मणोनि इतुकेंचि हें स्वहितकृत्य जीवांकडे; ।
प्रसाद करितां नसे पळ विलंब बापा ! खरें;
घनांबु न पडे मुखीं उघडिल्याविना पांखरें ॥ १० ॥
शिवे न तुझिया पदा अदयताख्य दोष क्षण;
प्रभो ! चुकतसों, तरी करिसि तूंचि संरक्षण ।
नमेचि शरणागतो घडलि सत्य अद्यापि ती;
रुचे विषय, ज्यां मिळे अमृत, ते न मद्या पिती ॥ ११ ॥
ह्मणा मज उताविळा; गुणचि घेतला; धावरें
असो मन असेंचि बा ! भजकबर्हिमेघा ! बरें ।
दिसे क्षणिक सर्व हें ! भरंवसा घडीचा कसें
धरील मन ? आधिनें[2] बहु परिभ्रमे चाकसें ॥ १२ ॥
कृतांत कटकामलध्वजजरा दिसों लागली;
पुरःसर गदासवें झगडतां तनू भागली ।
सहाय दुसरा नव्हे तुजविणें बळें आगळा
न हों जरि उताविळा स्वरिपु कापितो हा गळा ॥ १३ ॥
अवश्य करणें खरें प्रणतरक्षण स्वोचित;
उशीर मग कां ? बसों कृपण मीहि कां शोचित ? ।
नव्हे प्रभुवरा ! तुह्मां उचित एकटें धांवणें
कृतांत शिवला नसे तंव, दिसे बरें पावणें ॥ १४ ॥

---

१ श्लिष्ट शब्द—दंडधारी व संन्यासी २ चिंता. देहपतन होण्यापूर्वी आपणास ईश्वरप्राप्ति कशी होईल ही चिंता.

ध्रुवस्तवांनि आवडी धरि, ह्मणोनि अत्यादरें
तुह्मी करुनि दाविली, शिवुनि गल्ल सत्या दरें; ।
तसें मज करा, करांबुज धरा शिरीं, मावरा !
वराभयपरा ! पराक्रमपटो ! मना आंवरा ॥ १५ ॥
करांबुज असो; नसें उचित त्यास मी पामर;
प्रणाम करिती पदाग्रतिहि सन्मुनी सामर ।
पदाब्जरजही जगत्त्रयनमस्क्रियाभाजन;
प्रसादचतुरा ! कसा तरि करा बरा हा जन ॥ १६ ॥
तुह्मी करुनि दाविला ध्रुव कृतार्थ जैसा दरें
तसेंचि जरि योजिलें तुमचिया मनें सादरें, ।
असो; विहित तें करा; परि बरोबरी त्यासवें
नसे उचित; तो महाप्रबळ, वंदिजे वासवें ॥ १७ ॥
किती वय ? कसें तप प्रखर ? काय विश्वास तो ?
ध्रुव ध्रुव खरा; स्तवा उचित होय विश्वास तो,
कशी तुळितसां तुह्मी प्रकट मेरुशीं मोहरी ?
प्रसाद करितां उणें अधिक नाठवा, हो ! हरी ! ॥ १८ ॥
प्रभुत्व तरि हेंच कीं करुनि दे कृपा दान तें,
स्वसाम्य यदुपार्जनें मिरविजे स्वपादानतें ।
प्रसाद मग काय तो, जरि निवारिना लाघवा ?
कसें दशमुखानुजा विसरलां ? अहो राघवा ! ॥ १९ ॥
तुह्मींहि बळि बांधिला, ह्मणुनि आमुची माय जी,
मनांत सहजा दया, निपट टाकिली काय ? जी ! ।
सकोप दिसती गुरु क्षणभरीच; जें तापलें
जल ज्वलनसंगमें, त्यजि न शैत्य तें आपलें ॥ २० ॥
असंख्य खळ संगरीं निजकरीं तुवां मारिले;
न निष्ठुरपणें, कृपा करुनि ते भवीं तारिले ।
जगज्जनक तूं, मुलें सकळ जीव, यां भातुकें
दटावुनिहि देशि बा ! अमृत नेदिजे घातुकें ॥ २१ ॥
कृपाब्धि जननी तुह्मी, सकल जीव दायाद; या
तिणेंचि उपदेशिल्या करिति सर्व दाया दया; ।
असें उमजतां भले न गुरुभाव तो टाकिती
मता तुजहि गोपिका, मग जनास तोटा किती ? ॥ २२ ॥

---

१ खाऊ.

सुरर्षिजवळी स्वयें वदसि, ' तत्र तिष्ठामि; ' या
तुझ्याचि वचनें ह्मणें तुज ' कथावश ' स्वामिया ! ।
जसा स्थिर कथेंत तूं, स्थिर करीं तसें या मना
स्वभक्तसुरपादपा ! सफळ हे असो कामना ॥ २३ ॥
तुझें यशचि तारितें, परि न केवळा तारवे
सहाय असिला असे, तरिच शत्रुला मारवे; ।
न भागवत भेटतां न घडतांहि सत्संगती,
न अज्ञहृदयें, तशीं तवयशोरसीं रंगती ॥ २४ ॥
बुडे, बुडवि सागरीं तरि, सुकर्णधाराविना;
सहाय नसतां स्वयें परतटासि ती दाविना ।
सहाय भगवज्जना तव सुकीर्ति जेव्हां करी,
तयींच उतरी भवोदधितटीं जना लौकरी ॥ २५ ॥
सुसंगति सदा घडो; सुजनवाक्य कानीं पडो;
कलंक मतिचा झडो; विषय सर्वथा नावडो; ।
सदंघ्रिकमळीं दडो; सुरडितां हटानें अडो;
वियोग घडतां रडो; मन भवच्चरित्रीं जडो ॥ २६ ॥
न निश्चय कधीं ढळो; कुजनविघ्नबाधा टळो;
न चित्त भजनीं चळो; मति सदुक्तमार्गीं वळो; ।
स्वतत्त्व हृदया कळो; दुरभिमान सारा गळो;
पुन्हा न मन हें मळो; दुरित आत्मबोधें जळो ॥ २७ ॥
मुखीं हरि ! वसो तुझी कुशलधामनामावली,
क्षणांत पुरवील जी सकल कामना, मावली ।
कृपा करिसि तूं जगत्त्रयनिवास दासांवरी,
तशी प्रगट हे निजाश्रितजनां सदा सांवरी ॥ २८ ॥
दयामृतघना ! अहो हरि ! वळा मयूराकडे;
रडे शिशु, तयासि घे कळवळोनि माता कडे ।
असा अतिथि धार्मिकस्तुतपदा ! कदा सांपडे ?
तुह्मां जड भवार्णवीं उतरितां न दासा पडे ॥ २९ ॥

---

# शेवटची प्रार्थना.

दुग्धादिस्वरसें बहु पोषण केलें सदैव, गाई हो ! ।
गोमयदानें अंतीं मज दीला उद्धराचि आई ! हो ! ॥ १ ॥

---

१ ' मद्भक्ता यत्र गायंति तत्र तिष्ठामि नारद. '

विश्वंभरे ! क्षमे ! तूं देउनि शयनार्थ दर्भ कामातें ।
या पुरवुनियां, अंतीं देवि ! करीं धन्य अर्भका मातें ॥ २ ॥
माते ! तुळसि ! असो तव दळ वदनीं; मूळमृत्तिका भाळीं ।
प्राणावसानसमयीं, इतुकीच दया करूनि, सांभाळी ॥ ३ ॥
अंतीं हें आस्य वसिव. जेंवि दशरथास्य रामनामा तें ।
त्वत्कामनाचि वाढो; न स्पर्शो अन्य कामना मातें ॥ ४ ॥
भगवज्जन हो ! वंदुनि पदर पसरितों असेंचि या स्मरण ।
तरण तसें मज पाजा श्रीहरिहरनाम, पातल्या मरण ॥ ५ ॥
मोहाया न करावा प्रांजलि जो मीं मयूर या तंजर ॥
आप्त मुदित हो ! सुखवा हरिनामाचा करूनियां गजर ॥ ६ ॥

---

# आरती, अभंग, पद्यें वगैरे.

## आरती रामाची.

एक बा रामराया ! तुझ्या वंदितों पाया, आवरी आपुली हे विश्वमोहिनी माया ॥ ध्रु० ॥ मीं मूढ, हीन, दीन, सर्व सत्क्रियाहीन, तूं क्षमाशील देवा ! शुद्धचरितनिजाधीन ॥ १ ॥ घडो सदा साधुसंग, नसो विषयप्रसंग । सप्रेम भक्ति द्यावी; सत्व वैराग्य अभंग ॥ २ ॥ वाटतें नित्य भावें तुझे साधुगुण गावे, मन हें आवरेना सांग काय म्यां करावें ॥ ३ ॥ करितां संसारकाम, मुखीं असो तुझें नाम, दयाघना भक्त थोर । याचा पुरविसी काम ॥ ४ ॥

---

## अभंग.

१

तूं मळों नेदिसी महानदी नातें । लहान दीनातें न म्हणसी ॥ १ ॥
तुझ्या पुण्यजळीं जो करी मज्जन । तयातें मज्जन म्हणे विष्णू ॥ २ ॥
दयाकादंबिनी सर्वदा समोर । सर्व दासमोर नाचविसी ॥ ३ ॥

---

१ पृथ्वी. २ माझें मुख. ३ दुखणेकऱ्याला पेजेचें पाणी देतात त्यास ' तरण ' म्हणतात. ४ गोंधळ. ५ यांतील बहुतेक भाग आजवर अप्रसिद्ध असाच आहे. पंतांचीं पद्यें सुमारें साठ आहेत व तीं पंतांचे मित्र चातुर्मासे यांचे दप्तरीं व स्वतः त्यांचेही दप्तरीं आहेत. ६ सदाचारसंपन्न अशा स्वभक्तांच्या अधीन. ७ हे गंगे. हा अभंग व पुढला अभंग उघड काशीस रचलेले आहेत.

२

प्रसन्न तूं देवा काळभैरवा हो । काळ वैर वाहो, नसे भय ॥ १ ॥
कळिकाळावरी तुझी आहे सत्ता । दंडिसी तूं मत्ता सुरेशाही ॥ २ ॥
शरणागत हा मयूर हें जाण । करि परित्राण कृपासिंधो ॥ ३ ॥

३

राहोनियां[1] संतापासीं । संतापासीं[2] भांडती ॥ १ ॥
पावे तोच तोक थानीं । तो कथानीं पावती ॥ २ ॥
रामतोयद्मा समोर ॥ दास मोर नाचती ॥ ३ ॥

---

## पद्यें.

१

वरें[3] असा विभो दे कीं वत्सा गा वल्लीला ॥ ध्रु० ॥
पदवी श्रीची गोपीकांला । वैकुंठींची दिधली बल्लवपल्लीला ॥ १ ॥
तुझ्या कीर्तिमात्रेपुढें । न पुसे कोणी धन्वंतरितें खल्लीला ॥ २ ॥
भक्तमयूरसुखघना । न सुरद्रुम याचक नीचाच्या गल्लीला ॥ ३ ॥

२

धणी[4] तो माझा रघुवर धणी । जो मुनीस दे सुखधणी ॥ ध्रु० ॥
मथुनि ताटिका कौशिकमुनिमख रक्षुनि लेंकुरपणीं ।
भर्गचाप भंगूनि जानकी प्रणिली दुरतर पणीं ॥ १ ॥
जनकाज्ञेहुनि राज्यरमाही मानुनियां ठेंगणी ।
सपत्नीक सानुज विपिनातें नृपधानीसें गणी ॥ २ ॥
खरप्रमुख नक्तंचर खरतरशरें वधुनियां रणीं ।
शिवागृध्रबलिभुग्गादिकांची घडवी जो पारणीं ॥ ३ ॥
युवतिचोर दशवदन थोर जो प्रबळ सकळखळमणी ।
मथुनि पुत्रमित्रांसह जेणें सोडविली स्वरमणी ॥ ४ ॥
ज्याची पदयुगली जनशोकद्रुम आमूलहि खणी ।
मयूरासि घन चकोराशि विधु असि सुखदा देखणी ॥ ५ ॥

---

१ हा अभंग पंतांनीं स्वहस्तानें लिहिलेला चातुर्मासे यांचे घरीं सांपडला. एका कार्डा-एवढ्या चिटोरीवर लिहिला आहे. २ संताजवळ राहून त्रिविध संतापांशीं भांडतात, त्यांना जिंकतात. ३ हें पद्य अद्याप रामनवमीमहोत्सवांत पंतांच्या घरीं म्हणतात. ४ पंतांचें एकपदी रामायण म्हणून एक होतें तें हेंच असावें असें मला वाटतें.

३

केलें[1] पावन सदया रामारे । रामारे सुखधामा रे ॥ ध्रु० ॥
पातकपर्वतपविपदपङ्का उद्धरिलें घनश्यामा रे ॥ १ ॥
स्वांतीं संतत चिंतित होतें पूरविलें मनकामा रे ॥ २ ॥
मद्देहोपलसंस्पृशारुण जाला पदगुणग्रामा रे ॥ ३ ॥
अशनीं पानीं शयनीं गमनीं स्वमनीं गाइन नामा रे ॥ ४ ॥
प्राणविसांवा तूं करुणाब्धे ओले गौतमवामारे ॥ ५ ॥

४

धन्य धन्य धन्य तुका वाणी ॥ ध्रु० ॥
अमृतरसाची क्षितिवरि साची । सिंधुचि ज्याची वाणी ॥ १ ॥
डोलवितोचि जडा अजडाही । प्रभुच्या वेणूवाणी ॥ २ ॥
मोराघनीं श्रोत्यां ज्याचे अभंगीं । हर्षासि नाहीं वाणी ॥ ३ ॥

५

अहो अहो प्रभुजी पळभरि रहा । उद्धरिले बहु एकचि उरलों दीन मजकडे पहा । ध्रु।
तडतड तोडिति करिति विकळ खळ कामादिक वृक सहा ।
गृहगहनीं भ्रमलों तापत्रयवणवा दुःसह महा ॥ १ ॥
पंकपतितधेनूद्धरणाला संमति देतिल दहा
शरणागतविकलोद्धृतिकृतिवर म्हणती महिमा महा ॥ २ ॥
अजि करुणाघन साहेल कसा भक्तमयुर विरहा
सर्वपतितपावन हें अपुलें बिरुदहि त्यजितां अहा ॥ ३ ॥

६

नाम निगमशतसार[2] ॥ ध्रु० ॥
तारित आलें तारितसे हें । तारिलहि पुढें फार ॥ १ ॥
यातें धरिती कंठीं प्रेमें । कधि न मणिचा हार ॥ २ ॥
जेंवि मयूरा जलधर तप्तां । जीवां करितें गार ॥ ३ ॥

७

न[3] भुले सुरसदना कीं । सुरसद नाकीं हेंच ॥ ध्रु० ॥
नामरता अंधाहिन लागे । मार्गीं कांटा ठेंच ॥ १ ॥

---

१ या पदाचे शेवटीं पंतांचें नांव नाहीं तरी हें त्यांचे हातचें लिहिलेलें त्यांचे घरीं त्यांच्या पदसंग्रहांत आहे तेव्हां याच्या कर्त्याविषयीं संशय राहत नाहीं २ अनेक शास्त्रांचें सारभूत. ३ मी देवसदनाला म्ह. स्वर्गाला भुलत नाहीं याचें कारण स्वर्गीही देवांना अत्यंत रस म्ह. हर्ष देणारें हेंच नाम आहे. नामावांचून देवांनाही परमानंदकर दुसरें कांहीं नाहीं.

अमृतें मुकले स्वहिता चुकले । उकले नामें पेंच ॥ २ ॥
भवभुजगाचा नाम मयूर । ध्यानें उतरे रेंच ॥ ३ ॥

८

सुख जें खरें तें नामानें ॥ ध्रु० ॥
न बहुतुरगगजरत्नविराजित-। मणिकांचनमय धामानें ॥ १ ॥
वृद्धपर्णीं नवसानीं झालया । न कुमराच्या दामानें ॥ २ ॥
न स्वर्गींच्या गानें पानें । सुरपुष्पाच्या दामानें ॥ ३ ॥
भक्तमयूर ह्मणे रसने हें । सत्य ह्मणावें रामानें ॥ ४ ॥

९

रसने न राघवाच्या थोडी यशांत गोडी ॥ ध्रु० ॥
निंदा स्तुती जनाच्या । वार्ता वधू धनाच्या ।
खोट्या व्यथा मनाच्या । कांहीं न यांत जोडी[1] ॥ १ ॥
साधूंचिया सदांतें, । सुख देतसे सदा तें ।
श्रवणीं सुधा मदातें । सोडूनि हात जोडी ॥ २ ॥
विनवी मयूर भावें । सखि हेंचि नित्य गावें ।
मजला द्रवोनि पावें । दुसरें न बंध तोडी ॥ ३ ॥

१०

वद नामचि तें सार । रसने ! ॥ ध्रु० ॥
गोरस मधुरस इक्षुरस सुधारस, नवरस तेहि असार ॥ १ ॥
तळमळसी किति ? करिसी कीं हे, वेडे वेडे चार ॥ २ ॥
भक्तमयूरकृपाघन राघव. उघडित मुक्तिद्वार ॥ ३ ॥

११

अगइ असुख रचीतो असु खरचीतो नंद ॥ ध्रु० ॥
कोण्ही प्रत्याख्यान न करिती । बल्लव केवळ मंद ॥ १ ॥
क्रूरचि मेला काढुनि नेतो । व्रजसुखवल्लीकंद ॥ २ ॥
आज्ञा कृष्ण मथुरा घन कीं । जेंवि पिका माकंद ॥ ३ ॥

१२

सदये प्रभो तूं हो पावें ॥ ध्रु० ॥
जन्मापासुनि चुकताचि आलों । कीं जड मी न सुजें कोपावें ॥ १ ॥
मदधिकदीना प्रेम दिल्हें जें । तेंचि मला सुदीना वोपावें ॥ २ ॥
भक्त मयूर असें जन ह्मणती । त्वद्यशें न रामा लोपावें ॥ ३ ॥

---

१ लाभ. २ समेला, समुदायाला. ३ अडयळा.

# कविता आणि कवि.

थोरांहीं स्तविले कवि, तन्निंदा तिळहि सोसवत नाहीं ।
मज सुरस ग्रंथांहीं वृत्तिपरा जेंवि सोस वतनांहीं ॥ २ ॥

# कविता व कवितारसज्ञ.

सच्चेतः कैरवांतें विकच करि, जगत्ताप संपूर्ण टाळी,
अज्ञानध्वांत सारें हरि, रसिकचकोरांसि अत्यंत पाळी, ।
नाना वस्तु प्रकाशी, कविहृदयपयोराशिसंतोषहेतु,
काव्येंदु[1] स्वप्रभेनें खळ[2]विरहिजनीं होतसे धूमकेतु ॥ १ ॥
सुयश न जयांत हरिचें, चित्रैं[3]हि गुणभवन कवन तें अशुची ।
त्यांत सुमति नर न रमति पळही, बहु मानिती तया पशुची[4] ॥ २ ॥
गजराजतारकाचें नाहीं ज्या सुयश नाम वाणींत ।
शिरतां बहु कंटाळे हरिजनमन तींत जेंवि घाणींत ॥ ३ ॥
देवाचीं ज्यामध्यें नामें सुयशोंकितें प्रतिश्लोकीं ।
अघ नुरवीच अबद्ध[5]हि असतां तो वाग्विसर्ग या लोकीं ॥ ४ ॥
धातूंत जसें हाटक[6], नाटक वर सर्व सुप्रबंधांत ।
तें अरसिकांत संप्रति निष्फळसें मुकुर जेंवि अंधांत ॥ ५ ॥
रस न समजती ह्मणविति रसिक ह्मणुनि चित्त बहुत हळहळतें ।
जें तन्निंदक भाषण होतें कर्णांत तप्त हळहळ तें ॥ ६ ॥
थोरांहीं स्तविले कवि तन्निंदा तिळहि सोसवत नाहीं ।
मज सुरस ग्रंथांहीं वृत्तिपरा जेंवि सोस वर्तनांहीं[7] ॥ ७ ॥
सद्व्यसनीं वेंचावें आयुष्य, नसेचि भरंवसा याचा ।
जालों जीर्ण तरि मनीं आहे रसिकांत भर वसायाचा ॥ ८ ॥
तूं ' यत्करोषि[8] ' ऐसें वदलासि, दिलें तयासि मन पार्थें ।
कवि वाङ्मयें तपें तुज अर्पिति तीं जाहलींच अनर्थार्थें[9] ॥ ९ ॥
घेती सर्वत्र मधुप रस कीं हरिभक्त साधु सुरसिक ते ।

---

१ येथें काव्यावर चंद्राचें रूपक केलें आहे व तें सर्व बाजूंनीं सुरेख बसविलें आहे. २ चंद्र विरही जनांना तापप्रद होतो, तसें काव्य खळांना तापद होतें. ३ विविध गुणयुक्त. ४ त्याला मान देणारे विषयरत पुरुष पशूच समजावे ५ साहित्यशास्त्राच्या नियमांना सोडून जरी तो वाग्विसर्ग असला तरी तो पाप हरण करितो. ६ सुवर्ण. ७ मराठ्यांना वृत्तीचें महत्व इतकें आहे कीं ते इंचभर जमिनीसाठीं प्राण देतील. या उपमेनें कवीनें आपलें सुरस ग्रंथावरचें उत्कट प्रेम चांगलें व्यक्त केलें आहे. ८ ' यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ' ( भगवद्गीता. अ. ९ श्लोक. २७ ) ९ निरर्थक नव्हेत अशीं.

असतें रसज्ञ, अमृतीं नच रमते, साधुसूक्ति सुर सिकते ॥ १० ॥
दिसाति ह्मणवितिहि भगवद्भक्तिरसिक, साधुजन निपट थोडा ।
अगणित असाति सुसुख, शुचिलक्षणसंपन्न थोडका घोडा ॥ ११ ॥
ज्यांच्या हृत्कासारीं होय गुणस्नेह बिंदुही फार ।
सारज्ञ असूयोज्झित, त्यांला माझा असो नमस्कार ॥ १२ ॥

---

# संस्कृत कवि.

श्रीमत्सद्गुरु नारद वाल्मीकि व्यास शुक कवीश मनीं ।
आणुनि नमितों भावें जे मोहतमाचिया रवी शमनीं ॥ १ ॥
मुनिकृति नमिल्या श्रीमद्रामायण भारतादि ज्या माता ।
पाजिति जगा अपत्या अमृत, जसे सोम दक्ष जामाता ॥ २ ॥

---

## वाल्मीकि.

वाल्मीकि विप्रोत्तम काव्य पद्म श्री रामलीला मकरंद सद्म ।
तेथें मयूरेश्वर भृंग जाला, सेवावया नित्य सुखें रसाला ॥ १ ॥
आदिकवे ! प्रभुचरितीं सुज्ञ, जडहि, पावतो हुरुप, रमतो ।
श्रीरामचरणकमळीं लाविल जीवांसि जो गुरु परम तो ॥ २ ॥
झालासि पढविता प्रभुपुत्रांतें रचुनि तूं सुकाव्यास ।
देवर्षिवरें जैसे निववाया भागवत शुका व्यास ॥ ३ ॥
तें आयके स्वयें प्रभु, हयमेधीं सत्सभेसि आयकवी ।
नायक विद्वांसांचा निवुनि ह्मणे, 'रचिल अन्य काय कवी ?' ॥ ४ ॥
चरित श्रीरामातें जें शतकोटि प्रविस्तर, तशातें ।
तूं सुललित प्रबंधें रक्षक सुकविच बलप्रद यशातें ॥ ५ ॥
झाले जे तृप्त भास्वत्कुलतिलकरघूत्तंसलीलारसानें
सारासारज्ञ साधु स्वमनिं अमृतही मानिती फार सानें ।
पीयूषें सोदरेंदुक्षयहि न हरिला, त्यागिलेंही पित्याला,

---

१ देव जर खरे रसज्ञ असते तर अमृताला टाकून अमृतापेक्षांही मधुर जो काव्यरस ( सज्जनांच्या वाणिनिला रस ) तेथें रमले असते. २ जे देहपुत्रकलत्रादिकांच्या ठायीं जो मोहरूप अंधार तो नाहींसा करणारे सूर्य आहेत. ३ मुनीचे ग्रंथ. ४ सूर्यकुळांतला श्रेष्ठ राजा जो राम त्याच्या चरित्राच्या आस्वादनानें ५ तत्त्वज्ञ ६ या उत्तरार्धांत रामचरित्र-रसाहून अमृत कैसी कां हें दाखविलें आहे.

राहूचा घात केला, विषसह जनिला कोण सेवील त्याला ! ॥ ६ ॥
वाल्मीकिगीत सेविल कोणी श्रीरामचरित जरि लवही ।
तरि यमधर्म तयाचें कर्म लिहाया करीं न धरिल वही ॥ ७ ॥

## व्यास

श्रीमद्वेदव्यास चरण । ज्ञान देती करितां स्मरण ।
संसारपंकांतूनि उद्धरण । केलें येणें विश्वाचें ॥ १ ॥
सर्व श्रुति सर्व स्मृति । जीं जीं शास्त्रें पुराणें असतीं ।
त्या सकळांतें महामती । भारतामाजीं सांठवी ॥ २ ॥
शब्दब्रह्मसागर मथिला । अमृतें इतिहासकलश भरिला ।
साधु शिष्यांच्या हातीं दिधला । जाड्य रोगार्ता पाजाया ॥ ३ ॥
प्रसवे श्रीसत्यवती यमुनाद्वीपांत आशु भव्यास ।
वेद विभाग करी प्रभु हो, यास्तव नाम या शुभ व्यास ॥ ४ ॥
भव्य महाभारत हा रचिला इतिहास, पांचवा वेद ।
याच्या श्रवणें न उरे अज्ञान, तदुत्थ सर्वही खेद ॥ ५ ॥
व्यासा वा ! साक्षात् तूं नारायण, जड जनासि ताराया ।
अवतरलासि दयार्णव बोधें अज्ञान सर्व साराया ॥ ६ ॥
तुझिया सूक्तिश्रवणें लेशहि तापत्रयें न बाधावें ।
बाळें स्तन्यें, अन्यें अमृतरसेंही असें न वा ! धावें ॥ ७ ॥
होतिल बहु कलिमलिन प्राज्ञ, जन न पावतील भव्यास ।
यास्तव करी चतुर्धा वेद विभागासि म्हणुनि तो व्यास ॥ ८ ॥
ऐसा भगवान् व्यास ब्राह्मणरूपें मुकुंद अवतरला ।
जन ज्याच्या उपदेशें निजहित जाणुनि सुखेंचि भव तरला ॥ ९ ॥
त्या श्रीव्यासप्रभुतें वंदुनि मीं भारतेतिहासरस ।
पाजीन तुम्हां श्रोत्यां, अमृतरसाहूनि फार हा सरस ॥ १० ॥
पळही जसें स्वरूपा ज्ञाते, विसराति न विप्र भागवता ।
ग्रंथ असा न पर, न दे दुर्भत्व वरुनि नवि प्रभा गवता ॥ ११ ॥
मोहहि नसतां गावी जीवन्मुक्तींहि संहिता वा ! हे ।
श्रीहरिच्या अत्यद्भुत महिमा ऐसाचि सद्गुणीं आहे ॥ १२ ॥
वाचावे ऐकावे भागवतांतील उत्तम श्लोक ।
श्लों अर्ध, पाद, तारिल या इतुक्यानेंचि उत्तमश्लोक ॥ १३ ॥

# मराठी कवि.

## ज्ञानेश्वर.

ज्ञानेशा ! भगवंता ! भगवज्जनवल्लभा ! महा सदया ! ।
कलियुगवर्ती जन जो, देशी, स्मरणेंचि, मुक्तिचें पद या ॥ १ ॥
श्रीमद्भगवद्गीताव्याख्या केली जगासि ताराया ।
सारा या सद्ग्रंथा सेविति, संसारताप साराया ॥ २ ॥
श्रीहरिहरकीर्ति तशा वा ! विश्वास प्रिया तुझ्या ओव्या ।
जो व्यास तोहि बहुधा म्हणतो, 'श्रुतिशाचि या मला होव्या' ॥ ३ ॥
ज्ञाता शिष्यासि म्हणे, ' प्राकृत दिसतो परंतु न तसा रे; ।
गोपप्रभुसा अमृतानुभव, तया पाहि सुजन नत सारे ' ॥ ४ ॥
ज्ञानेशा ! त्वत्कृतितें करिती ज्ञाते समस्तही प्रणती ।
ज्ञानेश्वरी भवानी होय महामोह महिष हे म्हणती ॥ ५ ॥
शंकर निवृत्ति, हरि ! तूं ज्ञानेश, ब्रह्मदेव सोपान ।
विद्या मुक्ता; तुमच्या कीर्तिसुधेचें सदा असो पान ॥ ६ ॥

---

## नामदेव.

श्रीनारदमुनिचें जें सुमहद्व्रत, तेंचि नामदेवाचें, ।
याणें प्रसिद्ध केलें विठ्ठल हें भव्य नाम देवाचें ॥ १ ॥
भक्तिप्रताप लोकीं अत्यद्भुत याचि नामदेवाचा; ।
परमप्रिय भक्त, सखा कीं आत्मा आप्तकाम देवाचा ॥ २ ॥
किंबहुना नाम्याची भक्ता दासी जनी तसी वाणी; ।
खाणी पातक, आणी तरिच खळाच्याहि लोचनीं पाणी ॥ ३ ॥

---

१ म्हाव्यात. हें ' होणें, या क्रियापदाचें रूप लक्षांत ठेवण्यासारखें आहे. स्मरणींतही ' व्हावीस, ' बद्दल ' होवीस ' असें रूप आलेलें आहे. २ गवळ्यांत जसा श्रीकृष्ण श्रेष्ठ तसा प्राकृतग्रंथांत अमृतानुभव श्रेष्ठ होय ३ मिथ्या सृष्टीच्या ठायीं सत्यत्वाचा आरोप करून जीव देहगेहादिकांच्या मायेंत गुंततो. महिषासुराचा वध भवानीनें केला त्याप्रमाणें ज्ञानेश्वरी या महामोहाचा निरास करिते. ४ विष्णु ( विश्वव्यापक परमात्मा ) या शब्दाचें प्राकृत रूप विठु असें झालें व विठुचा विठोबा, विठ्ठल अशीं रूपें झालीं.

उद्धव, अक्रूर, प्रियभक्त श्रुतदेव, बहु असे कोटी।
परि याचि नामदेवीं प्रीति चरमबाळकीं तसी मोठी ॥ ४ ॥
श्रीनामदेव, तुकया, तदभंग प्रभुसि गोड घांस तसे।
गाहिंवरतसे परिसतां, नाचतसे, पांडुरंग, हांसतसे ॥ ५ ॥
भक्तिसुखाधिक मानुनि मुक्तिसुख कदापि याचिना, म्या तें।
अत्यद्भुत आयकिलें सद्वृंदीं नमुनि याचि नाम्यातें ॥ ६ ॥

---

## एकनाथ.

भूतदया संसारीं एकोपंतास निरुपमा घडली।
जडली आंगासींच शांति सदा; क्षांति तों गळां पडली ॥ १ ॥
भूताराधनयज्ञीं समदर्शी एक परम हा रमला।
द्रवुनि ह्मणे, 'पित्रन्नें भोज्य, जगन्निंद्य पर, महार मला;' ॥ २ ॥
एकोपंत जनार्दनपंताचें भजनही असीम करी।
याची मति गुरुचरणीं, भक्ष्यीं घालि न मिठी असी मकरी ॥ ३ ॥
श्रीज्ञानेश्वर भेटे एकोबाला, तसाचि अत्रिज गा !।
हें किति ! दास्य करि प्रभु, ज्याहुनि आधार अन्य न त्रिजगा ॥ ४ ॥
ग्रंथ श्रीभागवत, श्रीरामायण, करी सुविस्तर; ते।
जरि न रचिता दयानिधी, केवळ जड जीव तरि कसे तरते ? ॥ ५ ॥
विश्वेश्वर अविमुक्तीं, विठ्ठल पंढरपुरीं, प्रतिष्ठानीं।
प्रभु एकनाथ, वरिला सर्वमहितदैवतप्रतिष्ठानीं ॥ ६ ॥
नमिला शमिलास्यप्रद[1] शांतिजलधि एकनाथ तो भावें।
शोभावें ज्याचें यश विश्वीं, ज्या देववृंद लोभावे ॥ ७ ॥
भोजन दे चोराला, आदर आग्रह स्वयें करी मोठा।
साधु प्रसन्नचित्तें बांधुनि लागे वहावया मोटा ॥ ८ ॥

---

## रामदास.

द्विज 'सावधान' ऐसें सर्वत्र विवाहमंगलीं ह्मणती।
तें एक रामदासें आयकिलें; त्या असो सदा प्रणती ॥ १ ॥
कामजयें रघुवीरप्रेमें, हनुमदवतार हा सत्य।
भवरोग हरुनि येणें लाजविले, देववैद्य नासत्य[2] ॥ २ ॥

---

१ शमगुणसंपन्न जे महायोगी त्यांना आपल्या अनुपम शांतिगुणानें नाचावयाला लावणारा. २ अश्विनीकुमार.

सर्वत्र रामनवमी परमोत्सव, परमधर्म, चालविला ।
द्विजतर्पणसंकीर्तनयोगें कलिकाल दूर घालविला ॥ ३ ॥
शिवराजास ज्ञानद जो, जैसा याज्ञवल्क्य जनकास ।
तरले भवार्णवीं बहु दृढतर त्याची धरूनि जन कास ॥ ४ ॥

---

## तुकाराम.

नरकांतुनि काढितसे, काढुनि बहु पतित, पातुकावाणी; ।
तो गुरु कसा नव्हे हो ? ज्ञानांबुधि अतितपा, तुका वाणी ॥ १ ॥
भक्तरसचि मूर्त, असा करिति बृहस्पतिशतक्रतु कयास ।
कीं वाटे भगवद्यश सुरभीपय, अमृत तक्र, तुकयास ॥ २ ॥
विमद, विराग, विमत्सर, तृप्ति सदा सुगुण हे तुकारामीं ।
ते कैंचे स्वर्गींच्या विविधविषयलाभहेतुकारामीं ॥ ३ ॥
साधुसभाप्राणप्रिय, ज्याचे निर्दोष, युक्तिमदभंग ।
भगवज्जनेतराचा करिती ज्यांतील उक्ति मदभंग ॥ ४ ॥
ज्याचे अभंग लागति खळहृदया, जेंवि बाण [1]रामाचे ।
ज्या परवाद न मोहिति, शर जैसे ईश्वरासि कामाचे ॥ ५ ॥
स्वात्मानुभव पहातां, तुकया केवळ सखाचि जनकाचा ।
वैराग्यें डोलविला माथा जेणें मुनींद्र सनकाचा ॥ ६ ॥
ज्याच्या सदभंगातें सेवी जन, जेंवि बाळ आम्यातें ।
घनसा ह्मणे भरावें सुरसें, जें सुख करील आ, म्यां तें ॥ ७ ॥
ज्यां[2]च्या होय अभंगांवांचुनि होऊनि हरिकथा नाहीं ।
श्रोत्यांसि अभंगांहीं ती दे, जासि माय हारिख थानांहीं ॥ ८ ॥
सुज्ञ शिवाजी राजा न ह्मणे तुकयासि काय साधु निका ? ।
तत्पंडित[3]प्रधाना न कळे गुण; समज फार आधुनिका ॥ ९ ॥
प्रभु आपण शतमखसा, सदभंग प्रकट जो करी घनसे ।
नाचति मयूरसे हरिभक्त, ह्मणे ज्यांत शोक रीघ नसे ॥ १० ॥
भगवद्भक्ति कराया बहुजड जीवांसि जो तुका शिकवी ।
त्याच्या दुसरा धरणीवरि येइल कोण हो तुकासि कवी ? ॥ ११ ॥

---

१ रामाचे बाण जसे खळ जे राक्षस त्यांच्या हृदयास लागून त्यांना अंतीं मोक्ष देतात त्याप्रमाणें तुकोबाचे कडाकेही दुर्जनांच्या मर्मी झोंबतात; पण त्यांना गतिदायकच होतात. २ यावरून मोरोपंतांच्या वेळेपर्यंत तुकोबांच्या अभंगांना कीर्तनांत कसें अग्रस्थान मिळालें होतें हें दिसतें. ३ शिवराजा साधुसंतांना फार मानीत असे, तसे पेशवे हे साधुसंतांचे गुणग्राहक नाहींत असा कवीचा अभिप्राय आहे.

## वामन पंडित.

सुगुण, श्रीहरिभक्त, ख्यात; ज्ञात्या जनांत हा शुकसा।
बहुजन्मासिद्ध; ऐसा साधेल सुपक्वयोग आशु कसा ? ॥ १ ॥
काम न वामनचित्तीं मोक्षाचा कृष्णभक्तिवांचून।
भगवद्भजनचि केलें अनुदिन; किमपि न तदन्य वाचून ॥ २ ॥
श्रीहरिचीं बहु रचिलीं, देती जीं हर्ष नित्य नव चरितें।
भक्तिज्ञानरसभरित यत्कवन; जयांत एक न वच रितें[1] ॥ ३ ॥
केली श्रीगीतेची व्याख्या, बहु भक्ति जींत गाजविली।
साजविली साधुसभा; भाषा[2] कविकथनशक्ति लाजविली ॥ ४ ॥
रीति समश्लोकींची अतुला, साधेल काय नव्यांस[3]।
या सुयशें होइल कां रोमांचव्याप्तकाय न व्यास ? ॥ ५ ॥
वाटे सूक्तिश्रवणें मस्तक वाल्मीकिनेंहि डोलविला।
प्रभुनें भुलवाया मन, वामन हा वेणुसाचि बोलविला ॥ ६ ॥
अन्यत्र नसें कवनीं याचे रस सर्व, हा नियम कांहीं।
केली, भाषाकवि जे, त्यांची तो गर्वहानि चमत्कांहीं ॥ ७ ॥
वामन वामन साक्षात्, तरिच असा हा महातपा वेधी।
बहुसुख हरिदासांची, ज्याच्या कृतितें पहात, पावे धी ॥ ८ ॥

---

## महिपती.

श्रीहरिभक्तजनांचीं जीं श्रीहरिभक्तिसत्सुधाभरितें।
चरितें गातां, जेणें आयुष्य क्षण पडों दिलें न रितें[4] ॥ १ ॥
हरिभक्तविजयनामें रचिला सद्ग्रंथ, दोष साराया ॥
वाराया तापातें, प्राणी भवसागरांत ताराया ॥ २ ॥
त्या महिपतितें पाहुनि, ऐकुनि, सच्चित्त कां न लोभावें ?।
शोभावें यश ज्याचें चिर, नमिला विष्णुदास तो भावें ॥ ३ ॥
ज्याचा ग्रंथ हरिजना सेव्य, चकोरां जसा सदा इंदु।
जो पसरला जगांत, स्नेहाचा सत्सरीं जसा बिंदु ॥ ४ ॥
सत्य तुकारामाचा, या महिपतिवरि, वरप्रसाद असे।
सदनुग्रहाविणें हे निघतिल उद्गार काय सार असे ? ॥ ५ ॥

---

१ या पंडितांवरच्या अभिप्रायांत पंतांनीं फारच विमलमनस्कता प्रकट केली आहे. २ नवी-नांस ३ भाषाकवि ह्म. मराठी कवि, भाषाग्रंथ ह्म. मराठी ग्रंथ. ४ पंतांचा हा आपल्या समकालीन कवीवरचा अभिप्राय अगदीं अक्षरशः खरा आहे. महिपतीचा उद्योगच तसा अव्याहत चालला होता. या बड्या संतचरितकाराचा पंतांनीं योग्य स्तुति केली आहे.

साधूंचें यश गाया, प्रेमें देवुनियां सुभा केला ।
निःसंशय ताराया जड, महिपति विठ्ठलें उभा केला ॥ ६ ॥
महिपतिच्या वाणीतें सेहुनि तरतात, जेंवि गंगेतें ।
विषयांत रंगलें जें जनमानस, सयशीं च रंगे तें ॥ ७ ॥
ज्ञानोबाची जैशी, एकोबाची सुधा जशी वाणी ।
कीं, मुक्तेश्वर कविची; महिपतिची सेविती तशी प्राणी ॥ ८ ॥

---

## मुक्तेश्वर.

श्रीमुक्तेश्वर कविवर यातें कोण न शुभेच्छु वंदील ? ।
वंदी लक्ष जयाचें, ज्याचें यश भव्य जेंवि मंदील ॥ १ ॥[1]
मुक्तेश्वर कृत भारत आवडतें विठ्ठलासि कीं पर्व ।
सर्व श्रवणें हरितें आशा कविंच्या अशेषही गर्व ॥ २ ॥

---

### इतर कवि.

वंदन नंदनसा मीं करितों भावें मुकुंदराजाला ।
वश झाल्या सद्विद्या सत्कीर्ति, सुमुक्ति, सुंदरा जाला ॥ १ ॥
जरि शुचिमूर्ति, सुवृत्ता, मान्या श्रवणोचितें गुणें मुक्ता ।
विद्धा जडाहि ते, हे अगुणा ही तीस करि उणे मुक्ता ॥ २ ॥
श्रीरामदाससेवारत तो भरतावतार कल्याण ।
दुर्वारकामसिंहीं त्या वीरें घातलेंचि पल्याण ॥ ३ ॥
हरिविजयग्रंथातें मग आधीं श्रीधरासि वंदीन ।
शिववंदनकामांहीं लंघावा प्रथम देवनंदी न ॥ ४ ॥
कीर्तनसुखार्थ झाला अवतारचि अमृतराय जीवाचा ।
भलत्या मुखांतुनि अशी सुरसखनि निघेल काय जी वाचा ॥ ५ ॥
जो भक्तिसरित्पूरीं षडरींची सर्व वाहवी सेना ।
रुचला मनास बहुतचि तो भगवद्भक्त नाहवी सेना ॥ ६ ॥
आनंदतनय अरणीकर शोभवि फार कवन यमकांहीं ।
तत्सूक्ति पाठ ज्याला त्याचें पाहे न भवन यम कांहीं ॥ ७ ॥
विठ्ठलकविच्या भलता लंघूं न शकेचि चित्र कूटातें ।
प्रबळतरहि पर जेंवि श्रीरामनिवास चित्रकूटातें ॥ ८ ॥

---

१ सोगीर. २ खरी आर्या मुळांत अशी आहे. या आर्येची आजवर उगाच ओढाताण झालेली आहे. ३ बृहस्पतीचा.

नरहरिनामा पावे संत न सोनार दास मान कसा ? ।
तरला करुनि भवाचा अंत, नसो नारदासमान कसा ? ॥ ९ ॥
गावा नच मानावा चोखामेळा महार सामान्य ।
ज्याच्या करिं साधूंचा चोळा मेळा महारसा मान्य ॥ १० ॥
लाजविलेचि निजयशें दुग्धाब्धितरंग रंगनाथानें ।
भक्ति ज्ञानें ज्याची मति पोषी जेंवि अंगना थानें ॥ ११ ॥

# हिंदुस्थानी कवी

## महाराष्ट्रेतर प्रांतांतील कवि.

हिंदुस्थानी भाषा ग्वालेरी गोड तीहि पंजाबी ।
सुरसिक कवि ह्मणति इची तूंचि श्रीकुष्णपादकंजा वी ॥ १ ॥
श्रीसूरदास तुलसीदास कबीरादिसुकविकवनांतें ।
सोडुनि लावील कवण रसिक दुजासी रिझोनि नव नातें ? ॥ २ ॥

## तुळशीदास.

श्रीवाल्मीकिच झाला श्रीतुळसीदास, रामयश गाया ।
तरिच प्रेमरसाची खाणी वाणी तशीच वशगा या ॥ १ ॥
याचें सुप्रेमभवन कवन निववितें सदा बुधा सरसें ॥
हें जों जों सेवावें, तों तों सेव्यचि गमे, सुधासरसें ॥ २ ॥

## माधवदास.

बहु शांति, क्षांति, दया, पाहुनि, षड्रिपु करीत होते रे ॥
त्या माधवदासातें स्त्री हाणी, करुनि कोप, पोतेरें ॥ १ ॥
तद्वर्ति करुनि दीप, प्रभुपाशीं तच्छिवार्थ तो लावी ।
कोणाच्या शांतीशीं हे माधवदासशांति तोलावी ॥ २ ॥
साधु ह्मणावें ह्मणती नर माधवदास साधु याला जे ।
अतिसारीं पट ज्याचें न रमाधव दाससा धुया लाजे ॥ ३ ॥

## कबीर.

श्रीराम याचि नामीं, न म्हणुनि अल्ला, खुदा, नबी, रमला ।
झाला पुष्पें तुळसी; स्तवितां तारील तो कबीर मला ॥ १ ॥

श्रीरामभक्त मोठा ज्ञानी वाटे कबीर हित मातें ।
दोहा तो रविच गमे; हरिल तयाचा अबरिहि तमातें ॥ २ ॥
परमचमत्कारवती, साधुमता, श्रुति जशा, तशा उक्ति ।
ज्याच्या ब्रह्मज्ञानामळमौक्तिकरत्नगार्भिताशुक्ति ॥ ३ ॥
माया हे संसृतिची जाळूलि सशोक तो कवी रमला ।
रामपदाब्जीं अलिसा; बहुमत सुसुश्लोक तो कबीर मला ॥ ४ ॥

---

## नरसीमेहता.

नरसिंहनाम महता, अहतामळकीर्ति, भक्त, नागर हा ।
' याच्या वैभवगानीं ' स्वमुखसहस्त्रा ह्मणेल नाग ' रहा. ' ॥ १ ॥
राधादिगोपिकांशीं जगदीश्वर जे स्थळीं करी रास ।
तेथें शिवप्रसादें पावे, न त्यागितां शरीरास ॥ २ ॥

---

## नाभाजी.

कथिलें भागवत तुवां इंद्रप्रस्थाकडील विप्रांसी ।
हे कीर्ति ' भक्तमाला ' कथिती, जिस सर्व सत्कवि प्रासी ॥ १ ॥

# भगवद्गीता व तिचे टीकाकार.

गीतासुधानदींत स्नानें जाताति ताप, मळ सर्व ।
सर्वज्ञत्व सहज ये, गर्व पळे, स्तविति देव गंधर्व ॥ १ ॥
अमृतप्रपा उदारें सदयें कृष्णें विनिर्मिली मोठी ।
घोंटीना तो वेडा, स्वसुखें आकंठ सांठवा पोटीं ॥ २ ॥
श्री मद्भगवद्गीते ! वर्णावें आदरें तुला नमुनी ।
सर्वोपनिषत्सारे ! माते ! तुज पाहती तुला न मुनि ॥ ३ ॥
तुज सोडुनि तरि तरते अन्याचे जीव जरि उपासक ते, ।
त्यजुनि अमृत, लंघाया स्मृतितें, सेवूनि जरि तुषा, सकते ॥ ४ ॥

---

१ यांत व्यास, शंकराचार्य, मधुसूदन वगैरे संस्कृत टीकाकार व ज्ञानेश्वर, वामन हे मराठी टीकाकार यांचा उल्लेख असून शेवटल्या आर्येत पंतांनीं आपल्या समश्लोकीचा उपोद्घात केला आहे. सर्व टीकांत ज्ञानेश्वरीवर त्यांची विशेष भक्ति होती हें उघड आहे. इतर टीकाकार गीतादेवीचे साचिव व ज्ञानेश्वरी तिचा प्रतिनिधि असें म्हणण्यांत व ज्ञानेश्वरी नेईल तिकडे गीता जाते असें म्हणण्यांत पंतांनीं ज्ञानेश्वरीचें श्रेष्ठत्व व्यक्त केलें आहे.

भगवद्गीते ! ज्ञात्या अधिका तुजहुनि सुभानदी नाहीं ।
त्वद्भक्ता तार्यांहीं भय जेंवि द्विजें क्षुधा न दीनांहीं ॥ ५ ॥
तुज भजत्या संसारीं वसतां, गतिलाभ होय जो गीते ! ।
त्यासि न पात्र भ्रमति, भ्रमति व्यर्थचि तपोनि, जोगी ते ॥ ६ ॥
तव सचिव द्वैपायनशंकरमधुसूदनादि योगी ते ।
ज्ञानेश प्रतिनिधि हें वर्णन तुझिया मनास यो गीते ॥ ७ ॥
युवराज तुझा वामन वाम न मानूं तुवांचि मानावें ।
गुरु लघु कविंनीं प्रभुतें नित्य यथामति विशंक वानावें ॥ ८ ॥
भगवति ! शुचिकीर्ति तुझी सुमति ! ज्ञानेश्वरी प्रिया आली ।
झाली विश्वख्याता ! हे कार्या बहु जनांचिया आली ॥ ९ ॥
नेती तिकडे जासी भगवति ! बहु मत इचें तुला उक्त ।
ज्ञानेश्वरीस जन जे अनुसरले, त्यांसि करिसि तूं मुक्त ॥ १० ॥
एकचि अध्याय पुरे, किंबहुना श्लोक एक, हा नियम ।
गीते ! त्वदाश्रितजनीं तिळाहि करिल न बहु मानहानि यम ॥ ११ ॥

---

# आर्यावृत्त.

प्रकटी प्रथम भगीरथ नृप लोकीं सुरनदीस[2] ती आर्या ।
तशि हे मयूर नाहीं तरि सर्वांला न दीसती आर्या ॥ १ ॥
उचित प्रचार भासो रसिकांस प्राकृतांत आर्यांचा ।
शुष्मद्वैरेंचि[3] होतो सत्कार प्राकृतांत आर्यांचा ॥ २ ॥
गर्वे, ओव्या, सवया दोह्यांतें सर्व जाणती लोक ।
श्लोक प्रिय त्यांस जया प्रसन्न तूं पुण्यपूर्वकश्लोक ॥ ३ ॥
आर्यानाथा[4] ? आधीं छंदःशास्त्रांत पिंगळाचार्यां[5] ।
आर्याराध्या देवा ! त्वांचि पढविली मनोहरा आर्या ॥ ४ ॥
आर्यासुधा बुधांनीं आकंठ प्राशिलीच धन्यांनीं ।
कानीं मात्र परिशिली होती हो ! ती सती तदन्यांनीं ॥ ५ ॥

---

१ यांतल्या पहिल्या सात आर्या नामसुधाचषकांतल्या, आठवी भीष्मभक्तिभाग्यांतली, नववी मंत्ररामायणाच्या उपोद्घातांतली व अखेरच्या दोन भारतांतल्या आहेत. यांत आर्यावृत्ताचें मूळ, पंतांची त्याविषयींची गोडी व त्यांनीं त्याची प्रसिद्धि केली याबद्दल साभिमानोद्गार सुरेख दिले आहेत. २ गंगा. ३ आपल्या ( शंकराच्या ) कृपेनें. ४ पार्वतीपते ! ५ मूळ छंदःशास्त्रप्रवर्तक.

ते हे सुधा बुधांनीं मज लुब्धाला दिली सदा त्यांनीं ।
केलों पात्र दयेला आर्धी मग मी किलीस दात्यांनीं ॥ ६ ॥
आर्यावृत्तक्षीरीं सुध्मस्तुतिशुद्धशर्करा प्राज्य ।
वरि ओतिलें यथेच्छ स्वच्छ श्रीरामनाम भव्याज्य ॥ ७ ॥
आर्या आर्यासि रुचे इच्या टार्यीं असे जसी गोडी ।
आहे इतरा छंदीं गोडी परि यापरीस ती थोडी ॥ ८ ॥
आर्यकथाछंदानें आर्याछंदेंचि जन्मलीं सरलें ।
यांहीं माझें तनुवाक्कर्ममनःपाप सर्वथा हरलें ॥ ९ ॥
पुरुषा आर्या वृत्तें जैशी, ग्रंथा जयां तशी मोठी ।
शोभा आर्यावृत्तें आली, सुलतील यासि कवि कोटी ॥ १० ॥
बहु मानीलचि पूर्वप्रेमातें न त्यजूनि ओव्याही ।
आर्यासि ह्मणेल रसिक अभिनव विहिणीस जेंवि ' ओव्याही ॥ १२ ॥
आर्या देखुनि सज्जन चित्तीं होतील फार सानंद ।
मंदज्ञानिच सरतिल मागें, कीं ठाउकें नसें छंद ॥ १३ ॥

---

# मोरोपंताचे आपल्या काव्यांविषयीं विचार.

## मंत्ररामायण.

श्रीकारापासुनियां मकारपर्यंत वर्ण जे तेरा ।
ते राघवचरितांतीं ग्रथिले, हें रामभक्त हो ! हेरा ॥ १ ॥
केवळ उत्तरकांड श्रीरघुपतिमंत्ररत्नमंजूषा ।
पूर्षा खळघूकांचा, अतिसुखदा सर्वसाधुंची भूषा ॥ २ ॥
देहीं आत्मा जैसा आर्यांतीं मंत्रवर्ण सांग वसे ।
सूक्ष्मदृशांवांचुनिया कथापरालाचि तो कसा गवसे ? ॥ ३ ॥
नृपमुद्रांकित पत्र प्रजेसि होतें जसें शिरोधार्य ।
प्रभुचरित मंत्रचिन्हित यास्तव धरितील मस्तकीं आर्य ॥ ४ ॥
रामाचें रचिलें चरित्र मुनिनें वाल्मीकिनें संस्कृतीं
नाहीं हानि कदापि अन्य कविहीं तें वर्णितां प्राकृतीं ।

१ किल्लाला. २ आपली स्तुति हीच साखर. ३ उत्तम तूप. ४ भारनाला. ५ ही आर्या गीतिच्या उपोद्घातांत आहे. ६ ' श्रीरामजयरामजयजयराम ' हे तेरा वर्ण ७ राममंत्ररत्नांची पेटी. ८ सूर्य.

मुक्तांचा रचिलाचि हार वहिला जो रेशिमाच्या गुणें
तो कार्पासगुणें करूनि करितां काय प्रभेला उणें ? ॥ ५ ॥
' गीर्वाणें राघवाचें यश रसिकजना लागतें फार मिष्ट
तैसें न प्राकृतानें ' अचतुर ह्मणती, मानिती ते न शिष्ट ! ।
पीतां गोक्षीर कार्तस्वरमणिचषकें देतसे जेंवि गोडी
सारज्ञाला पलाशद्रुमदलपुटकें सेवितां ते न सोडी ॥ ६ ॥
श्रीवाल्मीकिप्रभृति मुनिहीं वर्णिली रामलीला
माहक्षांहीं मुदितहृदयें काय गावें न तीला ? ।
श्रीकंठेंद्राद्यमरपरिषत्सेव्यगंगाप्रवाहीं
संध्यास्नानादिक न करणें काय या मानवाहीं ? ॥ ७ ॥
यावें, दर्शन द्यावें, बोलावें, डोलवूनि बोलावें, ।
वाटे स्वमंत्ररामायण ' निजँनाटक ' तुह्मींच डोलावें ॥ ८ ॥
वाचीन मंत्ररामायण आधीं मींच मग तुह्मीं वाचा ।
वाचा वाचाया बहु झड घाली ग्रंथ सत्य नांवाचा ॥ ९ ॥

---

## कुशलवचरित, आर्यामुक्तामाला व प्रऱ्हादविजय.

जैमिनिकृताश्वमेधस्थित कुशलवचरित वर्णिलें आहे ।
या हे रीति पहावी, मज तों वाटे सुधानदी वाहे ! ॥ १० ॥
आर्या मुक्तामाला दावीन परंतु जरि न मागाल ।
लागाल प्रभुकंठीं घालूं, फुगवील कीं रमा गाल ! ॥ ११ ॥
श्रीमद्विष्णुपुराणीं पाहुनि अत्यंत आदरें रचिला ।
प्रऱ्हाद विजयनाम ग्रंथ पहा, नगचि मणिगणीं खचिला ॥ १२ ॥

---

## महाभारत.

ऐका सज्जन हो ! भवद्वच खरें, आश्चर्य क्यां पाहिलें
वाल्मीकिप्रभृतिस्वबंदिनिकरीं दीना मला वाहिलें ।
केलें प्राकृत काव्य ईश्वरपदीं धत्तूरसें वाहिलें
सांगू काय वरप्रसाद आजि तें ज्यासीहि कीं साहिलें ! ॥ १३ ॥

१ कापसाच्या दोऱ्यानें. २ सुवर्णाच्या रत्नखचित पेल्यानें. ३ पळसाच्या द्रोणानें. ४ मजसारख्यांनीं. ५ शंकर, इंद्र आदिकरून देवसमुदायांनीं सेविलेल्या गंगाप्रवाहांत. ६ मार्त्तंस उद्देशून या पुढील आर्या आहेत. ७ संस्कृत हनुमन्नाटक. ८ रत्नांनीं खचित असा अलंकार. ९ वाल्मीकिप्रभृति जे आपले गुण गाणारे त्यांच्या समुदायांत.

रामघन सत्प्रसादामृत जों जों बहु वळोनि वर्षतसे ।
तों तों भक्तमयूर स्वार्याकेका करूनि हर्षतसे ॥ १४ ॥
रसिक कवि परम सज्जन भगवद्भक्त प्रसन्न होतील ।
न गमेल यापरिस हित जों तों वदनांत अमृत ओतील ॥ १५ ॥
धन्य श्रीराम पिता धन्या लक्ष्मी प्रसू जर्गी झाली ।
आली सत्यवतीची, कीं भारतकीर्ति सुतमुखीं आली ॥ १६ ॥

## मंत्रभागवत.

देउनि उत्साह मला श्रीभागवतार्थ वदविला साचा ।
आनंद यापुढें तो तुच्छ ब्रह्मादिपदविलासाचा ॥ १७ ॥
श्रीराम द्रवुनि स्वयेंचि करवी ऐसी नवी योजना
सामग्री अधनासि दे करि धनी त्याच्या गृहीं भोजना ।
हें काय प्रभुला अशक्य हृदया ! कां चित्र भासे तुला ? ।
क्रीडार्थ प्लवगांसि योजुनि रची सिंधूंत हा सेतुला ॥ १८ ॥

## गीतार्थटीका.

त्यांचे पाय नमुनि मी दीन अति ज्ञानहीन परि भावें ।
गावें गीतार्थातें ह्मणउनि टीका करावया धांवे ॥ १९ ॥
मीं तों अगाध गीतासुधानदीमाजि घालितोंचि उडी ।
नरजन्मपर्व दुर्लभ जाणुनि घ्यावी कशी न येथ बुडी ? ॥ २० ॥

## सामान्यस्तुति.

( स्वकवितेचे गुण. )

जसे होती देव प्रमुदित शचीनायकवनीं
तसे सारज्ञाते बुधजन मयूरेशकवनीं ।
महाराष्ट्रग्रंथीं रसिक कवि जे तेच रमती
परंतु ज्ञात्याची पळहि न असावी चंर मती ॥ २१ ॥
संत मयूरेश्वरकृतकवनीं नवनीतकोमळीं गोडी ।
घेतील, कीं तयांचीं करणें परगुणविवृद्धि ही जोडी ॥ २२ ॥
प्रेम, प्रतिभा, शिक्षा, रीति पहा आयका वरें कवन ।
पवनप्रिय पुत्रा ! बा, म्यां केलें हें न निजगुणस्तवन ॥ २३ ॥

१ भक्तांचे. २ नंदनवनांत. ३ चंचळ. ४ संतांचीं करणें परगुणांची वृद्धि जोडतात.

तुमच्या पदप्रसादें फार चमत्कार अर्थयमकांचे ।
त्यांत प्रभुयश, तद्वशजगदुद्धाराधिनेंचि यम कांचे ॥ २४ ॥
वीणा वेणु जडचि परि वाजवित्याची कळाचि बोलवित्ये ।
अन्यांची काय कथा ! ती वादकभरतकेंचि डोलवित्ये ॥ २५ ॥

## स्वकवितेचे निंदक.

आर्येला मानियले बहु पाहुनि सज्जनीं चमत्कृतिला ।
खळचि न मानिति तैसें बहुदूषणरज्ज नीच मत्कृतिला ॥ २६ ॥
प्राकृत ह्मणोनि निर्भर हांसोत अतज्ज्ञ नीच मत्कृतिला ।
परि जाणशील बा तूं ! रसिककविवरा ! मनीं चमत्कृतिला ॥ २७ ॥
ज्वरितांसि शर्करा जशि, कटु होय खळांसि सुरसही कविता ।
शिष्टा पद्मां सुख दे, दुष्टा घूकांसि ताप दे सविता ॥ २८ ॥

## वाचकांची प्रार्थना.

गीर्वाणशब्द पुष्कळ, जनपदभाषाचि देखतां थोडी ।
यास्तव गुणज्ञलोकीं याची घ्यावी हळूहळू गोडी ॥ २९ ॥
प्राकृतसंस्कृतमिश्रित यास्तव कोणी ह्मणेल ही कंथा ।
भवशीतभीतिभीतस्वांताला दाविला बरा पंथा ॥ ३० ॥
कोठें दूरान्वित पद, कोठें हुकली असेल यतिमात्र ।
अतिमात्र दोष ऐसे, न वदोत कवी समस्तगुणपात्र ॥ ३१ ॥
वर्णगुणांतर न गणुनि एकीं ठेवूनि दृष्टि मधुपानीं ।
चुंबावेचि भलतसे कुसुम प्रेमें रसज्ञ मधुपांनीं ॥ ३२ ॥
पुरुषाचा धर्म श्रम, ह्मणउनि कांहीं पडेल जेथ उणें ।
पूर्ण करावें शोधुनि भगवत्प्रीत्यर्थ सज्जनें निपुणें ॥ ३३ ॥

## वरप्रसाद.

मद्ग्रंथ असावा हा बहुजनमत जेंवि शंभुवृषभांड ।
अर्थें पूर्ण असो मम वच, तत्पूजार्थ जेंवि वृषभांड ॥ ३४ ॥
भेटो रसिक लवहि जो ग्रंथीं चषकांत नूरवि, प्राशी ।
ऐसा वर दे, वरदेश्वरचरणा ! या मयूरविप्राशी ॥ ३५ ॥

---

१ जगाचा उद्धार झाल्यामुळें होणाऱ्या चिंतेनें. २ सभापर्वांतली ही आर्या आहे. द्रौपदीला देवानें वस्त्रें पुरविलीं त्या प्रसंगाकडेही लक्ष आहे. ३ मराठी भाषेतला शब्दसमूह थोडा. ४ गोधडी. ५ भवाच्या थंडीनें कुडकुडलेल्यास. ६ नंदीचा वृषण. ७ विष्णुपात्र देवपूजेचें पात्र.

# उपदेशपर कविता.

गति उत्तम होय असें वर्तावें, धर्मनीति रक्षावी, ।
चित्तांत पूर्वजांची नित्य स्थिति रीति शांति लक्षावी ॥ १ ।

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २१५६
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# तरुण राजपुत्रास बोध.

वत्सा ! शाश्वत होय श्रुति-तज्ज्ञ-पुराण-कथित जो धर्म ।
तो सेव्य उभय लोकीं प्राणी तेणेंचि पावतो शर्म ॥ १ ॥
भज सन्मार्गातें तूं, दैवज्ञांची करूं नको गर्हा, ।
स्वप्नींहि देवहेलन न करावें रीति हे तुला अर्हा ॥ २ ॥
त्वां सत्य न त्यजावें, मानावें प्राण-संकटाहि फोल, ।
गो-ब्राह्मण रक्षाया वत्सा ! केव्हां असत्यही बोल ! ॥ ३ ॥
देव द्विज परवनिता परधन तैसेंचि वस्तु-दुर्लभ जें ।
याची तृष्णा न धरीं, पुण्ययशस्कर असेल तेंचि भजें ॥ ४ ॥
जी सत्कथा सदागम सद्व्रत सद्धर्म जें सदाचरण ।
बा याची तृष्णा धर भावें स्मर शंभुचे सदा चरण ॥ ५ ॥
गो-विप्रातिथि-पूजन स्वाध्याय स्नान होम मंत्र जप ।
पितृतर्पण देवार्चन यांतें तूं आळस त्यजूनि जप ॥ ६ ॥
बा कोप लोभ शठता असदाग्रह पिशुनता कुटिल भाव ।
उद्वेग दंभ यत्नें सोडीं, जोडीं महाजनीं ठाव ॥ ७ ॥
तूं क्षत्रधर्मरत जरि तरि बा हिंसा करूं नको स्वैरें ।
बहुभाषण परनिंदा वत्सा ! तैसेंचि शुष्क जें वैर ॥ ८ ॥
हें न तुवां विसरावें स्त्री-मृगया-द्यूत-पान यांत सदा ।
अत्यासक्ति नसावी स्त्रीजित अविनीत जे तशांतें कदा ॥ ९ ॥
सुखसंपन्नीं मैत्री, नित्य दया दुःखितीं जनींहि करीं ।
संतोष पुण्यवंतीं बा औदासीन्य दुर्मतीं न धरीं ॥ १० ॥
सक्रोध हो अरिजनीं, स्वकलत्रीं हो सकाम तूं बापा ! ।
सकृप सलोभहि चित्तीं हो स्वजनाच्या हरावया तापा ॥ ११ ॥

---

१ वेद व वेदरहस्य जाणणारीं पुराणें यांनीं प्रतिपादिलेला जो धर्म तो शाश्वत (सनातन) होय. २ ज्योतिषी. ३ योग्य. ४ जपत जा. ५ स्वेच्छेसाठीं. केवळ इंद्रिय सुखासाठीं. ६ तसेंच स्त्रैण व उद्धत यांतही अत्यासक्ति नसावी. ७ दुष्टांविषयीं उदासीन राहूं नकोस, तर त्यांना दंड कर. ८ कामक्रोधादि रजोगुणोद्भव विकार क्षत्रियांनीं ठार मारूं नयेत, तर त्यांची योजना यथायोग्य करावी. शत्रूंच्या ठायीं क्रोध, धर्मपत्नीच्या ठायीं काम, स्वजनतापहरणार्थी लोभ, नास्तिकाविषयीं द्वेष, साधूविषयीं उत्कंठा, वाईट सल्लामसलत देणाऱ्याविषयीं, दुर्जनोक्तीविषयीं बहिरेपण हे गुण अंगीं असावे.

हो द्वेषी पाखंडीं, साधुजनीं हो सराग तूं बा गा ।
दुर्मंत्रीं केवल जड पिशुनोक्तीं बधिर हो महाभागा ॥ १२ ॥
नास्तिक धूर्त पतित शठ षंढ कितव चपल खल जड क्रूर ।
निज-कल्याणाकरितां वत्सा सोडूनि यांसि दे दूर ॥ १३ ॥
जननी जनक सती स्त्री गुरु सज्जन यांचिया वचा साधो ।
विश्वास पदाहि धरीं, न अविश्वासें व्यथा तुला बाधो ॥ १४ ॥
सावध सदां असावें संसारीं स्वहितकृत्य लक्षावें ।
पुरुषार्थांचें साधन बा धनसें हें शरीर रक्षावें ॥ १५ ॥
वत्सा ! भृत्याचाही तूं निजहृदयीं धरीं न विश्वास ।
समज मनीं गुरुकथितन्यायें वश मीं करीन विश्वास ॥ १६ ॥
निर्दोष जे तयांची चित्तांत कधीं धरूं नको शंका ।
प्राणाहि वेंचुनि रक्षीं वृद्धा बाळा सुदुर्बळा रंका ॥ १७ ॥
बा पात्र अपात्र असो नीच महत्तम कसाहि हो पावें ।
जो याचना करील स्वशिरहि हर्षें तयासि ओपावें ॥ १८ ॥
यत्नें कीर्तिच जोडीं बा होय पदार्थ हाचि बहु धन्य ।
राजे पंडित यांचें भूषण नाहींच कीर्तिहुनि अन्य ॥ १९ ॥
सत्कीर्तिप्रभवा श्री पुण्यहि सत्कीर्तिनेंचि बा तोक ।
ज्योत्स्नेनें चंद्र जसा शोभे सत्कीर्तिनेंचि हा लोक ॥ २० ॥
ताताच्या मातेच्या गुरुच्या नित्य क्षमा करीं रागा ।
आगां[१] निजपुत्राच्या भूदेवकृताऽन्यथाहि तूं बा गा ॥ २१ ॥
आयुष्य कीर्ति यश बल पुण्य-द्रव्य प्रजोन्नति प्राज्य ।
जेणें तें कर्म करीं, धर्मन्यायेंचि चालतें राज्य[२] ॥ २२ ॥
बह्वर्थ जन-मनोहर स्वल्पाक्षर मधुर सत्य बोलावें ।
ज्या सद्वाक्य- श्रवणें बुध-श्रोत्याचेंचि शिरहि डोलावें ॥ २३ ॥
संपत्तींत विपत्तित वत्सा होवूं नको कधीं भ्रांत ।
पापीं गुरु-बहुबोलीं ब्रह्मकुलीं सर्वकाल हो भीत ॥ २४ ॥
संतांचे अति हितकर उपदेश तशाचि पुण्य-धर्म कथा ।
यातें विमुख न हो तूं वत्सा सोडूं नकोचि भव्य[३] पथा[४] ॥ २५ ॥
कुलटा गणिका कामुक जेथें बहु नीचजन तशा स्थानीं ।
राहूं नको क्षणहि कीं दुर्देशीं न प्रवर्तता ज्ञानी ॥ २६ ॥
आचमन करूनि शुद्ध ब्राह्ममुहूर्तीं उठोनियां न्हावें ।
भावें गुरुचरणातें नमुनि शिवातें सदा तुवां ध्यावें ॥ २७ ॥

---

१ अपराधाला. २ सान्या बोधाचें सार 'धर्मन्यायेंचि चालतें राज्य' या सुंदर चरणांत आहे. ३ येथें एक मात्रा अधिक आहे. ४ कल्याणाच्या मार्गाला.

स्वा उदयातें येतां श्रीरविचे किरणचरण वंदावे ।
दारिद्र्यदुःख दुरित-ध्वंसें प्रारब्ध-भोग मंदावे ॥ २८ ॥
ऐसा तुज संक्षेपें धर्मांचा संग्रह स्वयें शुक्त ।
कथिला अन्य पुराणा-मध्यें जो विस्तरें असे उक्त ॥ २९ ॥

ब्रह्मोत्तरखंड अ॰ ११

---

## स्त्रीधर्म.

### आर्यागीति.

पतितक्लीबांधत्र सेवा हा स्त्रीचा मुख्य धर्म, यातें सेवा, ।
बाळातें पोसावें, हित भेषज लागतां कटुहि सोसावें. ॥ १ ॥
अगुण सगुण पति तातें दिधला त्यजिजे न टाकिजे पतितातें, ।
कीं जारीं सुख न सती वांछिति, दोनीही लोक तेणें नसती ॥ २ ॥

बृहद्धर्म अ॰ २९

## प्रल्हादाचा असुरपुत्रांस उपदेश.

बाळांचें प्रेम ह्मणुनि हरिचिंतनपराहि तो दयालु बरा ।
त्यां दे निजबोध, झटे हरिजनचि, न परहितोद्या, लुब्बरा ॥ १ ॥
" सुख विषयांत न कांहीं, हरिसि भजा, यथवांचि, ' बाळपण ।
सारुनि भजों ' ह्मणाल, प्रियसख हो ! वश नसेचि काळ पण ॥ २ ॥
देवा हरिचेचि सदा व्हावेंचि असुरकुमारहो ! भक्त ।
कीं हा या भूतांचा आत्मा ईश्वर सुहृत्प्रिय व्यक्त ॥ ३ ॥
वाटेल तुह्मांसी जरि श्रीकृष्णाचि एक देव जोडावा ।
तरि भोगोद्यम सहसा आधीं कैसा समस्त सोडावा ? ॥ ४ ॥
यत्नावांचुनि दैवें दुःख नसें सुखहि देहयोगानें ।
भोगोद्यमें न आयुःक्षय भगवत्कीर्तिच्याचि हो गानें ॥ ५ ॥
न घडेल भजन हरिचें, तरुणपणीं विषयसाधनीं भ्रमतां ।
वृद्धपणीं ही दुःसहकासश्वासाद्युपद्रवें श्रमतां ॥ ६ ॥
मोह स्त्रीपुत्रांचा गेहीं, तैसीच अर्थतृष्णा ते ।
दुस्त्यज, या सांपडला प्राणी पावेल काय कृष्णातें ? ॥ ७ ॥
वसतो आत्मा, यास्तव सर्वां भूतीं दया करा नमुनी ।

१ पतिव्यतिरिक्त पुरुषापासून २ दुसऱ्याच्या हितोद्यासाठीं हरिजनच झटे; लुब्बर (अज्ञान असून वाचाळ ) न झटे. ३ विषयसुखासाठीं उद्योग.

करिति उपाया इतरा सुखवाया या दयाकरा न मुनी ॥ ८ ॥
ते योगयाग रुचति न भूतदया हे जशी रुचे हरिला ।
प्रभु तुष्ट इणें होतां, अर्थ कवण जड मना! मनीं धरिलों ? ॥ ९ ॥
वारिजनेत्रा भावें ध्यावें गावें सदा यशाला हो!
आम्हां इतुकेंचि पुरे, धर्म इतरं मोक्षही कशाला हो ॥ १० ॥
सुखहेतु भक्तिपथ हा श्रीनारायण सुरर्षिला बोधी ।
तो मज, म्यांहि तुम्हांला, येणें तुमचीहि हरिरता हो धी" ॥ ११ ॥
बाळांसि असें अभिमुख करुनि प्रह्लाद आपल्यासि कवी ।
ज्ञान तसें निववाया चित्ता त्यांच्याहि तापल्या सिकवी ॥ १२ ॥

—मंत्रभागवत. स्कंध ७.

---

# ( ४ ) वधूवरास बोध.

तुंबरु गेल्यावरि ती स्वसखीतें कुंडला म्हणे "आले ।
त्वद्दयीं सद्गुण जे ते सर्व सुखें वसावया आले ॥ १ ॥
तुज नलगे शिकवावें स्नेहें देतें परंतु आठवनीं ।
पतिभजनीं सुख पावो तव मति शीतांत जेंविं पाठ उनीं ॥ २ ॥
पतिपरमेश्वर याच्या भजनीं अनुकूलबुद्धि हो भावें ।
लोभावें न तनुसुखीं त्वां संपादुनि कीर्ति शोभावें" ॥ ३ ॥
त्या नृपपुत्राहि म्हणे, "तुज सर्वज्ञासि काय सिकवावें ।
स्नेहें वदल्ये स्त्रीसह पुरुषार्थत्रय जपोनि पिकवावे ॥ ४ ॥
'स्त्रीयोगें पुरुषाचे साधति धर्मार्थकाम' सत्या गी ।
हे श्रुतिची सात्विक घे राजस कीं ईस तामस त्यागी ॥ ५ ॥
दोघे चिरकाळ तुम्हीं सतत सुखें पुत्रपौत्रसह नांदा ।
तुमच्या यशासि सज्जन सेवूत चकोर ते जसे चांदा" ॥ ६ ॥

—मदालसोपाख्यान. अ. २

---

१. प्रभु भूतदयेनें तुष्ट झाल्यावर मनीं धरिलेली कोणती इच्छा (मनोरथ) जड (पूर्ण होण्यास कठिण) आहे? २. नारदाला. ३. आपल्यास अभिमुख करून म्ह० आपणाकडे त्यांचें मन वळवून. ४. मदालसेला. ५. हे सखि! मैत्रिणि! ६. कुवलयाश्वास. ७. धर्म, अर्थ, काम. वस्तुतः स्त्रीसंगें मोक्षप्रमुख चारही पुरुषार्थ साधतात असें असून कुंडला पुरुषार्थत्रयाचाच उच्चार करिते याचें कारण 'धर्मेच अर्थेच कामेच नातिचरामि' या विवाहप्रसंगाची प्रतिज्ञा असावी. ८. वचन, वाणी.

# ( ५ ) गांधारीचा दुर्योधनास बोध.

पांडवांना राज्यार्ध देऊन साम करावयाला भीष्म, द्रोण, विदुर हे दुर्योधनाला सांगत असतांही तो त्यांचें ऐकत नाहींसें पाहून धृतराष्ट्रानें गांधारीस सांगितलें कीं 'तूं तरी आपल्या मुलास ताळ्यावर आण,' तेव्हां त्या श्रेष्ठ मातेनें आपल्या पुत्रास बोध केला तो पुढें दिला आहे. गांधारी ही विदुषी, विचारी व महाज्ञानी होती. तिनें भीड न ठेवितां आपल्या मुलास खऱ्या हिताचा बोध केला.

स्त्रीस म्हणे तो नृप "सति! तूं तरि दुर्योधनासि बोध करीं।
देणार अंतकाच्या स्वासुसह सकळ सहाय योध करीं" ॥ १ ॥
देवी म्हणे "शिकवितां देवर्षि महायशाहि उपरमला।
उपरमला भीष्म विदुर कृष्णहि, कथिता अशाहि उपर मला! ॥ २ ॥
ऐकेल काय गुरु-वच सुत? आपण ऐकिलें कितिकसें जी?।
पावेल सुयश सुसुख प्रसवुनि सुतशतहि हे दिति कसें जी? ॥ ३ ॥
सांगेन यथामति, परि कोठें तो?" नृप म्हणे 'वहा, आत्या!'।
आणी सभेंत वळवुनि विदुर पुन्हा वातसा महाभ्रा त्या ॥ ४ ॥
गांधारी त्यासि म्हणे "वत्सा, बहु कष्टतो दुरभिमानी।
कां त्यजिसि गुरूक्ति इला आत्माधिक बहुगुणें सुरभि मानी ॥ ५ ॥
अन्यायकृष्णवर्त्मा न स्पर्शो कीर्तिकापुरा तनया!।
ज्या लोभा भजसी तूं भजले नाहींत वा पुरातन या ॥ ६ ॥
कामें लोपें लोभें नागविले अमित यांस जे भुलले।
यांच्या कुदृष्टिपातें तेजस्वी पुरुषहीरेंही उलले ॥ ७ ॥
न उगाचि मूकसा तूं चित्तांत धरुनि दंभ दर्प रहा।
बा दुरभिमान न बरा देइल धनपतिकरींहि खर्पर हा ॥ ८ ॥
अहित कथील तरि कसा गुरु? बाप कसा? तसीच आइ कसी?।
नाइकसी गुरु-वचन; क्षुद्र-वचन बहु जपोन आइकसी ॥ ९ ॥
सत्यप्रेमें स्वामी न म्हणविती हे दयाभ्र मामाजी।
मी राजा ऐसें जें काय म्हणसि खेद या भ्रमामाजी ॥ १० ॥
राज्यार्ध पांडवां दे, तूं घे राज्यार्ध, बहु तुला बा हें।
साम करीं, यश हसलें मुरडुनि तुज पाहतें मुला! बाहे ॥ ११ ॥

---

१ धृतराष्ट्र गांधारीस म्हणतो. २. थकला, हात टेकले. ३. विदुराला. ४. अन्यायरूप अग्नी. ५ पूर्वज, पूर्वींचे राजे. ६. पुरुष हेच हिरे. ७. खापर. ८. कर्ण, शकुनि यांचें वचन. ९. भीष्म.

निष्कंटक राज्य करिसि हा महिमा सत्य पांडवांचा रे ।
सत्सख्य करूनि यशें धवल करा सत्यपांड, वांचा रे ॥ १२ ॥
भीष्म द्रोणाचार्य प्राणांतें सांडितील, न तयांतें ।
सामर्थ्य असोनि अधिक बहु ते आहेत साधु नत यांतें ॥ १३ ॥
क्षुद्र-शकुनि-दुःशासन-कर्ण, यश क्षुद्र-संग-रहितास ।
कोणा होइल केला भूत-बळें रुद्रसंगर हितास ? ॥ १४ ॥
सर्व सुहृत्तम कृष्ण प्रभु, याची कास धरुनि सर्व तरे ।
तूं किति ? तरले याच्या नामें बहु सागरांत पर्वत रे ॥ १५ ॥
तुज पांडवजय दुर्घट, नारळ हरिजेल काय खर्वंतरें ।
कृष्णोक्तिं सख्य करीं याचि उपायें अनिष्ट सर्व तरें" ॥ १६ ॥
ऐसें मातृवचनही लंघुनि गेला उठोनि पुनरपि तो, ।
जो भव्य पावणारा सद्गुरु-सद्वाक्-सुधेसि सुनर, पितो ॥ १७ ॥

—उद्योगपर्व अध्याय. ९.

---

# ( ६ ) निंदक.

दानस्नानजपोपवासनियमें पापासि जें वारितें
देतें पुण्य जनासि तीर्थ म्हणुनी सन्मानिसी वारि तें ।
जो एतन्निरपेक्ष निंदक गुणें तैसाचि पापांपहा
त्याला साधु न कां मना ! म्हणसि रे सन्मार्ग बापा पहा ॥ १ ॥
पापांचे बहुदाट कांट चढले फारा दिसांचे लया
नेत्ये, सर्व मना ! पुन्हां मिळवितां तैसें न सांचेल या ।
दे आम्हां कुतुकें, परेष्टकरणोद्योगीं फुका जी भरे
सन्माऱ्या चिरजीविनी तुझि असो ती निंदका जीभ रे ! ॥ २ ॥
घेती माथां परांचा दुरितभर बळें, तुल्य थोरीं लहानीं,
देतीं पुण्यें सुकष्टें करुनि मिळविलीं, मानिती हीं न हानी, ।

---

१ ब्रह्मांड. २ भूतांच्या जोरावर शंकराशीं युद्ध केलें तर तें कोणास हितकर होईल ? ३ ठेंगण्यामनुष्यानें. ४ ज्याचें कल्याण व्हायचें असतें तो सज्जन सद्गुरूच्या चांगल्या बोधाचा स्वीकार करितो. दुर्योधनानें मातृबोधाचा अनादर केला यावरून त्याचें अकल्याण होणार हें येथें सुचविलें आहे. ५ हे पांच श्लोक आजवर कोठेंही छापलेले नाहींत. हे पंढरपुरीं पंतांची बृहद्दशमाची जी हस्तलिखित प्रत आहे तिच्या अखेरच्या पानावर खुद्द पंतांनीं लिहिले आहेत. परमार्थी सुपुरुष निंदकाला आपला परम मित्र कां मानतो हें यावरून कळणार आहे. पंतांच्या खोंचदार लिहिण्याचाही हा एक मासला आहे. ६. पापनाशक.

एवं ज्यांची परार्थस्थिति सदुपकृती सज्जना सोयरीं तीं
साजे निंदा तिला ही ? अजि कविजनहो ! हे बरी होय रीती ? ॥ ३ ॥
आम्हां श्रीरामभक्तां अजितनुतिविणें स्वस्तुती तों न अर्हा
पापघ्नी पुण्यदात्री करिशिल जरि तूं निंदका ! होय गर्हा ।
मानें तोषा न रोषा परि म्हणति तुम्हां निंदका वेद, 'वाटे
स्वर्गाच्या चूकले हे पडतिल नरकीं !-' हा मना खेद वाटे !! ॥ ४ ॥
सुमार्गीं ही हेतु स्वलनपतना जेंवि खळगा
प्रमादी जे त्यांला अचुकचि मना तेंवि खळ गा ! ।
न कांटे धोंडे ही करिति गतिचा रोध इवरे
तयांच्या जे आंगें कुशळपद चालों धड वरें ॥ ५ ॥
दूता निंदिति कुलटा साध्वीतें साधुतेंहि जे विटे ते ।
जन अनघ कसे होते निंदक जरि हाय म्हणुनि ते विटते ? ॥ ६ ॥
जे साधु सत्पथीं स्थित ते वाङ्मात्रें न दूषिले जाती ।
माती कोठें न मर्दे खळ, घेती करुनि आपुली मौती ॥ ७ ॥
विशुद्धस्वांताला रुचति गुण पीयूषसम जे
परी त्यातें दुष्ट स्वमनिं विष ऐसेंचि समजे ।
घृतें क्षीरें होतीं प्रमुदित मखीं निर्जर खरें
परी तेंही तापप्रद रस जयाला ज्वर भरे ॥ ८ ॥
देवा ! निरामय सुखी शतवत्सर सर्व खळ असावेच ।
न प्रार्थितां नच करिल पंकाचा तीर्थजळ असा वेंच ॥ ९ ॥

---

## ( ७ ) वीरमातेचा वीरपुत्रांस निरोप.

पराभूत झालेल्या आपल्या संजय नामक पुत्रास उत्साह देऊन शत्रुजयार्थ परत पाठविणाऱ्या विदुलेची कथा सांगून कुंती कृष्णाबरोबर पांडवांना वीररसोद्दीपक निरोप पाठविते.

स्वरथीं चढोनि भगवान् मग जाय पुसावयासि आतेला ।
तेंचि वदूं, कोण रसिक गोघृत सोडुनि करील आ तेला ? ॥ १ ॥
सांगे सुयोधनाचें मत संक्षेपें यदूद्वह सतीतें ।
धर्मासि निरोप पुसे सुतमार्दव आठवूनि हसतीतें ॥ २ ॥

---

१ निंदा. २ परदारासक्त जार. ३ वरच्या दोन आर्या हरिवंश अ. ११ मधल्या आहेत. ४ हा श्लोक मंत्ररामायणाच्या उपसंहारांतला आहे ; शुद्धचित्ताला. ५ दुधातुपानें यज्ञांत देव हर्षित होतात. ६ ही आर्या रामरीतींत आहे. ७ यदुश्रेष्ठ श्रीकृष्ण.

कुंती म्हणे " वद असें त्या मत्तनयासि कमळनयना, कीं ।
परिसोत पूर्वज तुझा प्रेमें सुरगीत अमळनय नाकीं ॥ ३ ॥
वाटे सुभटें पुत्रें मेळविला विप्रसेवनीं नव टे ।
वर्षोष्णसह जटिलवर, तरि काय बहु तसे वनीं न वट ॥ ४ ॥
जें सिंधुराजीवजित स्वसुतातें बोलिली सती विदुला ।
तें परिस " सांगत्यें तुज यदुकुळकमळा कराचिया विधुला ॥ ५ ॥
विदुला म्हणे " अहा रे क्लीबा मंदा कसा पळालास ? ।
कां वांचलासि, अयश-स्कर ऐसा तूं न कां गळालास ॥ ६ ॥
अरि हरिल राज्य, मग तूं वरिशिल वृत्त्यर्थ काय माधुकरी ? ॥
सुखकर सुकर्म टाकुनि असुखकर कुकर्म कोण साधु करी ॥ ७ ॥
मघौवन, संजय हें निजनामहि, बुडविलें तुवां दगडें ।
झगडें यशोर्थ, अरि-रथ-चक्रांहीं स्पष्ट लोष्टसा रगडें ॥ ८ ॥
जेणें लज्जित व्हावें स्वर्गीं सहपर्वजें तुजा तातें ॥
परमानुचित पलायन कैसें केलें तुवां कुजाता तें ॥ ९ ॥
मरण विहित, न पलायन, भीती धर्मज्ञराजकन्या या ॥
अन्या याहुनि अधिका घडल्याही न गणतीच अन्याया ॥ १० ॥
साधूंसि बाहुजाचा मत विजय जसा, तसाचि वध मत रे ।
निजधर्माश्रित न बुडे, निजधर्मच्युत कधीं न अधम तरे ॥ ११ ॥
अधमा तुवां मरावें क्षणहि न बुडवूनि मान वांचावें ।
काळा, यासम अन्यांहि जे असतिल, त्यांहि मानवां चावें " ॥ १२ ॥
तो संजय तीस म्हणे " पुत्राच्या इच्छितीसि कां मरणा ।
वांछिति शमा अकाम-प्राज्ञ, इतर इच्छिती सकाम रणा ॥ १३ ॥
रडसील सस्नुषां कीं मज जरि देइल परासुता समर
न म्हणेल स्वप्नींही शतपुत्राही परासुतास मर " ॥ १४ ॥
" जी व्यर्थ उभयलोकानुपयुक्त अपत्य वाढवी, ती तें ।
स्पष्ट करी वात्सल्य, ज्ञाते जन म्हणति ' गाढवी ' तीतें ॥ १५ ॥

---

१ कुंती म्हणते माझ्या पुत्रानें-युधिष्ठिरानें विप्रसेवा करितां करितां नवीन ट मिळविला म्हणजे भट-योद्धा-त्यासारखें वागायचें सोडून क्षमावान् भट्ट मात्र झाला आहे. क्षत्रियाला अरिमर्दनच योग्य आहे. ऊन पाऊस सोसणारा जटाधारी धर्म बनला आहे पण तसे वट-वृक्ष काय थोडे आहेत ! २ सिंधुराजानें जिंकलेल्या आपल्या पुत्रास. ३ गर्भांतून पतन कां न पावलास ? ४ उत्तम जय मिळविणारा. ५ धर्मज्ञ राजकन्यांहून इतर कन्या. ६ हे मृत्यो ! यासारखे दुसरे जे भ्याड राजपुत्र असतील त्यांनाही तूं खाऊन टाक. ७ अपत्य इहपरलोक साधून देणारें हवें.

निजलासि काय ? उठरे, जय पावतसे सदा समरशील ।
उत्साह टाकितां तूं दैन्यें सांगेन सदास मरशील" ॥ १६ ॥
संजय म्हणे "नमस्ते जननि, जन निशाकरें जसा निवतो ।
बोधें तसा निवालों न हितकर गुरूपदेशसा शिव तो" ॥ १७ ॥
विदुलोक्त करी संजय जिंकुनि समरांत सिंधुराजाला ।
सिंहीला तोचि उचित सुत, जो मारूनि सिंधुरां जाला ॥ १८ ॥
सांग स्वसरव्यासि असें, झाली त्वत्सूतैकीं गगनवाणी ।
कीं कुंति, हा अरि वधुनि पद साधिल, तुज सुखा मग न वाणी ॥ १९ ॥
तें सत्य असो, तेंही जें युद्ध परांतका महेशासीं, ।
मद्वीरसूत्वहि, श्रीस्त्री-कीर्त्यं-पहारकाम हे शासीं" ॥ २० ॥
भीमासि म्हणे "यूतीं नेलें जिंकूनि वित्त भीमा जें ।
तें न स्मरे ; न तुमच्या वनवासालाहि चित्त भी माजें ॥ २१ ॥
सलतें मनांत दुष्टें वोढुन नेली सभेंत कृष्णा तें ।
स्मरलीं, त्वांहि उपेक्षा करितां, हरितां निरीस, कृष्णातें ॥ २२ ॥
त्या स्मरणें मन पडलें तापीं बहु, जेंवि तळमळत डागें ।
हृदयें मोह उघडिला जैसा ग्रीष्मांत तळमळ तडागें ॥ २३ ॥
दावावें यश जोडुनि कुळजानें सुप्रसन्न-वदन कुळा" ।
प्रथम पुसोनि कुशल मग जगदीशा तूं असेंचि वद नकुळा ॥ २४ ॥
"अयशस्कर तोक पळहि मळवाया धाम वा न रांगावें ।
जरिन गमेचि, तरि सुखें चित्र-रचित-राम-वानरां गावें ॥ २५ ॥
हें क्षत्रियासि समुचित," ऐसाचि निरोप सांग सहदेवा ।
जो पांचांत यशस्कर, तो माजा पुत्र मूर्तमह देवा ॥ २६ ॥
कृष्णेसि सांग कृष्णा । तिळभरिहि तुजें उणें नसो शील ।
त्वां साहिलें, असें पळ-मात्रहि सर्वंसहा न सोशील ॥ २७ ॥
त्वां रक्षिलें, न झालें क्षम रक्षायाहि मत्तनय नातें ।
असते क्षम चरण नखां स्पर्शों देते न मत्तनय-नातें ॥ २८ ॥
जरि बुडविलीस माझ्या पुत्राहीं व्यसन-गर्त-लीनाहीं ।
तन्हि न विटलीस, या परि सत्वें कोणीहि वर्तली नाहीं ॥ २९ ॥

---

१ स्त्रियांसह. २ हत्तीला. ३ त्वज्जन्मकाळीं. ४ राज्यलक्ष्मी, द्रौपदी व कीर्ति यांना हरण करण्याची इच्छा करणारे कौरव. ५ चित्रांत काढलेल्या व्यापारशून्य रामवानरांना. ६ पांच पुत्रांपैकीं जो शत्रूंना जिंकील तोच माझा पुत्र व तोच माझा मूर्तिमंत आनंद होय. ७ पृथ्वी. ८ समर्थ असते तर तुझ्या पायाचें नख शत्रूंच्या दृष्टीस पडूं न देते

किंबहुना सांग तयां समयीं जें काय चांगलें कांहीं ।
कृष्णा, मन्मत हें, कीं यश रक्षावें, न आंग, लेंकीहीं ॥ ३० ॥
—उद्योग पर्व अ. १०

## ( ८ ) शहाणा राजा.

निज देशसमीपस्थित बळेंदर्पित जो तयासि कवि-राजे ।
नच वांचो देति, असें न करी जो तत्प्रताप न विराजे ॥ १ ॥
जो शुभ निज प्रजांचे देशाची वृद्धि इच्छितो राजा ॥
तेणें पर जिंकावे न उपेक्षावें कदापि या काजा ॥ २ ॥
अभिषेकें जों ओले अलक शिरीं तोंचि आर्य आधीं ते ।
वारूनि प्रकृतीचें रंजन जे करिति कार्य आधीं तें ॥ ३ ॥
प्रथम स्वेंद्रियजेता तो नृप सर्वांहि पात्र होय जया ।
प्रणति करिति शत्रु, म्हणति कवि राज्यश्रीनिवासतोयजें या ॥ ४ ॥
सम्यक् वर्तावें हा काम स्वमनांत जो करी धन्य ।
उपदेशिता हित अहित गुरु त्याला लोकसम नसे अन्य ॥ ५ ॥
व्यसनातें स्पर्शेना धर्मीं रत नित्य जो बळश्रेष्ठ ।
सामंतापासुनि तो भय पावेना कधीं नृपश्रेष्ठ ॥ ६ ॥
—हरिवंश. अ० ११.

## ( ९ ) श्रीकृष्णाचा उद्धवास वेदांतोपदेश.

भगवान् म्हणे, 'न बंधहि मोक्षहि; बा ! बंध भासतो भोगें ।
मदधीन तीन सत्त्वादिक गुण, जे या उपाधिच्या योगें ॥ १ ॥
ते मोक्ष बंध ज्यांस्तव, विद्याविद्या अनादि मम शक्ती ।
बंध अविद्येनें बा ! विद्येनें मुक्तिची अभिव्यक्ती ॥ २ ॥
वार्याद्युपाधिकारितां बिंबप्रतिबिंबभेद रविस घडे ।
जळकृत कंपादिक जें, प्रतिबिंबालाचि जेंवि सकळ जडे ॥ ३ ॥

---

१ पांडवांनीं आपलें नांव राखावें, नांवाकरितां ते मेले तरी बेहेत्तर असा कुंतीचा अभिप्राय-सर्व निरोपाचें सार यांत आहे. २ आपल्या सामर्थ्याचा गर्व वाहणारा. ३. शुभ्र राजे. ४ केश. ५ चिंतांला काळज्यांला. ६ प्रजेचें. ७ राज्यलक्ष्मीचें निवासकमळ. ८ मांडलिक. ९ उदकादि उपाधीमुळें.

सुज्ञा ! प्रतिबिंबें जीं त्यांसि परस्पर उपाधिनें भेद ; ।
घट फुटतां, बिंबैक्यें प्रतिबिंबाचा जसा सरे खेद ॥ ४ ॥
हे मन तसा अविद्येमाजि प्रतिबिंब, तो मदंश जडे ; ।
जीवत्व त्या असे, जीं तींत अविवेकढून बंध घडे ॥ ५ ॥
बा ! त्या जीवालाचि, स्वाविद्योपाधिच्याचि भेदानें ।
नानात्व असे ; सुज्ञा ! कथिलें पहिलें असेंचि वेदानें ॥ ६ ॥
नरवर्या ! जीवेश्वरखग, नग हा देह, यांत आहेत ; ।
कर्मफळ एक खातो ; त्यांत दुज्याचा नसेचि बा ! हेत ॥ ७ ॥
सुज्ञ असक्त असुनिही प्रकृतींत, जसा जळांत बा ! सविता ।
दीपक अलिप्त जैसा, जरि सवा सर्व अर्थ भासविता ॥ ८ ॥
देउनि विरक्तिशाणें तीक्ष्णत्व, ज्ञानसदसितें, सुकवी ।
छेदी संशय जो, तो मायेचे ओंठ हा जयें सुकवी ॥ ९ ॥
बाहेरि निघे विद्वान् , सर्वहि संशय समूळ तोडून ।
स्वप्नासि जसा जागृत, हा देहादि प्रपंच सोडून ॥ १० ॥
मोडेना स्थिति त्याची, निंदा किंवा, नये तया, स्तवन ।
लोकव्यवहारातें मिथ्या समजे, म्हणे, 'तयांस्तव न' ॥ ११ ॥
भरला शब्दब्रह्मीं न परब्रह्मीं भरे तरि श्रमला ; ।
श्रमला पढ़नि घोकुनि आत्मज्ञांला न सुज्ञ तो गमला ॥ १२ ॥
गर्रेत नव्हे स्त्री तैसी, नाहीं सत्कीर्तिपात्र जी वाचा ; ।
पोषी असीस जो त्या वांटा बहु कष्टमात्र जीवाचा ॥ १३ ॥
वस्तुविचार दृढ करुनि, देहाद्यध्यास करिल जो दूर, ।
सर्वगतीं मद्रूपीं मन अर्पिल तोचि निश्चयें शूर ॥ १४ ॥
देहीं विरक्ति, माझ्या ठायीं त्या प्राप्त होतसे भक्ती, ।
ध्यातो मज ; सत्संगीं जसि, कोठेंही तसी नसे शक्ती " ॥ १५ ॥
मोक्षद म्हणे " सदय जो कोणाचाही करीचना द्रोह ।
नांदे क्षमा जयाच्या हृदयीं, तो साधु नाशितो मोह ; ॥ १६
भव्यबळ सत्य ज्याचें, नित्य असूयादिरहित जो काय ; ।
सुखदुःखांत सम सदा ज्याचा सर्वोपकाररत काय ; ॥ १७ ॥
वाहेना मान, करी इतरांचा मान, बोधनीं दक्ष ; ।
वंचक नव्हे, प्रवर्ते धरुनि दयेचाचि नित्य जो पक्ष ; ॥ १८ ॥

---

१ जीव आणि ईश्वर हे दोन पक्षी. २ विरक्तिरूप साहणेवर घांसून ज्ञानरूप चांगल्या खड्गातें तीक्ष्णत्व देउनि. ३ मिथ्यत्वास्तव तो नाहीं असे तो म्हणे. ४ पतिव्रता, कुलीन स्त्री. ५ परब्रह्माचा विचार म्हणजे चिंतन करून जो देहगेहांचा अभिमान दूर करील. ६ गर्व.

मोदें अर्पण सर्व प्राप्तार्थांचें मलाचि जें करणें, ।
दास्यें आत्मनिवेदन, कथनीं माझ्या कथांचिया भरणें. ॥ १९ ॥
भर बहु असणें येतां जन्माष्टम्यादि मंगळें पर्वें ; ।
अति उत्सवें भरावीं पर्वें तैसींच वार्षिकें सर्वें ॥ २० ॥
यत्नें प्रकृतिगुणत्रय हें, सत्वें रजहि तमहि, बुडवावें ।
सत्यदयावृत्ति शमात्मकसत्वानेंचि सत्व उडवावें ॥ २१ ॥
नयनींचा मळ झडतां, जैसा अर्थप्रकाश बहु होतो, ।
तैसा विवृद्धसत्वें धर्महि, मद्भक्तिरूप गुरु जो तो. ॥ २२ ॥
मोडूनि असात्विकांचा प्रेमा, सात्विक पदार्थ जे त्यांचें ।
सेवन सत्वगुणातें वाढवितें तद्विपक्षजेत्यांचे ॥ २३ ॥
भक्तिस्वरूपधर्म प्रकटोनि, अधर्म सर्वही नासी. ।
त्या निर्मूळा संभव तेंवि नसे जेंवि गर्व हीनासी. ॥ २४ ॥
यक्षपनरसखमूर्तिध्यान भलें जाण सात्विक स्पष्ट. ।
स्त्रीध्यान अरिध्यानहि, वाढवितें फार उद्भवा कष्ट. ॥ २५ ॥
मोह झडे, काळ दडे निर्मळमद्भक्तिरूप धर्म घडे, ।
मग मत्प्रसाद होतां जें परम ज्ञान तें गळांचि पडे. ॥ २६ ॥
तेजस्वी, स्वमना जरि होतो विक्षेप, मोह आवरितो ; ।
विषयीं दोष पहातो अनलस होउनि विरक्तिला वरितो. ॥ २७ ॥
वाट मम ध्यानाची, हळुहळु अनळस, मनास जो लावी, ।
विषयविरक्ति तयाच्या त्या स्वांताला, सुखेंचि बोलावी ॥ २८ ॥
सुत हो ! चित्तांत विषय, चित्तहि विषयांत हें खरें आहे ।
सुटति परस्पर त्याचे स्वात्म्यास ब्रह्मरूप जो पाहे ॥ २९ ॥
यज्ञस्वरूप यज्ञ प्रभु परमानंदरूप जो हा मी ।
स्फुरलों स्वात्मत्वें ; तरि तें सुख विधिच्याहि बा नसे धामीं ॥ ३० ॥
बहु जिव्होपस्थांचा धरणें जो वेग हेचि होय धृती, ।
न अनुद्वेगेंचि केवळ, समजेल असें यथार्थ तोचि कृती ॥ ३१ ॥
गलिताहंकृति जाणें बंधामोक्षासि, अनुभवीं चढला, ।
तो पंडित, इतर नव्हे, जरि पुष्कळ शास्त्र सर्वही पढला ॥ ३२ ॥
वाढवितो विषयांची तृष्णा, संतुष्ट जो नसे प्राणी ।
तोचि जन दरिद्र, क्षम न स्वत्राणीं न वा परत्राणीं ॥ ३३ ॥

---

१. विद्याधनरहितास. २. शंकर व विष्णु यांचें ध्यान. ३. जिव्हा व गुह्यस्थान. ४. धैर्य.
५. चित्ताचें स्थैर्यच केवळ धृति नव्हे. ६. आत्मसाक्षात्काराच्या पायरीस चढला.

बा ! अर्थसिद्धिकर, परि नश्वर हें नरशरीर जाणोनी ॥
मोक्षार्थ मृत्युपूर्वीं यत्न करावा मनांत आणोनी ॥ ३४ ॥
वश मन होय, विवरितां विश्वाच्या उद्भवासि आणि लया ।
तत्वंपदार्थशोधन, कीं मद्भजनाचि वशासि आणिल यां ॥ ३५ ॥
यद्यपि मन्मतचि बरें, त्वन्मत न खरें असा कलह खोटा; ।
तदपि भ्रमवी मायामृगजळ, वादांत सर्वथा तोटा ; ॥ ३६ ॥
नघडावें तें घडतें, विषयांच्या काय होय न ध्यासें ?
आत्म्याला जन्ममरण लिंगशरीराचियाचि अध्यासें ॥ ३७ ॥
नरदेहीं यम, नियम, व्रत, दान, जप स्वधर्म, जे कांहीं ; ।
यांचें मुख्य फळ मनोनिग्रहचि, ज्ञान वेगळें नाहीं ॥ ३८ ॥
वपु कल्पिलें मनें हें, मी हें माझें असें म्हणति अंध ; ।
भ्रमति भ्रमें अपारीं संसारीं, दृढ गळां करिति बंध ॥ ३९ ॥
बा ! जीभ चाविली जरि, तरि हित जिव्हेचिसारिखे दांत ; ।
कोणावरि कोपावें ? तत्सहनचि तोषकारि खेदांत ॥ ४० ॥
न बरा विषयिजनाचा, योगीं निष्ठा जया, तया संग ।
होय विरागनगाचा या वज्रेंकरुनि उद्धवा। भंग ॥ ४१ ॥
मोहीं पडतो कूपीं अंधाचा अनुग जन जसा अंध ; ।
गंधहि विषयिजनाचा, सुविरक्तालाहि करितसे बंध ॥ ४२ ॥
भरोंचि तप, श्रुत, विद्या, एकांत, त्याग, मौन, हें सर्व, ।
ज्याचें मन स्त्रीयांहीं हरिलें तेणें धरूं नये गर्व, ॥ ४३ ॥
मोह घडे, विषयेंद्रियसंयोग क्षोभवी मना म्हणुनी, ।
स्त्रीस्त्रैणसंग न बरा, सोडावा घात आपुला गणुनी ॥ ४४ ॥
वस्तुज्ञालाहि नव्हे क्षणही षड्वर्गशत्रु विश्वास्य, ।
मग मजसारखियांची काय कथा ? वर्णितोंचि विश्वास्य. ॥ ४५ ॥
वास करिति आनंदें, माहेरीं जेंवि लाडक्या कन्या, ।
साधूंत मत्कथा, ज्या श्रोत्यांचें पाप नाशिती धन्या ॥ ४६ ॥
तेजस्वी संतचि हे नेत्रें देतात आंत बाहेर, ।
तुज दिव्यदृष्टि देउनि, म्हणतिल हा चिद्विलास बा ! हेर ॥ ४७ ॥
बा ! संत देव, संतचि बांधव, गुरु संत, संत हे प्राण, ।
किंबहुना दाशार्हा ! विश्वात्मा मींच संत हें जाण ॥ ४८ ॥

---

१. धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ देणारें. २. अभ्यास करणाऱ्या मनास. ३. केवळ ओझेंच होय. ४. जगाचें म्हणजे सर्वजनसमूहाचें तोंड. ५ उद्धवा.

वाहत जावीं कर्मे मजला, मन चित्त मजचि अर्पावें ।
माझ्या यशोमृतानें साधुजना आपणाहि तर्पावें ॥ ४९ ॥
सुखहेतु पर्वे, यात्रा, परमोत्सव, वेगळेचि, अथवा हे ।
मिळुनि करावे, हा हित, निर्भय, मद्धर्मराज पथ वाहे"॥ ५० ॥

—मंत्रभागवत. स्कंध ११

## ( १० ) पिता, माता व देव.

सुविद्य, धन मेळवी, वचन आयके, आवरी
प्रपंच, भर घे शिरीं, करि कृपा पिता त्यावरी ।
असा जरि नसे रुचे तरि न तो अभद्र क्षण
असा तुजचि आवडे; करिसि तूंचि तद्रक्षण ॥ १ ॥
पिता जरि विटे विटो; न जननी कुपुत्रीं विटे,
दयामृतरसाद्रधी न कुलंकजलें त्या किटे'[1] ।
प्रसादपट झांकिती, परि परा गुरूचे थिटे[2]
म्हणोनि म्हणती भले न ऋण जन्मदेचें फिटे[3] ॥ २ ॥
विटेल जननी हि कीं शत रुची निमित्तें विधी;
मळे कलियुगीं श्रुती जशि, खळीं तिची तेंवि धी ।
कदाचित विटेल बा! तव दया न दीनावरी
जशी जगदघक्षयीं कर भवन्नदी नावरी ॥ ३ ॥

—श्लोककेकावली.

---

## ( ११ ) अंगदशिष्टाई.

"हे रात्रिंचर राजा! रामाचा दूत अंगदाभिध मीं ।
कोणी मला पुसाना 'कोण असें?' काय बैसलों अधर्मी? ॥ १ ॥
वैदेहीच्या रमणें[4] वीरें करुणाकरें जगद्गीतें ।
पाठविलें मज, त्याच्या ऐकें कल्याणहेतु सद्गीतें[5] ॥ १ ॥
'चतुरानन जगदीश्वर, त्याचा तूं पौत्र भूतपतिदासे[6] ।
श्रुतसंपन्न, नयज्ञ, ब्राह्मणसुत, पावलासि सुपदास ॥ ३ ॥

---

१. दयामृतरसानें आर्द्र झाली आहे बुद्धि जिची अशी माता त्या कुळास काजळ फासणाऱ्या कुपात्रालाही विटत नाहीं. २. इतर गुरूंचे प्रसादपट झांकितात खरें पण ते थिटे म्ह. अपुरते आहेत. सर्वांगाच्छादक असा एक जननीचा मात्र प्रसादपट आहे. ३. 'आस का बा निरासकी मा' अशी एक हिंदुस्थानी म्हण आहे. 'कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति' असें आचार्य देवीस्तोत्रांत म्हणतात. ४. रामानें. ५. हितकर अशा उत्तम वाणीनें. ६. पुलस्त्यमुनींचा पौत्र व शिवभक्त.

सुरभूसुर यत्नानें पूजावे, धर्मसेतु रक्षावे ।
निर्मल यश जोडावें, व्यसनानाचार ते उपेक्षावे ॥ ४ ॥
या विहिताचारातें, सोडुनि धरिलीस वृत्ति जननीचा[1] ॥
अनुसरलासि दशास्या! पक्षाला तूं स्वकीयजननीचा[2] ॥ ५ ॥
विधिवरसामर्थ्यानें, होउनि मदमत्त वन्यकुंजरसा ।
धर्मद्रु मोडिलें हे केली ध्वस्ताचि वेदकुंज रसा[3] ॥ ६ ॥
विप्रामर भजनीय स्तुत्य, तयांसींच लाविलें वैर; ।
कैरवपतिनिभ[4] पूर्वजयश मळवायासि वर्तसी स्वैर ॥ ७ ॥
शमदमनयभयलज्जा सोडुनि हरिशी परांगनावित्त; ।
वित्तम[5] होउनि निरयप्रद मार्गीं काय ठेविलें चित्त! ॥ ८ ॥
स्वकुलाला अंजन जो लावी, तो पुत्र न, प्रसविष्ठा; ।
शिष्टाचरणीं यास्तव नित्य असावी यशःप्रदा निष्ठा ॥ ९ ॥
करिशी अन्याय बळें, हितोपदेष्टा तुला गमे द्वेष्टा;
स्वेष्टांसि मंतुवांचुनि धिक्कारिशि, हे बरी नव्हे चेष्टा ॥ १० ॥
जनकमहाराजसुता रविकुलतिलकाजसत्नुची सून, ।
तूं न कळत नेली, तरि दे, हो सद्वृत्त आजपासून ॥ ११ ॥
अपराध हा महाजननिंद्य तशी हे जनाधमा! केली[6]; ।
अद्यापि मी पुलस्त्यद्विजाकडे पाहुनि क्षमा केली ॥ १२ ॥
रघुकुलज श्रीमंत प्राज्ञ प्रबल क्षमादयानिलय, ।
शरणागतवत्सल हे, ख्यात जनीं, शत्रुचा करूनि लय ॥ १३ ॥
रविवंशज राजांची बहुसरला भ्रूलताहि चापलता; ।
ते[8] वक्रा झाल्यावर, चालेना जिष्णुचीहि चापलता ॥ १४ ॥

---

१. जनांत नीच अशी वृत्ति धरलीस. २. रावणाची आई कैकसी ही सुमाली नामक राक्षसाची कन्या होती. ३ वेदरूपकुंजांनीं आच्छादिलेली पृथ्वी. ४. चंद्रप्रभेसारखें शुभ्र असें पूर्वजांचें यश ( कीर्ति ). ५. ज्ञानीपुरुषांत श्रेष्ठ. ६. बिभीषणासारख्या आपल्या आप्तांस अपराधावांचून उपेक्षितोस. ७. क्रीडा. ८. सूर्यवंशांतले राजे यांची भ्रूलता व चापलता सदा सरळ असते ( म्ह. ते सहसा रागावत नाहींत व धनुष्यबाणही हातीं घेत नाहींत ) पण त्यांनीं रागानें धनुष्यबाण हातीं घेतले कीं मग त्यांपुढें इंद्राचीही मात्रा चालत नाहीं. ‘ जिष्णुचीही चापलता ’ असें म्हणण्यांत कवीनें लौकिकाचार पाळला आहे खरा पण त्यामुळेंच या सुंदर आर्येत एक मोठा दोष झाला आहे. इंद्र रावणाच्या बंदिखान्यांत दीन होऊन पडला होता इंद्रजेत्या रावणापुढें इंद्राचें श्रेष्ठत्व वर्णन करण्यांत कवि अगदीं फसला गेला !

नाहीं तुजसीं मजसीं वैर, तथापि प्रियावियोग मला, ।
दिधला, यावरुनि तुझा स्वभाव विपरीत सर्वथा गमला ॥ १५ ॥
वैदेहीला तूं जरि आणुनि देशील आझुनी मजला; ।
मीही लंकाजीवन अभय, समर्पीन तत्क्षणीं तुजला ॥ १६ ॥
नाहीं तरि सायक हे, हे भुज, हा खड्ग, हें धनूरत्न, ।
मीं सज्ज जयधनातें, तूं निधनातें, स्वयें करीं यत्न' ॥ १७ ॥
यापरि तुज राजेंद्रें कथिलें, आतां करूं नको उशिर; ।
सीतोपायन घेउनि, ठेवीं, ये तत्पदांबुजीं स्वशिर ॥ १८ ॥
तूं करुनि समर, न मर; भ्रमरसम रघूत्तमांघ्रिनवपद्मीं ।
रम; रस घे; अमरांचि हो; भ्रमरहित स्वस्थ नांद निजसद्मीं !! ॥ १९ ॥
दे उत्तर, निजलासा, बहिरासा, मूकसा, नको राहूं; ।
याहुनि हित काय वदों; न वदसि कां आझुनीहि चोरा! हूं ॥ २० ॥
अनल अनिल यम यक्षप वरुण विधु ब्रघ्न सर्प गंधर्व ।
सर्व पराजित केले, परि रामाशीं करूं नको गर्व ॥ २१ ॥
राम प्रणतजनांचा त्राता, रिपुलोककाल या पाशीं, ।
चेष्टा करितां दुष्टा! भ्रष्टा! पडशील मृत्युच्या पाशीं ॥ २२ ॥
रामधनंजय तूंही कापुर तृण तूल काष्ठ घृत तैल; ।
शैलहि पिचविल, हें तुज नुमजे तूं मातला जसा बैल ॥ २३ ॥
यतिवेषें चोरानें, बाटवुनी रामचंद्रदलकुटिलीं[2] ।
कुटिलानें रत्नातें नेलें, तो शत्रु पाहिजे कुटिला ॥ २४ ॥
गिरिदलनमस्तकानें, स्वशिरोभंगार्थ दुर्मते! करिशी ।
करिशील तूं मदांधा! नरकपुरी इच्छितोशि लौकरिशी ॥ २५ ॥
तूं मुकलासि श्रीस्त्रीसौख्ययशःप्राणपुत्रमित्रांतें ।
आत्मौर्ध्वदेहिकातें तरि करि, तुज कोण या जनीं त्रातें?" ॥ २६ ॥

—मंत्ररामायण युद्धकांड.

---

## ( १२ ) पतिवशीकरण.*

भामाकृष्णा, गंगायमुनाशा भेटल्या अनादि सत्या ।
साक्षांत् लक्ष्मी गौरी ऐशा झाल्याचि त्या जना दिसल्या ॥ १ ॥

---

१. या प्रसिद्ध आर्येंत अनुप्रास फार उत्तम साधला आहे. 'मर ह्या दोन अक्षरांची आवृत्ति सात वेळ झाली आहे. २ पर्णकुटिला. * हें प्रकरण मूळ पंतलिखित प्रतीप्रमाणें लिहिलें आहे.

सत्या कृष्णेसि म्हणे "वदत्यें तें तूं खरेंच मान, सये! ॥
लोक म्हणोत, परि पळहि माझ्या हातीं न कांतमानस ये ॥ २ ॥
त्वां हे पांच पति कसे वश केले? भजति सर्व एकीतें! ॥
थोडें याहुनि पाहुनि, नटती कांदंबिनीस केकी तें ॥ ३ ॥
सांग वशीकरण कसें केलें त्वां देवि कोणत्या मंत्रें ॥
कीं दिव्यौषधिमूळें किंवा वात्स्यायनोदितें यंत्रें?" ॥ ४ ॥
कृष्णा हांसोनि म्हणे "भामे! मोहावयासि पतिला जे ॥
मंत्राद्युपाय करणें या श्रवणें बहु मदीयमति लाजे ॥ ५ ॥
प्रेमें पतिचरणासि न देउनि, दे हात तायिताला जे ॥
ते स्त्री न रुचे पतिला कीं तीतें आततायिता लाजे ॥ ६ ॥
पति-परमेश्वर-चरणा जी तत्सेवार्थ न नवशी करणें ॥
ती मुग्धा कैसी गे वळवील स्वामि-मन वशीकरणें ॥ ७ ॥
जाणें वशीकरण हें, करित्यें, जेणें कधीं न कोपति तें ॥
सखि! तूंहि असेंचि करी मदमत्सर दाखवूं नको पतितें ॥ ८ ॥
पतिचे प्रसाद देती ज्या सद्गतितें न योग सव तीतें ॥
वाहे पहा शिरीं शिव-देहाऽर्ध-गता शिवा स्वसवतीतें" ॥ ९ ॥
श्रुतिला कविधीसी ती मानवली फार शुद्धवदलीला ॥
न पतीसचि कर्णासहि सत्य सती होति उद्धवदलीला ॥ १० ॥

—वनपर्व अध्याय ६

# ( १३ ) सामान्य नीति.

## १ धर्म.

वेदोक्तीसीं नसतां विरुद्ध जें प्राणिशर्मकर कर्म ।
त्यातें म्हणतों आम्हीं संदीपनिसिंधुजीवनद धर्म ॥ १ ॥

## २ श्रद्धा.

श्रद्धाचि करितसे हित धर्माचें जेंवि माय तनयाचें ।
जप, तप, मख, गुरुपूजा, मुख्य श्रद्धाचि आयतन याचें ॥ १ ॥

---

१. सत्यभामा द्रौपदीस म्हणत्ये. २. सखे, जिवलग मैत्रिणी, ३. मोर मेघमालेला पाहून हर्षनिर्भर होऊन नृत्य करितात. त्यांच्यापेक्षांही पांच पांडव तुझ्या अधीक कह्यांत आहेत ४. 'मेघमाळा' पंतांची टीप.. ५. 'मयूर'–पंतांची टीप. ६. या प्रकरणांतील आर्या अनेक काव्यांतून काढून एकत्र ग्रथित केल्या आहेत. ७. श्रीकृष्णाचे गुरु. हा उद्गार कृष्णाचा आहे.

श्रद्धेनें भजत्यातें पाषाणहि फलद होय, जो अज्ञ ।
तोही सद्गुरु होतो, अश्रद्धेनें वृथा महा यज्ञ ॥ ३ ॥

### ३ पंडित.

विदुर म्हणे, "जो आस्तिक, गुरुवेदोक्तीं जयास विश्वास ।
मीपण ज्यासि न शिवलें, तो पंडित मान्य होय विश्वास ॥ ४ ॥
दुर्लभवस्तु न वांछी, न करी जो नष्ट वस्तुचा शोक ।
आपत्तींत न मोहे, त्या पंडित म्हणति जाणते लोक" ॥ ५ ॥

### ४ दुर्जननिंदा.

त्यांत पळ न वसावें, जेथ दुरितभीति धर्मनय नाहीं ।
तृणचरमुखें सुखें अवलोकावीं, खळमुखें न नयनाहीं ॥ ६ ॥
दुर्जनसहवास सदा तापद हा काय नरक सामान्य ?
होईल यास दाउनि मानधन प्राज्ञ नर कसा मान्य ? ॥ ७ ॥
खळ न खळत्व त्यागी जरि सामें गौरवूनि बोळविला ।
लकुच कटुचि अमृताकरांकरवी ही शर्करेंत घोळविला ॥ ८ ॥

### ५ दैव.

अनुकूळ दैव असतां न समर्थ करावयासि हानि यम ।
होतां तें प्रतिकूळ प्रबळहि दुर्बळचि होय हा नियम ॥ ९ ॥
भावि प्रबळ, भ्रमतो सर्वहि, बालिश असो, असो सुकवी, ।
होणार सत्पथींही दिवसींही डोळसासि ही चुकवी ॥ १० ॥
बलवत्तर विधि देतो थोराला थोरल्याचि तापातें ।
इंद्रप्रमुख सुरांस हि जें भावि न लंघवेचि बापा ! तें ॥ ११ ॥
अनुकूळ काळ होतो तेव्हां बळ बुद्धि तेज यश देतो ।
प्रतिकूळ तोचि होउनि माघारें दत्त सर्वही घेतो ॥ १२ ॥

### ६ पौरुष.

अर्भतर म्हणे, "सुत हो ! जरि जन जाणुनि अशक्यकर्मातें ।
न करितिल अनुद्योगें, पावतिल न कार्यसिद्धिशर्मातें ॥ १३ ॥
पुरुषें आरंभावें कर्म न पौरुष कदापि सोडावें ।
कर्मफळ जसें दैवें स्पष्ट तसें पौरुषेंहि जोडावें ॥ १४ ॥
यास्तव यत्न तसा मी करिन जसें सिद्ध होय हें कार्य ।
म्हणती 'सर्वार्थांची सिद्धि असें निश्चयीं' असें आर्य" ॥ १५ ॥

---

१. मदासलोपाख्यान अ. ३.

## ७ व्यसनासक्ति.

चार व्यसनें मृगया, स्त्री, पान, द्यूत, यांत जो सक्त ।
तो धर्मच्युत, तत्कृत सत्कृत न महाजनांत, हें व्यक्त ॥ १६ ॥

## ८ काम कोप व दुराग्रह.

बहु काम कोप लोभा उग्रा असुरा समस्त सुर भीती ।
हे व्याघ्रचि, वा विदुरा ! जी कीर्ति स्पष्ट होय सुरभी ती ॥ १७ ॥
कामें कोपें लोभें नागविले अमित यांस जे भुलले ।
यांच्या कुदृष्टिपातें तेजस्वी पुरुषहीरें[1] ही उलले ॥ १८ ॥
भ्रमवी, श्रमवी, मळवी, पळवी सत्कीर्तिला, दुराग्रह रे.
सेव्य सदुपदेश सुधाग्रह, असदुपदेश हा सुरा-ग्रहरे ॥ १९ ॥

## ८ क्षत्रिय व ब्राह्मण.

दुष्टदमन, अपलायन युद्धीं, द्यावें सदाश्रिता शर्म ।
राजांचा हाचि परम हेतु अशेषार्थसिद्धिचा धर्म ॥ २० ॥
षट्कर्मींच असावें नित्य रत ब्राह्मणें अघातरतें ।
क्षत्र स्वधर्मयुद्धानुष्ठानें सर्वथा अघा तरतें ॥ २१ ॥
ब्राह्मणधर्म अहिंसा, सत्योक्ति तसी क्षमा मनीं आण ।
क्षत्रियधर्म प्रकृतिप्रतिपालन, दंड, उग्रता जाण ॥ २२ ॥
या लोकीं परलोकीं आधार क्षत्रियांसि विप्र, भया ।
अभया द्याया प्रभु हे, सप्रभ कीं करिति निपट विप्रभ या ॥ २३ ॥

## ९ व्यवहारनीति.

भीष्म म्हणे, "कुलधर्मत्याग नव्हे उचित, मान्य मज आहे ।
सत्कुलजाचोंचि सदा स्वकुलाचाराकडेचि मन वाहे ॥ २४ ॥
संसार दों दिसांचा, यश जोडी जो कुलीन तोचि तरे ।
घ्यावें बरें म्हणोनि स्वपरमुखीं हें कुलीनतोचित रे ॥ २५ ॥
दुःख परासि न द्यावें, सत्य वदावे, क्षमा न सोडावी, ।
जोडावी कीर्ति, अशी कुलरीति बुधें कधीं न मोडावी ॥ २६ ॥
सुकृतातेंचि स्मरति न कुकृतातें, याचि साधुरीतीची ।
रुचि रसिका न सुधेची कीं केवळ अल्प माधुरी तीची ॥ २७ ॥
चुकल्या जनासि कोणी सांगुनि निजहितपथासि जो लावी ।
धनदेंहि उपकृतिसी त्याच्या निजसंपदा न तोलावी ॥ २८ ॥

---

1. हिरे.

जाळी ज्वलन न बोले, न वदोंचि जरि प्रकाश करि तरणी ।
न वदोनि कुलज पुरुष आले स्वयशःप्रकाश करित रणीं ॥ २९ ॥
संस्कारधर्मलोपें दुष्टजनसमागमें उडे शुद्धी ।
मग गुणवंताची ही सदधिक्षेपीं प्रवर्तते बुद्धी ॥ ३० ॥
मृत्यु हरितसे समयीं अमरासहि, कवण मृत्युला चुकवी ।
ऐसें जाणुनि तत्व व्यसनांत न मोह पावती सुकवी ? ॥ ३१ ॥
हृदयीं क्षमा असावी, सर्वत्र सदा असो नये पण ती ।
म्हणती क्षमितां दुर्बळ, न क्षमितां करिति दुर्जन प्रणती ॥ ३२ ॥
नीति अशी कीं अबळें प्रबळासि रणीं कधीं न हटकावें ।
दैवें विरोध पडतां बळहीनें त्यजुनि मान सटकावें ॥ ३३ ॥
रक्षावाचि, उपेक्षा व्यसनीं अरिचीहि न करिती संत ।
पाहों नयेचि आंगीं बळ असतां दीन जंतुचा अंत ॥ ३४ ॥
ज्या प्रेमें स्वापत्या त्या प्रेमें ब्राह्मणांसि पोसावें ।
कल्याणार्थ सुनेनें सासूचें जेंवि तेंवि सोसावें ॥ ३५ ॥
भूतीं दया असों द्या, व्हा इंद्रियषडरिनिग्रहीं धीट ।
सोडुनि अन्यपथ धरा निजधर्माचार, मार्ग हा नीट ॥ ३६ ॥
विसरिति अपकारातें उपकारातेंचि साधु आठविती ।
कीं सोशितां न सा विति, होय वपु न सोशितां न आठ विती ॥ ३७ ॥
बा सत्य धर्म जिकडे तिकडे श्रीकृष्णनाथ जाणावा ।
हा तेथें जय, रविसा प्रार्थुनि नलगे प्रकाश आणावा ॥ ३८ ॥
गति उत्तम होय असें वर्तावें, धर्मनीति रक्षावी ।
चित्तांत पूर्वजांची नित्य स्थिति रीति शांति लक्षावी" ॥ ३९ ॥

---

१. सज्जनांचा धिक्कार करण्याकडे.

# ( ४ ) वर्णनपर कविता.

ते प्रेमोद्गार मधुर, मधुरतर मुकुंदयशहि आधीं तें ।
गात्यांच्या श्रोत्यांच्या दूर करित तत्क्षणींच आधीतें ॥ ४ ॥

# ( १ ) अंबरीष राजा.

पूर्वीं भूपति अंबरीष रविच्या वंशीं महात्मा असे,
धर्में राज्य करी सदैव भगवद्भक्तांत भावें वसे, ।
भासे सिंहचि सगरांत गमती तच्छत्रु राजे ससे,
तो शांतांत, नितांतशांत, कमळाकांतींच चित्तें वसे ॥ १ ।
राजा साधुसमागमें समजला संसार निःसारसा,
सेवी श्रीपतिच्या पदा अलि जसा अत्यादरें सारसा, ।
नामाची धरि कास दास करुनी सद्भक्तिचा आसरा,
प्राशी निर्मळ विष्णुचेंचि यश जें हांसे सुधेच्या सरा ॥ २ ।
ज्यामध्यें बहुदक्षिणा सुविधिवत् विप्रादि संतर्पण
प्रेमें यज्ञ करूनि सर्व करि ते श्रीविष्णुला अर्पण ।
आंगें होउनि सत्तपोहुतवहीं तो सर्वदा सर्पण
स्वच्छत्वें नृप जाहला सुमणिचा जैसा नवा दर्पण ॥ ३ ॥
स्वाद्वन्नें परमादरें करुनियां विप्रोत्तमां तर्पुनीं,
त्यांतें कांचनदक्षिणा सुवसनें सद्भूषणें अर्पुनीं ।
आज्ञा घेउनियां व्रतोक्तनियमा रक्षावयाकारणें
तो राजेंद्र करी उपक्रम सुखें साधावया पारणें ॥ ४ ॥
तो भूतीं समदृष्टि, साधुभजनीं रावे, सदा सांवरी
आंगें दृग्विकळादिकांसि, भर हा टाकी न दासांवरी ।
सेवेवांचुनि आपुल्या न विषयीं याचें शरीर क्षण
श्रीशें जाणुनि हें सुदर्शन दिलें, त्याचें करी रक्षण ॥ ५ ॥

—भक्तभूषण.

# ( २ ) अर्जुनाचा पुत्रशोक.

अर्जुन संसप्तकाकडे युद्धास गुंतला असतां इकडे परम वीर्यशाली अभिमन्यूस कौरवांकडील महावीरांनीं चक्रव्यूहांत खेचून अधर्म युद्ध केलें. त्या एकांगवीरानें शौर्याची शर्थ करून सर्वांस चकित केलें. जयद्रथानें त्या **सोळा वर्षांच्या** बालयोद्ध्यास विरथ करून मारिलें.

संसप्तक वधुनि विजय सांजे शिबिरासि यावया परते ।
प्रभुसि म्हणे, 'कां कांपे मन ? कांपविलें जरि स्वयें पर ते ॥ १ ॥

---

१ शांतचित्त. २ परमशांत. ३ द्वादशीव्रताचे नियम. ४ आंधळे, बहिरे वगैरे पंगूंस ५ संध्याकाळीं.

कंठ गहिवरें भरला, शिरली हृदयांत केशवा! धडकी ।
येतें रडें वृथा कां? वा माजी प्रकृति काय गा रडकी? ॥ २ ॥
स्फुरणहि अनिष्ट, भिवविति उत्पातहि, सांग काय बापा! हे ।
कुशल असे कीं माझा[१] राजा ध्यानांत नीट वा। पाहे' ॥ ३ ॥
देव म्हणे, 'कुशल असे प्रभु ऐसें मन्मनास वाटतसे ।
कीं थोडे जन जगतीवरि धरिते नीतिधर्मवाद तसे ॥ ४ ॥
झालें असेल आणिक कांहीं, त्वद्विक्रिया[२] नव्हे वंध्या ।
'यद्वा तद्वास्तु' करी आधीं न गणूनि आधिला संध्या ॥ ५ ॥
संध्या करवुनि नेतां सेनेंत मनीं म्हणे 'परस्वामी ।
स्वधना न जपों कैसा? काय रथीं वाहतो परस्वा[३] मी?' ॥ ६ ॥
अर्जुन अस्वस्थहृदय जाय गतश्रीक शिबिर पाहून ।
प्रभुसि म्हणे 'महदप्रियसूचक बहु चिन्ह काय याहून? ॥ ७ ॥
मीं नायके सुवाद्यें, स्तुतिगीतरवासि तूंहि नायकसी ।
मज पाहुनि आप्त अधोमुख होती, गति असेल हाय कसी? ॥ ८ ॥
अतुल प्रताप लोकीं ज्या खलबलजलधिवाडवाभाचा[४] ।
तो कृष्णा आज तुझा मज आला कां न आडवा भाचा?' ॥ ९ ॥
शिबिरीं शिरोनि विजयें धर्मादिक देखिले अधोवदन ।
तें पुत्ररत्न एकचि न निरखिलें सद्गुणर्द्धिचें सदन ॥ १० ॥
मृदुलप्रकृति न साहे सुतशोका, जेविं न रविला पाला ।
शिबिरीं करी परोपरि नारायणमित्र नर विलापाला ॥ ११ ॥
'बोले कृष्णमुखीचा वेणु तसा परम लाडिका वाणी ।
जो स्पर्शें, शिशुहि न घे गुरुसंनिध, पर मला डिकावाणी ॥ १२ ॥
जो बहु परभृतनांसीं गोपींसीं बाळकृष्णसा रमला ।
दावा हो सत्वर तो स्वगुरुवचनगीतकृष्णसार मला ॥ १३ ॥
बालहि खड्गपरदशुचक्रगदाचापतोमरा वाहे ।
संकल्प दुर्जनांचे झाले कीं सफल तो मरावा हे! ॥ १४ ॥
ज्याचा शास्त्रीं शस्त्रीं व्यवहारीं वासुदेववत् समज ।
काय तुम्हीं केला हो? आणुनि तो भेटवाचि वत्स मज ॥ १५ ॥
बहुधा तुम्हीं धरुनि गुरुकृतचक्रव्यूहभेदकामातें ।
केलाचि पुढें, नाहीं तरि करितां स्पर्श खेद कां मातें? ॥ १६ ॥

---

१ युधिष्ठिर. २ तुला होणारे दुःशकुन वृथा नाहींत. ३ परधनास. ४ शत्रुसैन्यरूप समुद्राला वडवाग्निप्रमाणें ( जाळणारा. )

न तुम्हीं न कौरवहि, मीं तद्घातक कीं तया रिघायाचा ।
कथिला उपाय चपला आधीं म्यां न कथिला निघायाचा ॥ १७ ॥
तुमच्या भुजशस्त्रांतें धिक्! हा निःसार हो खटाटोप ।
शिर ज्या न रक्षवे तो कार्याचा काय ओखटा टोप! ॥ १८ ॥
हर हर! जाणों चुरिला तो बाळ करेणुंनीं चरणपातें ।
शिव! शिव! भरतिल कीं हो तो बाळक रेणुंनींच रणपातें ॥ १९ ॥
कुंतीस काय सांगूं? कृष्णेला दाखवूं कसें वदन? ।
दुष्कर मला सुभद्रासांत्वन, दुर्धर्ष उत्तरासदन ॥ २० ॥
जाऊं दिला मजविना परलोका काय एकला भाचा? ।
होता उपाय हातीं सुयशाच्या हाहि एक लाभाचा ॥ २१ ॥
खाताचि अद्वितीय सुदर्शन परबळ पळांत चाटून ।
परि बुडविल निज यश तें कर्म करिल कवि कशास दाटून? ॥ २२
याचें स्वरूप कळतें तरि पळ न विसंबितोचि बाला हो ।
'शिव! शिव!' म्हणेल मरणावधि वैधव्याधिमग्न बाला हो! ॥ २३
स्वार्थपर अकृप निस्त्रप आम्ही म्हणउनि मनांत विटशील ।
परि उत्तरा सती परगतिकामा तुज म्हणेल विट-शील ॥ २४ ॥
न म्हणे अमृतरस अधिक करि ज्याच्या बाप लालना कवि तो ।
काय पितृपरिष्वंगज जें सुख त्या वा पलाल नाकवितो ॥ २५ ॥
कां माझें उर न उले कवि पवि कीं म्हणति तोकशोकाला ।
लोकां लाजे मन कीं जेवि सुयश हारवूनि ओकाला ॥ २६ ॥
हा वत्सा! रक्ताक्षा! झाले त्वत्सुगुण आजि घातकसे ।
बा वाहिले परांचे तुजला मारावयासि हात कसे? ॥ २७ ॥
अभिमुख परप्रहारें पडला कीं धर्मराज! सांगावें ।
प्रभुजी न जें यशस्कर तें स्वगुरुसमक्ष तोक कां गावें'? ॥ २८ ॥
धर्ममुखें वृत्तांत स्वसुताचा ऐकतांचि तो कानें ॥
पडला मूर्छित अर्जुन 'हा वत्स!' असें म्हणोनि शोकानें ॥ २९ ॥
सर्वाप्तवीरमंडल झालें अत्यंत घाबरें हो! तें ।
धर्म म्हणे, 'दाखवितें न तपोवन या अघा, बरें होतें' ॥ ३० ॥
सावध होउनि अर्जुन सोडी बहु दीर्घ उष्ण निःश्वास ।
कोपें पेटे वाटे जाळील सधार्तराष्ट विश्वास ॥ ३१ ॥

—द्रोणपर्व अ. ७.

---

१. समोर-'त्यानें शत्रूला पाठ दाखविली नाहींना!' असा पार्थप्रश्न.

# ( ३ ) श्रीकृष्णाचा गुरुगृहवास.

श्रीकृष्ण व सुदामा ब्राह्मण हे दोघे सांदीपनी गुरुच्या गृहीं विद्याभासार्थ राहिलें होते. पुढें श्रीकृष्ण महाराजा झाल्यावर सुदामा दारिद्र्यानें गांजलेल्या स्वभार्येच्या आग्रहावरून त्याच्या भेटीस गेला. कृतकार्य होऊन परत आल्यावर सुदामदेवानें आपल्या भार्येस सर्व वृत्तांत सांगितला त्यापैकीं पुढें दिलेला भाग आहे.

विद्याभ्यासार्थ होतों निजगुरुसदनीं तेथवां एकदां जें
झालें वृत्त प्रिये! तें कथुनि यदुवरें मोहिलें चित्त माझें।
तें मीही तूज आतां जलरुहनयने! सांगतों ऐक जाये!
प्रेमानें वर्णितां हें घडि घडि हरिच्या नीर नेत्रांबुजा ये ॥ १ ॥
"बंधो! तें नित्य केव्हां तरि कुतुक तुझ्या आठवे कीं मनाला
आणाया इंधनाला स्वगुरुयुवतिनें धाडिलें जैं वनाला।
कालावांचूनि[1] आला जलधर, सुटला वात, अंधार जाला,
भ्याला आत्मा करालाहिकुटिलतरलां लास शब्दा विझाला ॥ २ ॥
भास्वान् मावळला, पयोद वळला, स्थूलांबुवाहोपल[2]–
व्रातांहीं बहु पीडलों, स्थिर वनीं दीलें न राहों पळ।
वर्षें कांकडलों, जळांत पडलों, झाला क्षणें दिग्भ्रम,
सारे व्याळ कराळ काळ शिरला चित्तीं महा संभ्रम ॥ ३ ॥
तो निम्नोन्नत[3]भूविभाग न कळे, सर्वत्र झालें वनें[4],
आम्हां काळमुखासमान गमलें सर्वांस ही तें वन,।
अंधारीं धरुनी परस्पर करीं स्वाध्वंभ्रमा[5] पावुनी
प्रत्यूषावधि[6] हिंडलों, मग परामर्शासि आला मुनी ॥ ४ ॥
झालों होतों श्रमानें विकळ सकळही काननीं दृष्टिवातें
आचार्यें धांवुनीया स्वहृदयिं धरिलें जेंवि आत्मोद्भवातें।
केलें आघ्राण माथां सकरुण गुरु तो वर्षला प्रेमतोया
मच्चित्ता आठवे श्रीगुरुचरणदयाप्राप्त सत्कार तो या ॥ ५ ॥
'केले हे क्लेशपात्र प्रियतम हि तुम्हीं अस्मदर्थ स्वकाय
या कर्माहूनि लोकीं गुरुसि समुचिता दक्षिणा येथ काय?।
पावा माझ्या प्रसादें सकळ हि सकळा शुद्ध संपूर्ण विद्या
शिष्याच्या हृत्तमाचा प्रशमकर करी ज्ञाननामा रवि द्या' ॥ ६ ॥

---

१ अकालीं पाउस आला २ पाण्यांनीं भरलेल्या मोठाल्या गारांच्या समूहांनीं ३ उंच सखल भाग ४ उदक ५ आपला मार्ग चुकणें ६ प्रभातकालापर्यंत.

एवं श्रीगुरुनें प्रसाद सदयें केला मला तो स्मरे
बंधो ! देशिकपादपद्मभजनें संसार हा ओसरे ।
झालीं यापरि जीं अनेक कुतुकें तीं या मनीं जागती "
भार्ये ! देव असा उदंड वदला लोकेश माजा गती ॥ ७ ॥
भार्ये ! ही कथिली कथा निजमुखें जेव्हां जगन्नायकें
तेव्हां उत्तर मीं दिलें हरिस जें तें तूं बरें आयकें ।
'लोकेशा ! जनसंग्रहार्थ गुरुच्या गेहीं तुझें राहणें
अस्मद्भाग्यहि थोर कीं अतिनुता लीला तुज्या पाहणें ॥ ८ ॥
ज्याचा वेदमय स्वदेह कुशलाधार त्रिलोकी वितों
जो वर्णाश्रमधर्मकल्पक कवी अत्यध्वसंस्थापिता ।
विश्वाचा गुरु तो स्वयें गुरुकुळीं विद्यार्थिभावें वसे
हें तों लोकविडंबन प्रभुवरा ! अन्यार्थ येथें नसे " ॥ ९ ॥

—पृथुकोपाख्यान.

# ( ४ ) सावित्रीची दिनचर्या.

अभंग.

हर्षेली पावोनी जसी सती भर्गा । वनाहुनी स्वर्गा तुच्छ मानी ॥ १ ॥
तसीच सावित्री आनंदली मनीं । क्रीडे तपोवनीं पतिसंगें ॥ २ ॥
श्वशुराची आज्ञा जसीच वेदाची । तिळही भेदाची बुद्धि नाहीं ॥ ३ ॥
कुळदेवताच ती श्वश्रू मानिली । पूजिली वानिली सावित्रीनें ॥ ४ ॥
केवळ अतिथीअभ्यागत बाळ । करि प्रतिपाळ माता सती ॥ ५ ॥
मानीयेला शाकफळमूळकंद- । रसाहुनि मंद सुधारस ॥ ६ ॥
बोलावें सस्मित मृदु परिमीत । सत्य प्रिय हित बोलवील्या ॥ ७ ॥
सर्वांच्या मागुती तृणशय्येवरी । सुखें निद्रा करी उठे आधीं ॥ ८ ॥
एकांतीं पतीचें हृदय रमवी । संताप शमवी सेवाधर्में ॥ ९ ॥

—सावित्रीगीत.

# ( ५ ) कुंभकर्णी झोप.

मग सत्वर रात्रिंचर गेले तों कुंभकर्ण उठवाया ।
पाठविले दशवदनें, जे तन्निद्राघनासि लुटवाया ॥ १ ॥

---

१ गुरु. २ त्रैलोक्य निर्माण करणारा.

त्याच्या निकट मधुरुधिरघट शतसंख्याक ठेविती पूर्ण ।
मत्स्यवराहमहिषमृगमांसांचें राशि निर्मिती तूर्ण ॥ २ ॥
विंध्य तसा, निजला तो ; वदनदरीमाजि निबिड आंधार ।
फार भयंकर भासे, पातालाचेंचि काय तें दार ! ॥ ३ ॥
श्वासानिलरयपतितक्षणदाचर तूलतुल्य ते भ्रमती ; ।
नासाप्रवेशनिर्गमगतागतें मशकसे किती श्रमती ॥ ४ ॥
'हे कुंभकर्ण ! राजा बलावितो' मारिती अशा हाका ; ।
हा कांहींच वदेना, निद्राप्रिय इंद्रशत्रुचा काका ॥ ५ ॥
एकसहस्र महारवदुंदुभिसहि ताडिले कितेकांहीं ; ।
मुद्गरमुसलें करिती ताडन, परि लागती न ते कांहीं ! ॥ ६ ॥
शतसंख्याकजलाचे कुंभहि आणूनि रिचविले कानीं ; ।
केशोन्मूलन केलें, झाले निजकंठ शुष्क हाकानीं ! ॥ ७ ॥
चाउनियां काय बलें धांवति अंगावरूनियां हसती ; ।
मृतवन्यगजास जसे वायसगण वेष्टिती तसे दिसती ॥ ८ ॥
दशशतगज देहावर चालविले, ताडिलीं शिलाशिखरें ; ।
निद्रापराजयास्तव केलें त्यांहीं प्रसिद्ध युद्ध खरें ! ॥ ९ ॥
ऐसा बहुतां यत्नें जागा केला, जसा महाकाल ।
मधुलोहित घट घट घट सेवी मांसासमेत तत्काल ॥ १० ॥
क्षुत्तृट्परिहारातें, करूनि निद्रालसस्वभावानें; ।
क्रव्यादासि म्हणे, 'मज ऊठविलें किंनिमित्त भावानें ?' ॥ ११ ॥

—मंत्र रामायण–युद्धकांड.

## ( ६ ) काळ.

तो काळ लोक ज्याला वश जैसे घन समस्त वाताला ॥
देतां योगवियोग श्रमलव ज्याच्या नसेचि हाताला ॥ १ ॥
लीलेनेंचि सुदुर्घट घडवी, तो प्रभु न होय काळ कसा ? ॥
विघडी घडींत घडिलें अवघडही निरभिमान बाळकसा ॥ २ ॥
जेथें नृप धर्म, गदाधर भीम, महास्त्रशस्त्रपटु, जिष्णु ॥
गांडीवचाप अद्भुतशक्ति, सखा कृष्ण हा स्वयें विष्णु ॥ ३ ॥

---

१ श्वासाच्या वायु वेगानें पडलेले. २ रात्रिंचर, राक्षस. ३ नाकांत येण्याजाण्याच्या श्रमानें. ४ क्षुधा व तृषा यांचें शमन. ५ राक्षसांस. ६ हें प्रकरण मूळाप्रमाणें छापलें आहे.

ऐसें अत्यंताद्भुत पुण्यशरीरास्त्रशस्त्रदैवबळ ॥
तेथेंहि विपत्ति असी दावी, हा काळ सर्वथा प्रबळ ! ॥ ३ ॥
—भीष्मभक्तिभाग्य.

## ( ७ ) द्रौपदी.

धर्म म्हणे, "शकुने ! जी रूपें श्रीला, क्षमागुणें महिला ॥
साजे सखी अखिन्ना कृत्यभरें सुमति आमुची महिला ॥ १ ॥
शरदुत्पलपत्राक्षी शरदुत्पलपुण्यगंधसमगंधा ॥
अस्खलित चालवी गृहधर्मीं मज यष्टि जसि पथीं अंधा ॥ २ ॥
आधीं जिनें उठावें, पाहुनि निजलों असें मग निजावें ॥
रागेजणें सुदुर्मिळ, तेंहि जिचें ज्वालसें गगनि जावें ॥ ३ ॥
धौम्यापासुनि गोपांपर्यंत जिनें स्वयें समाचार ॥
घ्यावा, श्रिततापहर श्रीगंगेचा जिचा समाचार" ॥ ४ ॥
—सभापर्व अध्याय ४.

## ( ८ ) "रामास वनांत धाडल्यामुळें भरत आईवर रागावतो."

हें जननीचें चरित श्रवण करुनियां, सखेद, फार रडे ; ।
दंडाहत[२] भुजग तसा कोपें मातेकडे तदा मुरडे ॥ १ ॥
"प्रिय वधिला, पापिष्टे[३]! धाडुनि विपिनासि सद्गुणकरंडा ; ।
केली अकीर्ति, आपण झालिस, पापाशये, स्वयें रंडा ॥ २ ॥
मारावें तुज पापे ! परि म्हणतो रामराय माय तुला ; ।
यास्तव उपाय नाहीं ; गरळाची तुजचि योग्य काय तुला[४]? ॥ ३ ॥
यमकार्यकारिणी तूं कृत्या, मोहूनि यास विश्वास ।
पत्नी होउनि गिळिला राजा, माझा पिता, सविश्वास ॥ ४ ॥

---

१ या चार आर्यांत कवीनें धर्माकडून आर्यस्त्रीचीं कर्तव्यें फार मार्मिकपणानें वदविलीं आहेत. गृहकृत्यभरानें न दगदगलेली, पतीला गृहस्थधर्माचारांत अंधयष्टीप्रमाणें पूर्ण साह्य करणारी, न रागावणारी व पुरोहितापासून तों गवळ्यापर्यंत सर्व आश्रितांचा त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें स्वतः समाचार घेऊन मातेप्रमाणें लालन करणारी, लक्ष्मीसारखी सुंदर व पृथ्वीसारखी क्षमाशील, पतीच्या नंतर निजून आधी उठणारी कुलीन, विनयशील गृहिणी पतीकडूनही कसा आदर मिळविते हें ह्या सुंदर उताऱ्यावरून स्पष्ट होत आहे. हें प्रकरण मूळाप्रमाणें छापलें आहे.
२ काठीनें मारलेला. ३ पापिष्ठे. ४ तुलना, उपमा.

ह्री श्री दया जयाच्या ठायीं जो स्तुत्य या जनामाजी ; ।
त्याला वनासि धाडुनि केली तूं काय कामना माजी ? ॥ ५ ॥
तूं राक्षसीपरीसहि अधमा, जे निजकुटुंब खातीस ; ।
मीही पाप तुझा सुत; " हें बोले होय पाठमों तीस ॥ ६ ॥

—मंत्ररामायण अयोध्याकांड.

# ( ९ ) रामराज्यं.

राज्यातें अजे तो करीत असतां जाले दरिद्री धनी ; ।
रोगी रोगविहीन ; बालिश रत ज्ञानाचिया साधनीं ; ।
गाई त्या घटदोहनी ; बहुरसा सस्यावृता मेदिनी ; ।
यूपस्तंभसमन्विता हि सरयू लोकत्रयाल्हादिनी ॥ १ ॥
दिव्यस्वादुफळाढ्य भूरुहलता संशोभती पुष्पिता ; ।
आत्मापत्यमृतिप्रति क्षितितळीं पाहे न मातापिता ; ।
वंध्या लब्धबहुप्रजा सकल ही वर्ण स्वधर्मी रत; ।
श्रीरामाख्य सुधेसि कर्णचषकें पीती सुखें संतत. ॥ २ ॥
पापातें न वसावया स्थळ दिसे ; कोण श्रमाला पुसे ? ।
नाहीं आश्रय यास्तव क्षितितळीं चिंता सचिंता वसे ; ।
विघ्नातें बहु विघ्न होति ; रुसली भीति त्रिलोकीं वरी ; ।
साकेतीं रघुनाथ सानुजसुहृद् राज्यासि जेव्हां करी ॥ ३ ॥

जे दुर्लभ त्रिभुवनींहि, तसे विरत्यांचे
न प्रेक्षिले कविजनें हितसेवित्यांचे ।
ते सद्गुण प्रकटुनी, निववि प्रजांतें ; ।
गाती सदा, वरुनिया, शिव विप्र ज्यातें. ॥ ४ ॥

---

१ तीस पाठमों होय म्हणजे तिजकडे पाठ फिरविता झाला. २ यांत पहिले तीन श्लोक शार्दूलविक्रीडितवृत्तांत आहेत ; चवथा वसंततिलकावृत्तांतला व शेवटचे दोन विबुधप्रियावृत्तांतले आहेत. पहिले तीन श्लोक कुशलवचरितांतून, चवथा सद्भक्तसर्वस्व रामायणांतून, व अखेरचे दोन विबुधप्रिय रामायणांतून घेतले आहेत. आपल्याकडेस ज्या राज्यांत परमावधीचें सौख्य मिळतें त्या राज्यास 'रामराज्याची' उपमा देतात. हें पंतांनीं केलेलें वर्णन फारच सरस उतरलें आहे. ३ जन्ममृत्युरहित असा परमात्मा रामचंद्र. ४ घागरभर दूध देणाऱ्या ५ धान्यानें व्याप्त. ६ यज्ञस्तंभांनीं युक्त अशी. ७ आपल्या मुलांच्या मृत्यूला. ८ आपले कनिष्ठबंधु व इष्टमित्र यांसहवर्तमान.

काम क्रोधहि सा असे परमोग्र जे सहजारि ते
सर्वही पडलेच सोडुनि दुर्गुणा सहजा रिते ; ।
आळ घेउनिया कधींहि न बाळही कळहा निघे ;
रामराज्यपदांत केवळ वासनाबळ हानि घे. ॥ ५ ॥
होय विप्रशिशु व्यसु प्रभु त्यासि सत्वर वांचवी ;
सांचवी यश गोड ते कविमानसें बहु लांचवी ; ।
रामराज्य तसें जगांत न भूतपूर्व, न भावि कीं
नित्य तेंचि अभाविकीं कविगीत, जें सुखभाविकीं ॥ ६ ॥
आधिव्याधि जरा दारिद्र्य व्यसन पंचताक्लेश ।
लेश प्रभुच्या राज्यांत नसे, संपन्न सुखी देश ॥ ७ ॥
व्याळ व्याघ्र चोर दुर्भिक्ष प्रभुच्या राज्यांत नसे ।
जन सेविति शिशुसेचि प्रेमें प्रभुचे सुगुणस्तनसे ॥ ८ ॥

## ( १० ) कुशलवांचें लक्ष्मणासीं युद्ध.

जैसे वायुविभावसू[२] कुशलव क्रोधें तसे धांवले
विस्फारूनि धनुर्लतांसि सहसा सैन्यांतरीं पावले ।
केलें मर्दन मांसकर्दमपटें रक्तस्रवंती किती
तेथें वाहति पाहती भट मनीं कल्पांतसें तर्किती ॥ १ ॥
कितेक रथ मोडिले ध्वज कितेकही तोडिले
कितेक शर सोडिले गज कितेकही झोडिले ।
असंख्य भट ताडिले यमपुराकडे धाडिले
शिरःप्रकर पाडिले बहुल यापरी नाडिले ॥ २ ॥
तेव्हा शूलगदापरश्वसिलताशक्त्यृष्टिचक्रायुधें
कुंतप्रासभुशुंडिमुद्गरमहापाशादिनानाविधें ।
सर्वांहीं त्यजिलीं लवावर तदा तो त्यांस खंडी शरें
मूर्खांच्या वचनासि पंडित जसा निःशंक युक्त्युत्तरें ॥ ३ ।
तेव्हां तो रुधिराक्ष राक्षस गदा हाणी लवाच्या शिरीं
मूर्च्छा पावुनियां उठे पुनरपि क्रोधें मुहूर्तांतरीं ।
केशीं त्यासि धरूनि मस्तक तदा कुंतायुधानें हरी
भास्वद्दत्तधनुः करीं करुनियां गर्जे हरीच्या परी ॥ ४ ॥

---

[१] या दोन साक्या पंचशती रामायणांतल्या आहेत. [२] वायु व अग्नि.

सौमित्री वारुणास्त्रें शमवित दुसऱ्या मारुतास्त्रासि सोडी
तेव्हां वायु प्रचंडध्वजरथगज जे त्यांसि अत्यंत झोडी
आकाशीं शुष्कपर्णापरि किति फिरती भ्रांत सारे पदाती
स्वर्गातें वृक्ष जाती द्विजसम उडती शैलही भीति देती ॥ ५ ॥
ज्यांपासूनि नभोंतरीं शिखिशिखा[1] विद्युत्समा फांकती
ऐसे बाण लवाग्रजें कवळितां लोकेश ही धाकती
त्यांहीं लक्ष्मण हृत्कपाटकवच छेदूनियां भेदिलें
त्यातें भूवरि पाडिलें मग कुशें मूर्च्छास्वहस्तीं दिलें ॥ ६ ॥
जेव्हां दुरूनि बंधुसिंहनिनद श्रोत्रीं तयाच्या घुसे
पाहे तों बळराजिवेष्टित लव क्ष्माजासुताला दिसे
हातीं घेउनि खड्ग चर्म परम क्रोधें तदा धांवला
अग्नीलागिं सहाय मारुत जसा जाऊनियां पावला ॥ ७ ॥
द्विधा गज विदारिले रथहि धूळिला अर्पिले
पदातिहय चूर्णिले पिशितभुक्[2] क्षणें तर्पिले
कितेक पललक्ष्माधर[3] विनिर्मिले क्ष्मातळीं
कितेक रुधिरें नदी कितिक कूप वापी तळीं ॥ ८ ॥

—कुशलवचरित.

## ( ११ ) रामेश्वरचा सेतु[4].

शत योजन आयत, दशयोजन विस्तीर्ण सेतु, शंकेतें ।
दे, गेला बुडवाया कोपाकुल भूमिबाहु लंकेतें ॥ १ ॥
किंवा तो कपिकटकोत्तरसिंधूद्गत[6] बुभुक्षु कालाही ।
दूर पसरला खाया रात्रिचरा क्षुद्र बेडकाला ही ॥ २ ॥
सेतु न तो यत्पतिनें स्वसुता नेली वृकें जशी एणी[7] ।
त्या लंकेची श्रीभूदेवीनें ओढिली असे वेणी ॥ ३ ॥
रामजयश्रीलग्नीं लंका घाली सुनील पाटावें ।
सेनावऱ्हाडणीला पायघडी कां असें न वाटावें ? ॥ ४ ॥
बहुधा तुच्छ जलधितृण चाटायाचा भरूनिया वीट ।
गेला प्रभुप्रतापासितपथ[9] रक्षोटवीकडे नीट ॥ ५ ॥

---

१ अग्निज्वाला. २ मांस खाणारे. ३ मांसाचे पर्वत. ४ रामवानरांनीं रचलेल्या विख्यात सेतुवर कवीनें या उत्प्रेक्षा केल्या आहेत. ५ लांब. ६ वानरसेनारूप उत्तरसागरांतून निघालेला ( कालसर्प. ) ७ हरिणी. ८ राम व जयश्री यांच्या लग्नांत लंकेनें नीलवर्णाच्या पाटाव्याची पायघडीच घातली आहे असें सेनावऱ्हाडणीला कां वाटूं नये? ९ रामप्रतापाग्नि.

कीं पतित पति त्यागुनि विश्वशरण्याकडे[1] रडत वाटे ।
आली जी लंकाश्री तीचा तो सांजनाश्रुपथ वाटे ॥ ६ ॥
कीं रचिलें स्वापयशें शोकानलदग्ध सागरोरेंचि[2] तें ।
सूचविले तर्क असे त्या सेतुवरें महासुधीरचितें ॥ ७ ॥

—वनपर्व अ० १२.

## ( १२ ) भीम आणि दुःशासन.

तेव्हां कर्णामागें दुर्योधन भीम अर्जुना मागें ।
संरक्षणासि होते ते अन्योन्यासि देखती रागें ॥ १ ॥
धांवति अन्योन्यावरि ते दोघे आठवूनि अपकार ।
जाणों ते मदमत्त क्रोधोद्धत दंपतीच अ-पैकार[3] ॥ २ ॥
जें वैरशल्य दुःसह हृदयांत करावया तदुद्धरण ।
अत्यद्भुतबळ अरि ते करिते झाले हैंठें[4] विरुद्धपण ॥ ३ ॥
दुःशासनशर मर्मीं लागे नागेशसा असुख रचिता ।
मूर्छित करि भीमातें इतरांचे तो पळांत असु खरचिता[5] ॥ ४ ॥
सावध होउनि भीम क्षिप्र महाशक्ति शत्रुवरि सोडी ।
तीसहि तो दुःशासन दशबाणांहीं पराक्रमें तोडी ॥ ५ ॥
तेव्हां गदाप्रहारें भीम ललाटीं स्वशत्रुला ताडी ॥
क्षितिवरि हैरि[6] वज्राहतगिरिशिखर जसें तसें तया पाडी ॥ ६ ॥
पत्नीचा केशग्रह-समय स्मरला, निजप्रतिज्ञा ते ।
आठवि, म्हणे ' म्हणोत न मिथ्यावादी मजप्रति ज्ञाते ' ॥ ७ ॥
गरुड जसा गगनांतुनि वेगें उतरोनि पन्नगा झडपी ।
तैसा भीम बळानें दुःशासनकंठ अंघ्रिनें दडपी ॥ ८ ॥
भीम विदारी खड्गें सहज परम कठिन शत्रुचें उर तें ।
वाटे पविपातींही त्या साध्वीला न गांजितां उरतें ॥ ९ ॥
अशनिहत शिलातल जल रक्त जसें खड्गभग्न तें उरवी ।
तृषित घटोत्कचतात प्राशी शोणित नलेशही उरवी ॥ १० ॥
मग कंठनाल चरचर तो सत्य करावया बिरुद कांपी ।
देउनि मिटक्या मटमट घटघट त्या स्वाहितासृगुदका[7] पी ॥ ११ ॥

---

१ राम. २ सागराचें हृदय. ३ पकाररहित दंपती म्ह. दंती, हत्ती. ४ हट्टानें. ५ प्राण घेतां. ६ इंद्र. ७ आपल्या शत्रुचें रक्त.

जे जे लोकीं असती रसें ती त्यांची न माधुरी थोडी ।
परि अरिच्या रक्तरसीं मज बहु त्याहूनि लागली गोडी ॥ १२ ॥
ऐसें वदोनि ओष्ठप्रांत जिभेनें पुनः पुन्हां चाटी ।
अवलंबी अत्युग्रा भीम अतृप्त द्विपारिची धाटी ॥ १३ ॥
रिपु शूर दूर तेथुनि तें दारुण कर्म पाहतां पळती ।
किति पडती किति दडती कितिएकांची धृतायुधें गळतीं ॥ १४ ॥
जाणों त्या अत्युग्रा मूर्त श्रीनारसिंहमंत्रास ।
पाहोनि पावले ते रिपुभटभूपाळभूत संत्रास ॥ १५ ॥
म्हणति मनुष्य नव्हे हा राक्षस कीं काळ हा खवळला हो ! ।
कीं आम्हुची कराया मूर्त प्रळयाग्नि राख वळला हो ॥ १६ ॥
भीम पुन्हां दुःशासनरक्तें अंजलि भरोनियां डोले ।
मिटक्या देउनि पाहुनि कर्णसुयोधनमुखाकडे बोले ॥ १७ ॥
"पीतों हें रक्त तुझें हांसत होतासि मज जसा भणगा ।
दुःशासना ! तसा तूं पुनरपि गौगौंः स्व आननें म्हण गा ॥ १८ ॥
आम्हांसि म्हणत होते जे गौगौंः क्षुद्रबुद्धि नाचोनी ।
म्हणतों त्यातें आम्हीं स्वभुजबळें संकटांत वांचोनी ॥ १९ ॥
मज काळकूटदूषित भोजन दिधलें प्रमाणकोटींत ।
मर्मीं सर्प डसविले काळाच्या घातलेंचि ओटींत ॥ २० ॥
आधीं निमग्न केलें ऐसें अतिदुस्तर प्रमोहांत ।
बांधोनि बुडविलें मग मज सरितेच्या गभीरडोहांत ॥ २१ ॥
जतुगृहदाह, द्यूतीं श्रीस्त्रीवस्त्रापहार; वनवसती, ।
दुःखें विराटभवनीं जीं बहु कोणीं हि भोगिलीं नसती ॥ २२ ॥
काय करूं काळानें अभय दिलें घेतलासि तूं पदरीं ।
दुःशासना ! कुळक्षयमूळा ! तुज रक्षिता दुजा न दरीं" ॥ २३ ॥
ऐसें बोलत हांसत शत्रुरुधिरदिग्धपाणिमुख विकट ।
प्रकट महाभैरवसा नाचत गेला जयाच्युता निकट ॥ २४ ॥

कर्णपर्व अ. ४५.

---

१ दही, दुध, मद, मद्य, घृत, गंगाजल, मातृदुग्ध वगैरे. २ लाक्षागृहाचें दहन. ३ शत्रूच्या रक्तानें भरले आहेत हात व तोंड ज्याचे. ४ अर्जुन व कृष्ण.

## ( १३ ) गायींची वत्सलता.

### आर्यागीति.

तेव्हां धेनू चरती गोवर्धनपर्वतावरी संचरती ।
तेथुनि दृष्टिस त्यांच्या वत्स दिसति सुकृत बहु अदृष्टि सत्यांच्या ॥ १ ॥
चार्‍यू विसरति घांसा चाविलियांही गळां न उतरति घांसा ।
हंबरती दयमाना पाहति वत्सांसि ऊचलुनि वर माना ॥ २ ॥
एकिकडे एकि कडे लंघिति धांवति करूनि भय एकिकडे ।
पाहुनि आटोपा[१]या गोप न जाले समर्थ आटोपा या ॥ ३ ॥
वत्सांचा मनिं ओढा न दिसे दृष्टीस दगड तरु वनिं ओढा ।
गोवर्धनगिरिमधुनी जाती सुखसिंधुलागिं त्या प्रेमधुनी[२] ॥ ४ ॥
आल्या कळपापाशीं क्षय ज्याच्या पदरजें सकळ पापांसी ।
बहु वत्सांवर माया करिति त्या दुग्धसिंधुच्या वरमाया[३] ॥ ५ ॥
हंबरती प्रेमानें चाटिति वत्सांसि पाजिती बहुमानें ।
वत्सवती परि माया बहु त्या प्रेमा जगीं नसे उपमा यां[४] ॥ ६ ॥

—बृहद्दशम, अ. १३.

## ( १४ ) श्रीकृष्ण, गोपी आणि मुरली.

भक्तप्रिय परमेश्वर वाजवि बहु मधुर, चित्तहर पावा; ।
कीं गोपींचा, सेवुनि नादामृत, सर्वताप हरपावा. ॥ १ ॥
वाहों आल्या तनु, मन, निजचरणीं हें कळूनि, आगमनीं ।
त्यासीं विनोद करि बहुनिष्ठुरसा जेंवि सानुराग मनीं. ॥ २ ॥
यतिपति, आत्मरत, प्रभु, साक्षी म्हणऊनि त्यास त्या कळल्या; ।
कीं सौंदर्यमदें या निश्चयमूढा व्रजस्त्रिया मळल्या[५]. ॥ ३ ॥

---

१ वेगास, आवेशास. २ प्रेमाच्या नद्या. ३ विहिणी. ४ मंत्र भागवताच्या दशम स्कंधांत गायींच्या वात्सल्याविषयीं कवीनें पुन्हां असेंच सरस वर्णन केलें आहे; त्यांतील तीन आर्या:—

गवळी चारित होते गोधन गोवर्धनाद्रिवरि दूर ।
तेथुनि वत्स पहातां गायींला नावरे कृपापूर ॥ १ ॥
वर्षानदी तशा त्या अद्रिवरुनि धांवल्या, न आवरती ।
आल्याचि; नव्या वत्सांपरिस बहु प्रीति त्या जुन्यांवरती ॥ २ ॥
ते गोप क्रोधानें आले जों त्यांसि न्यावया मागें ।
गायींहूनि द्रवले बाळ पहातांचि सोडिले रागें ॥ ३ ॥

५ सौंदर्याचा अल्पगर्व गोपींस वाटतांच श्रीकृष्णानें त्यांचा त्याग केला अशा करितां कीं अहंकार हा ईश्वरप्राप्तीच्या आड येणारा महाशत्रू आहे हें त्यांस नीट कळावें.

मोकलिल्या तत्काळ, प्रभु झाला गुप्त, दुर्गुणें विटला; ।
स्त्रीजन विरहीं टाकी, जैसा अग्नींत दिव्य पट किटला. ॥ ४ ॥
यमुनापुलिनीं गेल्या, विफळाशा जाहल्या, वनीं भ्रमल्या, ।
भ्रमल्या भगवद्विरहीं, शेवटिं त्या सर्व दीनशा गमल्या. ॥ ५ ॥
नक्षत्रें इंदुविणें, स्त्रीरत्नें प्रभुविणें तशीं गमलीं, ।
स्वसुखनिधान करींचें जातां त्यांचीं मनें बहु भ्रमलीं ॥ ६ ॥
मोहळ कृष्ण सुरसमय, गोपी सरघाचि, त्यासि त्या चुकल्या ।
काय क्लेश वदावा? सुकल्या शोकें, स्वजीवना मुकल्या ॥ ७ ॥
भक्तीनें आळवितां, गातां गुण चिंतुनी मनीं मूर्ती, ।
प्रकटे गोपींत प्रभु, होतां तद्बुद्धि निर्मळा पूर्ती. ॥ ८ ॥
गलदंजनाश्रुमलिनें वदनें त्यांचीं पुशी स्वपाणीनें; ।
सांत्वन करी प्रियांचें परमेश्वर अमृतमधुरवाणीनें ॥ ९ ॥
वर्णिति हरिमुर्तीला तदधर चुंबी तियाहि मुरलीला; ।
ज्याच्या, गाती गगनीं सस्त्रीक महेशमुख्य सुर, लीला ॥ १० ॥
ते प्रेमोद्गार मधुर, मधुरतर मुकुंदयशहि आधीं तें ।
गात्यांच्या, श्रोत्यांच्या, दूर करित तत्क्षणींच आधींतें ॥ ११ ॥
वाहों नये जलानीं, डोलावें फण करूनि उरगानीं ।
अश्रूनीं देवींचें नित्य भिजावें सवस्त्र उर गानीं ॥ १२ ॥
सुर अनिमेष, तसे खग, मृगहि; वसति अहि मयूरही जवळ ।
प्रभुवेणुरवश्रवणीं गायी, वत्सहि, न भक्षिती कवळ! ॥ १३ ॥
देवातें वेणूतें; विरहीं वर्णूनि गोपिका निवती ।
त्यांहीं केली प्रभुची कीर्ति स्वप्रेमशिशुगळां जिवती? ॥ १४ ॥
सुज्ञशिरोमणि उद्धव, बहु त्यांचें प्रेम भाग्य वाखाणी; ।
त्यांसि म्हणे 'बाई हो! अमृताची प्रेमभाव ही खाणी ॥ १५ ॥
देहीं गेहीं झालें चित्त उदासीन, कृष्णगुण गातां; ।
झालां कृतार्थ जन्मुनि उरलें कर्तव्य काय हो! आतां?' ॥ १६ ॥
मोठा शुद्धोदं असो, घनाविना चातकीस तो मरुची; ।
तैसें सगुणावांचुनि निर्गुण गोपींस लेश दे न रुची ॥ १७ ॥
भर बहु सगुणचरित्रीं गोपींचा, नित्य तेंचि आठविती ।
पढवुनि भक्ति बहु दिवस ठेवुनि, मग उद्धवासि पाठविती ॥ १८ ॥

—मंत्रभागवतस्कंध १०.

---

१ त्याग केला, टाकल्या. २ स्वच्छ जलसंचय.

# ( १५ ) ‘ रामाच्या बाललीला.’

धरूनिया रूपचतुष्टया प्रती । लीलामनुष्याकृति तो रमापती ॥
भूभारनाशार्थ करूनिया पण । जाला जगत्पाळक बाळ आपण ॥ १ ॥
पीतां स्तनातें क्षणमात्र राहणें । महादरें मातृमुखासि पाहणें ॥
वक्त्रांत तें दुग्ध तसेंचि वाहणें । तेणेंचि फूत्कार करूनि नाहणें ॥ २ ॥
मुखांतुनी दुग्ध गळे सुनिर्मळ । उरावरी ये अति शुभ्र वोघळ ॥
मंदाकिनीचा गगनीं प्रवाह तो । चंद्रप्रभापांडुर काय वाहतो ॥ ३ ॥
पीयूषगर्वापहमाधुरीधरा । त्रैलोक्यतापांतकरा सुखाकरा ॥
निजाननें श्रीश रमामनोरमा । चुंबी पदा दीनजनावनक्षमा ॥ ४ ॥
रमाधराचा रस सेविला असे । पद्मालया आपण भामिषें वसे ॥
म्हणोनिया रम्यतरा महासुखा । पाहोनी चुंबी नखदर्पणीं मुखा ॥ ५ ॥
बैसोनि हर्षे जननीचियाकडे । विलोकुनी तन्मुखनीरजाकडे ॥
स्मितामृतापूरित बोल बोबडे । बोले तदा ब्रह्मसुख स्वयें दडे ॥ ६ ॥
रमाकुचाग्रीं पद जे विराजती । करांसि ज्या कल्पतरुहि लाजती ॥
सदा तिहीं जेथ यथेष्ट रांगणें । केले जनीं दुष्कर पुण्य आंगणें ॥ ७ ॥
अत्यंत शुद्ध स्फटिकालयांतरीं । क्रीडा करी राम जधीं परोपरी ॥
नानासुतप्राप्तिसुखासि मावली । विलोकुनी तत्प्रतिबिंब पावली ॥ ८ ॥
स्वनंदनातें प्रतिबिंबमंडलीं । धौतामलस्फाटिक मंदिरस्थलीं ॥
माता न जाणे बहु शोधितां भ्रमें । परंतु पावे सुख ती अशा भ्रमें ॥ ९ ॥
धात्रीं जईं रामकरांबुजाप्रती । धरूनिया चालविती स्खलद्गती ॥
चुंबी धरा ती प्रभुपादनीरजें । अलभ्य ज्यांची दिविषज्जनीं रजें ॥ १० ॥
पित्यापुढें रत्नविराजि कंकणें । करें नमस्कार करूनि ठाकणें ॥
धात्र्युक्त सारें निजवृत्त सांगणें । अशा गुणें तो करि नाक ठेंगणें ॥ ११ ॥

---

१ श्रीविष्णूनेंच रामलक्ष्मणभरतशत्रुघ्न हीं चार मनुष्यरूपें धारण केलीं. २ ओघळ. ३ चांदण्याप्रमाणें शुभ्र ( गंगेचा प्रवाह ). ४ हीं सारीं ‘पदा’चीं विशेषणें आहेत; अमृताचा गर्व हरण करण्याइतकें माधुर्य ज्यांत आहे, त्रैलोक्य ताप हरण करणारें! लक्ष्मीला आनंद देणारें, दीनरक्षणसमर्थ असें आपलें पद राम चुंबी. ५ स्फटिकगृहांत रामक्रीडा करीत असतां त्याचीं अनेक प्रतिबिंबें पडलीं तीं पाहून कौसल्येला आपणास अनेक पुत्ररत्नें आहेत असें वाटून परमानंद झाला! ६ अनेक प्रतिबिंबें पाहून यांत खरा राम कोणता हें तिला कळेना यामुळें ती आनंददायी अशा भ्रमांत पडली! ७ देवांनाही ज्यांची रजें दुर्मिळ तीं पदें पृथ्वी चुंबी.

आधी जयानें उपदेशिला विधी । नाना श्रुतींचा बहु खोल जो निधी ॥
अशा निपीताब्धिसुतावरें मुखें । नृपाल तांबूलनिषेवणें सुखें ॥ १२ ॥
भूपापरी सर्वेहि तो सभाजन । याचें करी नित्यसुखें सभाजन ॥
विलोकितां मर्त्यकृतावतारक । न लोचनीं हालति पक्ष्मतारक ॥ १३ ॥
आला चतुर्वर्ग नृपालयीं स्वयें । चतुःकुमारात्ममिषेंचि निश्चयें ॥
तुळा नसे भूपतिच्या सुखाप्रती । स्तवी सदा यास मुखें दिवस्पती ॥ १४ ॥
रामासवें लक्ष्मण सर्वदा वसे । शत्रुघ्न तोही भरताश्रयीं असे ।।
पूर्वी विभागक्रम जाहले जसे । द्वंद्वें सुखें वर्तति बंधु ते तसे ॥ १५ ॥
छाया तनूची तनुला न सोडी । त्या बंधुची एक तसीच जोडी ॥
परस्परीं त्यांसि अपार गोडी । त्या मित्रभावा उपमाचि थोडी ॥ १६ ॥

—छंदोरामायण.

---

## ( १६ ) मद्यपी व भगवद्भक्त.

लज्जा, गेह, कुटुंब, धर्म, रुचि, भी, देहस्मृती ही गळे,
आधीं हांसति बाळ कर्मठ भले होती तयावेगळे ।
तोंडीं शब्द विचित्र, अश्रु नयनीं, पुण्यौघि सारी ढळे
कां पीती मदिराचि मूर्ख ! भगवत्कीर्तिप्रिया नाढळे ? ॥ १ ॥
देहातें विसरे, न मृत्युस गणी, हांसेहि, नाचे, रडे,
लज्जा जाय, नुरेचि रीति पहिली, अन्याचि आंगीं जडे, ।
हें पानव्यसनीं असें सुख ! तरी तें कीर्तिपानीं घडे
पायीं विश्व पडे, न जाय नरकीं, कां मद्यपा नावडे ? ॥ २ ॥

—बृहद्दशम अ. ६५.

---

## (१७) राम वनवासास निघाले तेव्हां अयोध्येंतला विलाप.

विबुधप्रिया.

ते[१] म्हणे “ रघुनायका ! सुखदायका ! तुजवाचुनी
या जगत्त्रितयीं नसे मज सौख्यलेश हि वांचुनी ।

---

१ लक्ष्मीनें चुंबिलेल्या मुखानें. २ पूजन. ३ धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ किंवा सलोकता, समीपता, सरूपता, सायुज्यता हे चार मोक्ष. ४ हें वर्णन सत्य आहे पण किती विनोदप्रचुर आहे ! ५ पुण्यसंपत्ती. ६ कौसल्या.

त्वद्वियोग रघूत्तमा ! हृदयास या श्रमहेतु कीं
उग्रदुःखभराचिया न तुळेत पर्वत हे तुकीं[1] ॥ १ ॥
वासरा ! तुज वास राजसुता ! वनीं रुचला कसा ?
कां कठोर करूनि मानस टाकिशी मज लोकसा ।
ने मलाहि चतुर्दशाब्द वियोग दुःख न सोसवे
स्वप्नखेद[2] सहावयास हि आजुनी हि नसे सवे[3] ॥ २ ॥
प्रीति देशि सपत्नीमातृमनासि[4] होउनिया जटी
दंडकींहि तपस्विलोकगणांसि होशिल धूर्जटी ।
दुःखसागरपारदा ! मजला परंतु तरी[5] नसे
नेत्रभृंग उपोषणें करितील हे किति दीनसे " ॥ ३ ॥
पोटिशीं धरुनी सुतासि करी विलाप परोपरी
कोपला बहु लक्ष्मण स्वमनांत धीरमणी परी ।
अग्रजासि म्हणे " विभो ! मज दे नियोगें[6], भुजाबळें
स्त्रीजित क्षितिपाळ[7] बांधुनि राज्य साधिन हें पळें ! ॥ ४ ॥
मारितों भरतासि आणि तयाचिया निज मातुळा
मद्भुजद्वितयासि या भुवनत्रयांत नसे तुळा ।
यौवराज्य करीं, घडो तव शत्रुला वनवास हा
स्वांघ्रिसेवनलब्धविक्रमदासकौतुक तूं पहा !" ॥ ५ ॥
लक्ष्मणासि धरूनिया हृदयीं म्हणे रघुराज तो
" हें यथार्थ परंतु बा समयीं पराक्रम साजतो, ।
पूर्ण हो जननीमनोरथ, सत्यसंध पिता असो,
दंडकांत चतुर्दशाब्द तपोधनीं जन हा वसो, ॥ ६ ॥
अंब ! तूं नगरीं असे, मम तात वृद्ध सचिंत हा
सेवनें सुखवी मनीं धर धीर, मीं नमितों पहा ! ।
मत्समानचि पुत्र लक्ष्मण दास्य नित्य करूं तुजें
या सुतासि सुदुर्लभ त्रिजगीं महासुखहेतु जें[8] " ॥ ७ ॥
कौसलेंद्रसुता म्हणे " पितृवाक्यपालनतत्परा !
वासरा ! जरि दंडकाप्रति जासि चित्तसुखाकरा ! ।

---

१ तुळणेला. २ स्वप्नांतलेंही दुःख. ३ सवय. ४ कैकेयीच्या मनास. ५ नौका. ६ आज्ञा. ७ दशरथ. ८ जें तुझें दास्य मला या जगीं महासुख देणारें आहे. या चरणांत रामाची मातृभक्ति सुव्यक्त झाली आहे.

अंतराय नसो पथीं तुजला असो सुख काननीं
मच्छरीर परंतु हें पडलें वियोगदवकाननीं" ॥ ८ ॥

वंदुनी जननीजनांप्रति रामचंद्र निघे तदा
"ने मलाहि" म्हणोनिया धरि लक्ष्मण प्रभुच्या पदा ।
मायबापहि टाकिले परि बंधुरत्न न सोडिलें
स्नेहबंधन सज्जनें भुवनत्रयींहि न तोडिलें ॥ ९ ॥

सांगतां वनवासवृत्त विदेहराजसुता सती
सिद्ध होय निवारितांहि, वधूसि मुख्य गती पती, ।
ते धवानुमता[1] स्वभूषण तेधवां अति आदरें
दे समस्त अरुंधतीप्रति पूजुनी नमुनी करें ॥ १० ॥

"काननीं कुशदर्भ कंटक गोक्षुरादि पथीं खडे
कोमळाकृति ही तिथे, चरणप्रचार कसा घडे ?" ।
यापरी जन तो विलोकुनिया तयासि वदे, रडे,
लोकशोकजळें करूनि चिखोल भूमिवरी पडे ॥ ११ ॥

वल्कलांबरधारणोत्तर पुत्रयुग्ममुखाकडे
पाहुनी नृप होय मूर्छित फार दीन तसा रडे ।
मायबाप गुरू नमूनि निघे रघूद्वह तत्क्षणीं
आणवी रथ तो सुमंत्रकरें नरोत्तम आंगणीं ॥ १२ ॥

दूर तो रथ जाय तों बहु राय 'हाय !' म्हणे, पडे
"न्या" म्हणे, "मज राक्षसी सदनांतुनी महिषीकडे[2] ।
मातृपुत्रवियोगदायक[3] हा तिच्याच गृहीं पडो,
वांचणें न दिसेंचि, मृत्युचि तत्समीप मला घडो" ॥ १३ ॥

जेधवां प्रभु तो निघे सहसा वनाप्रति जावया
पौर ते रडती, समस्तहि टाकिती द्रविणालया[4] ।
त्या रथासह धांवती पडती पथीं किति कश्मलें
'हा !' असें वदती मुखें नयनांतुनी गळतीं जळें ॥ १४ ॥

लोक सर्वहि शोकविव्हल ओकें टाकुनि धांवले
कीं तृषाकुळ सर्व ते अमृताशयाप्रति[5] पावले ।

---

१ पति जो राम त्याचें अनुमोदन मिळाले आहे ज़िला अशी. २ कौसल्येकडे. ३ मातेला पुत्रवियोग देणारा. ४ घरें. ५ जलाशयाजवळ.

रोधिती[1] रथमार्ग पाहति रामचंद्र मुखाकडे
बर्हिवेष्टित विद्युदंबुदसाम्य तैं प्रभुला घडे ॥ १५ ॥
लोक ते कर जोडुनी म्हणती वियोग न साहवे
स्पष्ट संयमनीसमान पुरीस आज न पाहवे ।
त्वत्पदांकित काननीं विचरूं जसे सुरनंदनीं
सर्व सौख्य असें त्वदास्यविलोकनीं पदवंदनीं ॥ १६ ॥
त्वत्पदाब्जवियोगतापित चित्त हें न रमे घरीं
न श्रुतिप्रतिपाद्यवस्तुविचारसार कथांतरीं ।
न स्मरलिसकेलिलालससुंदरीभुजबंधनीं
सर्व सौख्य असें त्वदास्यविलोकनीं पदवंदनीं ॥ १७ ॥
त्वत्पदाब्जवियोगताप हरावया बळ सारसीं
पाहतां न दिसे, नसेचि निशाकरीं, न सुधारसीं, ।
राघवा ! मग शक्ति कोठुनि सर्पवेष्टित चंदनीं ?
सर्व सौख्य असें त्वदास्यविलोकनीं पदवंदनीं ॥ १८ ॥
त्वद्वियुक्तमनासि तोष नसेचि षड्रसभोजनीं
गायनीं शयनीं धनीं वसनीं सुरूपवधूजनीं ।
स्यंदनीं तुरगीं गजीं भुवनत्रयीं स्वकळेवरीं
ने वनास जनास या रघुनायका ! करुणा करी ॥ १९ ॥
पन्नगाश्रित गेह सिंहगुहाच कीं पितृकानन
बंधनालय यातनास्थळ कीं सकोपयमानन ।
वाटती नगरी तशी तुजवांचुनी रघुनायका !
दे स्वपादसमागमामृत सर्वदा सुखदायका !" ॥ २० ॥
यापरी वदती, रथासह धांवती अनिवारित,
कोटियज्ञ पदोपदीं अखिलाघसंचय सारित ।
पावले तमसातटाप्रति लोक तों रवि मावळे
काय पौरकथा वदों ! नगरासि टाकिति कावळे ! ! ॥ २१ ॥

—छंदोरामायण. अयोध्याकांड.

---

१ अडविती. २ तेव्हां रामचंद्र मोरांनीं वेष्टिलेल्या विद्युद्युक्त मेघासारखे दिसले. ३ यमपुरी. ४ तुझ्या मुखावलोकनांत. ५ वेदांनीं स्तविलेल्या परब्रह्माच्या चिंतनांत किंवा अन्य उत्तम कथांत. ६ कामविकारांनी विद्ध झालेल्या मंदक्रीडेविषयीं उत्सुक असलेल्या सुंदरीच्या आलिंगनांत. ७ या सुंदर श्लोकांत रामावांचून आपलें घर व नगर कसें भयाण व भीतिप्रद वाटतें हें सांगितलें आहे. ८ पूर्वकर्मांचा नाश करीत.

# ( १८ ) भाषादेवीच्या राज्यांतला अद्भुत चमत्कार.

पुढें दिलेला उतारा अपूर्ण आहे. पण तो केवळ कवीच्या भाषास्वामित्वाचा एक पुरावा म्हणून पुढें आणला आहे. भाषादेवीच्या राज्यांत मयासुराप्रमाणें अद्भुत कसरतीचे खेळ खेळणारा जादुगार मोरोपंतच. याला तुला पृथ्वीवर सांपडणार नाहीं. कथाभाग सुसंगतपणानें सरळ व नेहमीच्या गोड भाषेंत वर्णून पुन्हा तो अनेक मंत्ररत्नांनीं विणून काढणें हें काम विश्वकर्म्याशिवाय दुसऱ्या कोणास येणार?

रामप्रेक्षाकामें *श्रीमदगस्त्यादि पुण्यकीर्ति मुनी।
येती, त्यांला पूजी राजा निजमस्तकीं पदें नमुनी ॥ १ ॥
म्हणती, "त्वद्विध राजा पूर्वीं आम्हीं न देखिला कोणी।
दारुणशत्रु निशाचर मथिले, केली सुखाकरा क्षोणी ॥ २ ॥
क्षालायाला जनमळ भगीरथें आणिलीच देवधुनी।
चंद्राभ्रपरि कीर्ती विनिर्मिली त्वांहि सुररिपू वधुनी ॥ ३ ॥
विमलगुणा! तुजवांचुनि सूक्ष्मदृशांला न देखणा ठावें।
अर्तिदिनि तव चरणाब्जीं, म्हणवुनि त्यांचा द्विरेफसा भाव॥४॥
हें ऐकुनि विनयज्ञ प्रभु वंदुनिया म्हणे, "अहो! स्वामी!
बहुमान कीर्तिशाली भवत्प्रसादें करूनिया आम्हीं ॥ ५ ॥
लंकेश निशिचराधिप मेला तुमच्या तपःप्रभावानें।
कारुण्याकुलहृत्स्थलें मजला स्तवितां स्वपुत्रभावानें ॥ ६ ॥

---

* हा उतारा सातव्या कांडांतला असल्यामुळें प्रत्येक आर्येच्या प्रथमार्धाचें सातवें अक्षर घेतलें म्हणजे दर तेरा आर्यांत 'श्रीराम जयराम जयजयराम' हा मंत्र गुंफलेला सांपडतो. शिवाय = अशी खुण केलेले वर्ण एकत्र केले म्हणजे रामरक्षा अगर विष्णुसहस्रनामांतले श्लोक सांपडतात. पहिल्या दहा आर्यांत 'रामो दाशरथिः शूरो लक्ष्मणानुचरो बली। काकुत्स्थः पुरुषः पूर्ण कौसल्येयो रघूत्तमः' हा श्लोक साधला आहे; व पुढील चार आर्यांत 'वेदांतवेत्ता यज्ञेशः पुराणपुरुषोत्तमः' हा श्लोकार्थ साधला आहे. सारें मंत्ररामायण त्रयोदशाक्षरी मंत्रांत बसविलें आहे. व उत्तरकांडांत या मंत्राशिवाय अन्य श्लोकही साधले आहेत व यामुळें तें कांड पंतांच्याच हेतुप्रमाणें 'श्रीरघुपतिमंत्ररत्नमंजूषा' झालें आहे. हे सर्व मंत्र अद्याप सांपडले नाहींत. कांहीं कै. वामनरावजी ओकांनीं हुडकून काढले आहेत. ते खचित् 'सूक्ष्म-सदृशावांचून कथापरांलाच सांपडणार' नाहींत. १ राम दर्शनाच्या इच्छेनें. २ गंगा. ३ सुंदर स्थान. ४ भ्रमरासारखा. ५ दयामृतानें भरलेलें हृदय ज्यांचें.

हा दशमुख अमरांचा रिपु दारुण जन्मला कसा दुष्ट ?।
दोषनिधीला याला वरदाता कोण जाहला तुष्ट ? ॥ ७ ॥
हें पूर्ववृत्त मजला सांगा, आकर्णनस्पृहा आहे"।
ऐसें पुसतां हर्षें अगस्त्य सांगे कथा तयाला हे ॥ ८ ॥
"चतुरास्य तनय रामा ! पुलस्त्यनामा अखंडितज्ञान।
वेदाब्धि पावकौजा सत्कैवल्यैक गेयविज्ञान ॥ ९ ॥
संसारसिंधुचें जल केलें लंघूनि जेंवि तृणबिंदु।
त्या सत्तमासि मग दे कन्या राजर्षिनाथ तृणबिंदु ॥ १० ॥
त्याला झाला तनय, ख्यात मुनी विश्रवा गुणें ह्रय।
वेदांत सारवेत्ता, सर्वजनामाजि मान्य सद्विय ॥ ११ ॥
तद्वनिता रघुराया! सती भरद्वाजकन्यका झाली।
यक्षप सुजेश्वरसख, शमधन, वैश्रवणनाम सुत व्याली ॥ १२ ॥
त्याप्रति लंकानामक पुरातन स्थान अर्पिलें तातें।
द्रविणस्वामित्वासह, पुष्पक विधि दे स्वभक्तिमंतातें ॥ १३ ॥
भव पुरकाल श्रीगल गौरीगुरु भक्तकामनाकर्ता।
झाला शूलविषोरगधर वित्तपमित्र कामसंहर्ता ॥ १४ ॥

—मंत्ररामायण उत्तरकांड.

## ( १९ ) रंगभूमि.

दुसरे दिवशीं राजापौरांहीं हर्ष बहु मनीं धरिला।
समर पहाया येऊनि शीघ्र महारंग सर्वही भरिला ॥ १ ॥
त्या त्या मंचीं ते ते विप्रादि समग्र जन सुखें बसले।
जेंवि विमानांत अमर गंधर्वादिक तसे समुल्लसले ॥ २ ॥
वर मंच वेगळाले विप्रादिस्त्रीजनींहि शोभविले।
वेश्यांच्या मंचांहीं बहु कामी मधुपसेचि लोभविले ॥ ३ ॥
उपरिगृहिं राजवधू जेथें अतिरम्य जवनिका राजा।
देवीच करिति भजनें प्रिय न सहातीच लव निकारा ज्या ॥ ४ ॥

१ अग्नीसारखा तेजस्वी. २ ब्रह्मद्रष्टा. ३ प्रशंसनीय आहे आत्मस्थिति ज्याची. ४ कुबेर. ५ शंकराचा मित्र. ६ शूल, विष व सर्प यांतें धारण करणारा. ७ भव्य वस्त्रपात्रादिकांनीं शोभले. ८ हें वर्णन आजच्या नाटकगृहाला बरोबर लागतें. ९ माडीवर. १० पडदे.

प्राङ्मुख कांचनमंचीं इंदु तसा भोजनायक विराजे ।
बसले स्वोचितमंचीं रत्नांबररम्यकाय कविराजे ॥ ९ ॥

—हरिवंश. अ. १७.

---

# ( २० ) रावण व रामवानर यांचें युद्ध.

मग रक्षःकुंजर[1] तो घेउनि सेनेसह स्वपुत्रास ।
वानरबलासि येउनि देता झाला जगद्रिपु त्रास ॥ १ ॥
ते दुंदुभि तोयदरव,[2] दरवर,[3] वीणा, मृदंग, वाजविती ।
गजहयरथचक्रध्वनि भटसिंहध्वान भुवन गाजविती ॥ २ ॥
कांपे धरा थरारां, गिरि चळती, अब्धि होय संक्षुब्ध ।
पांसु प्रांशूष्णांशुद्युति[4] चोरुनि होय सुरनदीलुब्ध ॥ ३ ॥
वासवनीलश्री,[5] तो कवची, खड्गी, गदी, शरी, चापी, ।
प्रासी, शूली, कुंती मुसली दशकंठ पातला पापी ॥ ४ ॥
कपिबलपारावारीं दशमुख शिरला जसा महामकर ।
'मामकरक्षोवृंदीं,' म्हणे, 'कसा शर धरील रामकर ?' ॥ ५ ॥
तो समर लोमहर्षण[6] केला, त्याला तुला नसे कांहीं ।
केशाकेशि, नखानखि, मुष्टामुष्टि प्लवंगलोकांहीं ॥ ६ ॥
नानायुधव्रजक्षत कपि कोपें पादपाद्रिशिखरांहीं ।
रात्रिंचरसेनेला मर्दिति पदमुष्टिदंतनखरांहीं ॥ ७ ॥
मृतगजहयदेहातें हातें उचलोनि मारिती रिपुला ।
क्षतरक्षःक्षतजांच्या क्षितिपृष्ठीं वाहती नदी विपुला ॥ ८ ॥
ते गगनग मग अगनगधर[7] खरतर वीर नीरदासारे ।
वर्षति अध्वररक्षण दक्षासुरसंघ[8] मस्तकीं सारे ॥ ९ ॥
मांसाचे संचय किति ; रक्ताचे वाहती महापूर ।
शूरजनक्षय झाला, भूरजहीना, द्रुमाद्रिही चूर ॥ १० ॥
धूलीच्या निकरानें पडला सर्वत्र निबिड आंधार ।
कार्य[9] रजःपटलानें भूमि करी निर्जरांसि आधार ॥ ११ ॥

---

१ राक्षसश्रेष्ठ रावण. २ मेघासारखे नाद करणारे नगारे. ३ चांगले शंख. ४ फार प्रखर असें सूर्यतेज. ५ पाचूसारखी नीलकांति ज्याची तो. ६ अंगावर कांटा उभा करणारा. ७ वृक्ष व पर्वत धारण करणारे. ८ इंद्रजिताचा यज्ञ रक्षण करण्याविषयीं तत्पर असलेले राक्षससमुदाय. ९ उत्प्रेक्षा.

घेउनि धिक्कारातें, जय देउनि रामबाहुदंडांतें ।
यातु गृहीं जाय, गणी कोदंडातें चि कालदंडां तें ॥ १२ ॥
—मंत्ररामायण. युद्धकांड.

## ( २१ ) भारतीयुद्धानंतरचा रणभूमीवरचा शोकप्रद देखावा.

श्रीकृष्णवरें पाहे हें युद्धस्थान दिव्य-दृष्टि सती[१] ॥
योग्या जाणाया जी स्व-व्रतपुण्यें अशेष सृष्टिस ती ॥ १ ॥
जे भक्षिले शिवांहीं गृध्रांहीं कांत-काय काकांहीं ॥
ते पाहुनि न पाहति बहु-मूल्य मणींस बायका कांहीं ॥ २ ॥
तें सर्व विचेष्टित गांधारी दिव्यदृष्टिनें पाहे ॥
कृष्णासि म्हणे कोण्ही स्त्री मजसम दुःखिता जगीं आहे ॥ ३ ॥
हुडकिति शवें पहा पतिसुत वळखायासि बायका सारीं ॥
या कमळ-वन-विहारा शिरल्या हंसीच काय कासारीं ॥ ४ ॥
भीरुप्रकृतिहि न गणिति भय पतिंच्या भेटतां धडा, कांकीं ॥
गृध्रीं वृकींहि साहति कदलीहि करेणुचा[२] धडाका कीं ॥ ५ ॥
शोधुनि जोडिति हातें पतिपुत्रशिरादि अवयव धडा जे ॥
तारुण्यभर वधूंचा[३] मचितीं तेंवि न सुत-वध डाजे ॥ ६ ॥
पदरें पुसोनि चुंबिति पतिमुख सुरतांत जें जसें चुंबी ॥
बा मत्क्रिया[४] प्रसवली जैशी ऐशी न कटु फळें तुंबी[५] ॥ ७ ॥
दुर्योधनास भेटे होय तिच्या[६] फार भर विलापाला ॥
दैवें मृतपुत्रविप-च्छामेचा[७] तीस भरविला पाला ॥ ८ ॥
आलिंगितां सुतशव स्फुरले बहुकरुण जे विलाप तितें ॥
त्या दुःखा ते स्वल्पचि सुकलत्रा जेंवि जेविला पति तें ॥ ९ ॥
कृष्णा ! पहा ! सुतेजा जोडा होता जगांत हा रविला ॥
हार विलासवतीनें जेंवि क्षितिनें तसाचि हारविला ॥ १० ॥
हार विलासवतीनें केला हा लक्ष्मणप्रसूनें कीं ॥
हारविला सवतीनें क्षितिनें, पुजिला सुरप्रसूनें कीं ॥ ११ ॥
कृष्णा ! युद्धारंभीं हा माझा पुत्र सत्पदा लागे ॥
'माते ! विजय घडाया दे आशीर्वाद मज' असें मागे ॥ १२ ॥

१ गांधारी. २ हत्ती. ३ सुनांचा. ४ माझें कर्म. ५ भोपळा. ६ दुर्योधन स्त्रीनें विलासवतीनें. ७ मृतपुत्र हीच विपत्तिरूप वल्ली तिचा.

वदलें मेघश्यामा ! या माझ्या नंदनासि मीं वा गा ! ॥
जिकडे सुधर्म तिकडे जय, युद्धीं न भ्रमें महाभागा ! ॥ १३ ॥

वत्सा जरि तूं युद्धीं न भ्रमसिल पावसील सुगतीतें ॥
करिती कुलीन जेणें हर्षें स्वर्गीं स्वपूर्व कुगती तें ॥ १४ ॥

रडत नसे पुत्रातें, स्वर्गा गेला, न सोडिली संधा ॥
कृष्णा रडतें मी या दीना हत-बांधवा धवा अंधा ॥ १५ ॥

विटले कंसाऽराते ! संसारा तेचि एक जन धन्य ॥
अन्य व्यर्थचि गेले, मेले विषयार्थ करुनियां जन्य ॥ १६ ॥

मुख हुंगिती सुतांचें पतिवरि कर फिरविती पहावेना ॥
कृष्णा कोणाचा तरि शोक करिल हें मला सहावेना ॥ १७ ॥

तापविती अति दुःसह पतिसुत-शोकाऽर्कं आंत बाहेर ॥
विधिवरि बोटें मोडुनि कोपें खातात दांत बा हेर ॥ १८ ॥

हा दुःशासन कृष्णा मेलाही दाखवी न पाठ उनीं ॥
पडला पहा उताणा अभिमान असे असूंसि पाठउनी ॥ १९ ॥

हा मूढ भ्रात्याचें कर्णाचें प्रिय करावयाहि तसें ॥
साध्वीस सभेमध्यें गांजी तें कर्म या गमे हितसें ॥ २० ॥

म्हणसिल कृष्णा मज तरि मारावें या कसें न भावातें ॥
सोडूं नये प्रशस्ता शीला कुलजें जसें नभा वातें ॥ २१ ॥

सौभद्र शिशु शरभसा तो हा संपन्न जो महाकौर्यें ॥
तुजहुनि धनंजयाहुनि अधिक दिढीनें रणीं बळें शौर्यें ॥ २२ ॥

कृष्णा ! त्वत्सम तव कृत-वर्णन भाचा परा सुकविता कीं ॥
झाला घालाया धृत-वर्ण नभाचा पराऽसु कवि ताकीं ॥ २३ ॥

---

१ आपले पूर्वज. २ पतीला, धृतराष्ट्राला. ३ युद्ध. ४ पतिशोक व सुतशोक हेच कोणी सूर्य. ५ या कठिण आर्येवर खुद्द कवीनें विस्तृत टीप दिली आहे ती अशी:–" कृष्णा ! त्वत्सम कृतवर्णन कविकृतगुणवर्णन तव भाचा परा अरितें प्रतापें सुकविता शुष्क करिता असा होता कीं तो हा नभाचा धृतवर्ण गगनासारखा श्यामवर्ण सौभद्र स्वाश्रयीं अमृतीं जे कवि होते ते स्ववियोगीं ताकीं नीरसीं पराश्रयीं घालावयासि परासु झाला." पंतांचा भावार्थ असा दिसतो. " कृष्णा ! तुझ्यासारखा श्यामवर्ण पराक्रमी भाचा शत्रूंस स्वतेजानें असा निस्तेज करणारा होता कीं तत्पराक्रमवर्णनामृत पिणारे जे कवि होते त्यांना स्ववियोगतक्र पाजण्यासाठींच कीं काय तो मृत्यु पावला."

ग्रं. क्र. २१५४

शुद्धा सरस्वतीशी कृष्णा सोडी प्रभा न मेल्याला ॥
मज भगवान् भास्करसा हाहि महाभाग भा गमे त्याला[1] ॥ २४ ॥
अंकीं मस्तक घेउनि ती बाळा उत्तरा पहा पतितें ॥
चिबुक[2] धरुनि बोलविते लिहिलें ऐसें कसें महापातितें ॥ २५ ॥
म्हणत्ये मौन त्यजुनि स्मितपूर्वक एक बोल बोलाजी ॥
ती कसि निवेल तुमच्या प्रियवागमृतींच नित्यलेला[3] जी ॥ २६ ॥
हा जैन[4] सखी–समाजीं तुमचा सोडुनि काय पद रमला ? ॥
चुकलें क्षमा करावी पसराया उशिर काय पदर मला ॥ २७ ॥
नसतां उशी उशीर[5]–व्यजन पयःफेन–शुभ्र मृदु–शयन ॥
कशि निज आली जरि शिर न मदंकीं पदतळींहि हा शय[6] नें ॥ २८ ॥
अपराध कां करिल हे जाणे पतिदास्य–धर्म साध्वी कीं ॥
अजि तीर्थबुद्धि केवळ जी युष्मत्पीतशेषमाध्वीकीं[7] ॥ २९ ॥
नेत्रें उघडुनि पहा दासी तुमचीच हे नव्हे अन्या ॥
भलती स्पर्शेल कसी ? मी सत्य विराटनृपतिची कन्या ॥ ३० ॥
हा सातवा परिचया मास पहा ! गणुनि लोटले साच ॥
इतुक्यांत कसे विटलां साधु म्हणति सख्य साधुसीं साच ॥ ३१ ॥
आर्या कृष्णादेवी आर्या कृष्णाऽनुजा पृथा आजी ॥
यांवरि रुसलां कैसे जातां सोडुनि कां वृथा आजी ? ॥ ३२ ॥
वीरा कोणा पांडव माधव तव हे न नाथ सा मान्य[8] ? ॥
मेलाशि असाहि कसा सहसाचि जसा अनाथ सामान्य ॥ ३३ ॥
अत्यद्भुतही सुखद न यांचा यांतेंहि न महिमा मातें ॥
सुखदा होइल मारुनि रिपुला विपुलाहि न महि मामातें[9] ॥ ३४ ॥
तुजवाचुनि वांचुनि सुख कैचें हा काय भार तार मला ॥
ने हंस मानसीं निज–हंसीविण काय भारता ! रमला ? ॥' ३५ ॥
उदकीं लवण तसें हें करिलचि शोकांत उर विलीन[10] सती ॥
असती मृदु तरि पळ या तापें लोकांत उरविली नसती ॥ ३६ ॥

---

१ हा सूर्याप्रमाणें भा ( तेज ) त्याला ( तेजोरूप अलंकारानें भूषित झाला ) २ हनुवटी. ३ रमलेली. ४ मीं-संस्कृत ' अयं जनः 'प्रमाणें प्रथम पुरुषार्थी घ्यावा. ५ वाळ्याचा पंखा. ६ हात. ७ आपण पिऊन उरलेल्या मद्याला मी तीर्थ समजत होतें. ८ पांच पांडव व साहवा कृष्ण. ९ कृष्णातें. १० मग्न.

आयांतें दायांतें म्हणत्यें मज लाविली बळेंच सवे ॥
कां मोडितां तुम्हीच क्षण आतां स्त्र-पति वेगळें नसवे ॥ ३७ ॥
पति जवळुनि कां नेतां नेउनि हितबोध करुनि खोलींत ॥
तुमच्याहि असें अंतर पडलें कांगे क्रियेंत बोलींत ? ॥ ३८ ॥
जड सोडवितां हृदयीं देह मनोमयचि उरविला पतिचा ॥
गांधारीनें कथिला, भिजवी प्रभुचेंहि उर विलाप तिचा ॥ ३९ ॥
राधा म्हणत्ये हा ! मज पुत्रवतींचीच लागली दृष्टी ॥
पुत्रा शून्या झाली तुजवांचुनि जेंवि रविविना सृष्टी ॥ ४० ॥
मजपरिसहि बहु म्हणतिल हे वार्ता परिसतां धरासुर 'हा !' ॥
अस्मदभाग्यें केला तो कर्ण रणांगणीं पराऽसु रहा ॥ ४१ ॥
द्विज[१] हो संतत तुमच्या जो आशीरमृतदृष्टिनें ओला ॥
पार्थदवानें केला कल्पद्रुम भस्म तो कसा बोला ?' ॥ ४२ ॥
वृषसेना राणि म्हणते 'नाथा ? तुज न विजयें न गुरुशापें ।
वधिलें कृष्णाक्षोभें अथवा माझ्याचि पूर्वकृत पापें ॥ ४३ ॥
ब्रह्मण्य शूर दाता बुध सर्वांगोपभोग जो कर्ता ॥
हर्ता शत्रूपद्रव दुष्टे ! मेहि[२] ! मारिला कसा भर्ता ? ॥ ४४ ॥
मज तुजहि समचि भजला उपभोगें तोषला विलासवती ॥
अन्या स्वप्नीं नेणे त्यासि कसा दोष लाविला सवती ॥ ४५ ॥
मज कां गिळिलें नाहीं ? पापे ! रथचक्र गे ! कसें गिळिलें ॥
दे उत्तर ऐकों दे कां न वदसि, तोंड काय गे खिळिलें ? ॥ ४६ ॥
बहुभर्तृका कुशीला तूं तुज म्हणतात सुकवि कुंतरीच[३] ॥
रथचक्र क्रव्य कवळ करुनि खरी जाहलीस कुतरीच ॥ ४७ ॥
धर्मा त्रयोदशाऽब्द न ज्याच्या चिंते करूनि निज लागे ॥
तो हा पुन्हा उठाया वसुधे ! तुज दृढ धरूनि निजला गे ॥ ४८ ॥
'देवा ! जयद्रथाचें सांपडलें परि नसेचि धड धड तें ॥
आलिंगिलें सुतेनें[४] पाहुनि माझ्या उरांत धडधडतें ॥ ४९ ॥
कृष्णा हरिली जेव्हां कृष्णा ! हा तेधवांचि मारावा ॥
परि धर्म म्हणे बुडतें भगिनी-सौभाग्य म्हणुनि तारावा ॥ ५० ॥

---

१ द्विज, ब्राह्मण. २ पृथ्वीनें रथचक्र गिळिल्यामुळें कर्णवध झाला. ३ पृथ्वी, बहुभर्तृका आहे म्हणजे पुष्कळ राजांनीं तिचा उपभोग घेतला आहे, अर्थात् ती कुशीला आहे ४ दु:शिला ही धृतराष्ट्राची कन्या असून तिचा पति विषयांध जयद्रथ होता.

तैसीच या प्रसंगीं धर्में कां दुःशिला न आठविली ॥
जाणो युद्धारंभीं करुणा तीर्थाटनासि पाठविली ॥ ५१ ॥
बहुतकरुनि तों एका कन्येच्या या जनांत ज्या माता ॥
त्यांसि गमे स्वतनुपरिस अधिक सुतासूनुपरिस जामाता ॥ ५२
येती पुनःपुन्हा शिर हुडकुनि धांवत सुता धडाजवळ ॥
कीं काक-गृध्र-टंक-बक तडतड तोडूनि भक्षिती कवळ ॥ ५३ ॥
म्हणत्ये तुझ्या सख्याला[१] बा कोणिकडे झुगारिलें शिर तें ? ॥
शिरतें काळिज कानीं कन्येचे करुण-वच जसें शिरतें' ॥ ५४ ॥
'भीष्म प्रभुशर-तल्पीं निजला आहे जसा कुसुम-तल्पीं ॥
हें शौर्यवीर्य न सुरीं कैसें मनुजीं असेल मग अल्पीं ॥ ५५ ॥
या मागें धर्माचें पांडव पुसतील तत्व कोणातें ? ॥
हा! राजनीति विधवा झाली बैसेल धरुनि कोणातें[२] ॥ ! ॥ ५६ ॥
हा परम-सत्यवादी स्ववधोपाय स्वयेंचि कीं कथिला ॥
मग अर्जुनें शिखंडी करुनि पुढें न्यस्त-शस्त्र हा मथिला ॥ ५७ ॥
सकळां शस्त्रधरांचा हरसा आचार्य[३] नायक विनेता[४] ॥
पडला पहा परांतें विलया म्हणऊनि हाय कवि नेता ॥ ५८ ॥
शिव शिव कृष्णा ! क्रव्या-दांहीं याचाहि भक्षिला काय
स्वाश्रय[५] न रक्षिला तरि अस्त्रांहीं अर्थ रक्षिला काय ? ॥ ५९ ॥
ज्याचें अतुळ ब्राह्म-क्षात्रहि तेज प्रसिद्ध, जो लोहा ॥
स्पर्शमणि तसा, प्रणता शिष्या अत्युत्तमत्व दे तो हा ॥ ६० ॥
त्याचा खातात पहा तडतड तोडूनि करट[६] पायातें।
सर्व तुम्ही वंदाया तेव्हां जोडूनि कर टपा यातें ॥ ६१ ॥
कृष्णा ! कृपी कृशाकृति कृपणा झाली पहा महाशोकें ॥
नाना विलाप करिती गमती कोकींच टाकिली कोकें ॥ ६२ ॥
ती ब्रह्मचारिजटिलच्छात्रजनासह करूनि आशु चिता ॥
उचिता क्रिया करितसे या स्त्रीची अद्भुताचि बा शुचिता ॥ ६३ ॥
तळमळती पाहोनि प्रेतदशा निपट अनुचिता पतिची ॥
असिला बहु काय चिता देणारी सुबहु तनुचि ताप तिची ॥ ६४ ॥

---

१ पार्थाला. २ कोपऱ्याला. कुलीन घराण्यांतली विधवा लज्जेनें दुःखानें कोपऱ्यांत रडत बसते. ३ द्रोणाचार्य. ४ शिक्षक, गुरु. ५ कौरव व पांडव उभयतांचा आश्रय द्रोणाचार्य होता तेव्हां त्याच्या अरक्षणाचा दोष दोघांकडे आहे. ६ कावळे.

हा शकुनि अमृत परि ज्या विषधर्मे न्याय सत्य घामेलो ॥
नाहींच मनीं कपटद्यूतीं जोडूनि अत्यघा मेला ॥ ६५ ॥
हे राजश्री व्हाया मम तोकांचा विनाश शिकले तें[2] ।
तपनालाहि गिळी जो तम तो कां चाविना शशिकले तें ? ॥ ६६ ॥
तूं एक पांच पांडव हे सा केवळ अवध्य गमतात ॥
आपण नामेंचि अचळ ऐसें येइल अवध्यगमतांत[3] ॥ ६७ ॥
भीष्म द्रोण जयद्रथ दुर्योधन कर्ण यां पुढें पुरलां ॥
कृप कृतवर्मा अश्व–त्थामा अत्युग्र परि तुम्ही उरलां ॥ ६८ ॥
हे समरीं अमरींचे तिलकहि लकलकित नाहींसे करिते ॥
परि तेजोनिधि दैवें घटजें केलेचि कीं अनेक रिते ॥ ६९ ॥
ऐसें वदोनि दुःखध्वस्तज्ञाना[4] सती बहुत रडली ॥
धैर्यातें सांडुनि ती गांधारी शोकमूर्च्छिता पडली ॥ ७० ॥

—स्त्रीपर्व. अ. ४ व ५

---

# ( २२ ) रामाचा सीतेसाठीं शोक.

प्रणमन करून लक्ष्मण, विभुला सीतोक्ति सर्व आयकवी ; ।
तच्छ्रवणें व्याकुल बहु झाला चित्तांत सुज्ञराय कवी. ॥ १ ॥
तो निजउटजा येतां, मार्गीं होती अनेक अपशकुनः ॥
हानीतें सुचवीती निजदेहस्फुरण, मृग, शिवा, शकुन[5]. ॥ २ ॥
आलय जाउनि पाहे, तों सीता राघवासि भेटेना ; ।
त्या समयाहुनि दारुण मृत्यु, असें लक्ष्मणासि वाटेना. ॥ ३ ॥
रुचिराक्षा नाहीं कीं, वत्सा ? हें अन्यगेह वाटतसे ; ।
इतरस्थलासि आलों, चुकती अनभिज्ञ[6] लोक वाट, तसे ॥ ४ ॥
वत्सा ! मज जरि म्हणसी, सीतेची हेच होय दलशाला ; ।
तरि मीच रामनामा नसेन ; साध्वी दिसेल काशाला ? ॥ ५ ॥
ते मजवांचुनि नाहीं गेली गोदावरीविहारातें ; ।
क्षण मद्विरहें तीतें युग होतें ; भार भावि हारातें[7]. ॥ ६ ॥

---

१ द्रवला, विरघळला. २ द्यूत. ३ अवधि–अग–मत अस्ताचलाच्या मनांत. ४ दुःखानें हरण केली संज्ञा जिची अशी गांधारी. ५ अंगस्फुरण, हरिण, कोल्हीं व पक्षी अशुभ सुचवितात. ६ अजाणते. ७ माझ्या विरहांत तिला हारही भार ( ओझें ) वाटतो.

तें प्रियतमा न हिंस्रें वधिली; नाहींच रक्त भूवरतें; ।
नेलीच राक्षसानें;' म्हणोनि शोधी स्थल क्षमावर तें ॥ ७ ॥
"कोठें जनकसुते ! तूं गेलीस; धरासुते ! प्रिये ! जाये ! ।
न करीं विनोद; झाला व्याकुल अत्यंत देह माझा; ये. ॥ ८ ॥
तूं काय कोप धरिला; अपूर्व मृग नाणिला म्हणून मनीं; ।
तरि चंद्रमृगहि आणुन देइन, हें तूं असत्यसें न मनीं ॥ ९ ॥
श्वशुराला परलोकीं गेलिस जरि तूं करावया नमना; ।
पुसल्यावांचुनि कैशी सीते ! झालीस आज यानमना ? ॥ १० ॥
न्यावें मजही तेथें, श्वशुराची प्रार्थना करून, सती ! ।
भरत करूं राज्यातें, तुजवाचुनि वांचुनी, सुखें नसती. ॥ ११ ॥
राज्यश्री हरुनि, जरी कैकेयीनें वनास पाठविलें ।
तरि तव योगें तें मीं नाहीं कांहीं मनांत आठविलें. ॥ १२ ॥
मज-राजकन्यके ! तूं वरूनियां पावलीस न सुखातें; ।
खातें हें चित्तातें; सांगों कोणास मी स्वदुःखातें ॥ १३ ॥
हा कमलाक्षि ! तनूदरि ! सुंदरि ! जाये ! प्रिये ! अये ! सदये ! ।
विधुमुखि ! पिकगर्वापह, अमृताहुनि गोडसें, स्वयें वद; ये. ॥ १४ ॥
पंकज, विधु, हरि, गज, पिक, चमरीमृग, कीर जिंकिले होते; ।
त्वन्मित्रातें मातें, त्वद्वैरें, पीडितील सखि ! हो ! ते. ॥ १५ ॥
हा प्रियतमे ! वियोगज्वलनमुखीं होमिलेस कां मातें; ।
वैरी संतोषविले, टाकुनि यातें वनीं सकामातें !' ॥ १६ ॥
ऐसा रात्रिदिवसही विलाप करि शोकपर, जसा कोक ।
कोकनदाक्ष सुमित्रातोकसहित तो करी विकल लोक ॥ १७ ॥

—मंत्र रामायण–अरण्यकांड.

---

१ सुवर्णमृग. २ जाण्याविषयीं इच्छा जिला अशी. ३ कमला.

## ( ५ ) कथानकपर कविता.

सत्पुरुषकथा अद्भुत रसदा म्हणतों इलाचि सुरभी मीं ॥ १ ॥

# ( १ ) रुक्मिणीचें स्वविवाहवृत्तकथन.

'कौरवयादवभार्या[1] एका जागां मिळोनिया बसती ।
हरियश गातां पळविति कोकिळशुकसारिकांसि लांब सती ॥ १ ॥

श्रीमद्रुक्मिण्यादि प्रभुपत्नींतें अजातरिपु[2] भार्या ।
प्रश्न करि प्रेमें जे[3] मित्र ननांदा प्रियासखी आर्या ॥ २ ॥

"हे वैदर्भि! स्वमुखें स्वविवाहोत्सव कथा मला सांगें ।
कैसें वरिलें तुजला श्रीकृष्णें दीनवत्सलें आंगें?" ॥ ३ ॥

प्रथम म्हणे वैदर्भी, "बाई होतें लहान मीं कन्या ।
धन्या कृष्णकथा मज तेव्हांच रुचे, न आवडे अन्या ॥ ४ ॥

भगवद्भक्त ब्राह्मण जे येती मत्पित्याचिया गेहा ।
जें हारि हरियशोमृत पाजिति तें मात्र चालवी देहा ॥ ५ ॥

हरिगुणगायक सज्जन ते धनलोभी नव्हेत, परि हार ।
मुद्रा कंकण द्यावें, न करिति माता पिताहि परिहार ॥ ६ ॥

ज्या दिवशीं हरिचरितश्रवण नसे त्यांत मज दहा दुखणीं ।
दुखणीं काय नवखणी माडी नलगे, धरीं नखेंदु खणी ॥ ७ ॥

श्रीकृष्णाला द्यावी श्रीरामा जानकी तसी दुहिता ।
ऐसी गुरुबुद्धीनीं केली बाई! विचारणा सुहिता ॥ ८ ॥

कृष्णीं माझें अर्पण चित्ता आलेंचि साधुभावांच्या ।
कृष्णगुणीं श्रुत्यर्पण ये जेंवि मनास सत्स्वभावांच्या ॥ ९ ॥

रुक्मी माझा दादा जो आम्हां साजणामधें मोठा ।
खोटा नव्हेचि परि हरिचरितरसीं तो भिजे न मणिगोटा ॥ १० ॥

त्या स्वगुरुविचारातें निंदुनिया मोहरोगवैद्यातें ।
मजला देऊं केलें दानानें हठ धरूनि चैद्यातें ॥ ११ ॥

---

१ मूळ पोथींत 'यदुकुरुभार्या कुशलप्रश्नालिंगन करूनिया' असाही पाठ पंतांनीं स्वतः दिला आहे २ द्रौपदी. ३ कारण तिची नणंद, प्रियसखी व आर्यस्त्री या तीनही नात्यानें तिला रुक्मिणीला प्रश्न विचारावयाचा अधिकार होता. ४ "मंजुभाषिणी त्या–" पंतांची टीप. ५ चित्तहारी. ६ दुमजली. ७ नखांनीं भुई उकरी–अर्थात् दुःखभारामुळें. ८ "रत्न जऱ्ही झालें तऱ्ही तो पाषाणचि, अमृतांतही भिजायवा नव्हे. भावास रत्न म्हणती"– पंतांची टीप. ९ श्रीकृष्णातें.

केला लग्नाचाही निश्चय चैद्यासि धाडिलें मूळ ।
गूळ क्ष्वेडंचि[1] वाटे मज, तातविचार होय पांगूळ ॥ १२ ॥

न चले कांहीं तेथें जननीचें बंधुचें स्वताताचें ।
होय लवांत दहादा फळ इष्ट अनिष्ट आत्मघाताचें ॥ १३ ॥

एक ब्राह्मण केवळ साधु दयामूर्ति, तत्पदीं नमनें ।
केलीं पाय धरुनि म्यां एकांतीं विनविला सुदीनमनें ॥ १४ ॥

कां तो द्रवता माझा असता जरि भाव पाहिला खोटा ।
जेणें अभयवर दिला त्या गुरुहस्तांत म्यांहि लाखोटा ॥ १५ ॥

स्वकरें वसंततिलकावृत्तें पत्रांत सात[2] मोजूनी ।
लिहिलीं होतीं तींही लिहितां लिहितां क्षणांत योजूनी ॥ १६ ॥

काय लिहावें म्यां सखि ! ज्याचे संपूर्ण वेद निश्वास ।
विश्वास ज्ञानप्रद परि माझा हरिपदींच विश्वास ॥ १७ ॥

गेला धांवत घेउनि मत्पत्र द्वारकेस सद्विप्र ।
या प्रणतवत्सलाला आणाया आण घालुनि क्षिप्र ॥ १८ ॥

तों आला शाल्व मगधपतिसख तो चैद्य, मांडलें लग्न ।
झालें पुर तद्दळ जळनिधींत, आधींत मन्मनहि मग्न ॥ १९ ॥

तांतडि बहु दादाची ; कैचा अवकाश ? लागली हळद ।
खेळदर्पघ्न[3] दिसेना जो नतचातकदयासुधाजळद ॥ २० ॥

गरळ विलेपन वाटे लाविति अंगास जी हरिद्रा तें ।
सखि ! सुकृपणकृत शुष्कोपचरण[4] निवविल कसें दरिद्रातें ॥ २१ ॥

शतदा ध्वजांचि[5] झाल्यें, प्रासादशिरीं पुरेक्षणछद्में ।
द्वारवतीपथ पाहति नयनें हरिदिङ्मुखा[6] जसीं पद्में ॥ २२ ॥

आली रात्रि सुगात्रि ! द्रौपदि ! अवकाश तीच लग्नासीं ।
झाली यष्टी कष्टी जें मन त्या आधिभारभग्नासीं ॥ २३ ॥

चिंताज्वरांत रात्रौ माझा नाहींच लागला डोळा ।
जायासाठीं कंठीं शतवार प्राण जाहले गोळा ॥ २४ ॥

लावियला म्यां दुःखीं बाई ! त्या ईश्वरासही बोल ।
यत्पदपद्मरजाचें चिंतामणिकोटि ही नव्हे मोल ॥ २५ ॥

---

१ विष. २ ‘श्रुत्वा गुणान् भुवनसुंदर’ इत्यादि सप्तश्लोकी रुक्मिणीपत्रिका सर्वांस माहीत आहेच. ३ श्रीकृष्ण. ४ कोरडे उपचार. ५ माडीवर गेलें. ६ कृष्णाच्या वाटेकडे.

तों 'प्रियकंठीं आपण पडोन हेही सुखांत पाडावी'।
या भावेंचि स्फुरली करि माझी भुजलता कृपा डावी ॥ २६ ॥
नेत्रभुजोरुस्फुरणें चिंतेची सोडिली मनें वाज।
[1]आज प्राणांनीं ही गेल्या धैर्येंहि यावया लाज ॥ २७ ॥
तोंचि समूळाधिज्वरहरमात्रा आणुनी उषःकाळीं।
आला द्विज धन्वंतरि, सदय पिताही तसा नसे बाळीं ॥ २८ ॥
[२]आधीं विप्रमुखश्री कळवी येतांचि माधवागमन।
मग मुनि सांगत, मज तों ऊठ म्हणे, 'गुरुपदास लाग,' मन ॥ २९ ॥
विप्रें कथिलें मज कीं 'वत्से ! लिहिलेसि उत्तम श्लोक।
ज्यांच्या अर्थश्रवणें आला धांवोनि उत्तमश्लोक' ॥ ३० ॥
आले प्रभु हें कळतां सामोरा शीघ्र धांवला बाप।
हा पर्जन्यप्रियसख शिखिसुख सेवी, उरेचिना ताप ॥ ३१ ॥
[२]कृष्णागमनानंदें हृदयांतुनि ज्यां बळेंचि घालविलें।
चैद्यादिमनें याया स्थळ त्या चिंतादिकांसि [३]पालविलें ॥ ३२ ॥
अंबेच्या नमनाला न्यावी जीचा विवाह नवरी ती।
धरि हरिशंका दादा, देवीयात्रा कुळीं, न नव रीती ॥ ३३ ॥
मग बाई ! दादाचे मागधशल्यादिकाहि मेल्यांचे।
सैनिक मज रक्षाया आले धाके विरोनि गेल्यांचे ॥ ३४ ॥
स्वसखी धात्री जननी विप्रश्री मंडळी न, ती पेटी !।
तींत मणी मीं, नेलें शुभविधिनें श्रीशिवेचिये भेटी ॥ ३५ ॥
पूजुनि पाय निववीली, 'कन्यांतें प्रसवितात ज्या माता।
त्या लटक्या, तूंचि खरी, तुज कृष्णाचि योग्य होय जामाता' ॥ ३६ ॥
पत्रीं लिहिलें होतें 'देवीयात्रेंत मज पदें दावा।
दावा बहुतांसीं, हा भाव कळों दुर्जनासि नेदावा' ॥ ३७ ॥
तों आला हरि, सुंदरि जोडा नाहींच त्या [३]मेहा, भागा।
आपुलिया घ्याया ते कोले वारिति कसे महाभागा ॥ ३८ ॥

---

१ "प्रस्थानीं कटि बांधोनि अशक्त सिद्ध होतात"—पंतांची टीप. जाण्यासाठीं प्राणांनीं माज म्हणजे कंबर बांधली होती तीही सोडली. २ बोलविलें. माझ्या हृदयांतून कृष्णागमनानंदानें चिंतेला झुंकून दिलें तों तिला चैद्याच्या हृदयांत स्थान मिळालें ! ३ आनंदाला.

हरि रवि, मीं नलिनी; स्त्री कैरविणी, वीर वायसाराती ।
आनंदाची वेळा सांगों तुज साध्वि! काय सारा ती? ॥ ३९ ॥
माझा मूर्त मनोरथ तो रथ आला प्रियास घेऊन ।
दर्शन नयनें घेती जैसें शिशिरीं दरिद्रि घे ऊन ॥ ४० ॥
तों आलि म्हणे मज 'सखि! सुमनोमाळा वरा वहा यास ।
हा या समयीं विधि, मग नित्य असेंचि प्रिया पहायास!'[1] ॥ ४१ ॥
माळा ऊचलितां प्रिय आपणहि रथावरूनिया लवला ।
लव लागेना तों घे अंकीं, करुणासमुद्र कालवला ॥ ४२ ॥
हंसें मुक्ता नेली मग केला कलकलाट काकानीं ।
हाकांनीं नभ भरलें जाय सुरांच्याहि नाद हा कानीं ॥ ४३ ॥
श्वगणांतूनि जसा हरि निजभागा हरि तसाचि अतिधीर ।
अबळखळांतूनि प्रभु मजला घेऊनि जाय यदुवीर ॥ ४४ ॥

—बृहद्दशम. अध्याय ८३.

## ( २ ) कोल्ह्याचें शहाणपण.

पांडवांचा पराक्रम, ऐश्वर्य व गुण हे वाढत चालल्यामुळें धृतराष्ट्रास दुर्योधनादि आपल्या पुत्रांविषयीं चिंता पडली. तेव्हां त्यानें आपल्या राजनीतिनिपुण कणक नांवाच्या प्रधानास शत्रुनाशाचा उपाय विचारिला. त्यानें कोल्ह्याच्या चातुर्याची गोष्ट सांगून त्यानें वाघ, लांडगा, मुंगस, उंदीर या सर्वांस ठकवून स्वहित जसें साधलें तसें तूं साध म्हणून सांगितलें.

'राज्यार्थ शत्रुवध हा पुरुषार्थ' असेंचि बोलिला कणिक ॥
तत्कथितजंबुककथा मात्र कथिन कौतुकें न मी अणिक ॥ १ ॥
कोठें[2] व्याघ्रवृक नकुळ जंबुक मूषक सखे वनीं होते ॥
बहु जपले परि एका मृगकुळपतिला[3] न पावले हो ते ॥ २ ॥
जपति जसे पाडाया व्यसनीं सुजनासि सर्वकाळ विट ॥
तेहि तसेचि, परि करी विफळचि तद्यत्न सर्व काळविट ॥ ३ ॥
चिंता करितां जंबुक त्यांस म्हणे "आचराल जरि सारे ॥
सांगेन सुयुक्ति, तुम्ही स्वेष्टफलप्रद[4] मद्युक्ति परिसा रे! ॥ ४ ॥
या आखुनें करावा क्षत-खुर जेव्हां असेल तो सुप्त ॥
व्याघ्रें मग मारावा मृगवर, पर मंत्र हा करा गुप्त" ॥ ५ ॥

---

१ रुक्मिणीची सखी थट्टा करायच्या वेळेला थट्टा करायचा आपला हक्क कां गमावील!
२ कोणें एके ठिकाणीं. ३ काळविट. ४ आपले इष्ट हेतु सफळ करणारी.

करितां तसेंचि कोल्हा त्यांसि म्हणे स्नान करुनिया खाया ॥
तोंवरि सावध बसतों येथें मी या मृगास राखाया" ॥ ६ ॥
तो स्वार्थ-पंडित असें सांगे तें जेंवि अंबु कमळाला ॥
त्यांच्या मना रुचे, दे न दिसों कपटींद्र जंबुक मळाला ॥ ७ ॥
न्हाउनि येउनि पाहुनि दीन पुसे व्याघ्र, "वद, नवा घाला ॥
पडलासा कां दिससी," सांगे तो म्लान-वदन वाघाला ॥ ८ ॥
फेरु[1] म्हणे परिसावें, "वदला जें किमपि आखु खोटा तें ॥
धिग् व्याघ्रातें माझ्या सामर्थ्यें भरिल आजि पोटातें" ॥ ९ ॥
व्याघ्र म्हणे "हें नलगे घालिन मृग-यूथपीं[2] नवा घाला ॥
देईल या भुजांचें बळ फळ याहूनि पीनें[3] वाघाला" ॥ १० ॥
गेला तो तेजस्वी अभिमानी व्याघ्र भक्ष्य सोडोनी ॥
तों आला आखु तया फेरु म्हणे साध्य भाव[4] जोडोनी ॥ ११ ॥
"वदला 'व्याघ्रामिष[5] विष तुज खाऊंदे,' असेंचि मुंगस, खा ॥
ऐसें कसें म्हणों मी लघु परि तूं मेरुहूनि तुंग[6] सखा ॥ १२ ॥
हें ऐकतांचि वंचकवचन[7] शरण जाय तो बिळाला हो ॥
चित्तीं म्हणे 'न मेलों हाचि महालाभ मज मिळाला हो!' ॥ १३ ॥
वृकही आला त्याला फेरु म्हणे "मज मृगासि रक्षाया ॥
ठेवुनि गेला व्याघ्र स्त्रीसह येणार सर्व भक्षाया ॥ १४ ॥
वांच, मरसि कां लोभें, मांसाशा शीघ्र सांड गा जा गा ॥
हें ऐकतांचि निसटे झाला तत्काळ लांडगा जागा ॥ १५ ॥
मग मुंगसासहि म्हणे "आखु वृक व्याघ्ररायही नकुळा! ॥
म्यां जिंकोनि पळविले तेथें तुज काय लाभ हीनकुळा? ॥ १६ ॥
युद्धीं न भंगितां मज कोण मृगाला शिवे कवळ खाया ॥
मी श्वापदवर आहें, परि तुज नाहीं विवेक वळखाया ॥ १७ ॥
नकुळ म्हणे "आखु वृक व्याघ्रहि जिंकोनि पळविले जेणें ॥
तेणेंसीं न झगडणें येणेंचि भलें, न या मृतें एणें[8]" ॥ १८ ॥
ऐसे मंत्रबळें[9] वृक-नकुळ व्याघ्राखु मोहुनी चवघे ॥
जंबुक निर्भय चित्तें मृगमासाची वनीं सुखें चवघे ॥ १९ ॥

---

१ कोल्हा. २ हरिणांच्या कळपांच्या नायकावर. ३ पुष्ट, चांगलें. ४ साध्य गोष्ट अगर हेतु योजून. ५ वाघाचें मांस. ६ उंच. श्रेष्ट. ७ लबाडकोल्ह्याचें भाषण. ८ हरिण. ९ मसलतीच्या जोरावर.

ऐसेंचि कृतप्रज्ञें साधावें आत्मकार्य नैपुण्यें ॥
अघशमनाऽर्थ करावीं होईल स्वार्थ-सिद्धि तें पुण्यें ॥ २० ॥

—आदिपर्व अ० २७

---

# ( ३ ) हंस व काक यांची स्पर्धा.

पुर्वी सागर-तीरीं साधु नृपाच्या पुरांत एक धनी ।
सन्मान्य वैश्य होता नांदे ज्याच्या स्वधर्म-नीति मनीं ॥ १ ॥
त्या धनिका वैश्याचे होते बहु पुत्र पौत्र गुणवंत ।
त्यातें आशीर्वादें गौरविती सर्वदा सदय संत ॥ २ ॥
त्या वैश्य-कुमारांचें भक्षी उच्छिष्ट एक काक सदा ।
बाळक उदार-मतिनें न वदति वाणी कदापि साध्वसदा[१] ॥ ३ ॥
देती वैश्य-कुमारक मांसौदन सेवया वडे मांडे ।
मधु घृत पायस वायस खाय सदा पक्षियांसवे भांडे[२] ॥ ४ ॥
सागर-तीरीं तेथें आले दैवें कदाचित मराळ[३] ।
जे मुक्ताफळभोजन करिती बिसतंतु भक्षुनि फराळ ॥ ५ ॥
पाहुनि हंसांतें ते बाळ स्वोच्छिष्टपिंडपुष्टातें ।
म्हणती तूंचि विहंगा सर्व-खग-श्रेष्ठ त्या सुदुष्टातें ॥ ६ ॥
गर्वें मूर्खपणें तो मानी बाळोक्त सर्व साचार ।
अधिकचि माजे स्तवनें न विचार करी मलीमसाचार[४] ॥ ७ ॥
गेला उडोनि गगनीं मग नीच सगर्व काक तो त्यांत ।
साधूंत खळ जसा कीं काचमणी परम-शुद्ध मोत्यांत ॥ ८ ॥
जाणे त्या हंसांत श्रेष्ठ जया त्यासि तो म्हणे काक ।
"दोघे उडों, तुझें बळ पाहों दे, मत्समीप ये, ठाक." ॥ ९ ॥
ऐसें वायस वदतां हांसति ते हंस त्या खगापसदा[५] ।
कीं शुद्धासीं मत्सर मूर्ख करी ज्यांत ताप पाप सदा ॥ १० ॥
म्हणती हंस तयातें "गर्व-भरें करिसि वायसा चार ।
आम्हीं मानसवासी सर्व खगांचेहि राय साचार ॥ ११ ॥
आम्हीं सुदूरपाती हंस खगांमाजि पूज्य खगनीचा ।
क्षीरधि-तीर-विहारी जलकेलि करूं नदींत गगनींच्या[६] ॥ १२ ॥

---

१ भीति देणारी. २ श्रीमंताच्या घरचीं उत्तम पक्वान्नें खाऊन मत्त झालेला तो कावळा पक्षिश्रेष्ठांबरोबर भांडूं लागला. ३ हंस. ४ मलीन आचरणाचा. ५ पक्ष्यांतल्या अधमाला ६ आकाशांतील गंगा-मंदाकिनी.

करिसी बरोबरी तूं हंसाची काय वायसाऽपसदा ।
करितो घात तुझा मद, मारीलचि जो गृहांत साप सदा ॥ १३ ॥
रे बलिपुष्टा ! दुष्टा ! कैसा हंसासमेत उडशील ? ।
साहस करितां सहसा स्पष्ट व्यसनार्णवांत बुडशील " ॥ १४ ॥
वायस बहु हंसाच्या हितवचनाची करूनि कुत्सा[1] हें ।
वदता झाला त्यांसीं पुनरपि तो गर्वराशि उत्साहें ॥ १५ ॥
" शत पात[2] जाणतों मी उडेन एकेक पात शतगावें ।
मजसीं उडतां अन्या खगमांचें पक्षिवीर्य न तगावें ॥ १६ ॥
गति शत दावीन तुम्हां तेव्हां माझें कळेल बळ साचें ।
निवडे निकटचि वर्णं, दूर समचि पद्म पुष्प पळसाचें " ॥ १७ ॥
ऐसें पुष्कळ बोले दावी बहु गर्व मूढ तो करट ।
स्तनमान काय पावे जरिहि उरीं वृद्धि पावलें करट ॥ १८ ॥
हांसोनि एक हंस ध्वांक्षासि[3] म्हणे " तुझ्या गती शतशा ।
आम्हीं हंस समस्तहि एकचि गति जाणतों दुज्या न तशा ॥ १९ ॥
जाणें एका गतिला त्याचि गतीनें उडेन आकाशीं ।
माने तिनें उडें तूं, " बोले ऐसें मराळ काकाशीं ॥ २० ॥
तों बहु हांसति जे कीं आले होते मिळोनि तज्ज्ञातीं ।
शतविधगतिहुनि अधिका परि तुच्छा भासली अतज्ज्ञां ती ॥ २१ ॥
" शत-पात-पंडितासीं या अस्मन्मित्रबंधुकाकाशीं ।
हा एकपातमात्रज्ञाता कैसा उडेल आकाशीं ॥ २२ ॥
एका पातांतचि या हंसाला हा स्वबंधु हारवितो " ।
ऐसें हांसति वायस खद्योत परी करि क्षमा रवि तो ॥ २३ ॥
हंस उडे तों त्यासीं स्पर्धेनें कावळा उडे व्योमीं ।
शतघात पातकालय[4] दावी सांगों प्रकार किति तो मी ॥ २४ ॥
उड्डीन प्रमुखें जीं होतीं शतसंख्य ठाउकी पतितें[5] ।
तीं सारीं दाखविलीं हंस-प्रवरापुढेंचि त्या पतितें ॥ २५ ॥
स्व-ज्ञाति-श्रेष्ठाचें गतितांडव पाहतांचि काकांनीं ॥
हर्षभरें नभ भरिलें ' का का का का ' अशा स्वहाकांनीं ॥ २६ ॥

---

१ निंदा, धिक्कार. २ शंभर प्रकारचीं उड्डाणें. ३ कावळ्यास. ४ पापाचें घर असा तो काक. ५ गमनें.

अप्रिय बोलति पुष्कळ हांसति बहु हेळसोनि हंसातें ।
अवमानिती अर्मंगळ खळ ते खगकुळशिरोवेतंसातें[1] ॥ २७ ॥
मृदुपातें हंस उडे काकाहुनि हीनशक्तिसा भासे ।
ऐसें मुहूर्तभरि तो दावी तों काकमंडळी हांसे ॥ २८ ॥
हंसासि काक म्हणती हा हारविलाचि कीं भवज्ज्ञाती ।
आयकिली दुरुनि त्या सर्व मराळोत्तमें अवज्ञा ती ॥ २९ ॥
मग पश्चिम दिग्देशीं शीघ्र शिरे हंस काकही मलधी ।
जिकडे होता कर्णा ! गंभीर अपार खोल तो जलधी ॥ ३० ॥
मागें धांवे वायस हंस पुढें सोडिला जसा तीर ।
स्पर्धेत काक नेणे कीं केवळ दूर राहिलें तीर ॥ ३१ ॥
पक्षांचें बळ सरलें, गर्व मनींचा मनांतचि जिराला ।
घे धाक काक, सागर सर्वत्र दिसे, निराश्रय विराला ॥ ३२ ॥
न दिसे अग नग मग तग गगनीं खग नीच काय काढील ।
चित्तीं म्हणे 'समय हा मज काळाच्या मुखांत वाढील' ॥ ३३ ॥
जाऊनि दूर आला किंवा नाहीं असें फिरे पाहे ।
राहे न करि उपेक्षा हंस खळाचीहि काळजी वाहे ॥ ३४ ॥
आला हंसापासीं प्रतिक्षण क्षीणशक्ति करटपती ।
आतां पडेल ऐसें जाणुनि त्या खावया मकर टपती ॥ ३५ ॥
अवलोकिला मराळें अत्यंतासन्नपतनें[2] पामर तो ।
मग आणिलें मनीं कीं यावरि मीं न करितां कृपा मरतो ॥ ३६ ॥
रक्षावाचि, उपेक्षा व्यसनीं अरिचीहि न करिती संत ।
पाहों नयेचि आंगीं बळ असतां दीन-जंतुचा अंत ॥ ३७ ॥
ऐसें सत्पुरुषव्रत आठविलें मग म्हणे मराळ "अगा ! ।
बहु-गति-चतुरा पतितें शत कथिलीं त्वां स्वयेंचि काकखगा ॥ ३८ ॥
परि जें निजगुह्यपतित आम्हांसि न सांगसीच कां गा तें ।
झालें सख्य परस्पर दूर उडालों नभांत सांगातें[3] ॥ ३९ ॥
वद काय नाम काका या पाताचें शतीं असे हा कीं ।
त्याहुनि वेगळाचि स्पष्ट कथीं मौन एकदा टाकीं ॥ ४० ॥
ये ये झडकरि हा मी हंस तुझी वाट पाहतो करटा ।
या लक्ष-योजनांबुधि परतीरीं आमुचा असे घरटा ॥ ४१ ॥

---

१ पक्षिकुळाला भूषण अशा हंसाला. २ अगदीं पडायला झालेला. ३ बरोबर.

नेत्रीं नाकीं कानीं क्षारोदक, पक्ष जाहले ओले ।
केवळ विव्हळ दुर्बळ तो खळ आर्तस्वरें असें बोले ॥ ४२ ॥
"का का शब्द करूनी भ्रमती त्यांच्या कुळांत मी झालों ।
प्राणोपायन घेउनि तो आतां शरण मीं तुला आलों ॥ ४३ ॥
ते मज सागरतीरीं हंसा दे प्राण-दान दीनातें ।
उडतां व्याकुळ झालों भ्यालों या दुस्तरा नदीनातें" ॥ ४४ ॥
ऐसें वदतां पडला सिंधुजळीं काक धाक पावोनी ।
त्याच्या समीप गेला सदय जनोत्तंस हंस धावोनी ॥ ४५ ॥
हंस म्हणे "रे काका सांगत होतासि पात शत जाणें ।
आत्मश्लाघा ज्यांत, स्मर तें ज्ञाति-प्रमोद-कर गाणें ॥ ४६ ॥
मजहूनि अधिक तूं कीं इतुक्यांतचि भागलासि सांग मला ।
शत-पात-पंडिता तुज हा श्रम अल्पा पथींच कां गमला" ॥ ४७ ॥
काक म्हणे "मीं भक्षुनि उच्छिष्टें फार मातलों बा गा ।
कीं आपणासि मानीं गरुडचि हंसोत्तमा महाभागा ॥ ४८ ॥
त्यां काक अन्य खगही पुष्कळ अवमानिले अदभ्र मदें ।
ऐकविलीं बा तुजही दुर्वाक्यें सज्जन-श्रुति-श्रमदें ॥ ४९ ॥
हो वेट भेट हंसा! असती तूं दक्ष रक्षणीं आंगें ।
पाळिति संत व्यसनीं दीन मुकें बधिर आंधळे पांगें" ॥ ५० ॥
ऐसें वदे रडे बहु खाय गटकळ्या जळांत करि 'का का' ।
धांवे मराळ चरणीं कवळुनि काढी क्षणांत वरि काका ॥ ५१ ॥
वाहे त्या दीनातें पृष्ठीं तो ब्रह्मवाहनहि हंस ।
घेउनि गेला सागर-तीरातें सर्व सज्जनवतंस ॥ ५२ ॥

—कर्णपर्व अ० २८

---

## ( ४ ) ब्रह्मदत्त राजा व चिमणी यांची गोष्ट.

भीष्म म्हणे 'ऐक नृपा[२]! संवाद सुखें सदा करायाची ।
ती पक्षिणी प्रियसखी होती त्या ब्रह्मदत्त रायाची ॥ १ ॥
केला अंधनृप-तनय, कारण कथितों नृपा! तुला याचें ।
त्या नृपगृहांत होतें स्थान पिल्याचें तिच्या कुलायाचें[३] ॥ २ ॥

---

१ नदीचा ईन म्ह. स्वामी त्यातें, सागरातें. २ युद्धिष्ठिरा! ३ घरट्याचें.

निजे[1]-नृप-पुत्रार्थं फळ-द्वय अमृत-स्वादु नित्य ती आणी ।
नाना-देशादि कथा सांगे, बोले मनोहरा वाणी ॥ ३ ॥
न गमे नृपा पळ दिसा गेली ती पक्षिणी जरि चराया ।
सांजे येउनि भेटे बोले सुख होय त्या तरिच राया ॥ ४ ॥
धात्री खेळवि नित्या-परि तो खगबाळ मृदु-शरीर गडी ।
नृपपुत्र एकदा त्या दृढ मुष्टीनें बळें धरी रगडी ॥ ५ ॥
सोडवितां सोडीना कर्म-विपाका न बाळ तो भ्याला ।
शाते केवळ शिशुला किंवा दृढमुष्टि म्हणति लोभ्याले[2] ॥ ६ ॥
राजा धांवुनि येउनि दे त्या वक्षस्थळीं पदें[3] पिल्याला ।
मृत जाणुनि सर्वांगीं शोकातें ज्ञानवान् तदपि त्याला ॥ ७ ॥
साश्रु सखीसुतघातें धात्रीतें शोकतप्ततनु गांजी ।
कीं तीच आपणाला अन्यायें प्राप्ति होय अनुगां जी ॥ ८ ॥
तोंचि फळद्वय घेउनि आली राजर्षिची अनव्यीली[4] ।
सुत मृत पाहुनि खवळे, घातीं योजी जसें मन व्याली ॥ ९ ॥
शोकें रडली पडली किति वर्णावा महाविलाप तिचा ।
नेत्रें फोडुनि करी अंध स्वसुतघ्न सुत इलापतिचा[5] ॥ १० ॥
भूपासि म्हणे 'रे ! श्रित[6]-विश्वस्ताऽरक्षणें पतन नरकीं ।
तेणसि भूतदयेनें विधि-लोकीं जोडिती वतन नर कीं' ॥ ११ ॥
विप्रिय करूनि जाऊं लागे तो ब्रह्मदत्त सुखगीतें ।
विनवी तें परिसावें ज्याच्या होतें अनंत सुख गीतें ॥ १२ ॥
"सखि ! अखिलैं[7]-खिन्नता-हर-सुगुणे मधु-वाणि पूजनीये तें ।
सख्य त्यजुनि न जावें जें कामा स्वर्ग-भूजनीं[8] येतें ॥ १३ ॥
त्यजिला म्या सत्य तुवां त्यागावा खेद, जाहलें नीट ।
सखि ! बहुतां दिवसांचें प्रेम, तयाचा धरूं नको वीट ॥ १४ ॥

---

१ आपल्या पिल्लाकरितां एक व राजपुत्राकरितां एक अशीं दोन मधुर फळें तीं नित्य आणि व अनेक देशाचें वृत्तांत सांगून राजाचें मन रंजवी. २ दृढमुष्टि हें पद बाळ किंवा लोभी यालांच लागेल. बाळ हट्टानें मूठ सोडीत नाहीं, लोभ्याच्या मुठींतला पैसा सुटत नाहीं. ३ त्या पिलाला आपल्या उरावर स्थान दिलें, ( ठेवलें ) व जाणता असूनही शोकाकुल झाला. ४ जुनी मैत्रीण. ५ पृथ्वीपतिचा. ६ आश्रयाला राहून विश्वास ठेवणाऱ्याचें रक्षण न केल्यानें. ७ सर्व दुःखें नाहींशीं करण्यासारखे सद्गुण जिच्यांत आहेत अशी, मधुर भाषिणी व पूज्य अशी. ८ परलोकीं व इहलोकीं जी मैत्री उपयोगी पडते.

वस निज-गृहीं, वदत जा शब्द सुधा-मिश्र, मी न कोप-रत, ।
तूं आपणा करूं मज-लाहि सुधेर्गीं श्रमी नको, परत," ॥ १९ ॥
ऐकुनि भूप-वचन हें गगन-गता ती म्हणे "अगा राया ! ।
झालें विप्रिय यास्तव जात्यें सोडूनि मी अगारा या ॥ १६ ॥
अप्रियकारि जनाचा अणुमात्र धरूं नयेचि विश्वास ।
तुज म्यां त्वां मज पाहुनि सोडावे दीर्घ उष्ण निश्वास ॥ १७ ॥
जेथें विरोध तेथें न वसावें त्यजुनि नीतिची पदवी" ।
ऐसें त्या चटकेला तद्धृदयस्थ प्रभु स्वयें वदवी ॥ १८ ॥
तेथुनि गेलीच खगी देउनि मित्रात्मजासि अंधपण ।
त्यांचें सख्य निरुपमाचि होतें, सरला ऋणानुबंध पण ! ॥ १९ ॥

—हरिवंश. अ. २

---

# ( ५ ) आस्तीकजन्म.

एक जरत्कारु नांवाचा तपोनिष्ठ मुनी होता. त्याचे पितर अधोगतीस जातांना त्यानें पाहिले. कारण विचारतांच त्यांनीं सांगितलें कीं 'तूं विवाह करून वंश चालूं दे' जरत्कारूनें वासुकीनागाच्या बहिणीशीं लग्न लावलें, व ती सगर्भ आहे असें कळतांच, व आपलें वीर्य अमोघ आहे असें जाणून कांहींतरी निमित्त काढून त्यानें तिचा त्याग केला. तिच्या पोटीं आस्तीकऋषि जन्मले.

स्त्रीस मुनि म्हणे, 'अप्रिय करितांचि त्यजिन तत्क्षणीं तुजला ।
विप्रिय सोसी विषयी, हा विषयाकारणें नसे सुजला !' ॥ १ ॥
त्या शब्दें कंपिततनु झाली झंझानिलें जसी कदली ॥
पद्लीना ते साध्वी मान्य करुनि 'बहु बरें' असें वदली ॥ २ ॥
भयचकितता मृगाची, शुनकाची जागरूकता शिकली, ॥
ती इंगितज्ञता ही काकाची, म्हणुनि सेवनीं टिकली ॥ ३ ॥
पत्नी अंतर्वत्नी होतांचि म्हणे मनांत तो 'जावें, ।
हा स्नेहपाश कैसा तोडावा, यासि काय योजावें ?' ॥ ४ ॥
एका समयीं स्त्रीच्या अंकीं ठेवूनि शिर निजे श्रमला ।
साध्वीस तोच अवयव सर्वावयवांत धन्यसा गमला ॥ ५ ॥

---

१ चांगल्या गृहीं, राजवाड्यांत. २ या गोष्टीचें सुंदर रहस्य पुढील आर्यांतच दिलें आहे. ३ पतिसेवा तिनें किती जपून केली तें या आर्येंत सांगितलें आहे. ४ सगर्भ.

संध्यासमयावधि पति निजला न उठे म्हणोनि ते व्याली ।
निद्राभंग कराया न करायाही सती मनीं भ्याली ॥ ६ ॥
निद्राभंग बरा परि न बरा आवश्यकक्रियालोप[2] ॥
करुनि विचार असा जों उठवी तों विप्र तो करी कोप ॥ ७ ॥
"कांगे भुजंगमे, त्वां मजला निद्राभरांत जागविलें ? ।
काय करसील अंकीं शिर ठेवुनि तुज उद्दंड भागविलें ॥ ८ ॥
जातों न साहवे मज ऐसा अवमान पळहि हा कांहीं ॥
गृहसुख पुरे, कळविलें शूळचि उठले शिरांत हाकांहीं ॥ ९ ॥
अस्तासि चालिला रवि संध्याविधि अंतरेल या भावें ॥
म्हणसी जागविलें तरि माझें सामर्थ्य तुज नसे ठावें ॥ १० ॥
मी निजलों असतां बळ कैचें अस्तासि जावया रविला ॥
म्या काय वृत्तांत ख्यात स्वतपः प्रताप हारविला ?' ॥ ११ ॥
दाटूनि दोप ठेवी तो काय किती प्रकार बोलावा ॥
स्नेहाचा निजचित्तीं लेशहि येऊं नदेचि ओलावा ॥ १२ ॥
जातां स्त्रीस म्हणे, 'मी होतों सुखरूप या तुझ्या भंवनीं ।
गेल्यावरि वासुकिला सांगावें योग्य हा जन स्वैवनीं[3] ' ॥ १३ ॥
नमुनि जरत्कारु म्हणे 'नसतां अपराध टाकितां दासी ॥
द्विजराज तुम्ही या अप-वादा कैं याल हर्ष चांदासी ॥ १४ ॥
वासुकिनें ज्या अर्थें या देहें पूजिले भवचरण ॥
अजि वरद, अहो वत्सल, आहे कीं तें नसे तुम्हां स्मरण ' ॥ १५ ॥
विप्र म्हणे 'त्वद्गर्भीं आहे गुणमणिकरंड कवि शिष्ट ।
शापव्याकुळमातुळकुळविपदर्णवतरंडक[4] विशिष्ट ' ॥ १६ ॥
चिंतामणि पेटीला कीं जेंवि निधानकुंभ सुक्षितिला ।
कीं अमृतरस कुपिला बहु गौरव दे तिचाच कुक्षि तिला ॥ १७ ॥
उत्तम समयीं झाला पुत्र तिला, प्रकटतां रवि प्राची ।
जसि शोभे तसि तेणें ती भार्या फार फार विप्राची ॥ १८ ॥
आस्तीक नाम त्याचें ठेवुनि मानानि लाभ लाभाचा ।
वासुकिनें स्वप्राणाहूनि सदा रक्षिला भला भाचा ॥ १९ ॥

—आदिपर्व अ. ५

---

१ सर्पीण, वासुकी नागाची बहिण. २ ब्राह्मणाच्या नित्यक्रियेचा लोप बरा नव्हे. ३ हा जन ( मी ) उत्तम रक्षणास योग्य आहे, माझें उत्तमप्रकारें रक्षण करा असें आपल्या भावाला सांग. ४ शापानें व्याकुळ झालेल्या मातुलकुळाला विपत्तिरूप सागरांतून तारून नेणारी नाव.

# ( ६ ) बळीचें औदार्य.

मग हरि जाय बळिकडे जेथें श्रीनर्मदानदी नांदे ।
जी सहजपान घडतां स्वर्गीं बहु शर्मदान दीनां दे ॥ १ ॥
मखमंडपांत येतां वामन धाम न मुनित्रजीं राहे ।
तेजें धर्षित झाले, ग्रह कोण असा रवीस जो साहे ? ॥ २ ॥
भार्गव सशिष्य उठले सभ्य जनहि अग्निहि स्वकुंडांत ।
देहांत सर्व सात्विकभाव ' नमस्तेस्तु ' वर्ण तुंडांत ॥ ३ ॥
स्वकरें आसन मांडुनि बहुमानें नमुनि बैसवुनि बटुतें ।
गुरुहुनि शतगुण पूजी बळि मेळविता न अन्यजन पटु तें ॥ ४ ॥
श्रीचरण प्रक्षाळुनि वाहे सकुटुंब मस्तकीं सलिला ।
जें शंकरतापापह तीर्थांचें तीर्थ ताप दे कलिला ॥ ५ ॥
कर जोडुनी बळि म्हणे " सर्व ब्राह्मणशिरोमणे आर्या ।
वद वदनें बा आहें मी सिद्ध करावया तुझ्या कार्या ॥ ६ ॥
हें कुळ पवित्र झालें तृप्तीतें आजि पावले पितर ।
श्रितरक्षणपटु हरिसा तूं तुजसम बटु न देखिला इतर ॥ ७ ॥
झाला सफळ क्रतु हा सुहुत हुताशन समस्तही एणें ।
येणें केलें मूर्तें नादें त्वां चित्त म्या दिलें एणें ॥ ८ ॥
अर्थी तूं गोधन गृह कन्या सुग्राम सुगजरथ वाजी ।
घे देतों तीहि करिन सफळा इच्छा असेल अथवा जी " ॥ ९ ॥
बटु बोले " या वंशीं म्हणता निःसत्व याचका नाहीं ।
ऐसा पुरुष परिशिला वृद्धांच्याहि न न याच कानांहीं ॥ १० ॥
प्रल्हादसुत विरोचन तव तात परा घना जसा वायु ।
द्विजवेष सुरांतें दे जाणुनिही सर्व आपुलें आयु ॥ ११ ॥
तूंही सुकीर्तिभाजन हा जन आला म्हणोनि यांचाया ।
त्रिपदपरिमिता वसुधा दे आजि पदें गणूनि यांच्या या ॥ १२ ॥
जगदीश्वरा ! वदान्या ! उचितार्थ परिग्रहांत अघ नाहीं ।
कण तीन चार चातक पी परि होई न तृप्त अवनांहीं " ॥ १३ ॥
भूप म्हणे " द्विजपुत्रा ! वृद्धबहुमता मुखें वदसि वाणी ।
बालिशमति बाळचि तूं, असदासि हि वरिच दिसे सदसिवाणी ॥ १४ ॥

---

१ भृगुकच्छ ( भडोच ) शहरीं बळीनें अश्वमेध यज्ञ मांडला होता. २ तेज. मुनि वामन येतांच निष्प्रभ झाले हा भावार्थ. ३ बळीचे गुरु शुक्राचार्य. ४ वाईट तलवार वरच चांगल्या तलवारीसारखी दिसते, वस्तुतः तशी नसते.

द्वीपचि देणारा प्रभु म्हणसि तया त्रिपदमात्र दे वसुधा ।
गंधचि मागसि त्याला जो पुष्कळ पाजणार देव सुधा ॥ १५ ॥
माझा यांचक व्हावा पूर्णाखिलकाम नित्य सुखवासी ।
तत्सम न चातकहि कीं न परा परि तो घनासि मुख वासी ॥ १६ ॥
घे तूं पटो बटो मजपासुनि मागोनि भूमि वृत्तिकरी[1] " ।
बळि अर्थिवृत्ति चालवि बहु दानें, जेंवि मधुपवृत्ति करी[2] ॥ १७ ॥
वामन म्हणे " प्रिय विषय जितुके या त्रिभुवनांत आहेत ।
तेंहीं अजिता ह्याचा पूर्ण कराया न शकति वा हेत ॥ १८ ॥
जो त्रिपदमहीलाभें संतुष्ट त्रिभुवनेश्वरा ! नाहीं ।
होइल न सनैववर्ष[3] द्वीपेंही पूर्णकाम तो कांहीं ॥ १९ ॥
सप्तद्विपिवराच्या इच्छेनें सर्वदा तळमळेल ।
तृष्णामळें न पावुनि सुविवेका चित्तिचें जळ[4] मळेल ॥ २० ॥
सप्तद्वीपवरेश्वर ऐकतसों पृथुगयादि ही वा ! जे ।
अर्थांहीं कामांहीं तृष्णान्तातें न पावले राजे ॥ २१ ॥
संतुष्ट पुरुष सहजें लाभेंचि सुखें करूनि वर्ततसे ।
होतात असंतुष्टा प्राप्त सकळ लोक असुखगर्त तसे ॥ २२ ॥
भवहेतु असंतोषचि संतोषचि मुक्तिकारणें होतो ।
हाचि अमृतरस दुसरा यापरि फेडी न पारणें हो तो ॥ २३ ॥
जो संतुष्ट यदृच्छालाभें ब्राह्मण सदैवही असतो ।
वाढे तत्तेज असा बहुतेजस्कर नव्हे सुधारस तो ॥ २४ ॥
द्विजतेज असंतोषें शमतेंचि[5] ज्वलन जेंवि तोयांत ।
हालाहलांत दुर्गुण जो जैसा काय तेंवि तो यांत " ॥ २५ ॥
स्मित करुनि बळि म्हणे तो " द्यावें बापा बटो यथाकाम " ।
भूदान द्यावया घे जलपात्र न ओळखोनि तें धाम ॥ २६ ॥
विष्णुमतातें जाणुनि भूदानाज्ञा तया न भार्गव दे ।
वारावया प्रवर्ते निज शिष्यातें प्रवृत्तिमार्ग वदे[6] ॥ २७ ॥
" हा हरि अदितितनय वरिवरि वदतो गोड ऐसा, धाया ।
कपटें पटु बटु होउनि आला अरि देवकार्य साधाया ॥ २८ ॥

---

१ उपजीविका चालविणारी. २ हत्ती मदस्रावानें जसा भ्रमरांची वृत्ति चालवितो तशी बळी याचकांची वृत्ति चालवित असे. ३ नव खंडांसह द्वीपानें. ४ प्रसन्नतारूपजळ. ५ लोपून जातें. ६ संभावितासारखा.

म्हणतो पदत्रय परि व्यापिल हा विश्वकाय विश्वास ।
हो सावधान कपटि प्रभुचा धरितोसि काय विश्वास ॥ २९ ॥
ज्ञानें मला समजलि स्पष्ट कपटबुद्धि विष्णुची गूढा ।
सर्वस्व यासि देउनि मग कैसा वर्तशील रे मूढा ! ॥ ३० ॥
पदयुग भरेल करिशिल मग काय तृतीय बटुपद भराया !
बहुधा तूं विटलासि स्वमनीं मानूनि कटु पदभरा या ॥ ३१ ॥
असुरश्रेष्ठा जेणें होतो संपूर्ण वृत्तिचा अंत ।
ज्यांत विचार नसे त्या दानातें न प्रशंसिती संत ॥ ३२ ॥
कीं वृत्तिमान् पुरुष जे त्यांसि घडे दान यज्ञ तप कर्म ।
बुडतां वृत्ति बुडे जन, जोडावा व्याकुळें कसा धर्म ? ॥ ३३ ॥
धर्मार्थकामकीर्ति स्वजनार्थ विभागितां स्ववित्तातें ।
या लोकीं परलोकीं पुरुषाच्या हर्ष होय चित्तातें ॥ ३४ ॥
असतां दृढमूळ द्रुम सांडुनि आघातही सुखें वांचे ।
मग वरिचेवरि त्याच्या ठायीं फळपुष्पसंपदा सांचे ॥ ३५ ॥
केवळ सत्यें रिक्तचि जन निंद्यचि केवळानृतें होय ।
कांहीं तें कांहीं तें हित धरितां वृद्धनीतिची सोय ॥ ३६ ॥
अनृत वदावें राया ! निःशंकचि वृत्तिसंकटीं नर्मी ।
गोविप्रपरित्राणीं जैंवि विवाहीं, न दोष या कर्मी ॥ ३७ ॥
बळि गुरुसि म्हणे "स्वामी कथिला त्वां धर्म या जना सत्य ।
हृद्रोगशमविता तूं शिष्यांचा सुज्ञराज नासत्य ॥ ३८ ॥
पूर्वी भू वदली कीं 'अतिदुःसह सर्वभार साहेन ।
परि मीं स्पष्ट अनृतपरनरभर परमोग्र पळ न वाहेन' ॥ ३९ ॥
नरक, दरिद्रत्व, पदभ्रंश, मरण, असुखसिंधु हो ! मी तों ।
यां पासुनि भीत नसें जैसा बहु विप्रवंचना भीतों ॥ ४० ॥
जरि याचितार्थ न पवे सुखरोमांचाढ्य आंत वरि काय ।
तत्काळ याचकाचा जें न करी दान तेंहि तरि काय ? ॥ ४१ ॥
साधु करिति सर्वस्वें भूतांचें श्रेय, दे वपु दधीची ।
नेतात साधुची वा याचक संपत्ति मेघ उदधीची ॥ ४२ ॥

१ धर्म, अर्थ, काम, कीर्ति प्राप्त होतात. २ विनोदांत. ३ अश्विनीकुमार. ४ असत्यांत रमलेल्या पुरुषांचा भार. ५ होवो, प्राप्त होवो. ६ या मुनीनें वृत्रासुराचा वध व्हावा म्हणून इंद्रास वज्र तयार करण्यासाठीं आपलीं हाडें दिलीं.

गुरुजी ! कापुनि देतां निजमांसहि उबगला न शिबि[1] कांहीं ।
सुख साधुरीतिंहीं जें दिधलें श्रांतासि तें न शिबिकांहीं ॥ ४३ ॥
ज्या दैत्येंद्रांहीं हे भू भोगिलि मथुनि शत्रु करवाळें[2] ।
त्यांचे गिळिले लोकहि भोगहि, गिळिलें न एक यश काळें ॥ ४४ ॥
युद्धीं देह त्यजिते अनिवर्ती पुरुष जे सुलभ आजि ते ।
अति दुर्लभ सत्पात्रीं श्रद्धेनें सर्वही धन त्यजिते ॥ ४५ ॥
मग या तुम्हां अशांचा करितां परिपूर्ण काम, आंगातें ।
आलें दैन्य यशस्कर कीं अयशस्कर तुम्हींच सांगा तें ॥ ४६ ॥
यास्तव देतों वटुला भूमि पदत्रय तुम्हीं वदा दे हें ।
किति काळ अनुभविल हा शिष्य अनित्यें चळा पदा देहें ॥ ४७ ॥
नसतां अपराध मला जरि हि अधर्में करूनि अरिभावें ।
बहु बंधनादिकेंही गांजिल साहीन तेंहि तरि भावें ॥ ४८ ॥
भ्याला ब्राह्मण झाला त्याचा वध तो नव्हे उचित मातें ।
कीं प्रल्हादयशातें लावावा डाक कां शुचितमातें ?" ॥ ४९ ॥
सुरगण बळितें स्तविती पुष्पांच्या सर्व वर्षती वर्षें ।
कीं जाणोनि हि रिपुला विपुला संपत्ति अर्पिली हर्षें ॥ ५० ॥
वाढे वामन सहसा, कोंदे विश्वांत तनु असा फुगला ।
झाला सङ्ख्योत्सव ज्याला राहेल तो कसा उगला ? ॥ ५१ ॥
होय त्रिविक्रम पुन्हां वामन तो विश्वविरचिता त्वष्टा ।
बळिस अहंकृतिहरणा[3] लावी तिसऱ्या पदाचिया कष्टा ॥ ५२ ॥
गरुड वरुणपाशांनीं, प्रभुमत समजोनि, बळिस करकावी ।
केव्हां ज्वालाहि वितो जो परमोदार जलद करका वी[4] ॥ ५३ ॥
बळिबंधन अवलोकुनि वदले सुरवृंद सर्व ' हा ! हा !' तें ।
वाळमळ जसी माता हरि हरितो दासगर्व हा हातें ॥ ५४ ॥
प्रभुसि बळि म्हणे पुण्यश्लोका मीं तों स्वयें मृषा कांहीं ।
वंचन तुझें करावें या भावें करुनि बोलिलों नाहीं ॥ ५५ ॥
तों ये प्रह्लादप्रभु त्यासि करी बद्ध बळि शिरें नमनें ।
जाणों म्हणे कदा तो गुरुपदपद्मांत अळि शिरेन मनें ॥ ५६ ॥

---

१ श्येनापासून कपोताचें रक्षण करण्यासाठीं. २ तलवारीनें. ३ मीं पृथ्वी व स्वर्ग यांचा स्वामी आहे हा बलीचा गर्व हरण करण्यासाठीं. ४ परम उदार मेघ जो गारा उत्पन्न करितो तो कधीं कधीं ज्वालाही ( विजेच्या ) उत्पन्न करितो.

प्रभुला प्रह्लाद म्हणे " दिधलें होतें तुवांचि पद यातें ।
हरिलें हि तुझेंचि तुवां केवळ कारुण्य होय सदया तें ॥ ५७ ॥
भुलवी ज्ञात्यांतें ही राज्यश्री स्पष्ट होय हाला हो ।
प्रभुजी ! आतां बळिअळि या पदपद्मासवासि हा लाहो " ॥ ५८ ॥
विंध्यावळि[१] विनवाया ये, विधि विनवावयासि जों पाहे ।
तीच्या बहुमानार्थ क्षणभरि चतुरास्य तो उगा राहे ॥ ५९ ॥
राज्ञी बोले " प्रभुजी तुमचेंचि तुम्हासि काय अर्पावें ।
कैसें जी जलदानें जलदानें सागरासि तर्पावें ? ॥ ६० ॥
विश्वाचे उत्पादक परिपालक हेचि चरण संहरिते ।
पडती स्वामी आपण म्हणुनि करुनि दुरभिमान अहं रिते " ॥ ६१ ॥
भगवान् म्हणे " विधात्या माझ्या स्तुति करिति साधुरीतीची ।
आइक, सुधा सुधा जन म्हणती परि काय माधुरी तीची ॥ ६२ ॥
करितों अनुग्रह मनांतूनि जयावरि दयाब्ध मीं हरि तों ।
त्याच्या सर्वार्थातें, न पडों बाया तया भ्रमीं, हरितों ॥ ६३ ॥
अर्थाहीं मद होतां होय पुरुष बहु अनम्र वा धात्या ।
अवमानितो जनातें मातें ही, ती पिशाचबाधा त्या ॥ ६४ ॥
बहु पुरुषजन्म दुर्लभ तेथें अत्यंत सर्वहानिकर ।
पापांचा शापांचा तापांचा होय गर्व हा निकर ॥ ६५ ॥
ऐसा गर्वाचा क्षय माझ्याचि अनुग्रहें अगा धात्या ।
मदनुग्रहेंचि तरले यासि जसे सेतुनें अगाधा त्या ॥ ६६ ॥
आतां गतमद मत्पर झाला हा सविनया विधे यातें ।
देइन जें बहु दुर्लभ हर्षें हासविन या विधेयातें[२] ॥ ६७ ॥
अत्यद्भुत च्छळें या दुसरा जन कोण सत्य न त्यजिता ।
यानें शुचिसत्वबळें हारविलें मज अशाहि अत्यजिता[३] ॥ ६८ ॥
हा बळि सत्वें समधिक या प्रह्लादापितामहापरिस ।
कीं उतरला बहु कसा म्हणसि कसा तरि पितामहा ! परिस ॥ ६९ ॥
प्रह्लादाला होता गुरुचा माझाहि आश्रय पहा, या ।
बळिला एकहि नव्हता मत्कृत अत्यद्भुत छळ सहाया " ॥ ७० ॥
प्रभुवर बळिस स्वमुखें प्रथम महाराज इंद्रसेन असें ।
संबोधन करुनि वदे करुणेच्या प्रीतिच्या द्रवोनि रसें ॥ ७१ ॥

---

१ बळीची स्त्री. २ सेवकास ( बळीस. ) ३ कधीं न जिंकला गेलेल्या ( मला ).

" येथुनि जाउनि हो तूं माझ्या आज्ञेकरूनि सुतलेश ।
सद्भक्ताहुनि अधिक प्रेमास्पद मज गमे न सुत लेश ॥ ७२ ॥
तेथें तुझा पराभव शकतिल न करावयासि लोकेश ।
सिंहाच्या नाकींचा जो पीडिल कोण सत्त्व तो केश ॥ ७३ ॥
निश्चिंत रहा सुतळीं रक्षीन सदा तुला सपरिवारा ।
माता आपण भागे लागोंचि न दे मुलास परि वारा " ॥ ७४ ॥
या सुवरें प्रह्लादप्रभुचा जो पौत्र महिवरेश तदा ।
बद्धांजळि होय बहु प्रेमभरें करुनि गहिंवरे शतदा ॥ ७५ ॥
" परमेश्वरा ! तुज दिलें म्यां त्रिभुवन, काय गोष्टि हे, राहो, ।
ज्याणें न पाहिले हे श्रीचरण, भ्रांति त्याचि येरा हो ॥ ७६ ॥
या हस्तमस्तकांहीं तादृक्सद्भक्तिभाग्यहीनाहीं ।
प्रभुच्या श्रीचरणांला केला सम्यक् प्रणामही नाहीं" ॥ ७९ ॥
ऐसें वदोनि बंधनमुक्त बळि प्रभुसि विधिसि रुद्रासी ।
वंदुनि सुतळीं शिरला पावुनि भगवत्प्रसादमुद्रासी ॥ ७७ ॥
प्रह्लादवंशजीं छळ करि कल्याणार्थ कनकपट तो कीं ।
करितो अहित पदार्थ त्यजवाया स्पष्ट जन कपट तो कीं ॥ ७८ ॥
एवंच वंचक नव्हे करि बहु कारुण्य न च्छल हरी तें ।
प्रभुदृक् दासा पद दे न सुधोदधिचीहि अच्छ लहरी तें ॥ ७९ ॥
राजपदीं स्वर्गपदीं सत्यपदीं किति वृथा बसुनि कुगती ।
मुक्तीहुनी शतगुणें बळिराजाची अधोगतिहि सुगती ॥ ८० ॥

—वामनचरित्र.

---

## ( ७ ) उषा व अनिरुद्ध.

सेवेंत नग-सुतेच्या त्या बाणाची सुता उषा होती ।
पाहे प्रभुसीं क्रीडा देवीची निकटवर्त्तिनी हो ती ॥ १ ॥
इच्छी अनुरूप-सगुण-पतिसीं क्रीडा तसीच ती धन्या ॥
समजे स्मित करुनि म्हणे तीतें ती श्रीहिमाद्रिची कन्या ॥ २ ॥
" वत्से ! करिसिल तूंही ऐशीच प्रियतमासह क्रीडा " ॥
या श्री-देवी-वचन-श्रवणें आलींत पावली व्रीडा ॥ ३ ॥

---

१ सुतल नांवाच्या पाताळाचा राजा. २ जीव, प्राणी. ३ भगवंताच्या प्रसादाचा परमानंद. ४ पार्वतीच्या. ५ शंकराशीं.

पतिलाभ घडेल कधीं ऐसें जों ती उषा मनीं आणी ॥
तेंही समजोनि वदे श्रित-कल्पलता शिवा अशी वाणी ॥ ४ ॥
" जो रमवील स्वप्नीं वैशाखद्वादशी निशा-काळीं ॥
कन्ये ! तो दयित तुझा तूं त्याचें वचन सर्वदा पाळीं " ॥ ५ ॥
सखिया हंसती हंसविति म्हणती "वांछित वर: उखा लाहो ॥
स्वप्नीं लग्नवऱ्हाडी आपणचि सुपात्र हे सुखाला हो " ॥ ६ ॥
करितां पति-प्रतीक्षा झाली बहु काममोहवशगा ती ॥
व्हाया स्वस्था आली श्रीदुर्गेचेंचि भव्य यश गाती ॥ ७ ॥
न निजे, जेवी, सेवी न जळहि तांबूलही न ती चावी ॥
पांडुत्वांतें देह प्रतिपळ अति-शक्तिहीन तीचा वी[1] ॥ ८ ॥
निंदी शीत-करातें सेव्यहि वाटे तिला असेव्य जन ।
आर्द्रेंहि नलगेचि म्हणे भाजितसे तापलें असे व्यजन ॥ ९ ॥
पुसति वयस्या " होतें काय तुला सांग नव्य थारा हो ॥
क्लेशासि स्व-जन-हृदय मृदु हेंहि न आंग न व्यथा राहो ॥ १० ॥
सखि ! न तुझा राहो दे शत्रु-मनामाजि गर्व लव तात ।
यातें शिव-प्रसादें प्रबळहि लोकेश सर्व लवतात " ॥ ११ ॥
प्रभु-जल-केलि विलोकन-समयापासूनि फार मातें तें ॥
दासी कथिति उषेच्या देहीचें व्याकुलत्व मातेतें ॥ १२ ॥
माता धांवुनि आली, प्रिय-कन्येतें विलोकिती झाली, ॥
चित्तीं बहु ती भ्याली, घर्माच्या अश्रूंच्या भरें न्हाली, ॥ १३ ॥
आलिंगी कुरवाळी वदवी परि किमपि ती सुता न वदे ।
दावी चिकित्सकांला[2] तीस परम-भय तिचें सुतानैव[3] दे ॥ १४ ॥
पटुवैद्य वदति देव स्वस्थ रहा ईस लागली दृष्टी ।
कीं अतिसुंदरपण हें न असें अन्यत्र शोधितां सृष्टी ॥ १५ ॥
अभिषेक करा, उतरा सर्षप, लावा मुलीस अंगारा, ।
सांगा राम-कवच-मनु-पाठ, सुधा जवळि असुनि कां गारा[4][5] " ॥ १६ ॥
वदल्या चतुरा नारी " केला देहीं प्रवेश तारुण्यें ।
पति शीघ्र उषेसि मिळो पितृ-वात्सल्यें महेशकारुण्यें " ॥ १७ ॥
त्या उपरि भगवतीनें कथिल्या काळीं उषा सखी-सहिता ॥
निज-हर्म्य-वरीं निजली स्वप्नीं पाहे तसेंचि ती महिता ॥ १८ ॥

---

१ प्रभवे, निर्मी. २ वैद्यांला. ३ अत्यंतकृशत्व. ४ मोहऱ्या. ५ रामरक्षेचे बारा पाठ.

झालें तें नवसंगीं होतात विकार भोगिलीला जे ।
कुळदूषण मानी भी प्रबळेंविटें जेंवि भोगिली लाजे ॥ १९ ॥
कुंभांडसुता रामा तीस म्हणे " सखि ! धरूं नको ताप ।
घडतां स्वप्नीं संग स्त्रीसहि पुरुषासहि नसे पाप ॥ २० ॥
तुज जो कांत शिवेनें दिधला तो त्रिभुवनीं असामान्य ।
सखि ! तूं धन्या कन्या कोण दुजी पति जिंचा असा मान्य ॥ २१ ॥
रामेसि उषा प्रार्थी " प्रियसखि ! न सुचेचि मन्मति भ्रमली ।
तूं सांग उपाय, सुजनजिव्हा नच सांगता हित श्रमली " ॥ २२ ॥
रामा सांगे, " कार्या करिल निजा तेंवि चित्रलेखा या ।
कविनीं न सुमैत्रिहुनी कल्पलतेनें विचित्र लेखाया " ॥ २३ ॥
तत्काळ अप्सरा ती प्रभुपौत्रीनें समीप आणविली ।
पडुनि गळां अतिपीडा वांच्छा निवडूनि तीस जाणविली ॥ २४ ॥
देवी तीस म्हणे " सखि ! हें कार्य अशक्य कीं न कुळशील ।
देशहि लोकहि ठावा परि विरहें तूं उरांत उलशील ॥ २५ ॥
याकरितां लिहितें मी त्रैलोक्यामाजि पुरुष जे महित ।
सुरदानवयक्षोरग-राक्षसगंधर्वमानवां सहित ॥ २६ ॥
देवस्त्री ती आणी पट्टातें सप्तदिन सदा लिहुनी ।
प्रिय संसारांत करी सेविलि संपत्तिहि न सदालिहुनी ॥ २७ ॥
देवासुरादि सुपुरुष जे चित्रपटांत रेखिले होते ॥
सादर सर्व उषेनें वळखाया दयित देखिले हो ते ॥ २८ ॥
नंदाचें भाग्य म्हणे व्रज तारायासि बळ खिलारा ज्या ।
त्या प्रभुचा पौत्र परम सुंदर अनिरुद्ध वळखिला राज्या ॥ २९ ॥
वदली स्मित करुनि उषा ' रतितस्कर हाच साच जाणावा ।
सखि कोणाचा कोण ध्यानीं त्वां प्रथम नीट आणावा ॥ ३० ॥
कुलशील नाम याचें प्रथम मला त्वां अशेष कळवावें ॥
मग मी कथिन उचित तें जन्मुनि पितृयश सये ! न मळवावें " ॥ ३१ ॥
सांगे देवी " ज्याची कीर्ति निववितो सुधा जशी तप्ता ।
त्या श्रीकृष्णप्रभुचा सखि ! अनिरुद्धाख्य होय हा नप्ता[२] " ॥ ३२ ॥
ती तीस म्हणे " सखि ! करि बहुत न लावूनि दिवस भेटि कसी ।
सेवेंत शिवेच्या तूं श्रीलितयोगींद्रे[३] शिवसभे टिकसी ॥ ३३ ॥

---

१ दांडग्या जारानें. २ मातु. ३ परिचय आहे योगींद्र जिच्या.

चित्तांत मरण निश्चय वदतें वाहुन आण जागे हा ।
आल्यें शरण तुला मीं सखि ! पात पाहूनि आण जा गेहा " ॥ ३४ ॥
देवी वदली "जाल्यें म्हणासि मज स्तवुनि साहसी आण ।
करिल भगवती करुणा कीं वदसि मरेन वाहसी आण " ॥ ३५ ॥
वदुनि अशी गुप्तपणें ती प्रभुच्या नित्यनवपुरा गेली ॥
कीं कीर्ति सदुपकारीं करितां श्रमपात्र न वपु रागेली ॥ ३६ ॥
मग ती अनिरुद्धातें पाहे जावुनि रम्यगेहांत ।
ज्याच्या ऊषाविरहज्वर दुःसह सुप्रवृद्ध देहांत ॥ ३७ ॥
उपभोग जिचा स्वप्नीं चिंतित होता उषेसि चित्तांत ।
तद्रूपी तो तैसा लुब्ध जसा हृष्ट नष्टवित्तांत ॥ ३८ ॥
" अनिरुद्धा ! यदुवीरा ! कुशल असे कीं तुला पहायाला ।
आलें दूती होउनि मी बाणसुतासखी वहायाला ॥ ३९ ॥
दिधलासि भगवतीनें जीचा स्वप्नीं तुला समागम ती ।
मत्प्रियसखी उषा पति-विरहें त्या जानकीसमा गमती ॥ ४० ॥
प्राण उषेचे विरहीं यावरि यदुसत्तमा ! न वांचावे ।
ज्ञात्याहि सुरा असुरा स्मरअहि अतिमत्त मानवां चावे ॥ ४१ ॥
बळिसुत शोणितपुरपति बाण तयाची सुता उखा लाहो !
तुज ती तिस तूं लाहे वा हें यश सत्सभासुखाला हो " ॥ ४२ ॥
अनिरुद्ध म्हणे " मज ने सत्य करीं स्वप्न रक्ष तीस मज ।
जी उपकृति अत्यातीं देवि स्वल्पाहि लक्ष ती समज ॥ ४३ ॥
तुज सत्य चित्रलेखे ! वाटो स्वप्नीं विलोकिली परि ती ।
करिती खरी परिसही बहु विकळ मन क्षणक्षणीं हरिती " ॥ ४४ ॥
देवी चित्तांत म्हणे ' पावलि परमेश्वरी, उखा यास ।
चंद्रासि चकोरीसी सेविल, हा जन जगीं सुखायास ' ॥ ४५ ॥
मग अनिरुद्धासि म्हणे ' भेटवितें शीघ्र अंगना चाल ।
दोघे परमानंदें पावुनि अन्योन्यसंग नाचाल ॥ ४६ ॥
श्रीनारददत्ताद्भुत विद्येनें ती तयासि झांकून ।
घेउनि जाय करूं दे कोणा पुरुषस्त्रियांसि कांकूं न ॥ ४७ ॥
शोणितपुरांत ने त्या न धरूं दे विरहनेट वीरा ज्या ।
अनिरुद्धासि उषेसी क्षण करुनि विनोद भेटवी राज्या ॥ ४८ ॥

१ मदनसर्प देवासुरमानवांना ज्ञात्यानांही चावतो.

तों तीस म्हणे " अनघे ! धन घे शोधुनि दिलें उखे नाच ।
दोघे सावध वर्ता जेणें मन लेशही दुखेनाच " ॥ ४९ ॥
श्रीहरिहरांसि वंदुनि गांधर्वं सुज्ञ इष्ट संपादी ।
दुर्गावरविश्वासें सोडी ती सुतनु दैत्यकंपादी ॥ ५० ॥
कांहीं काळ प्रेमें क्रीडा व्रीडावती करी राजा ।
निववी पति संगसुखें कामदहन तापवी शरीरा ज्या ॥ ५१ ॥

—हरिवंश अध्याय ४१.

# ( ८ ) एका कुटुंबावरची पाळी.

पांडव तापसवेषानें आपली आई कुंती इजसह एका ब्राह्मणाचे घरीं राहत होते. त्या नगरीस बकराक्षस फार छळीत होता. त्यास रोज पुष्कळसा साळीचा भात, एक बकरा व एक मनुष्य आहारार्थ लागत असे. प्रत्येक कुटुंबावर एकदा त्या राक्षसाची भूक शमविण्याची पाळी येत असे, तेव्हां कुटुंबांतील कोणी तरी एक मनुष्य बळी द्यावा लागे. पांडव ज्या ब्राह्मणाचे घरीं होते त्या ब्राह्मणावर तशी पाळी आली, तेव्हां सर्व कुटुंब मोठ्या दुःखांत पडलें. ब्राह्मण, त्याची भार्या, त्याची उपवर कन्या व तान्हुला मुलगा यांपैकीं कोणी जावें असा मोठा विचार पडला. अखेर कुंतीच्या आज्ञेवरून भीमसेन ब्राह्मणाच्यावतीनें गेला व बकासुरास मारून ब्राह्मणावरचें व एकंदर नगरीवरचें संकट त्यानें नाहींसें केलें. या प्रकरणांत आश्रयद ब्राह्मणाचा उपकार फेडण्याची कुंतीची उत्सुकता व पांडवांचें औदार्य वर्णनीय आहेतच, पण ब्राह्मण, त्याची स्त्री, कन्या, व पुत्र यांचा संवाद व अन्योन्यप्रेम फार हृदयद्रावक असें कवीनें वर्णिलें आहे. यांत कौटुंबिक नीति ध्वन्यार्थानें फार चांगल्या तऱ्हेनें दर्शविली आहे.

जातां देऊनि अभय निज-जनकाचा पिता[२] महाज्ञाते ।
त्याचि नगरिं द्विजगृहीं होते पाळुनि पितामहाज्ञा ते ॥ १ ॥
सिद्धान्न मातृहस्तीं देती ते वरुनि वृत्ति माधुकरी ।
भीमासि अर्ध देती अर्धाचे पांच भाग साधु करी ॥ २ ॥
होते कांहीं काळ स्वीकारुनि भैक्ष्यवृत्तिला मुदित ।
तों कुंती परिसे त्या आश्रयदब्राह्मणालयीं रुदित ॥ ३ ॥
भीमासि म्हणे ' रडतो दुःखें सकुटुंब विप्र बापा हे ।
मज बहु दुःसह झालें आलें नेत्रासि अश्रु बा पाहे ॥ ४ ॥
आम्ही पक्षी, हें गृह नीड, धरादेव आश्रयागम हा ।
दुःख हरूनि करावी प्रत्युपकृति, होय हाचि याग महा ' ॥ ५ ॥

१ हें प्रकरण मूळ पंतलिखित प्रतीवरून तपासलें आहे. २ व्यास.

भीम म्हणे 'शोध करीं जा स्वमुखें विप्रनायका पूस ।
वारीन दुःख सर्वहि, दहना अतिभार काय कापूस ?' ॥ ६ ॥
द्विज रुदित पुन्हां तप्त श्रुति करि झगटोनि यादवीची तें ।
मोहे मन जेंवि विषां-बुधिच्या भेटोनि यादवीचीतें ॥ ७ ॥
जाय द्विजाकडे ती गाय जसी वासुराकडे मोहें ।
करितां विलाप बोलत होता निज दुःख तेथवां तो हें ॥ ८ ॥
'ज्याये ! वदलीस पर-स्थळगमन विचार सर्वथा राहो ।
माहेर येथ होतें ओळखिती लोक सर्व थारा हो ॥ ९ ॥
गेलों असतों तरि कां पडतें हें प्राणसंकट प्रमदे ।
स्वकुटुंबव्यसन जसें देतें न तसें बुधा विष भ्रम दे ॥ १० ॥
जरि दान तुझें द्यावें कांते मज भासतें तसें तरि तें ।
सिंधूदरीं विकावें स्वहितार्थ तितीर्षुनें जसें तरितें ॥ ११ ॥
पुत्रचि अधिक न कन्या अन्यास गमे, मला न लोभ्याला ।
नयनयुगांतुनि एकहि द्याया स्वप्नीं न कोण तो भ्याला ॥ १२ ॥
देतों निजवपु परि तूं भीरु कसी साहसील विरहातें ।
स्वप्नींहि दुःसहाचि जें म्हणसील मज स्मरोनि चिर हा ! ते ॥ १३ ॥
प्राणाचा त्याग बरा तुमचा न बरा कसा न तो पापी ।
कूपांत बळें अबळां घालुनि ठकवूनि दोर जो कापी ' ॥ १४ ॥
तों ब्राह्मणी म्हणे ' हो कवि साधु तुम्ही करूं नका शोक ।
यन्मूल ' आपदर्थे ' तो शंकरसाचि आठवा श्लोक ॥ १५ ॥
अजि ' आत्मानं सततं रक्षेद्दारैर्धनैरपि,' श्लोकीं ।
तेंचि करा हो, न बुडों द्या हो मज निजमतीसही शोकीं ॥ १६ ॥
पतिपूर्वी स्त्रीस मरण तें लग्नाहूनि काय हो ऊन ? ।
न रहावेंचि सतीनें पळभरहि विरूपकाय होऊन ॥ १७ ॥
रक्षाल तुम्हींच मुलें अबळा वाहील भार जीवा हे ।
रक्षील कसी अन्या नवपूरीं भीरु फार जी वाहे ॥ १८ ॥
जाईन मींच, राक्षस जरि करकर सर्व मानवां चावे ।
दैवें स्त्री म्हणुनि दया येतां मत्प्राण कां न वांचावे ! ॥ १८ ॥

---

१ कुंतीची श्रुति ( कर्ण ) तप्त करी. २ संसारसागरांतून धर्मपत्नी तारून नेणारी नौका आहे असा ब्राह्मणाच्या बोलण्याचा भावार्थ. ३ पुत्रापेक्षां कन्या कमी योग्यतेची असें लोक समजोत, मी तर पुत्र व कन्या हे माझे दोन डोळे आहेत असें समजतों. ४ ' आपदर्थे धनं रक्षेत् दारान्रक्षेद्धनैरपि । आत्मानं सततं रक्षेद्दारैरपि धनैरपि ' ॥

मज भक्षीलचि तो तरि विधुरपणें सर्वथा नका राहूं ।
ती स्त्री मीच म्हणा जी, मागें सारुनिया[1] नकारा, हूं' ॥ २० ॥
ऐसें म्हणतां स्त्रीच्या कंठीं घालुनि मिठी म्हणे 'अयि ते ।
कथमेवमुक्तमदयं तदयं किमनुष्ठितुं क्षमो दयिते' ॥ २१ ॥
परिसे असें पृथा जों तोंचि म्हणे त्यांसि कन्यका 'मातें ।
या, यायाचीचि[2] सुता, हे किमपि नयेचि अन्य कामातें ॥ २२ ॥
आत्मा पुत्र, सखा स्त्री, कन्या चिंताचि सर्वकाळ जिला ।
प्रसवोनि वाहती मनिं श्रीमंतहि पितर सर्व काळजिला ॥ २३ ॥
कन्या रक्ष्य तिघांतुनि एका तुज हो म्हणेल कां ? टाकीं, ।
बापा काव्यानेंचि प्राज्ञ सुखें काढिताति कांटा कीं' ॥ २४ ॥
ऐसें वदोनि कन्या रडवूनि रडे तशांत जवळून ।
खवळूनि उठे बाळक बोले हस्तें तृणासि कवळून ॥ २५ ॥
समजावुनि त्यांसि म्हणे 'ऐसें लाल्लिंचलासि मालीन ।
कां ललतां आललतां पलतां मी सागलांत[3] तालीन' ॥ २६ ॥
हांसविलीं हर्षविलीं व्यसनार्त तिघेंहि बाळ-शब्दानें ।
अब्दानें ग्रीष्मदवाकुळबर्हिकुळें जसींच अब्दानें ॥ २७ ॥
तेव्हांचि पृथा देवी भेटे अभयोक्ति जी वदे त्यांतें ।
संजीवनीच जाणों ती वेगें करुनि जीव देत्यांतें ॥ २८ ॥
कुंती म्हणे 'दिला तुज एक स्वसुत द्विजा नकोचि रडों ।
हा शोकभर स्वशिरीं घेउनि सकुटुंब तूं नको चिरडों' ॥ २९ ॥
कुंती म्हणे, 'मदात्मज गुरुवरमंत्रें असे महातेजा ।
साहों न शकति राक्षस वज्राघातासही सहाते ज्या ॥ ३० ॥
सुरवल्लिचा नव्हे गा क्षुद्रलतागुच्छकासम स्तवक ।
स्पष्ट मदात्मजचरणीं अर्पील प्राणधन समस्त बक' ॥ ३१ ॥
मग विप्रपृथाप्रार्थित भीम धरुनि राक्षसापराध मनीं ।
कोपे, जाणों दहनचि तो होय; प्रार्थना तया धमनी ॥ ३२ ॥
तें मान्य करुनि मुनिला व्हा स्वस्थ असेंचि तो कवि प्रार्थी ।
संसारीं वित्तार्थी तैसेचि कुलीन लोक विप्रार्थी ॥ ३३ ॥

—आदिपर्व अ. ३१

---

१ पंतांची टीप:—'नकारातें मागें सारुन हूं म्हणा.' २ 'अर्थो हि कन्या परकीय एव'—कालिदास. ३ सागरांत.

# ( ९ ) परांगनाधर्षणाचा परिणाम.

कीचकनामा[1] सेनापाल श्याल प्रसिद्ध राजाचा ।
भंगं पाहे कृष्णाव्रत, वांछी अभ्युदय धरा ज्याचा ॥ १ ॥
भगिनीस म्हणे "पूर्वीं आढळली या न हे मला भवनीं ।
वाटे जन्मदरिद्रा झाला बहुकोटिहेमलाभ वनीं ॥ २ ॥
लब्धतदनुमोदन[2] तो जंबुक सिंहीस, कीं सकाम ससा ।
व्याघ्रीस, सतीस बळें, शांतीस वरावयासि तामससा ॥ ३ ॥
रावणसा बहु विनवी प्रेम प्रत्यक्षरींहि नव दावी ।
कीचक नीच कलुषनिधि[3] त्याची आर्यांत गोष्ट न वदावी ॥ ४ ॥
कृष्णा म्हणे "अहाहा ! बुडती तरि भजति नीच कामातें ।
सावध हो, गा वध हो न, व्याली जाण कीचका ! मातें ॥ ५ ॥
पर-दारा मी, मत्पति गंधर्व, प्रबल उग्र शिवशील ।
मागें सरशिल, तरशिल, मरशिल जरि मज बळेंचि शिवशील ॥ ६ ॥
प्रिय पांचजन्य जीस प्रिय तदितर त्या भुजेसि कंबु कसा ।
झिडकारिला सतीनें सिंहीनें दुष्टबुद्धि जंबुकसा ॥ ७ ॥
बंधु भजो, पति न भुलो, म्हणउनि, नसतां परस्व सामान्य ।
ती त्या कार्यासि करी, जरि न करावें पर, स्वसा मान्य ॥ ८ ॥
ती[4] तीस म्हणे "कीचक-सदना जाऊन आण गे हाला" ।
धाडी बळें वृकाच्या घालुनि हरिणीस आण गेहाला ॥ ९ ॥
कृष्णा म्हणे "न जाइन-जेंवि मृगी वृकबिळा-विटागारा ।
साधुगृहा धाड, परम-तमा तत्पथ-शिळा विटा गारा" ॥ १० ॥
विनवी ऐसें बहु परि तीस सुदेष्णा म्हणे तरी 'जाच' ।
फारचि बरी निरयगति[5] परवशता शतगुणें करी जाच ॥ ११ ॥
ती आपणा म्हणे "हे द्रौपदि तुजवरि हरीच विटला गे ।
चुकलीस तूंचि, नसतां पदरीं अघ, पाठिला न विट लागे ॥ १२ ॥
ज्या श्रीकृष्णसखीतें योग्य नमाया सुरासुर सतीतें ।
प्रेषी आणाया ती राज्ञी मानुनि सुरा सुरस तीतें ॥ १३ ॥

---

१ विराटराजाचा मेहुणा व सेनापति. २ भगिनी सुदेष्णेचें अनुमोदन ज्यास मिळालें असा. ३ पापसागर. ४ सुदेष्णा द्रौपदीस म्हणे. ५ नरकवास.

जातां परार्थेही बहु तापातें पावली सुरामा ती ।
न करील कां पित्याची दुर्गतिची माउली सुरा मोती ॥ १४ ॥
कीचक विलोकुनि म्हणे, त्रिजगद्गुरु विष्णुच्याहि आलीस ।
" रंभाचि सुदति तूं या नलकूबर[2] मंदिरासि आलीस ॥ १५ ॥
सर्वस्व अर्पितों तुज देवि, करीं पूर्ण काम, हो दारा ।
विकत मिळतां स्मितसुधलेशें वेशी न कां महोदारा " ॥ १६ ॥
इत्यादि नीच कीचक दुष्कर्मांची धरूनि आस वदे ।
कृष्णा वदे " सुदेष्णे-करितां पात्रीं भरूनि आसव दे " ॥ १७ ॥
तों कर धरुनि खल म्हणे " दासी आहेत फार अन्या या ।
बैसा शयनीं, राज्ञी करिते करवूनि दास्य अन्याया " ॥ १८ ॥
कर आसुडितांचि पडे धडधड वात्यां[3]सवें जसा विटपी ।
कैचें तेज बल तशा दुर्वृत्तीं जो सुरारसा विट पी[4] ॥ १९ ॥
तेथुनि राज्ञीपाशीं जाऊनि म्हणोनि तात अंबरडे ।
फोडी जैशी व्याघ्रवि-मुक्त कुलभ्रष्ट धेनु हंबरडे ॥ २० ॥
कळतां म्हणे सुदेष्णा "नाहींच विचार कीचकीं अधर्मीं ।
सखि उगि, जरि म्हणसिल, तरि करिन तवसुखार्थ बंधुचा वध मी " ॥ २१ ॥
कृष्णा म्हणे " वधावा भ्राता त्वां कां ? तुझा न अपराधी ।
पति गंधर्व न दुर्बल, माझी प्रार्थील किमपि न परा धी " ॥ २२ ॥
जाय निशीथीं साध्वी दावी तिस तत्प्रभाचि वाट तमीं ॥
चित्तांत म्हणे " भीमा ! दयिता ! दयिता नसेन वाटत मीं" ॥ २३ ॥
पाहून म्हणे " भीमा आश्रय तुज काय हें महानस[5] ? हा ! ।
न यशोहानि सहा गा सुज्ञा, सह-काय हेमहान[6] सहा ॥ २४ ॥
साश्रु गळां पडुनि म्हणे " मेलां किंवा तुम्ही अहां सासू ? ।
होतें म्हणत व्याली माझीच रिपुक्षयावहां सासू ॥ २५ ॥

---

१ दुर्गतिची माउली जी सुरा ती पित्याची ( पिणाराची ) माती न करील कां ? सर्व अधोगतीचें मूळ असें जें मद्यप्राशनाचें व्यसन तें मद्यप्राशनाधीन पुरुषाला धुळीला मिळविणार नाहीं काय ? अवश्य मिळवीलच. ११ व्या व १४ व्या आर्यांतले अर्थांतरन्यास मराठींत म्हणी वजा झाले आहेत. २ कुबेरपुत्र. ३ वावटळीबरोबर. ४ हा अर्थ किती खरा आहे. व्यसनी पुरुषाचें सर्व सामर्थ्य जिव्हेंत असतें. व्यसनानें तो तेजोहीन व बलहीन झालेला असतो. ५ स्वयंपाकघर. ६ देहासह सुवर्णहानी सोसा पण यश गमावूं नका.

निजलां काय मृतापरि, व्हा जागे, सिंहसे उठा, राहो।
निद्रा, कीर्ति वरा हो द्वीप्रद हा बाहु भृगुकुठारा हो" ॥ २६ ॥
भीम गडबडोनि उठे अंकींच निवास तीस दे वामीं ॥
चित्तीं म्हणे "बहुदिसां आतळलों या सतीस देवा! मीं ॥ २७ ॥
दयिते कां आलीस? प्रमदे हा आर्द्र कां पदर जाये।
भ्यालीस भीरु, भय कां-भेटे, त्यालाचि कांप, दर ज्या ये[१]" ॥ २८ ॥
देवी म्हणे "पुसतसां जाणुनिही खेद काय मातें हो।
विनवा तुम्हीं तरि सुकृत जें बंधच्छेदका यमा तें हो ॥ २९ ॥
कृष्ण-सखी द्रुपद-सुता धर्म-स्त्री सून पांडुराजाची।
कविगण गणपति गाती कीर्ति सुधासिंधुपांडुरा ज्याची ॥ ३० ॥
कीचक नीच कर तिचा धरि, परि हरिची सखी न अनुसरली।
कर आसुडितां, पडतां खल, तेथुनि दूर ती सुतनु सरली ॥ ३१ ॥
पक्वा बुद्धि करितसे सुयशाची वृद्धि मृत्तिका काची।
हरिनीं श्व-वृत्ति वरिली कीं हंसांनींच वृत्ति काकाची ॥ ३२ ॥
तेज तुम्हां असतें तरि उरता हाणोनि न विट लातेला।
अहितायुला[२] न पीतां तेजस्वी दीप न विटला तेला ॥ ३३ ॥
देवा वांचाया, हे स्त्री, मातीसीच तुडविली, लाजो[३]।
तोहि पती, उद्धरिना अरिनें व्यसनांत बुडविलीला जो ॥ ३४ ॥
हे स्त्री नव्हे, प्रतिष्ठा तुमची, जरि ईस सोडितां पाणी।
'धर्मैचाऽर्थैच' असें वदला कां प्रथम जोडितां पाणी" ॥ ३५ ॥
नेत्रें पुसोनि कवळुनि भीम सतीला म्हणे "उगी न रडें।
अज्ञातवास नसता तरि अरिचें तैंचि मुरडितों नरडें ॥ ३६ ॥
एकांत नृत्यशाला-शयनीं भेटे असेंचि कर, जाये!।
येइल तसेंच माझ्या नृहरीच्या यश जसेंचि करजां[४] ये ॥ ३७ ॥
मुळमुळ रडों नको सति, सीतेसहि सोडिलें न भोगानें।
तेज असोनिहि वरिले कालकृताभ्युदयलय नभोगानें[५] ॥ ३८ ॥
हरि-भक्त-च्छल करितां तत्काल उलेल कां न नीचोर[६]?।
निश्चय सद्वन हरितां निजमार्गे भुलेल काननीं चोर" ॥ ३९ ॥

---

१ मराठी म्हण 'ज्याला दर त्याला डर'. २ शत्रुजीविताला. ३ ही स्त्री लाजो व शत्रूनें व्यसनांत बुडविलीला तारण्याविषयीं असमर्थ जो तिचा पती तोही वांचाया लाजो. ४ नखांना. नृसिंहानें हिरण्यकश्यपूचें उदर जसें नखांनीं फाडलें तसें मीं ( भीम ) कीचकाचें फाडीन. ५ सूर्यालाही कालकृत उदयास्त आहेत. ६ नीचाचें उर.

गांठी तिला पुन्हां तो खल, जेंवि पतंग दीप-कलिकेला ।
प्रार्थुनि म्हणे "सुमुखि मज भज, तुजसीं म्यां चुकोन कलि केला ॥ ४० ॥

सुंदरि विराट राजा नांवाचा जाण, साच मत्स्यप हा ।
शृंगाररसतरंगिणि ! तळमळतो संगमार्थ मत्स्य पहा !" ॥ ४१ ॥

त्यासि खरें भासेसें प्रिये-शिक्षित सस्मित स्वयें वदली ।
परि कांपली सतीची तनु जैसी मंद-मारुतें कदली ॥ ४२ ॥

त्या शून्य नृत्यशाला-शयनीं सांजेचि गुप्त भीम निजे ।
जागति ते स्त्राकारें भुजगांच्या नित्य देति भी मनिं जे ॥ ४३ ॥

जों चाचपी तयाच्या-मृगपतिच्या जेंवि फेरु-आंगातें ।
करितो करकर जाणों म्हणति जडवरासि कां मरसि गा तें ॥ ४४ ॥

"आलों तुज भेटाया घेउनि सर्वस्व हें उपायन हो ।
प्रमदे ! त्वत्प्राप्तिस्तव बहु केला विफल हा उपाय न हो ॥ ४५ ॥

असता दीप तरि सुमुखि ! मानुनि मज मूर्त-मदन रमतीस ।
लटकी म्हणूनि हृदया-माजि न देतीस पद नरमेंतीस ॥ ४६ ॥

हळुच म्हणे भीम "तुम्हीं सुमहागुणनदनदीपं, काशाला ।
दीप ? प्रकाशली कीं पावुनियां वदन-दीपका शाला ॥ ४७ ॥

तुमचें लोकांत अहो कीचक सामान्य काय हो शील ।
परि तूं वरटेसि करट-नीच कसा मान्यकाय होशील ? ॥ ४८ ॥

संगासि उर्वशीच्या स्वप्नीं तरि काय गा ढवा लाहे ॥
सैरंध्री वीर-वधू या तुज नरकाय गाढवाला हे" ॥ ४९ ॥

ऐसें बोलुनियां धूर्त-खलगल बलजलधि तो भला बुकली ॥
पावेल जय कसा प्रभु-सेतुसवें करिल जो अलाबु कली ॥ ५० ॥

प्राणा मुकेल इच्छुनि सिंहीचे गजहि सबहुमान मुके ।
कां न मुके कोल्हा, कां छी म्हणतिल त्या जनाधमा न मुके ॥ ५१ ॥

प्रबलासीं करिल स्त्री-स्तव आमृति कां न नीच मूढ कली ? ।
सुकविहि दशमुख निजतनुसह काल-वृकाननीं चमू ढकली ॥ ५२ ॥

---

१ हें रंगेल भाषण परस्त्रीलुब्धाला योग्यच आहे. २ भीमानें शिकविलेलें. ३ कोल्हा. ४ मला मनुष्य न समजतां प्रत्यक्ष मदन समजतीस. ५ समुद्र. ६ कावळ्यांतला नीच. ७ साजिंद्याला निंदेनें ढवा म्हणतात. ८ धरिला आहे खळाचा गळा ज्यानें असा भीम.

दावी दुरूनि नरकग्रामाची भीम कीचका वेस ।
कलिमाजि लघुत्वप्रद शक्तीस तसेचि नीचकांवेस ॥ ९३ ॥

—विराटपर्व अ. १.

---

१ नीचाच्या क्रोधाला.

# ( ६ ) चक्रीरामायण.

चरित्रीं विश्व रमलें, शमलें सर्व पातक ।
श्रीराम मेघ गमला, भक्त ते मोर चातक ॥ ६ ॥

# चक्रीरामायण.

श्रीरामाचें वारितें पातक सारें नाम ।
सकृदुच्चारें तारितें सर्व पुरवितें काम ॥ १ ॥
पीयूषाहुनि शतगुणें रामाचें यश गोड ।
याचें उदारपण म्हणे मंदारा 'कर जोड' ॥ २ ॥
—दोहा रामायण.

भवाब्धि सुकवी, कविप्रिय करी, करीशतम हा महाद्य हरी ।
सुकीर्ति परमा रमाप मिरवी, रवीडितमहा महास्पद नवी ॥ ३ ॥
—विचित्ररामायण.

श्रीमान् राजशिरोमणि दशरथ जो निजयशें बरा महित ।
द्विजसेवक, यज्ञनिरत, जनभयहर्ता, धरानिकामहित ॥ ४ ॥
—मंत्रमयरामायण.

नरपति अनपत्य होता तया प्राप्त झाली, प्रजा आदरें पाळितां, वृद्धता साधितां
विधिसुतकथित स्वयें ऐकिलें तें सुमन्त्रप्रधानोक्त होय क्षमापाळ तो साधिता ।
हयमख करि, ऋष्यशृंगासि आणूनि तो विष्णुहंसा वदे, पद्मभू[१], 'रावणावायसा
वधुनि सुखिव दिग्रथापत्य हो, ' 'हो' म्हणे देव, पुत्रेष्टि होतां द्रवे, अग्नि दे पायसा ॥५॥
त्रिभुवनपति पायसीं त्या शिरे, दिव्य तें अन्न राजप्रिया ज्या तिघी सेविती सन्मती,
तदुदरभव चार साराकृति श्यामगौरप्रभ प्राज्य तेजस्क सत्पुत्र जे जन्मती ।
प्रथमतनुज कोसलेंद्रात्मजेचा तया 'राम' हें नाम ठेवी महात्मा सुखी तो पिता
परममुदितचित्त होय द्विजांकारणें भूषणें सद्मनें कल्पशाखी तसा ओपिता ॥ ६ ॥
—दंडकरामायण.

कैकेयीच्या पोटा आला, ठेवीं रम्या आख्या त्याला ।
रघुवर दशरथ 'भरत' असि सुकवि, अहितसुख सुकवि, कुगतिसहि चुकवि ॥ ७ ॥
स्वार्या[३] मित्रा तीचे दोघे, तज्जन्में धन्यत्वा तो घे ।
स्तुति शतमख करि, सुगति चरण धरि, जगदघ परिहरि, सुयश भवन भरि ॥ ८ ॥
यत्नामीं[४] लक्ष्माच्या अंतीं ण प्रेमानें घ्यावा संतीं ।
प्रथम तनय नयरत ततगुण शुचि, उचित निपुण निजरुचि[५]जितहिमरुचि ॥ ९ ॥

---

१ चिंता, खेद. २ ब्रह्मदेव. ३ 'सु' आदि जिच्या अशी मित्रा म्हणजे सुमित्रा.
४ लक्ष्माच्या अंतीं 'ण' लक्ष्मण. ५ आपल्या कांतीनें जिंकिला शीतांशु–चंद्र–ज्याणें.

याचा शत्रुघ्नाख्य भ्राता, कैकेयीपुत्रांभिध्याता ।
रघुकुलहितकर, सकलपुरुषवर, नयनहृदयहर, विमलगुणनिकर ॥ १० ॥

—सौभाग्यरामायण.

हर्षे केलीं तदुपनयनें त्यांसि भूदेव शिष्ट
प्रेमें विद्या जपुनि सकळा निर्मळा दे वसिष्ठ ।
तों त्या वृद्धा दशरथनृपा तद्विवाहाधि लागे
विश्वामित्र क्रतुसमवना रामचंद्रासि मागे ॥ ११ ॥
गुर्वाज्ञेनें नृप मुनिकरीं दे सुत प्राण दोघे
त्यांला अस्त्रें शत कथुनियां, सयश प्राज्य तो घे ।
सांगे विद्या प्रथमचि 'बळा' जी निवारी क्षुधेतें
तृड्बाधाघ्नी मग 'अतिबळा' लाजवाया सुधेतें ॥ १२ ॥

—भावरामायण.

कृत्या तसी क्षोभे, पथीं रोधी तपस्याहाटका ।
त्याच्या निदेशें मारिली श्रीराघवें ती ताटिका ॥ १३ ॥
सिद्धाश्रमीं श्रीगाधिज स्वस्थें मनें यागा सजे ।
ते राक्षस व्यापादिले कर्ते बळें आगास जे ॥ १४ ॥

—सुरारामायण.

त्यावरि तो मिथिलेसि महामुनि जाय; पथीं प्रभु गौतमजाया
उद्धरि पादसरोजरजें; बहु जी भ्रमवी मन ती हरि माया ।
त्र्यंबककार्मुकभंग करी क्षितिजाजनकाधि लयाप्रति जाया
कांडहि केवळ होय थिटे अतुळ प्रभुचें भुजसयश माया ॥ १५ ॥
श्रीजनक क्षितिपाळक सत्वर आणवि पंक्तिरथा अतिधन्या
तत्तनुजा चवघांसहि तो अनुजांसह दे चवघी निजकन्या ।
ग्रामगजा अवलोकुनि ये बहु कोप जसा पर दुःसह वन्या
क्रोध करी भृगुराम तसा नच तो वळता प्रभुवांचुनि अन्या ॥ १६ ॥
भार्गवराम पराभवल्यावरि पंक्तिरथ स्वपुराप्रति पावे
पौर असें वदले, 'न सुरद्रुम रामभुजाधिक हे गुरु गावे' ।
मातुळ ने स्वपुरा भरताप्रति दे अनुमोदन भूपति पावे
हे प्रभुचे परमाद्भुत सद्गुण सोडुनि अन्य न मंत्र जपावे ॥ १७ ॥

—सवाईरामायण.

---

१ क्षुधातृष्णा निवारणाऱ्या बळा अतिबळा नांवाच्या विद्या. २ हें 'सूरा' वृत्त हिंदुस्थानी आहे.

दिग्रथाप्रति योजितां युवराज राम करावया
सप्रधान म्हणे वसिष्ठहि, 'हा विचार बरा वया'।
मध्यमा दयिता वदे 'वर दोन हे रुचले मना।
मत्सुता अभिषेक, राम चतुर्दशाब्ज भजो वना' ॥ १८ ॥

—विबुधप्रियरामायण.

हें ऐकतां भूपती पावला ताप
तीतें म्हणे 'काय तूं बोलशी पाप !।
कां चित्त ऐसें कठोर प्रिये ! आज
जालें अमर्याद सोडोनिया लाज ! ॥ १९ ॥

जेष्ठापचायी सुविद्य क्षमाशील
हा टाकितां तूं जनीं निंद्य होशील।
दाता कृती शूर सत्कीर्ति निर्दोष
ऐशा स्वपुत्रीं बरा काय हा रोष ?' ॥ २० ॥

ते निर्दया केकयाची सुता यास
कोपे म्हणे 'कां करीसी वृथायास।
या पुत्रलोभें प्रतिज्ञाव्रतत्याग
कां रूचला ? हा यशाला तुज्या डाग ! ॥ ११ ॥

सत्यासि रक्षी पहा आपला प्रांत[1]
तूं या अवस्थेंत होऊं नको भ्रांत।
येणेंचि होईल अंतीं अधःपात
यामाजि आहे तुझा सर्वथा घात' ॥ २२ ॥

म्हणे राम 'तातार्थ मीं प्राणदान
करीन क्षणें हें मनीं सत्य मान।
त्यजीन स्वयें राज्यदाराधनातें
स्वमातेचिया ही पदाराधनातें ॥ २३ ॥

करी जो अनुज्ञेविणा तातकार्य[2]
जनामाजि तो धन्य सत्पुत्र आर्य।

---

१ शेवट. कैकेयी म्हणते 'तूं पुत्रमोहांत पडून आपलें सत्यव्रत सोडूं नकोस, आपला प्रांत (आत्यंतिक क्षेम, मोक्ष) कशांत आहे तें पहा ! तूं आपलें हित पहा !' कैकेयीच्या उपदेशाप्रमाणें दशरथानें खरोखरच आपला प्रांत (मृत्यु) पाहिला ! ! २ बापाचें मनोगत ओळखून त्याप्रमाणें वागणारा तो उत्तम पुत्र. हा श्लोक किती सुंदर आहे !

दुजा बोलिला मध्यम प्रोक्तकारी
न वर्ते नियोगेंहि जो तो भिकारी'[1] ॥ २४ ॥

—छंदोरामायण.

सकनिष्ठ सदार निघे चरणगति, तयासि तात रथ धाडी ।
सारथि गंगा तरतां त्याजि अजि ! न निषाद खेदही झाडीं ॥ २५ ॥
करि चित्रशृंगशैलीं ऋषि हर्षित, दशरथ त्यजी देहा ।
आजाच्या नगरीचा कैकेयीतनय आणिला गेहा ॥ २६ ॥

—निरोष्ठरामायण.

वंदूनि मातेसिं तेव्हां म्हणे[2] 'आज
गेला असे सांग कोठें महाराज ?'
'स्वर्गासि गेला कुमारा ! तुजा तात'
'अंबे ! अकस्मात झाला कसा घात ?' ॥ २७ ॥
'हा पुत्रशोकेंचि मेला सुता ! राय'
'तो कोणता हें मला सांग हो माय ?' ।
'बंधू नमस्कार सारे करा ज्यासें[3]'
'जाले तया काय ? तो मान्य राजास' ॥ २८ ॥
'स्त्री बंधु घेऊनि गेला अरण्यास'
'कां मानलें हें जनाच्या शरण्यास ?' ।
'वत्सा तुझी तातवाणीच तन्मूळ'
'ऐसें कसें बोलिला भूपशार्दूळ ?' ॥ २९ ॥
'बोले असे भूप मद्वाग्गुणाबद्ध'
'कैची फळप्राप्ति ? कां पीडिला वृद्ध ?'
'व्हावें तुला राज्य तो साधिला काम !'
'हा पापिणी ! काय केलेसि ? हा राम !' ॥ ३० ॥

—साररामायण.

कौसल्या समजावी भरता, बोधुनि गुरुक्रिया करवी, ।
मग जाय चित्रकूटा, तुष्टि भरद्वाज दे बरवी. ॥ ३१ ॥

---

१ आज्ञा झाल्यावरही ती न पाळणारा पुत्र भाग्यहीन कपाळकरंटा समजावा. पितृसंतोष करून खरें स्वहित साधण्याचें भाग्य ज्याचे कपाळीं नाहीं तो भिकारीच खरा ! २ हा माता पुत्रांचा संवाद किती बहारीचा आहे ! ३ कैकेयी रामाचें नांव घ्यायला संकोचते !

प्रभुला वंदुनि साश्रु स्वपित्याच्या कळवि भरत हा निधना ।
राम म्हणे 'हा !' होतां अतिलोभी जेवि हानि धना ॥ ३२ ॥
पिंड पित्यासि दिल्यावरि भरत म्हणे धरुनि पाद, 'या परतें' ।
ऐके न सत्यसंध त्रिदशहितोद्यत दयापर तें ॥ ३३ ॥
'म्यां त्वांहि न लंघावें स्वगुरूक्त, अवश्य शब्दच वदावा, ।
राज्य करीं बा ! येतों मीं सरतां अब्द चवदावा '॥ ३४ ॥
सिंहासनीं बसाया मागुनि घे पादुका, शिरीं वाहे, ।
राहे नंदिग्रामीं अंत्याब्दसमाप्तितें पाहे[१] ॥ ३५ ॥

—आर्यारामायण.

"देउनि अभय मुनींतें, आशीर्वाद प्रसाद जोडून ।
अत्र्याश्रमासि गेले स्वामी तो चित्रकूट सोडून ॥ ३६ ॥
चालति माझ्या मागें लक्ष्मणजी, काननीं, पुढें स्वामी, ।
ग्रामीं तसींच हर्षें चाले पाहोनि आपल्या स्वॉं मी ॥ ३७ ॥
जेंवि भरद्वाज तसे द्रवले पाहोनि तेहि मामाजी ।
झाले अतितर सुखकर, कर जैसे भानुचे हिमामाजी ॥ ३८ ॥
तद्भार्या अनुसूया मजवरि करि सासुमायसी माया ।
स्वकरेंचि अलंकारी, आहे प्रेमासि काय सीमा या ? ॥ ३९ ॥
वेणी घालुनि, लोचनीं निजकरें ती लेववी कज्जल,
लावी चंदन सुव्रता, व्रज गमे गंगाचि तें तज्जळ ।
गुंफी सत्कुसुमें शिरीं, सुरुचिरा माळा गळां अर्पुनी
प्रेमें धर्म कथी, सुधाधिकरसें सूक्तें मला तर्पुनी ॥ ४० ॥
तैसाचि मळवटीं साध्वी सिंदूरतिलक जो लावी ।
तोहि अगतसार सदा, कैसी तत्सुकृतसिद्धि बोलावी ? ॥ ४१ ॥
तो अंगराज चिरकाळ तसाचि ओला
यत्सौरभीं भ्रमरपंक्ति सदैव लोला ।
घ्राणेक्षणांसि म्हणती कुसुमेंहि 'डोला'
वेणी नवीच, न सतीयश शक्य बोला " ॥ ४२ ॥

—सीतारामायण.

---

१ वाट पहात राहिला. २ भरद्वाजास. ३ सीता आपल्या स्वसा-जावांस सांगते ४ धन, राम. ५ कुलीन स्नुषा सासूला आईहून अधिक मानते. ६ नवा, टवटवीत.

राघवें मग विराध तारिला । तन्महोग्रतर शाप वारिला ।
नाशिला सुचिर ताप सांचिला । देवता म्हणति तापसां 'चला' ॥ ४३ ॥
जो स्वतातसख त्या जटायुतें । तो नमी प्रभु शिरें जटा-युतें ।
पीति याचि कवि साधुरीतितें । जी सुधा न असि माधुरी तितें ॥ ४४ ॥

—गद्यरामायण.

गळां पडे शूर्पणखा, परांतें । पाहे वराया, पण खापरातें ।
तो सद्गुणाचा वरिना करंडा । प्रहृष्ट दंडें करि नाक रंडा ॥ ४५ ॥
सौमित्रि खड्गें हरि कर्णनासा । ज्याच्या करीती गुणवर्णना सा ।
पावेल त्या कंवि तशी कुशीला? । पुण्यें न येतां क्षितिच्या कुशीला ॥ ४६ ॥
खरा ससैन्या हननार्थ धाडी । लीले करूनि प्रभु त्यासि ताडी ।
छेदी शिरें सर्व, परांरें फाडी । सेना जनस्थानहि ओस पाडी ॥ ४७ ॥
स्वदुर्गुणें पावुनि ताप, भावा । दशानना ती कथि पापभावा ।
'स्त्रीरत्न घे होवुनि निस्व साहो । न शोक वैरी, मुदिता स्वसा हो' ॥ ४८ ॥
मारीच मायामृग शत्रु दावी । श्री त्यासि हेमाकृति सत्य भावी ।
मागें धराया दयितासि लावी । मनुष्यलीला प्रभुचीच गावी ॥ ४९ ॥
मर्मीं तयातें शर राम हाणी । तों तो खळ श्रीरमणाचि वाणी ।
'हा! हा!' अशी तारतरांत वाणी । बोले, भ्रमे श्री न जशी शहाणी ॥ ५० ॥
सौमित्रितें, भावुनि घात, भीता । 'धांवे' म्हणे, 'पत्यवनार्थ' सीता ।
तो जाणवी सत्य भला, शमाया । तत्त्रास, 'हे देवि! पलाशमाया' ॥ ५१ ॥

—सद्वृत्तरामायण.

सीता वदे, "मदभिलाष तुझ्या मनांत । आलासि यास्तवचि तूं कुजना! वनांत
जा, नीच, नीच, उटजीं कितवा! न राहें । ऐसें कुकर्म न नरा हित, वानरा हें ॥ ५२ ॥
भार्या कसी उचित, जी तुज मायसी ते । !" ती आपणासहि वदे, 'त्यज काय!' सीते! ।
रामाकडे रडत तो धृतताप गेला, । सोडी तिला खग जसा कलुषापगेला ॥ ५३ ॥

—सद्रूकसर्वस्वरामायण.

---

१ जटांनीं युक्त अशा. २ बापाच्या मित्राला बापासारखा पूज्य मानण्याची जी कुलीनांची रीति तीतें. रामचरित्रांत पदोपदीं अशी गोडी लागते की अमृत त्यापुढें तुच्छ वाटतें. ३ ईश्वराला. ४ सहा शब्दें. ५ रामासारखा पति मिळायला सीतेसारखीच पुण्याई पदरीं पाहिजे. ६ शत्रूचें वक्षस्थळ. ७ सामान्यांच्या चरित्रांत काय गोडी? ८ रामासारखी. ९ त्या सीतेची भीति. १० संशयग्रस्त सीतेला क्षणैक गढूळ झालेल्या पण निसर्गशुद्ध अशा गंगेची उपमा किती शोभते! * वृत्तनाम रथोद्धता.

कटु ऐकुनि जों असे रडें द्रुत जाय प्रभुसत्तमाकडे ।
तंव ये दशकंठ, तो यती गमला, सादरबुद्धि होय ती ॥ ९४ ॥
हरि कामसहाय हा यती, वदली शापुनि 'हाय ! हाय !' ती ।
'अजि राघव वीररायजी ! करुणा ती त्यजिलीच काय ? जी ॥ ९५ ॥[1]
त्यजिली कसि कीर्ति ? याच, कीं तुमच्या दैन्य उरे न याचकीं ।
अजि लक्ष्मणजि ! त्वरा करा, यश या स्वाहितजित्वरा करा' ॥ ९६ ॥[2]
अवलोकुनि गृध्रपा वटीं, यश गाया अतिभव्य, शेवटीं ।
वदली, 'निववा दयारसें अजि मामाजि ! पहा उठा' असें ॥ ९७ ॥
करि तो अरितोषहामितें, समरा त्या सुरवृंद वानितें ।
रथ भंगुनि सूत सोडवी, परि त्याचें विधि पक्ष तोडवी ॥ ९८ ॥
अमृताधिकगोडवीक्षण द्विज पावे, सुन सोडवी क्षण ।
परि तोडुनि गृध्रपक्षती हरि अन्यायरणैकदक्ष तो ॥ ९९ ॥

प्रियरामायण.

कोशामध्यें टाकी भूषा, पावे मंदत्वातें पूषा ।
लंकेत स्वारामीं स्थापी, दापी कामी क्रोधी पापी ॥ ६० ॥
राम श्रीविश्लेषें शोका ऐणाच्या तो दावी लोका ।
विश्वाचा जो धाता तो या दे गृध्रेंद्रा ताता तोया ॥ ६१ ॥
ज्या मूर्धा नाहीं तो खाया पाहे स्वामी दे तोखा या ।
दिव्या भक्ता भिल्ली केली श्रीरामें स्वस्थाना नेली ॥ ६२ ॥

—विद्युन्मालारामायण.

पंपातीरीं बोले सीतेतें आठवुनि 'हा !' राम ।
जो साक्षात् सर्वांही दासांचा स्वर्गभूरुहाराम ॥ ६३ ॥

—दिव्यरामायण.

दयिताविरहीं शोकें प्रभुचा काय कोंदिला ।
विलाप सर्व न जना करुणें आयको दिला ॥ ६४ ॥
वनीं विलाप प्रभुचा ज्याचिया श्रवणीं पडे ।
रडे खग मृग व्याघ्र द्रुम वल्ली असें घडे ॥ ६५ ॥

—अनुष्टुप्रामायण.

---

१ हे वैतालीय वृत्त करुणरसाला अत्यंत अनुकूळ आहेच पण त्यांतही या श्लोकांतली पद-रचना किती कोमळ आहे ! २ आपल्या शत्रूंना जिंकणाऱ्या. ३ दयार्द्रदृष्टि जटायु. ४ अशोकवनांत. ५ शबरी. ६ कल्पवृक्ष.

मी सुगल, परंतु पुढें ये भेटे पवनपुत्र विनयानें ।
वाहे पृष्टीं, दे सुख देवांच्या तेंवि लेशहि न यानें ॥ ६६ ॥
अन्योन्य ते परंतु न कटकं मुकुट रत्नहार निष्क पट ।
समदुःखत्वें देती, नरवानरसख्य होय निष्कपट ॥ ६७ ॥
प्रभुसि सुगल देवींचे नग शोकप्रद परंतु ते दावी ।
लावी राम उरासीं, स्वाधिक दुःखी सखे तयां भावी ॥ ६८ ॥
तज्ज्ञ परंतु पुसे प्रभु, सौमित्रि म्हणे, 'मला कळे सेवा,।
नमितां देखत होतों मीं जीं तीं हींच नूपुरें देवा!' ॥ ६९ ॥
सुग्रीव म्हणे 'वानर हृतदार परंतु मी नसे कष्टी ।
तुज देवी भेटवितों, व्यसनीं धृति हितकरीं तमीं यष्टी' ॥ ७० ॥

—परंतुरामायण.

युद्ध कराया हटकवुनि पळें एकशरें शतमुखसख वाळी
सर्वशरण्यप्रवर विभु वधी, त्या सुगळा कपिपति करि, पाळी ।
ऋक्षसुरांशप्लवग मिळविले, ते सुगळें मग महिजनिशोधा
पाठविले हो अवधि करुनिया एकचि मास कथुनि हितबोधा ॥ ७१ ॥
तीन दिशांतें हुडकुनि फिरले, सांगति 'तो खळ दशमुख नाहीं'
त्यांत यमाशा निरखिति हरि जे त्यांहि कळे न कुशळगति कांहीं ।
शोध न लागे, अवधिहि टळला, उग्रसुकंठ म्हणुनि बहु भ्याले
सागरतीरीं प्लवग सकळही सिद्ध मरों अनशन दृढ झाले ॥ ७२ ॥

—तन्वीरामायण.

गृध्रं तारात्मजः प्राह ; 'रावणं रावणालयम् ।
अंतिके यदि वा दूरे यदि जानासि शंस नः' ॥ ७३ ॥
विहंगमपतिः प्राह "लोकान्वेद्म्यखिलानहम् ।
रामस्य यदिदं कार्यं कर्तव्यं प्रथमं मया ॥ ७४ ॥
इतस्तोयनिधे द्वीपे पूर्लंकां शतयोजने ।
तामध्यास्ते विश्रवसस्तनुजो रावणाभिधः ॥ ७५ ॥
तस्यां सा राजतनया रावणांतः पुरे सती ।
रुद्धा वसति लंकायां राक्षसीभिः सुरक्षिता" ॥ ७६ ॥

—संस्कृत मंत्ररामायण.

---

१ लक्ष्मण म्हणतो, 'मीं सीतामातेच्या सर्वकाळ पायांकडे पाहणारा तिचा दास. तेव्हां वरचे अलंकार मी कधींही पाहिले नाहींत, हीं नूपुरें मात्र तिचीं आहेत खास!'

कपि ते श्रीसीतेचा यापरि ऐकोनिया समाचार।
झाले मुदित मनीं परि त्यासि गमे सिंधु रिपुसमाचार॥ ७७॥
'या सागरासि कैसें तरणें? याच्या पलीकडे लंका।
यातें विलंघल्यावरि दिसेल सीता सती गतकलंका॥ ७८॥
कैसें सामर्थ्य असें कोणातें? कोण लंघितो यातें।
मार्गप्रत्यूहातें, नदीपतीतें, अगाधतोयातें!॥ ७९॥
सरसिजभवजृंभोद्भव ऋक्षपती जांबवान् वदे त्यांस।
"मारुति नौका असतां चिंतासिंधूंत जीवदेत्यांस॥ ८०॥
हा तनय मारुताचा, याच्या ऐका अपार वीर्याला।
भक्षित होता परिणतफलमतिनें उपजतांचि सूर्याला॥ ८१॥
हेमधराला ही हा सलील झेलील तूलकंदुकसा।
याचे पुढें धरीना गोष्पदसमतेसि आज सिंधु कसा?॥ ८२॥
व्यर्थचि मनांत धरितां चिंता पावोनि सेतुला याला।
ओजस्तेजें यासम कोणी प्राणी नसे तुला याला॥ ८३॥
याचे भुजदंड महाप्रचंड यमदंड दंडदक्ष महा।
हा वज्रदेह केवळ सुरशत्रुपराजयप्रद क्षम हा॥ ८४॥
हा विजयवीर्यशाली दुर्धर दुर्धर्ष सर्ववीरमणी।
लंघुनि नदीपतीतें शोधील नृपालसूनुची रमणी"॥ ८५॥
ऐसें कंजभवात्मज वदतां तो मारुती महाकाय।
वाढे महेंद्र शिखरीं, वामन बलिराज्यकाम हा काय?॥ ८६॥
कपिनायकप्रमोदासह मारुति वाढला स्वजयकामें।
तद्भारवें महेंद्रासह लवले ते प्लवंग एकामें॥ ८७॥
तों मकरालयलंघनलीलारंभीं म्हणे प्लवंगातें।
'अचलापरि अचल असा करुनि महेंद्राद्रिशृंगसंगातें॥ ८८॥
मी जातों मकरालय लंघुनि देखावयास त्या सतिला।
जैसा मयूरपक्षी सामोरा जाय मेघसंहतिला'॥ ८९॥

—मंत्ररामायण, किष्किंधाकांड.

लंका शोधुनि, चिंता वाहे। मग तीस अशोकवनीं पाहे।

१ शत्रुसारखा. २ विघ्नातें. ३ ब्रह्मदेवाच्या जांभईपासून जन्मलेला. ४ शासनक्षम. ५ मेघमालेला.

तों ये खळ, तत्कुवच न साहे । सुज्ञ म्हणे, 'प्रभुयोग्या आहे!' ॥ ९० ॥
देवी बहु धिक्कारी क्षुद्रा । तो जातां कपि तिस दे मुद्रा ।
श्री सीता चुडामणि अर्पी । आर्धी आशीरमृतें तर्पी ॥ ९१ ॥

—कल्याणरामायण।

आज्ञा आशी घेउनि हर्षे मारुति उपवन मोडी ।
झोडी वनपाळांतें, उर्धे राक्षसकटकें तोडी ॥ ९२ ॥
लीलेनें मारी दणदक्षा शत्रुकुमारा अक्षा, ।
भस्म करी घनरव-भटलक्षा, जेंवि दवदहन कक्षा ॥ ९३ ॥
घननाद ब्रह्मास्त्रासि बळें सांपडतां त्या बांधी ।
ने तातसभेसि, महाकपि न भ्रमविल अरिची कां धी ? ॥ ९४ ॥
कपि बोले, 'श्रीरामप्रभुचा दूत, सती शोधाया ।
आलों बा! तव दर्शन व्हाया हित तुजला बोधाया ॥ ९५ ॥
वांच, शरण चाल प्रभुला, दे प्रभुदार उपायनसे ।
या वांचुनि वांचाया दुसरा तुज सार उपाय नसे" ॥ ९६ ॥
वेष्टविलें वायुज पुच्छ खळें बहुतैलार्द्रपटांनीं ।
पेटविलें, चालविला नगरीं फिरवायासि भटांनीं ॥ ९७ ॥
साधुबिभीषणगृह संरक्षी, लंकेची करि होळी ।
घोळी बहु कटकें हरि, अरि तो 'हाय' म्हणे, करचोळी ॥ ९८ ॥
विझवि समुद्रीं पुच्छ, 'हा' म्हणे सीतालय मानून ।
तीस पुन्हां पाहुनि सुकवि निघे, तो न गमे भोंनून ॥ ९९ ॥
अंगदजांबवदादिकपींतें कुशळ वृत्त आयकवी ।
नायक वीरानंद अतुळ तो त्या वर्णिल काय कवी ॥ १०० ॥

—पंचशतीरामायण.

प्रमुदितहृदय विभु कपिस पसरुनि भुज उठुनि सुचिर दृढ कवळि ।
स्तवुनि बहु तदुपकृतिभर मिरवि, सुयश विखरि, सकळ जग धवळि ॥ १०१ ॥

—लघुरामायण.

शत्रुच्छेदा राम निघाला अति तेज्या । उत्साहातें देति कपींचे पति जे ज्या
पाथोधीच्या उत्तरतीरा अज पावे । ज्याचे पाय त्यागुनि सर्वस्व जपावे ॥ १०२ ॥

---

१ रावण. २ रावणाच्या चाटूक्ति ऐकतांच सीतेनें त्याचा धिक्कार केला हें पाहून मारुति मनांत म्हणतो 'ही सीता देवी रामायोग्य आहे खरी!' ३ सूर्याहून उणा.

ज्याची धर्मीं धी अनुजन्मा हितवक्ता
जो त्या त्यागी रावण धिक्कारुनि भक्ता ।
दावग्रस्ता सोडुनिया जेंवि अरण्या
यावे, तैसा ये नमि तो विश्वशरण्या ॥ १०३ ॥

—मत्तमयूररामायण.

लंकाराज्य बिभीषणा प्रभु दे नमितां पाय ।
कनकाचळचि करी कणा, कृपा वदावी काय ? ॥ १०४ ॥
शर कोदंड प्रभु धरी, सजे म्हणाया 'संप'।
भेटे सिंधु स्तुति करी, नमी चरण धृतकंप ॥ १०५ ॥

—दोहारामायण.

प्रभु करवि पयोनिधींत सेतु । प्रबळ निशाचर राज्यधूमकेतु[१] ।
निववि उतरितांचि शोक, लंका । तुडवि तिच्या कपिराज तो कलंका ॥ १०६ ॥

—पुष्पिताग्रारामायण.

न लवे दशास्य, कथि अंगद या । "प्रभुची न वांछि तव भंग दया ।
कर साम, आजिस न राम सजो । बुडतो अधर्मरत तामस जो" ॥ १०७ ॥
दशतुंड पुंड खवळे, धरवी । परवीर ते वधुनि 'हा !' करवी[२] ।
प्रभुसी भिडे, वरमर्दें खळ हा । बळहानिहेतु उभवी कळहा ॥ १०८ ॥

—वरदरामायण.

दिक्कंठातें सुकंठ प्रथम निरखितां दाखवी तेज, ताडी,
तो दूता अंगदातें धरवि, धरितेयां बाहु झाडूनि पाडी ।
युद्धप्रारंभ होतां बहुबळ खपवी रामकोदंडधारी
बांधी उग्राहिपाशीं धनरव विभुला लक्ष्मणा नाकपारी[३] ॥ १०९ ॥
'हा !' बोले दाखवीतां विकळ महिसुता, दे जटा[४] जी त्रिपूर्वा
ती धैर्या; स्वास्थ्य पावे करपलिहि सती वृष्टिनें जेंवि दूर्वा ।
पक्षीश व्याळमूर्छा उडवि, करि तनू स्पर्शतां अक्षता, तें
ऐकोनि प्रेपिला जो यमसम कलशश्रोत्र[५] तो अक्षतातें ॥ ११० ॥

—सत्कीर्तिरामायण.

समय कठिण जाणुनि घटकर्णा उठवी दशास्य, तो खर्[६]ची ।
तोख रची, सुगळ धरी, हरि मारुतिच्या प्रभा मुखावरची ॥ १११ ॥

---

१ सेतु बांधला हाच रावणराज्याला मोठा अपशकून झाला. २ धरणाऱ्याला. ३ स्वर्गाचा आधिप जो इंद्र त्याचा शत्रु—इंद्रजित. ४ त्रिजटा. ५ कुंभकर्ण. ६ गाढव.

वरेचील काय यूथप, तत्कर्णघ्राण सगळ तोडि खळ ।
तो डिखळ तेंवि रगडी, त्या मारी स्वजनवज्रकवच पळ ॥ ११२ ॥
चपळत्व गांठि पडतां न करूं दे जेंवि हरिस शरभ वनीं ।
शर भवनीं अरिच्या 'हा !' प्रभुचे म्हणविति, निवें जयें अवनी ॥ ११३ ॥
अवनीं स्वबळाच्या पळ करुनि घनरवेंहि पाडिले शवसे ।
लेश वसे न कपिबळीं धृति, केले प्रभुहि विकळ मानवसे ॥ ११४ ॥

—दासरामायण.

दुर्वासनाशल्य ज्याचें हरि नाम
तो प्राकृतें काय शल्यें श्रमी राम ? ।
या मेघनादासही दे प्रभु ख्याति
याच्या प्रसादेंचि वातात्मजा गाती ॥ ११५ ॥
औषध्यगाचें महाशृंग खाणून
तत्काळ अत्यंत दूरून आणून ।
केले विशल्य प्रभू ते चमूयुक्त
वातात्मजाच्या यशा वर्णिती मुक्त ॥ ११६ ॥
होतांहि बंधुप्रधानात्मज प्रेतें
सामाकडे तो न दिकंठ दे चेत ।
घाली सतीकंठनाळीं रणीं घाय
दे शक्रजित् सर्वसेनामुखीं 'हाय !' ॥ ११७ ॥
माया असें जाणवी, हर्ष न स्तोक
दे कुंभकर्णानुजन्मा हरी शोक ।
श्रीलक्ष्मणें मारिला तो महामाय
आनंद लोकत्रयींही न हा माय ॥ ११८ ॥

—रमणीयरामायण.

रडे पुत्रशोकें सुराराति, मोहें
पडे, पाप योजी मनामाजि तो हें ।
'घडे जीमुळें नाश हा ती वधावी ।
जडे या न कंठा, कृपाणा बधावी !' ॥ ११९ ॥

---

१ वरकड. २. मृत. ३ जी मला स्पर्श करूं देत नाहीं ती खड्गाला तर देईल कीं, नाहीं. बधावी=भ्यावी.

अकस्मात् पुढें देखतां खड्गपाणी
भयें राघवाची म्हणे हाय राणी ।
सुपार्श्वप्रधान स्वयें त्यास वारी
फिरे वायुनें मेघसा वासवारी ॥ १२० ॥
'वधा राम, सौमित्रि, सुग्रीव, भक्षा,'
म्हणे राक्षसांतें, 'निघा, राज्य रक्षा, ।
उठा दाव घ्हा शत्रुच्या सैन्यकक्षा,
भिडा, जानकीचें जडो वक्ष वक्षा ! ॥' १२१ ॥
न त्या ऐकवे बायकांच्या विलापा
न कंठे पुरीं राक्षसांच्या इलापा[1] ।
मनाचा खचे सर्व थारा, मराया,
वधाया निघे सर्वथा रामराया ॥ १२२ ॥
करी रावण क्रव्यभुक् सर्व गोळा
म्हणे 'हूं,' बघा वीर हो ! शत्रु घोळा'
वदे त्यांसि सुग्रीव, 'धूळींत लोळा ;
रणीं भग्न व्हा, दांत खा, हात चोळा[2] !' ॥ १२३ ॥

—सुरारामायण.

प्रभुसह खळ भांडे तो अहोरात्र सप्त,
त्रिदश, मुनिहि, झाले युद्ध पाहोनि तप्त !
उडवि शर शिरें जों तोंचि आलीं नवीनें
बहु नवल कथावें काय हो ! तें कवीनें ? ॥ १२४ ॥
प्रभु करि बहुचिंता, जो श्रितस्वांत शोधी[3]
'रविहृदय' जपाया तो अगस्त्यर्षि बोधी ।
दिनकर वर दे, या ईश्वरातें घडाया
विजय, अरि पडाया, कीर्ति विश्वीं जडाया ॥ १२ ॥
कुळकरमिहिराशी[4] घे असी मारणातें
करुनि सुख सुरांतें दे असीमा रणातें ।
रघुपति वर बाण, ब्राह्म योजूनि सोडी
कठिणतर अरीचें वक्ष तत्काळ फोडी ॥ १२६ ॥

—रामायणपीयूष.

---

१ राजा, इला म्ह० पृथ्वी. २ रावणाचा त्वेष व सुग्रीवाचें त्यावर अधीक त्वेषाचें उत्तर हीं चांगलीं साधलीं आहेत. ३ जो राम आश्रितांचें अंतःकरण शुद्ध करितो. ४ आपल्या कुळाचा जो मूळ पुरुष सूर्य त्याचे आशीर्वाद.

अशेष सुर हर्षले, कुसुमराशितें वर्षले;
जयध्वनिहि माजले, अमित दुंदुभी वाजले ।
बहु प्रभुयशोरतें नटति अप्सरांचीं शतें
सुरर्षिसह पर्वतें, महित गाति गंधर्व ते ॥ १२७ ॥
बिभीषण विभुप्रिया करि बरी दशास्यक्रिया
तयापरिस हा अर्या प्रभु, न गाति कां या अया ? ।'
अरीसहि महोदया अजित दे, न सोडी दया
म्हणे, 'करिन भव्य या', गति सुखें वरा अव्यया ॥ १२८ ॥
बिभीषण वरासनीं बसविला; मग क्ष्मासुता
तया पुसुनि आणवी स्वदयिता त्रिलोकस्तुता ।
स्वदिव्यचरितें हरी जडजनापवादास तीं
निवे प्रियतमांकगा द्रुहिणपूज्यपादा सती ॥ १२९ ॥
प्रियार्थ विभुच्या हरी उठवि सर्व मेले हरी,
समाधिरत आदरा स्तुति, म्हणे तदा 'हा !' दरी ।
बिभीषण सभंजना विनवि त्या रमाभाजना
नये, भरतकामना न पुरतां, प्रभूच्या मना ॥ १३० ॥

—पृथ्वीरामायण.

यश मेळवी धवळ । जेंवी सुधेचा कवळ ।
शीघ्र आणवी जवळ । पुष्पका वहावया ॥
रक्षःकपीशांचा हेत । जाणुनी तयांचें चेत ।
हर्षवी सैन्यासमेत । त्या सख्यांतें घेउनी ॥
सदार सानुज राम । पुष्पकीं विश्वाभिराम ।
भक्तकल्पद्रुमाराम । बैसे स्तुती सेवुनी ॥
युद्ध वियोगचरित- । -सुधा कर्णांत भरित ।
जाय गुहेतें त्वरित । ..न त्या नेउनी ॥ १३१ ॥
श्रीचा पुरवाया काम । तारेतें आणवी राम ।
मुख्य स्त्रियांसह धाम । सोडुनी ती पातली ॥
श्रीतें सांगे शत्रुघूक- । सूर्य, "तो हा ऋष्यमूक ।
जेथें वियोगाची हूक । सुग्रीव मंत्रें शमे ॥

---

१ रामास संमत अशी. २ भाग्यवान्. ३ कल्याण. ४ सीता. ५ इंद्र वानर उठवी.
६ अभ्यंगस्नानादिकांचा महोत्सव करण्याविषयीं.

हे पंपा सरसी जाण । येथें तापले मत्प्राण ।
त्वद्विश्लेषीं काम बाण । हाणी, काळसा गमे ॥
कांते ! हा मतंगाश्रम । येथें गेला माझा श्रम ।
शबरी उडवी भ्रम । चित्तींचा, मनोरमे ! ॥ १३२ ॥
या गोदेतें प्रणिपात । करी, तीर्थ तीर्थव्रात ।
इच्या पोटीं म्हणे 'मात- । स्व त्वं महादये !' ॥
कुंभजाचा मनोरम । शरभंगाचा आश्रम ।
हा अत्रीचा जेथें श्रम । आमुचा न राहिला ॥
गंगेतें डोळे भरून । पहा नमन करून ।
संकटाब्धीतें तरून । आलीस इच्या बळें ॥
हें गुहाचें शृंगवेर । साकेत सीते ! तं हेर ।
नमस्कारी वाटे येर । पूर यापुढें दुजे ॥ १३३ ॥

—धनाक्षरीरामायण.

रघुपति म्हणे 'हा तीर्थेंद्र प्रयाग, असा धुतो
दुरित; भजतां यातें होतोचि साधु असाधु तो ।
सतत यमुना गंगा संगा न सोडिति याचिया
म्हणति पतिता जीवां 'तारूं पळांतचि या चि या !' ॥ १३४ ॥
उतरुनि भरद्वाजा वंदी, मुनींद्र गळां पडे
दशरथ तसा प्रेमें गोंजारुनि प्रभुला रडे ।
पवनतनया धाडी स्वामी गुहाभरताकडे
पर किति सुखी त्या योग्यांचें समाधिजही दडे ॥ १३५ ॥

—सच्छ्राव्यरामायण.

त्या प्रयागसत्पदीं मुनीस हर्ष दे, वसे;
विप्र तच्छिरीं करीति पुष्पवर्ष देवसे ।
भक्तवत्सल[1] स्वबंधुनिश्चयासि आठवी
सूचवावया स्ववृत्त मारुतीस पाठवी ॥ १३६ ॥
तो[2] वदे, "तुला विलोकितांचि सर्व पावलें
नाशितील बा ! तुझीं सुरद्रु गर्व पावलें ।
रामहंसमानसा ! रघूत्तमालिसारसा !
सार साधिलें यश, ज्ञ[3] या करी पसा रसा" ॥ १३७ ॥

---

१ हा रामभरतभेटीचा व अयोध्येंत परत जाण्याचा प्रसंग कवीनें फार प्रेमळपणानें वर्णिला आहे. २ मारुती भरतास म्हणतो. ३ बृहस्पति या भक्तिरसाला वांछितो.

श्री वसिष्ठ, वामदेव, मातृवर्ग, नागर
स्वप्रधानसैन्ययुक्त शुद्धसत्वसागर ।
सानुज प्रभूत्तमासि जाय चिंतित क्षण,
प्रेक्षितां दिसे विमान भव्य पुण्यलक्षण ॥ ३८ ॥
होय पुष्पक त्यजूनि, दास तैंवि, पत्ति, तें
जन्ममृत्युच्या, स्वकाळ भासतें, विपत्तितें ।
वाटला विलोकित्यांस गाय वत्सल क्षण
श्रीनिवास, तोहि साधुराय वत्सलक्षण ॥ १३९ ॥
लेवनि पादुका, पदाब्जयुग्म पाहिलें[1]
साधुनें, तयावरि स्वशीर्षराज्य वाहिलें ।
हुंगतां शिरीं दयासमुद्र अश्रु वर्षला
भेटला सुतासि तात तैंवि, राम हर्षला ॥ १४० ॥
वृद्ध जे गुरु प्रधान ते सुखांत घातले,
पातले समस्त पौर दर्शनेंचि मातले ।
भेटले बिभीषण प्लवंगराज सज्जना
सानुजास, पावले सुधासमुद्रमज्जना ॥ १४१ ॥
वासवादि नंदनोत्थ पुष्पवर्ष वर्षले
देवगायक प्रभूसि गाति, फार हर्षले, ।
नाचल्या वराप्सरा मृदंग वेणु वाजले
दिव्य दुंदुभिध्वनीस मेघनाद लाजले ॥ १४२ ॥

—पंचचामररामायण.

अभिषेक महोत्सव होय दया-
निधिचा, म्हणती कवि 'तोयद'[2] या ।
'अमरादिक जीव मयूर, मही
सरसी, सुख तें जळ, ताप अही !' ॥ १४३ ॥
प्रभुचें यश सेव्य सुधासरसें
भुलवी अबुधास बुधास रसें ।

---

१ पुढील तीन श्लोकांत वर्णिलेल्या क्रिया जितक्या जलद झाल्या, तितक्याच त्वरित कवीनें अनेक वाक्यांत तुटक क्रियापदें घालून अर्थ व वर्ण यांची अनुरूपता साधून वर्णिल्या आहेत. २ रामावर मेघाचें रूपक चांगलें साधलें आहे. राम हा मेघ, सारे देव मयूर, पृथ्वी हें सरोवर, जळ तें सुख, व अही तो ताप.

पशु पी रघुपाळकथा नरसा,
वरि सोडुनि बाळक थानरसा ॥ १४४ ॥
—हररमणीयरामायण.

सत्यप्रतिज्ञत्वयश प्रभुनें निज रक्षिलें ।
भक्षिलें वन्य, वेदोक्त गुरूक्त सम लक्षिलें ॥ १४५ ॥
भक्तकल्पद्रुमरामें रामें रंजविलें जग ।
एकादशसहस्राब्द पुर उद्धरिलें मग ॥ १४६ ॥
चरित्रीं विश्व रमलें, शमलें सर्व पातक ।
श्रीराम मेघ गमला, भक्त ते मोर चातक ॥ १४७ ॥
—मंत्रिरामायण.

प्रजा सर्वांहि विमळा विमानामाजि वाहिल्या ।
नेल्या स्वलोका ताराया, कथा श्रोत्यांसि राहिल्या ॥ १४८ ॥
—सप्तमंत्ररामायण.

व्हावें कृतार्थ जंतु, जावें लयासि अघ, यावें महागतिमना
ध्यावें विशुद्ध यश, मावे तरी न जगिं, भावें दशास्यदमना
ध्यावें, स्वतत्व उमगावें, असेंचि शुचि, ठावें असें गुरुमुखें
पावे प्रभो ! म्हणुनि नांवें सदा जपत गावें चरित्रचि सुखें ॥ १४९ ॥
—कविप्रियरामायण.

---

# उपसंहार.

भावें वंदुनि रामचंद्रचरणीं म्यां ग्रंथ हा वाहिला
कीं याचि प्रभुनें प्रपन्न जन जो तो बंधुसा पाहिला ।
उच्छिष्टें बदरें महामखपुरोडाशाधिकें लक्षिलीं
ताराया शबरीस, साधु म्हणती अत्यादरें भक्षिलीं ॥ १५० ॥
सदा गावें सीतापतिरमण हा योग बरवा
रवा या साधी जो जन धरि पराची न परवा ।
रवा नामाच्या भी भव, कलिकथा काय ? गमला
मला न श्रेष्ठाही गुरु म्हणुनि देवर्षि रमला ॥ १५१ ॥
नामातें प्रभुच्या, मयूर विनवी, चित्ता भरी या भरीं
श्रीरामायण गायिलें तरि पुन्हां गावेंचि ऐसें करीं ।
पापाचा परिहार फार बरवा व्यापार हा साधुनी
गावायासि सदैव या मम मुखीं बापा ! रहा साधुनी ॥ १५२ ॥
—रम्यमंत्ररामायण.

---

१ हा श्लोक फार गोड आहे. रामयश शुद्ध अन्न साऱ्यांना प्रिय आहे. रामकथामृत पशूही असोसीनें पितात, व बाळही मातृस्तन्य सोडून याच रसाला वरितात. २ रामयशलुब्ध कवीनें म्हणून तर तें १०८ वेळा गायिलें.

# विविधविषयपर कविता.

कवि म्हणति 'कवन तैसें बहुउद्योगेंहि धन जसें मिळतें ।
जितुकेंचि मिळायाचें अधिक मिळेनाचि एकही तिळतें' ॥ ७ ॥

# ( १ ) द्रौपदीचें सत्व.

दुर्योधनाच्या सांगण्यावरून दुर्वासऋषि पांडवांचें सत्व हरण करण्यासाठीं मध्यरात्रीं येऊन अन्न मागूं लागले. पांडव भयार्त झाले तेव्हां द्रौपदीनें श्रीकृष्णाचा धांवा केला. श्रीकृष्ण आले व थालीस लागलेलें एक भाजीचें पान होतें तें खाऊन ढेकर दिली, तेव्हां विश्वाची तृप्ति झाली. ऋषिही तृप्त झाला पण पांडवांच्या सत्वाला भिऊन गेला व सज्जनाचा छळ पुढें न करण्याची त्यानें प्रतिज्ञा केली. धर्माला श्रीकृष्णानें धीर दिला व धर्मानें स्वभार्येचें फार फार गौरव केलें.

शिष्यायुतयुत[1] भगवान् दुर्वासा गजपुरासि ये राहे ।
सत्संगति सत्फलदा, सुज्ञासि पचे, पचे न येरा हे ॥ १ ॥
प्रार्थुनि धर्में मुनि तो स्नानासि स-शिष्य-कटक पाठविला ।
त्या संकटीं सतीनें श्रितकल्पद्रुम मुकुंद आठविला ॥ २ ॥
स्वमनिं म्हणे ती कृष्णा "श्रीकृष्णा धांव, पाव नाश तदा[2] ।
हीचा होउं न दिल्हा, स्मरतें मज तेंचि पावना शतदा ॥ ३ ॥
नेसविता झालासि प्रेमें तूं करुनियां दया लुगड्या ।
आतां चुडे भरीं बा, आश्रय मज एक तूं दयालु गड्या ॥ ४ ॥
तुजहुनि इतरें कोणें वारावा क्षिप्र अंतराय[3] महा ।
दंडीलचि, साहेल न, देवा! स्वल्पाहि अंतरा यम हा ॥ ५[4] ॥
या मुनिकोपासि जसा लागे न पयाचिया उता वेळ[5] ।
श्रीकृष्णजी, तुम्हीं मज-वरि करुनि दयाचि या उतावेळ" ॥ ६ ॥
स्मरतांचि ये प्रभु, दया सत्य सुरभि, भक्त वत्स, लागावें ।
कांसेसि याचियाचि, त्यजुनि सकळ, याचि वत्सला गावें ॥ ७ ॥
येतांचि दीनबंधुप्रति कळवी ती नमूनि आधींतें[6] ।
भगवान् म्हणे "भुकेलों सखि वाढ मला, असोचि आधीं तें" ॥ ८ ॥
कृष्णा म्हणे, "अहा! बा! वाढावें काय गा पहा हातें ।
क्षाळुनि घातलेंसे आतां कीं पालथें अहाहा! तें ॥ ९ ॥
अन्न मदर्शनावधि रविदत्तस्थालींत[7], मग नसे लवही ।
त्वद्दृष्टि सर्व जाणे, यमधर्माची असी नसेल वही" ॥ १० ॥
कृष्ण म्हणे, "नर्म[9] पुरे तपांया योग्य सर्व थालीला ।
मीच नव्हें काय इची सखि, सुरभि सखीच सर्वथा लीला ॥ ११ ॥

---

१ दहा हजार शिष्यांसह. २ वस्त्रहरणप्रसंगीं. ३ विघ्न. ४ थोडीही चूक हा यमस्वरूप ऋषी सहन करणार नाहीं. ५ स्त्रियांना दुधाचा दृष्टांत सुचणें किती स्वाभाविक आहे! ६ चिंतेतें. ७ थालीपात्र. ८ माझें भोजन होईपर्यंतच. ९ थट्टा, विनोद.

आण वरें पाहोंदे ऐसा आग्रह करूनि आणविली ।
कृष्णेसि सत्सभेसि स्थालीसहि बहु दयाचि जाणविली ॥ १२ ॥
त्या पात्राच्या कंठीं स्वल्पचि शाकान्न लागलें होतें ।
सत्परिचर्येंचि जडही समयीं सत्वासि जागलें हो तें ! ॥ १३ ॥
तो यज्ञ-भुक् तशाही त्या शाकान्नासि वोढवी पाणी ।
कृष्णेकरवी आपण सांगुनि संकल्प सोडवी पाणी ॥ १४ ॥
प्राशुनि म्हणे प्रकट हरि 'विश्वात्मा देव तुष्ट हो येणें' ।
हळुचि म्हणे मुनि किति हे ? घेउनि शतकोटि दुष्ट हो येणें ॥ १५ ॥
अघमर्षणींच तो मुनि झाला आकंठ तृप्त सहसा जे ।
शिष्य अयुतमित होते गार्भिण्यापरि तयांहि सह साजे ॥ १६ ॥
हरिला स्वजन प्राणाधिक, तैसें वित्तही न लोभ्याला ।
चिंतूनि अंबरीषच्छळपरिणामहि मुनींद्र तो भ्याला ॥ १७ ॥
ते शिष्य म्हणति "गुरुजी ! न सुचे कर्तव्य काय तें कळवा ।"
गुरु त्यांसि म्हणे "मळवा यश, परि सत्वर पळा, मला पळवा ॥ १८ ॥
म्यां आजिपासुनि शपथ करुनि नमस्कार सच्छला केला ।
दृग्घित न विषशलाका टाकुनि कर्पूरसच्छलाकेला ॥ २२ ॥
झालों गुरूदर जशा अत्यासन्नप्रसूति गरवारी ।
सच्छळकर्मस्वल्पहि सद्यःक्षयहेतु जेंवि गरवारी ॥ ९३ ॥
त्या श्रीमदंबरीषाहुनि धर्मे तपोबळें नसे ऊन ।
हा मी मंदचि केवळ सच्छळगरळा जळेन सेऊन ॥ २४ ॥
त्यीं पांडुसुतांमध्यें भीम महात्मा उदार बल-सत्वें ।
चारील मुष्टिमोदक आतिथ्यासि न चुकेल अलसत्वें !" ॥ २५ ॥

---

१ द्रौपदीला आनंद झाला कारण तिची चिंता हरिली, सज्जनांना आनंद झाला कारण सतीचें विघ्न टळलें, व थालीला आनंद झाला कारण परमात्म्याचा स्पर्श तिला झाला. २ हात पुढें करी. ३ 'श्रीपरमेश्वरः प्रीयताम्' हा. ४ पापनाशक मंत्र. ५ गर्भिणीसारखे, पोट भरल्यामुळें वर आलेले. ६ सच्छळा नमस्कार केला–साधूच्या छळाला सोडलें; नमस्कार करणें म्हणजे पुरे म्हणणें, नकोसें होणें. ७ दृष्टीनें हित. ८ प्रसूति जवळ आलेल्या गर्भार स्त्रियांप्रमाणें माझें पोट मोठें झालें आहे. श्रीकृष्ण तृप्तीनें विश्वतृप्ति झाली अर्थात् दुर्वासाचेंही पोट अती भरून वर आलें ! ९ विषयुक्त जल. १० या दोन्ही आर्यांत हास्यरस अगर विनोद केवढा भरला आहे !

ऐसें म्हणतचि पळतां प्रबळ भयचि होय बलद दुर्वाशा ।
धांवे लंबोदरसा तो, गळल्या तज्जटाहि दुर्वाशा ! ॥ २६ ॥
झाला होता सानुज तो राजा धर्म चित्रसा साधी ।
सुयश निशीथीं भेटुनि भक्तां पद्मांशि मित्रसा साधी ॥ २७ ॥
देव म्हणे " मी आलों कृष्णेपाशीं मघांचि मज्जन हो ! ।
चिंतितसें कीं स्वप्नीं व्यसनींहि क्षण तुम्हां न मज्जन हो ॥ २८ ॥
कृष्णाचिंतेनें हें संकट मज कळविलें अगा राया ! ।
आलों संरक्षाया धांवत मी आपुल्या अगारा या ॥ २९ ॥
अनिल-समीहित साधी राया, वारा महीवरा, कामा ।
अमलस मीहि तसा, धीरा ! यावा रामही, वरा कां मा " ॥ ३० ॥
ऐसें बोलोनि करी स्वजनघनश्रीद यान दीपकसा ।
भक्तांशि उपेक्षील व्यसनीं तो श्रीदयानदीप कसा ? ॥ ३१ ॥
धर्म म्हणे " मतिमत्ति सति ! संसारामाजि अन्य कुणगा तो ।
केवल अनिष्ट, परि हा बहु धन्य तुझा म्हणोनि गुण गातो ॥ ३२ ॥
तुजविण न दीपिके सति, कृष्णे तरतों नयज्ञहि तमातें ।
करितों जरि तरि गमता कृष्णेतर तों न यज्ञ हित मातें ॥ ३३ ॥
देव तुझा कैवारी शुद्धें प्रेमें तुझ्याचि वळला गे ।
दे धेनु दुग्ध धांवुनि वत्सा, इतरा तदर्थ बळ लागे " ॥ ३४ ॥

—वनपर्व अ. ८.

## ( २ ) श्रीकृष्णाचा रुक्मिणीशीं विनोद.

मोठा विनोद भीष्मककन्येशीं एकदां करी ; तीतें ।
देव म्हणे, " सुदति ! वृथा वरिलें मातें अलोकरीतीतें ! ॥ १ ॥

---

१ सचिंत. २ रात्रीं. ३ या प्रसिद्ध आर्येचा अर्थ: " हे गंभीर पृथ्वीपते ! धर्मा ! वारा जसें अग्नीचें इच्छित साधून देतो, तसें तुझें साह्य करण्यास मीं सदैव तत्पर आहें. प्रसंग पडला तर बळिराम दादाही येतील. मग आम्ही आल्यावर रुक्मिणीही येईल, ती कोण मोठी आहे " ! ३ गमन. ४ स्त्रिया पुरुषमंडळीला न कळवितां गुप्त द्रव्यसंग्रह करितात तो ; सांठा. धर्म म्हणतो ' द्रौपदि ! संसारांत बायका कुणगा करितात तो अनर्थावह असतो. पण तूं आम्हांस नकळत श्रीकृष्णप्रेमाचा जो कुणगा केलास तो मात्र धन्य आहे. ५ कृष्ण भक्तिरूप जो यज्ञ त्याहून इतर यज्ञ. ६ बृहद्दशम अ. ६० मध्यें श्लोकवृत्तांत व मंत्रभागवत स्कंध १० मध्यें आर्यावृत्तांत हा पतिपत्नींचा विनोद पंतांनीं वर्णिला आहे. ७ विलक्षण रीति वर्तनपद्धति आहे ज्याची असा !

भर्ता, योग्य, कुलज, नृप, न वरुनि, मजला वरूनि चुकलीस ।
राजसुते ! चित्रनलिनरतमधुपीसी[1], हितास मुकलीस !" ॥ २ ॥

म्हणे विभु "नृपात्मजे ! गुणवती अशी तूं वरी
नसे उचित मीं पती ! गति मतिभ्रमें[2] ही खरी ।
स्वरूप-अनुरूप तूं सुमुखि ! भूप आतां तरी
वरी ! हित चुके जरी कुशळ तें पुन्हां सांवरी[3] !!" ॥ ३ ॥

वचन नवें अति अप्रिय कानीं पडतां रडे पडेचि सती ।
उचली करुणार्णव[4] कीं दीनाहुनि दीन जाहली दिसती ॥ ४ ॥

तेल जसें उत्तेजन देतें तत्काळ दीपकलिकेला ।
प्रभुचें कृपावलोकन तेंवि तिला; तो हितार्थ कलि केला ॥ ५ ॥

नेली शीघ्र चतुर्भुजें प्रियतमा आंगें पलंगावरी
हस्तें तत्कचभार हार वसन स्वाधार तो आवरी ।
शोकाश्रूंक्षित[5] गल्ललोचनकुचद्वंद्वें पुसी हा वरी
स्वस्था होय तसी दयाचि करि कीं झाली सती घाबरी ॥ ६ ॥

वैदर्भीस म्हणे "प्रियंवद अहो ! मच्छब्द जे हे तुतें
झाले तापकर प्रतप्तशरसे मूर्च्छेसही हेतु तें ।
कांहीं ही मृदुमानसे ! तव मनें नाहींच कीं साहिलें !
म्यां केला परिहास हा सति ! कसी तूं कोपसी पाहिलें ॥ ७ ॥

कसें वदसि पाहसी चलकटाक्षमोक्षेक्षण[6]
प्रिये ! भ्रुकुटिशोभि[7] हें मुख तुझें पहावें क्षण ।
कसें अधरपल्लवस्फुरण लोचनीं शोणता[8]
गृहीं जन तयास यापरिस लाभ तो कोणता ? ॥ ८ ॥

विनोदरससागरीं रमति मीनसे दंपती
अशा कलहसांत्वनीं दिवसयामिनी संपती ! ।
म्हणोनि परिहास हा सहज आजि केला, हंसें
तुझें न मुख; भीतिला न धरि नायिके ! लीलसे[9] !" ॥ ९ ॥

---

१ चित्रांतल्या कमळासीं रत झालेल्या भ्रमरीसारखी. २ ही अवस्था तुला बुद्धीला भ्रम पडल्यामुळें प्राप्त झाली. ३ चतुर मनुष्य चुक झाल्यावर सांवरून घेतो ४ भक्तांचा आधार. ५ शोकाश्रूंनीं भिजलेले ( गाल, नेत्र व कुच ). ६ रागानें लाल होऊन चंचलपणें डोळे मुरडणें. ७ वक्र भुवयांनीं शोभणारें. ८ लालपणा, रक्तिमा. ९ शोभे. १० लाडके ! मजला भुलणारणी.

वैदर्भी त्यागभीति त्याजि, पति पहिले बोलिला जे स्वदोष
त्यांतीं होतेचि, त्यांचीं कथुनि समुचितें उत्तरें दे सुतोष ।
ते कृष्णें बोलवीली प्रियगुण मुरली गोड अत्यंत बोले
श्रोत्यांचें वृंद वृंदावन, हरिहि तयामाजि अद्यापि डोले ॥ १० ॥

# ( ३ ) लक्ष्मीचें स्वयंवर अथवा पतिशोध.

लक्ष्मीला आत्मगुणयोग्य पति पाहिजे होता. म्हणून तिनें सिद्ध, मुनि, देव, दानव या सर्वांत शोध केला, पण तप व वेदाध्ययन करणाऱ्या बहुतेक पुरुषांत तिला दोष आढळल्यामुळें तिला कोणताच वर पटेना. दुर्वास तपस्वी पण कोपिष्ट म्हणून; शुक्र ज्ञानी पण संगविवर्जित नाहीं म्हणून; ब्रह्मदेव व चंद्र मोठे पण कामांध म्हणून; इंद्र समर्थ पण परापेक्ष म्हणून, परशुराम धर्मज्ञ पण निर्दय म्हणून; कार्तवीर्य पराक्रमी पण शांतकीर्ति नव्हे म्हणून; सनक विषयपराङ्मुख म्हणून; मार्कंडेय दीर्घायु पण इंद्रियमारक म्हणून; कनककशिपु गुणवान् पण साधुद्वेष्टा म्हणून; शंकर या सर्वांहून श्रेष्ठ पण अमंगळ व भ्यासूर म्हणून;—याप्रमाणें प्रत्येकांत तिनें कांहीं खोडी काढली. व अखेर या पूर्वोक्त दोषांपासून मुक्त व सर्वगुणसंपन्न अशा भगवान् विष्णूच्याच गळ्यांत लक्ष्मीनें माळ घातली.

श्रीदेवी मग चाले उत्पलमाला[१] सलील धरुनि करीं ।
शोभे सुरासुरगणीं मूर्त मधुश्रीच[२] जेंवि तरुनिकरीं ॥ १ ॥
गंधर्वयक्षचारणसिद्धसुरासुरगणांत ती पाहे ।
कीं आपणासि आश्रय कोण ध्रुव अतुलशुद्धगुण[३] आहे ॥ २ ॥
जेथें जेथें सुतपश्रुतइत्यादीष्टगुण जना दिसती ।
तेथें तेथें पाहे बहुधा दोषांसि ती अनादि सती ॥ ३ ॥
"कोठें शुद्ध तप असे, परि दारुण नाशहेतु कोप महा ।
दुर्वासःप्रभृति तपोधन सुभुजंगमणिकरंडकोपम[४] हा ॥ ४ ॥
कोठें सुरगुरुशुक्रप्रभृतींत ज्ञान बहु असे, परि तें ।
संगविवर्जित नाहीं, परिपूर्ण हि दूषितांबु पात्र रितें ॥ ५ ॥
आहे महत्व बहु परि न द्रुहिणीं चित्तभूजय, न सोमीं[५] ।
भलता वर वरुनि, म्हणे केंवि, सुवर जरि नसे तरि नसो, मीं ॥ ६ ॥

---

१ कमलांची माल. २ वसंताची शोभा. ३ निश्चल व विमलगुणी. ४ सर्पाच्या मस्तकांतल्या मण्याच्या करंड्यासारखा; किंवा महासर्प ज्यांत आहे अशा मणिकरंडकासारखा. ५ ब्रह्मदेव स्वकन्या सरस्वती हिच्यावर व चंद्र गुरुपत्नी तारा हिच्यावर लुब्ध होता.

जरि ईश्वरत्व दिसतें शक्रप्रभृतींत तरि न तें साचें ।
होय परापेक्षे कसा ईश्वर? निववी न पानं फेंसाचें ॥ ७ ॥
जरि धर्म परशुरामप्रभृतींत असे, नसेचि भूतदया ।
निजभर हरिला म्हणवुनि चिंतू कल्याण एकेभू तदया ॥ ८ ॥
कोठें वीर्य असे परि तें परिहरिलें न काळवेगानें ? ।
पित्तें कृतवीर्यसुतसुखवीर्यकथांच्याचि चाळवे गानें ॥ ९ ॥
सनकादि समाधिनिरत, विषयांचें त्यापुढें कसें मांडे ? ।
पतिस्मृतासि कैसें वश करितिल आपुल्या रसें मांडे ? ॥ १० ॥
मार्कंडेयादि असे दीर्घायु, परंतु तें नसो शील ।
सोशील सर्वहि स्त्री, परि इंद्रियदमन हें न सोशील ॥ ११ ॥
जेथें इंद्रियलालन तेथें क्षण भरंवसा न आयूचा ।
काळाचा वेग जना दुःसह, अभ्रासि जेंवि वायूचा ॥ १२ ॥
कनककशिपुप्रभृतिला करिता झाला क्षणांत गट काळ ।
सुगुणहि साधुद्वेष्टा तो केवळ दोषसिंधु फटकाळ ॥ १३ ॥
इंद्रियदमन हि नाहीं, आयुष्याचाहि भरंवसा आहे ।
श्रुत पूर्वोक्त न दोष श्रीरुद्रीं म्हणुनि आणही वाहे ॥ १४ ॥
परि तोहि अमंगळसा मसणीं भूतांत नग्न कां नांदे ? ।
बाळांच्या भस्मभुजंगभूषण हें नाम भीति कानां दे !" ॥ १५ ॥
ऐसा विचार करितां श्री श्रीपुरुषोत्तमासि पाहूनी ।
चित्तीं म्हणे "सुमंगळ वर हाचि, न अन्य धन्य याहूनी ॥ १६ ॥
जरि हा आत्मरत प्रभु, याला माझी नसे तिळहि परवा ।
पर वाहेन वपु पदीं, ऐसा कैचा मिळेल वर बरवा ? ॥ १७ ॥
जावें शरण प्रभुतें, जशि गेली सुरनदी नदीनातें ।
शोभे महत्तमातें आश्रय करितां, न दीन दीनातें" ॥ १८ ॥
यद्यपि आत्मरत प्रभु हरि तरि वरिला, परासि न वरी हो ।
कंठीं घालुनि माळा झाली श्री विष्णुचीच नवरी हो ! ॥ १९ ॥

—अमृतमथन. अ. २.

---

१ इंद्राला शत्रु जिंकायला अप्सरांचें किंवा देवांचें साह्य लागतें तेव्हां त्या परावलंबी देवाला ईश्वर कसें म्हणावें ? २ शत्रुनिर्दळणानें आपलें ओझें कमी झालें म्हणून एक पृथ्वी मात्र तदया ( त्याच्या दैवासाठीं ) त्याचें कल्याण चिंतो. ३ पित्त चाळवे=चित्तक्षोभ होतो. ४ भस्म लावणारा व सर्पमाळा घालणारा म्हणून याचें नांव ऐकूनच मुलें भितात. हा पति केला तर याच्याबरोबर संसार सुखाचा होणार नाहीं हा लक्ष्मीचा भाव.

## ( ४ ) कुलीन सासरा. ( सुनेचें गौरव. )

रावणवधानंतर लोकनिंदेकडे लक्ष देऊन रामानें सीतेकरवीं अग्निप्रवेशाचें दिव्य करविलें; तेव्हां दशरथ विमानांत बसून आले व त्यांनीं आपल्या सुनेचा गौरव केला तो प्रकार सीता स्वमुखानें आपल्या बहिणींस सांगते.

संसारीं असतात साधु कुलज स्नेहाळ्य कैं सासरे;
मामाजी परि एक, यासह दुजा साम्यास कैसा सरे ?
पोटासी धरिले सये ! मज शिरीं हुंगोनिया दाटले,
प्रेमें ताताचि वाटले, नयनिंचे नाहीं झरे आटले ॥ १ ॥
मातें ते वदले, " तुवां उपवनें तैसींच वत्से ! वनें
केली; जे पतिभक्तिसद्व्रत सतीसर्वस्व, तत्सेवनें ।
भर्ता तारुनि संकटीं कविसभा श्रीसंपदे वारिला
विश्वोपद्रव जाहला तव तपें या कंप देवारिला ॥ २ ॥
त्वां सूर्यवंश सुयशें सति ! धन्य केला
वैदेह धन्य तुज पावुनि कन्यकेला " ।
प्रेमें असा मज दिला बहु मान, लज्जा
सांगे मदीय नयनांसि, 'पदींच मज्जा' ॥ ३ ॥

—सीतारामायण.

---

## ( ५ ) टाकावी कीं न टाकावी हे शुद्धचरिता सती ?

" एका रजकाची बायको नवऱ्याशीं भांडून आपल्या माहेरीं गेली. तिचें वागणें अनुचित आहे असें जाणून तिचा सुज्ञ बाप तिला घेऊन तिच्या नवऱ्याकडे आला. ' रावणाच्या घरीं कांहीं वर्षें वास केला असूनही रामानें तिला घरीं आणली व तिजसह पुन्हां सौख्य भोगीत आहे. हें कर्म राम राजा आहे म्हणून खपतें, परगृहीं वास करणाऱ्या स्त्रीला परत घ्यायला मीं काय राम आहे ? ' असें म्हणून रजकानें आपल्या स्त्रीचा धिक्कार केला. " ही गोष्ट लोक आपल्याविषयीं काय बोलतात हें ऐकून घेण्याची इच्छा झालेल्या अयोध्याधिपति रामचंद्राला त्याच्या दूताकडून कळली. सीता शुद्ध आहे, तिनें दिव्य केलें आहे हें माहीत असूनही लोकापवादाला रामचंद्र भ्याला व ' सीता टाकावी कीं न टाकावी ' याचा विचार करीत बसला. रामाचे लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न हे वंधु तेथें आले व त्या सर्वांनीं सीतादेवीचा त्याग करूं नका म्हणून आग्रहानें विनविलें; पण इक्ष्वाकुकुळाला कलंक लागूं नये म्हणून त्या कुलधन उदार पुरुषानें त्या परमप्रिय भार्येचा त्याग करावयाचा निश्चय केला.

---

१ सखे !

ऐसें ऐकोनियां राम चिंतेला मानसीं धरी ।
लोकापवादवित्रस्त विचारातें मनीं करी ॥ १ ॥

" जाली वन्हिमुखीं शुद्धी तथापि जन निंदिती !
टाकावी कीं न टाकावी हे शुद्धचरिता सती ? ॥ २ ॥

कैशी हे त्यागावी सद्वृत्ता साधुसंमता प्रमदा ? !
श्रोत्रीयमुखें जैशी त्याज्या स्वाचारपद्धती न कदा ॥ ३ ॥

त्यागीन अवश्य इला विप्र जसे कलियुगीं निजश्रुतिला " ।
ऐसें हृदयीं चिंती वारंवार स्मरोनि साश्रु तिला ॥ ४ ॥

" जलजलसद्रम्यमुखी नव नवनीतापरीस मृदुला हे ।
शिव ! शिव ! मजविण भीरु न वनवसती दुःखभोगणें लाहे " ॥ ५ ॥

अथ भरतप्रभृति निजानुजांसि सारें । कळवितसे निशि कथिलें जसें स्वचारें ।
चरणरजें करुनचि नाशिता अघातें । स्वमत असें कथित असे तदा तिघातें ॥६॥

" श्रुतीतें निंदितो जैसा पाखंडी पापभाजन ।
रक्षोगृहीतां यासाठीं मैथिलीतें तसा जन ॥ ७ ॥

योगी जैसा त्यजितो संसारभयास्तव स्वममतेला ।
अपवादभयास्तव मी कीर्तिप्रतिपालनार्थ सीतेला " ॥ ८ ॥

ऐसें आकर्णितां त्यांच्या नीर नेत्रांतुनी गळे ।
रोमांच उठले देहीं दुःखानें दाटले गळे ॥ ९ ॥

पुसूनियां शोकपाणी पाणी जोडुनियां नयें ।
रामापुढें दीनवाणी वाणी भरत हे स्वयें ॥ १० ॥

' अंत्यजसदनापासुनि पूर्वी जे आणिली बळें गाय ।
संसर्गपातकास्तव पुनरपि ते धेनु टाकिजे काय ? ॥ ११ ॥

शुद्धि दिली वन्हिमुखीं प्रविशवुनीयां विशंक निजकाय ।
त्या दिव्याचें रामा ! स्मरण नसे सांग आज तुज काय ' ? ॥ १२ ॥

' जालों ज्या मानवाला मरणद वनितापुत्रवित्तादिशोक ।
त्याला नाहीं च कांहीं बुधजन म्हणती पुण्यलभ्योचलोक ।
सीता हे सून माझी सुविमळचरिता यामुळें देवलोकीं ।
रे वत्सा ! वर्ततों मीं प्रमुदित मजला ऊर्ध्वनेत्रें विलोकी ' ॥ १३ ॥

---

१ कमलासारखें सुंदर मुख आहे जिचें अशी. २ राक्षस रावण यानें हरण केली म्हणून. ३ हे ( सीता ) वाणी ( स्तवी ). ४ हें दशरथाचें भाषण आहे.

एवं सदैव गगनीं विमानगत तात बोलिला वदनें ।
त्याचें स्मरण करावें रामा ! त्वां ज्ञानिलोकेहृत्सदनें ॥ १४ ॥
स्मरण करीं पूर्वीं जें वदला व्योमस्थ देवसंघात ।
करुणाब्धे ! सीतेसह न करावा आत्मकीर्तिचा घात" ॥ १५ ॥
एवं वदोनि भरतें केलें रामासि वंदन ।
जाला अश्रुजलभ्रष्ट हृदयालिप्तचंदन ॥ १६ ॥
ऐकोनि ऐसें वदे जानकीजानी । "लोकापवादेंचि होते यशोहानी ।
ज्याच्या नसे कीर्तिचा जाहला नाश । त्याला न मारावया दक्ष कीनाश ॥ १७ ॥
मेले हरिश्चंद्रवैन्यादि जे संत । ते या जगामाजि आहेत जीवंत ।
ज्या बंधुयोषित्सुतांहीं यशोभंग । स्वप्नांतरीं ही तयासी नसो संग ॥ १८ ॥
कित्येकांहीं देहदानें रक्षिलें स्वयशोधन ।
म्हणोनि सीतात्यागें मी करितों कीर्तिशोधन" ॥ १९ ॥
सौमित्रि कोपतप्ता क्षितिपतिसि म्हणे "प्रार्थना ऐक रामा ! ।
मिथ्या लोकापवादें करुनि विकलुषा त्वां त्यजावी न रामा ।
म्लेंच्छांहीं निंदिजेते श्रुति म्हणवुनियां काय ते विप्रलोकीं ।
टाकावी हें विचारें करुनि बुधपते ! शास्त्रनेत्रें विलोकी ॥ २० ॥
सांग मला हें सत्य तूं दोषज्ञांचा राय ।
स्त्रीकलहास्तव पंडितें माय त्यजावी काय ?" ॥ २१ ॥
शत्रुघ्नें ही बहु विनविला राम सामप्रकारें ।
तेंही जालें विपिनरुदितासारिखें व्यर्थ सारें ।
अप्रस्तावीं विफळचि असे काम ऐसेंचि आहे ।
मेघापायीं न तिळभरि ही नरि सारंग लाहे ॥ २२ ॥
सीतात्यागाद्विजपजननीं वाढला दुःखसिंधू ।
शोकाश्रूंहीं भिजविति तदा भूमितें रामबंधू ।
कन्यात्यागश्रवणजनितक्लेश मूर्छेसि गेली ।
शिंपोनीयां म्हणवुनि जणों जीवनें शांत केली ! ॥ २३ ॥

---

१ ज्ञान्यांच्या हृदयाचें सदन ( राम. ) २ अश्रुप्रवाहानें ज्याच्या उरास लावलेलें चंदन पुसून गेलें आहे असा. ३ यम. ४ पंडित. ५ अरण्यरोदन. ६ अयोग्य प्रसंगीं. ७ मेघ. ८ सीतात्याग हाच कोणी चंद्र त्याचा उदय होतांच. ९ सीता पृथ्वीची कन्या असल्यामुळें तिला दुःख जालें व ती मूर्च्छित पडली. तिला रामबंधूंनीं शोकाश्रूंनीं भिजवून शांत केलें अशी कवीची उत्प्रेक्षा.

स्वबंधु करितातिं हे करुण मंजु शब्दें स्तव ।
कलंक परि लागतो निजकुळासि सीतेस्तव ।
असा करुनियां बरा दृढ विचार लंकापति- ।
कुळांतक असें वदे कठिण कीं श्रुती कांपती ॥ २४ ॥
"अपवादभयास्तव मी स्वतनूतें ही तुम्हासि हे देखा ।
त्यागिन सहसा मग या सीतेचा कायसा असे लेखा" ॥ २५ ॥
रघुपतिमुखें कैकेयीचा सुतश्रवणीं अशीं
कठिण वचनें स्वांतोद्वेगप्रदें[1] शिरलीं जशीं ।
हळु हळु रडें गेलें सर्व स्वधैर्य तदा लया
अनुजयुत तो जाता जाला त्यजूनि तदालया[2] ॥ २६ ॥
वनाप्रति विनागसा[3] दवडिली धरानंदिनी
म्हणूनि बहु दुःखिता स्वपटहस्वनाक्रंदिनी ।
निवारित असे तदा सकरुणा अयोध्या[4] सती
समीरणचलांशुकध्वजकरें जणो तीस ती ॥ २७ ॥

—कुशलवचरित. अ. ४.

# ( ६ ) सूड कां क्षमा ?

द्वैतवनीं द्रुपदसुता पतिला होऊनि तप्त-तनु गांजी ॥
वदली लेशहि न कधीं श्रुति-कटु अपराधियांहि अनुगां[5] जी ॥ १ ॥
"द्यूत महाव्यसन असें नायकिलें काय ? नर-वरा ! कानीं ? ॥
सर्वस्व हरुनि सहसा केलासि अरण्य-चर वराकांनीं[6] ! ॥ २ ॥
श्रोतृश्रुतिहर कीं तूं वदता सुविचार-खनि कथा पिकसा ॥
व्यसनांत बुडालास भ्रात्यांसह सुज्ञ जरि तथापि कसा ? ॥ ३ ॥
व्यसनप्रसंग तुजही तेजस्विवरासि अंक हा रविला ॥
झालासि दीन, वाटे द्यूतीं तोही प्रताप हारविला ! ॥ ४ ॥
सर्वत्र क्रोध जसा तैशी सर्वत्र न क्षमा साजे ॥
ते कैसे न वधावे तोडिति पर-घात-दक्ष मासा जे ॥ ५ ॥

---

१ चित्ताला उद्वेग देणारीं. २ त्या रामाच्या घराला. ३ निरपराधी. ४ अयोध्येस दुःख झाल्यामुळें ती आपल्याठायीं वाजणाऱ्या पटह ( नगारे ) यांच्या शब्दांनीं रडली व वाऱ्यानें फडफडणाऱ्या पताकारूप हस्तानें तिनें निवारण केलें अशी कवीनें येथें उत्प्रेक्षा केली आहे. ५ जी द्रौपदी सेवकालाही कधीं कठोर बोलली नाहीं ती संतापानें धर्मराजाला म्हणाली. ६ क्षुद्रकौरवांनीं.

येऊं या कोप मनीं एकिकडे संप्रति क्षमा राहो ॥
कां गोष्पदांत बुडतां ? यश रक्षा, खळ विपक्ष[1] मारा हो ॥ ६ ॥
क्रोध असावा समयीं केवळ वश चित्त न क्षमेला हो ॥
कोप त्यजितां जरि जमदग्नि धनुर्वेददक्ष मेला हो ! " ॥ ७ ॥
धर्म म्हणे " मतिमति सति ! यतिपतिगति अति समर्थ जो हरि तो ॥
म्हणतो क्षमाचि बरवी पर-वीर-यशें स्वसद्गुणें हरितो ॥ ८ ॥
व्याघ्र व्याळ क्रूर क्रूरतर क्रोध, बोधं-रोधक[2] हा ॥
क्रोधवशासि विलोकुनि बहु म्हणति ' स्वहित-तत्व-शोधक हा ! ' ॥ ९ ॥
वरिली सुयोधनें ती म्यांही भावुकं-पद[3] क्षमा[4] ; तींत ॥
नर जे हिला न सेविति, दवडिति हित ते अदक्ष मातींत ॥ १० ॥
त्यजुनि तिला बहु तरले, एकहि न हिला त्यजूनि तरला गे ॥
कृष्णे ! क्षमा-सुधारस-रसिकां रस गोड कां इतर लागे ? ॥ ११ ॥
श्रित-हित करिती हरिती सर्व-व्यसन क्षमा-भवानी हो ॥
आराधावी आम्हीं खलं-महिषाऽपहृतवैभवांनीं[5] हो " ॥ १२ ॥
भीम म्हणे " देवा त्वां जन्मापासूनि सेविला धर्म ॥
त्याचें हें फळ ! नाहीं धन मान स्थान यश, नसे शर्म ॥ १३ ॥
ज्याशीं जैसें त्याशीं तैसें जरि वर्ततासि तरि अरि ते ॥
हरिते कां सर्वस्व ? व्यसनीं आम्हांसि मग्न कां करिते ? ॥ १४ ॥
न क्षत्रिय तूं ! साधु ब्राह्मण आम्नाय पढविता पढता ! ॥
मान-धन क्षत्रिय या व्यसनें, ज्वलनें कटाहसा[6] कढता ॥ १५ ॥
राज्योपद्रव[7] गेला, झाला अभिलषित लाभ अजिनाचा ! ॥
परमोत्सवीं उगे कां ? अजि गा उडवा स्ववल्क, अजि नाचा ! ॥ १६ ॥
काय म्हणों तुज आर्या ? ब्राह्मण-वृत्तीस काय अनुसरसी ? ॥
त्यजुनि जलधि-वसति कशी तिमिंगिलें[8] सेविजेल तनु-सरसी ॥ १७ ॥

---

१ शत्रु. २ ज्ञाननाशक. ३ कल्याणाचें स्थान. ४ दुर्योधनें ती क्षमा ( पृथ्वी ) वरिली, म्यां ही ( सहनशीलता ) सेविली. क्षमा शब्द येथें श्लिष्ट. ५ खल दुर्योधन हाच कोणी महिषासूर यानें ज्या आमचें वैभव हरण केलें आहे त्या आम्हीं क्षमादेवी आराधावी हें योग्य आहे. ६ कढई. ७ भीम टोंचून म्हणतो ' राज्याचा त्रास गेला ! इच्छेसरसीं वल्कलें मिळालीं ! या महोत्सवीं स्वस्थ कां ? आनंदानें वस्त्रें उडवून नाचा ! ' ८ तिमिंगलनामक मोठा मासा आहे. तो महासागर सोडून अल्पसरोवराचा आश्रय करील काय ?

श्रेयस्कर स्वधर्म त्यागुनि घ्यावी न विप्रता पदरीं ॥
प्रकटी यशोऽर्थे, बुडवी न कधीं त्वत्समकवि प्रताप दरीं ॥ १८
हे आर्या ! हे भार्या हे आम्ही योग्य काय वन-वासा ? ॥
वल्काऽजिन-धर वससी स्वस्थ कसा या वनांत ननवांसा ? ॥ ॥
देतील राज्य न सुखें धरिजे कितवोक्तिचा न विश्वास ॥
काळाचाहि भरंवसा नाहीं जो नित्य खाय विश्वास ॥ २० ॥
द्वादश वर्षे गहनीं दुसरें अज्ञात वर्ष तेरावें ॥
लोटावें कैंवि वरें ! दूर विचारें करून हेरावें ! ॥ २१ ॥
रवि-वरि अभ्रें तैशीं वस्त्रें तव निग्रहाउपरि मळकीं ॥
गुप्ताहि मृगमदातें प्रकट करितसे स्वयें सुपरिमळ कीं ॥ २२ ॥
सोडील कसा तीतें जी देती नित्य लाभ नव धरणी ॥
वध्यचि खळ, धर्मचि हा, चोराचा दोषहेतु न वध रणीं ॥ २३ ॥
भणगा परि न वस वनीं, म्हण गा, बापा, मनुष्य-देवा, 'हूं' ॥
दे वाहूंस यश रणीं खळखळ खळ-रक्तपूर दे वाहूं' ॥ २४ ॥
धर्म म्हणे "भीमा बा, दुर्व्यसनीं मीच हेतु तापा तें ॥
दुःखीं साश्रितहि बुडे करितो जो मीलिताऽक्ष पापातें ॥ २५ ॥
तेव्हांचि क्षण निष्ठुर होउनि हे मूर्तिमंत पाप कर ॥
त्वां जरि केले असते भस्म, न होते तुम्हांसि ताप-कर ॥ २६ ॥
द्यूताला युद्धाला जावेंचि बलाविल्या, प्रतिज्ञा ती ॥
रक्षूं जातां कपटें हरिता झाला पदाप्रति ज्ञाती ॥ २७ ॥
हे कृष्णा तरि झाली तरलों त्या दुस्तराहि आवर्ता ॥
बुडतोंचि या सतीचा महिमा जरि काय हात आवर्ता ॥ २८ ॥
पूज्या मर्यादा, परि भ्याला कांहीं हि न शकुनी तीतें ॥
तो नावरेचि घातक दुर्जन जो होय वश कुनीतीतें ॥ २९ ॥
प्राणांस तुम्हांसहि मी त्यजिन, न धर्मासि पळहि सोडीन ॥
हें व्रत धर्मचि रक्षू, बापा न कदापि अयश जोडीन ॥ ३० ॥

---

१ पुष्कळ दिवस वनांत राहण्याची संवय झालेल्या मनुष्यासारखा. २ शरीरावर. ३ डोळे मिटून पाप करणारा पुरुष संसर्गी पुरुषासह दुःख भोगतो. ४ पापी. ५ द्यूतांत कौरवांनीं पांडवांस जिंकल्यावर दुश्चिन्हें झालीं म्हणून धृतराष्ट्रानें द्रौपदीचें सांत्वन करण्यासाठीं वर दिला. तिनें धर्मादिकांस दास्यत्वापासून मुक्त केलें त्या गोष्टीकडे संबंध आहे. ( सभापर्व अ. ६ पहा )

बा गा, धर्माच्या तों कोणीं सोडूं नयेचि कासेतें ॥
निष्फळ होतीं मेघं त्यजिलीं आलींहि जिविका शेतें[1] ॥ ३१ ॥
निज-हित-कर-धर्माचें कुशलें विटवूं नयेचि मन कांहीं ॥
कीं यापरि पोषण पालन लालन करिजे न अन्यजनकांहीं ॥ ३२ ॥
अंभोदास पहाती जैशीं पसरूनि नित्य आ शेतें ॥
धर्मासि तशीं भूतें; करि पूर्ण समर्थ हाचि आशेतें ॥ ३३ ॥
साधु म्हणति जो न करी धर्माशीं नीतिशीं विरोधा, त्या ॥
रक्षी व्यसनीं; तदितर जन उदकीं लोष्ठसा विरो घाल्या ! ॥ ३४ ॥
म्हणऊनि अनुसरावें सूज्ञें न क्रोध-लोभ-काम-मता ॥
पतनार्थ कां अहंता पोषावी, गा तशीच का-ममता[2] ॥ ३५ ॥
तुमचे प्रताप जे जे दिग्विजयीं प्रकटले न ते लटिके ॥
कुरु[3]-गुरुपुढें परि न गुरु, यज्ञांत घृतापुढें न तेल टिके ॥ ३६ ॥
आम्ही नियम त्यजितां न चुकेल नदीजेंही[4] उगाराया ॥
त्या सर्वज्ञ प्रभुला बा कोण म्हणेल 'गा ! उगा राया' ॥ ३७ ॥
यांसीं कलि करणें हें न म्हणेल कधीं सुधी नर विहित रे ॥
धर्म-न्याय त्यजितां तेजस्वीही तमीं न रविहि तरे ॥ ३८ ॥

—वनपर्व अध्याय २.

---

# ( ७ ) श्रीकृष्ण कर्णास पांडवांकडे वळविण्यास गेले तेव्हां झालेला कृष्णकर्णसंवाद.

## कर्णाचा थोरपणा.

श्रीकृष्ण म्हणे "कर्णा ! तूं कुंतीचा कुमार कानीन[5] ।
त्वद्वदनोत्थ[6] न पडला अर्थिजनाच्या कधींहि कानीं 'न' ॥ १ ॥
ऐसा वदान्य[7] विद्वान् विश्रुत तूं शुद्ध विप्रजनदास ।
चाल, भजोत भ्राते तुज, चातक भजति जेंवि वनदास[8] ॥ २ ॥
साऽनुजसुत धर्म तुला नमिल, सयादव करीन मी नमन ।
सचित्त गुर्वनादर तोयानादर करी न मीनमन[9] ॥ ३ ॥

---

१ शेतें जीविका आलीं म्हणजे पिकास आलीं. २ खोटा अहंकार. ३ द्रोणाचार्य. ४ गंगापुत्र भीष्म. ५ कानीन पुत्र म्हणजे कन्यकेला कुमारावस्थेंत झालेला पुत्र. ६ तुझ्या तोंडांतून निघालेला 'न' कार याचकांच्या कधीं कानीं पडला नाहीं. ७ दाता. ८ मेघ. ९ मासा जसा जलाचा अनादर करीत नाहीं, तसें सज्जनाचें चित्त गुरूचा अनादर करीत नाहीं.

राज्याभिषेक करितिल तुज मजसह विप्र भूमिप देरानें ।
किंबहुना घेइल तव तांबूल क्षिप्र भूमि पदरानें ॥ ४ ॥
चाल कसा, हो राजा मातेच्या मानसासि दे सुख गा ।
यांचा तुज काकांचा सहवास, जसा सितच्छदा सुखगा[२]" ॥ ५ ॥
कर्ण म्हणे "बा देवा ! वदसि स्नेहेंचि बा दयाळो ! हें ।
भट-कैर-गें जोडावी स्पर्शमणीची कसी दया लोहें ? ॥ ६ ॥
मातृत्यक्ता मजला राधाहस्तीं दिलें अधिरथानें ।
मज पाजाया प्रेमें पय, पळ धरिती तिचीं न धिर थानें ॥ ७ ॥
दुर्योधन नांवाचा, राजा मी, सर्वराज्यभोग मला ।
मूर्त नरक, नरकविच्या हृदयाला, जो कृतघ्न, तो गमला ॥ ८ ॥
संस्कार विवाहाऽवींध केले माझे यथोक्त सूतानें ।
निर्मळपणें निघावें रक्तपटांतूनि केंविं सूतानें ? ॥ ९ ॥
श्रीकृष्णजी, करावा कैसा विश्वासघात अवसानीं ।
युद्ध कसें न करावें आम्हां हा युद्धलाभ नवसांनीं ॥ १० ॥
तरि मग उरलें काय प्रभुजी ! त्यजिल्या जरि प्रतिज्ञा त्या ? ।
नच सोडवेल देवुनि धीर भरंवसा अरिप्रति ज्ञात्या ॥ ११ ॥
राज्य न करील, देइल धर्म मला, उमजतांचि हें नातें ।
देइन सुयोधना मी ! तेव्हां होइल तुम्हांसि हें ना तें ॥ १२ ॥
आटोपिला न पहिला तो आटोपेल काय गा ऊत ? ।
जोडा यश, कवि होउनि रोमांचव्याप्तकाय गाऊत ॥ १३ ॥
धारातीर्थींच मिळे सद्गति सत्कीर्ति शुद्धि अधमातें ।
राज्यपदभोग नलगे द्यावा देवा रणांत वध मातें ॥ १४ ॥
मज समजलें प्रभो ! हें त्वद्दृष्टिपुढें उरेल न क्षत्र[६] ।
रवि काळरुद्रदृष्टिसि न पुरे, तेथें पुरेल नक्षत्र ?" ॥ १५ ॥
देव म्हणे "राज्य नको उपदेश अयोग्य काय हे महिम्न्या ? ।
क्लीवाला कन्यासी तुज कां द्यावी बळेंचि हे महि म्या ॥ १६ ॥

---

१ भयानें. २ शुभवर्णाचे पंख ज्यांचे अशा पक्षिश्रेष्ठ हंसास ३ वीरहस्तांतल्या (लोहानें म्ह. शस्त्रानें). ४ शेवटीं वचन दिल्यावर शत्रूचाही त्याग करविणार नाहीं मग मित्राचा कसा करवेल ? ५ दुर्योधनप्रेमाचा वेग. ६ क्षत्रिय. ७ तुमच्या महिम्यास (कीर्तीस) हे उपदेश अयोग्य आहेत काय ?

धनदानें अनघाचा तुमचा तैसाचि काम रणदानें ।
ऱ्यां पुरविजेल, यावीं स्वरगें इतरें, न कां मरणदानें ॥ १७ ॥
जा, सर्व सिद्ध व्हा, जरि आहे उद्युक्त मानस मराया ।
सम रायास तुम्हांसहि भीमाऽर्जुन वरद, शीघ्र समरा या " ॥ १८ ॥
कर्ण म्हणे " या वचना मान्य न झालों म्हणों नको, पावें ।
वध्यें वधाचि म्हणतां प्रभुनें आग्रह म्हणोन कोपावें ? ॥ १९ ॥
सत्य उपदेश आम्हीं वरिचेवरि भव्यहेतु झेलावे ।
जाणोनि सर्व देवा लाविसि कां बोल ? हे तुझे लावे ! " ॥ २० ॥
श्रीकृष्ण म्हणे, " बहुधा मरणारचि हे समस्त सुपदेशें ।
कीं तव हृदयें माझा हितहि स्वीकारिला न उपदेश " ॥ २१ ॥
कर्ण म्हणे " भेटि असो परलोकीं मात्र बा दयाळो, कीं ।
कलहीं स्नेह न राहे, हे दुर्लभ म्हणुनि पाद या लोकीं " ॥ २२ ॥
ऐसें म्हणोनि कर्ण प्रभुला कडकडुनि भेटला सुचिर ।
मुग्धासहि जडित कनक- मरकतनग न गमला तसा रुचिर ॥ २३ ॥
झाला मंत्रे असा ; मग आला नगरांत कर्ण परतोन ।
पर तो न प्रभु कोपे ; वरि पुरता, आंत, पूर्ण पर तो न ॥ २४ ॥

—उद्योगपर्व अ. १०.

# ( ८ ) राजकन्या* व गुरुकन्या यांचें भांडण.

उदकीं क्रीडत होत्या त्यांचीं वस्त्रें सरस्तटीं होतीं ॥
मारुतरूपें शक्रें मिश्रित केलीं परस्परें हो तीं ॥ १ ॥
राजसुता शर्मिष्ठा जळकेलि करूनि त्यां तटीं आली ॥
होती जळाशयींच श्रीमत्कवि-कन्यका तिची आली ॥ २ ॥
शर्मिष्ठा कविजांबर नेसे झडकरि कळों न वासव दे ॥
तों तसि देवयानी ओढुनि तत्परिहितांत्मवास वदे ॥ ३ ॥

१ कल्पवृक्षानें सर्व दानें द्यावी मग मरणदानच कां देऊं नये ? २ राजे. ३ वादामुळें स्नेह राहत नाहीं व तूं पांडवपक्षपाती आणि मी कौरवपक्षपाती असे दोघेही दोन विरुद्ध पक्षाकडे असल्यामुळें या मृत्युलोकीं हे तुझे पाय दुर्लभ झाले, आतां आपली भेट परलोकीं मात्र होणार ! ४ सुवर्ण व पांच यांचा पर्वत. ५ गुप्त मसलत. * हें प्रकरण मूळाबरहुकूम उतरलें आहे. ६ शुक्राचार्यांची कन्या देवयानी. ७ ' राज्यकन्या जें नेसली तें स्ववस्त्र ' -पंतटीप.

असुरसुते! मच्छिष्या होउनि मद्वस्त्र नेससी कां गे ॥
बहुमातलीस ऐसें मज समुदाचार[1] लोप हा सांगे ॥ ४ ॥
मर्यादा पाळावी, निजशिव गुरुचेंचि पाय, रीतीतें ॥
सोडूं नये म्हणति कवि साधुपदार्थींच पायरी तीतें ॥ ५ ॥
शर्मिष्ठा तीस म्हणे 'बैसावें जैं सभेंत मत्तातें ॥
त्वत्तातें व्हावें तैं बंदी, तूं विसरलीस मत्ता तें ॥ ६ ॥
सिंहासनीं विराजे मद्गुरु[2], न सहस्रकरहि परि सविता ॥
बैसे खाले त्वद्गुरु कवि कविता करुनि त्यासि परिसविता ॥ ७ ॥
माझी न पाविजे त्वां मत्ताताची तुझ्या न सरि[3] तातें ॥
जें जन्हुकन्यकेचें भाग्य न पावेल अल्पसरिता तें ॥ ८ ॥
तूं तों कन्या जो स्तुति-कर, याचक दान घे सदा त्याची ॥
मीं कन्या स्तव्याची भव्याची सर्वसैव्यदात्याची ॥ ९ ॥
होती महेंद्रनयनें पाहुनि राजेश्वरा जया चकितें ॥
मत्तातभाग्य कैचें त्वत्ताता भिक्षुकासि याचकि[4]! तें ॥ १० ॥
मत्ताताची जी श्रीकीर्ति कवीला नयेचि भिक्षुकि ती ॥
अमृतरसासीं व्हाया सम माधुर्यें समर्थ इक्षु किती? ॥ ११ ॥
राजसुतेचें यश जें तुज येइल काय गे दरिद्रे! तें ॥
पाहसि विकावया तूं केसरमूल्यें कसें हरिद्रेतें[5]' ॥ १२ ॥
निर्भर्त्सना करी बहु संपादी द्वेष पाप, गाढ कली[6] ॥
करुनि कविजेसि कूपीं, ती कोपाची महापगा[7] ढकली ॥ १३ ॥
मेलीच असें मानुनि शर्मिष्ठा आपुल्या घरा गेली ॥
कूपीं कविजा होती जैसी नागी मनांत रागेली ॥ १४ ॥

—आदिपर्व. अ. १०.

---

# ( ९ ) भीष्माचा निर्याणसमय.

भारतयुद्धीं वधिले गुरु, बंधु, स्वजन, मित्र, शूर, हित. ।
केली भुवनख्यातप्रियनृपटंदेंकरुनि भू रहित. ॥ १ ॥
यास्तव मन धर्मांचें पावे शोकेंकरूनि कष्ट महा. ।
सांगे भागवताचा अध्याय स्पष्ट अर्थ अष्टम हा. ॥ २ ॥

---

१ 'सदाचार'-पंतटीप. २ माझा बाप. ३ बरोबरी. ४ भिकारड्ये! ५ हळदेस. ६ भांडण. ७ कोपाची महानदी.

व्यासादिक गुरु सांगति शोकशमन सदितिहास रायास; ।
तरि मोह घर्णमणीना, कीं दे गुरुवरचि आसरा यास. ॥ ३ ॥
व्यासादिक जे बोधिति धर्माला, त्यांत देवेंहि तसाच ।
बोधी; जें जें बोले, तें तें सर्वांसि मान्य हित साच. ॥ ४ ॥
परि धर्माच्या चित्तीं अविवेक जगद्धितार्थ वाढविला. ।
आपण न काढिला, मुनिबोधाहातींहि तो न काढविला ॥ ५ ॥
भगवदभिप्राय असा कीं, झाला तप्त दुःसहें ग्रीष्में ।
तो, जेंवि मयूर घनें, बोधावा धर्म सज्जनें भीष्में. ॥ ६ ॥
कुरुगुरु कवि रवितेजा संप्रति करणार देहसंन्यास; ।
धन्यास त्यास यावें हें यश, देवूं नयेचि अन्यास ॥ ७ ॥
ऐसा प्रभुसंकल्पें प्रौढहि नृप तो, जसा शिशु अभला ।
'प्रसवोनि, मलिन झाला वंश,' म्हणे 'दुग्धराशिशुभ्र मला' ॥ ८ ॥
ऐसा भ्याला लोकद्रोहाला, आठवूनि कृतकर्म, ।
धर्मनृपाळ विनशना गेला, भीष्मा पुसावया धर्म. ॥ ९ ॥
गेले हयरत्नावरि बैसोनि वृकोदरादिक भ्राते ।
भेटाया श्रीभीष्मा जैसे चातक मयूर अभ्रा ते. ॥ १० ॥
नर नारायण दोघे बसले एके रथीं सखे, दमन ।
करुनि खळांचें, केलें मुदित जिहीं भूमिचें सखेद मन ॥ ११ ॥
भासे भीष्म महात्मा भूमिवरि स्वर्गविच्युतामरसा ।
वेष्टिति जन ते त्यातें, तृपित मधुव्रत जसे सुतामरसा. ॥ १२ ॥
पांडव पितामहातें वंदिति, घेऊनि आपुलें नाम. ।
विनयें तसेंच वंदी, वंदी ज्याचें शिवादि तें धाम. ॥ १३ ॥
देवर्षि, ब्रह्मर्षी, राजर्षी तेथ तेधवां आले, ।
त्या भरतनायकातें देखाया सर्व एकवट झाले ॥ १४ ॥
जे हे आले त्यांतें पूजी धर्मज्ञ तो स्वदृक्कमळें; ।
तर्पी कुशळप्रश्नें, स्वागतशब्दामृतेंहि अत्यमळें ॥ १५ ॥
भीष्म म्हणे, 'पुत्रक हो! परिसा मद्वाक्य पांडुनंदन हो!
कां म्लानवदन झालां? जो होता, तो विवेक मंद न हो ॥ १६ ॥
जें हें झालें, याच्या तापें निजजीवितीं तुम्हीं विटलां; ।
निर्मळ विवेकमानसहंस कसे शोककर्दमें किटलां? ॥ १७ ॥

---

१ जाईना, धावरेना. २ श्रीकृष्ण. ३ कुरुक्षेत्र. ४ स्वर्गांतून पतनपावलेल्या देवासारखा.

यावरि वांचावें हें योग्य नव्हे आपणांसि लोकांत, ।
ऐसें मनांत आणुनि, सुत हो ! झाला निमग्न शोकांत ॥ १८ ॥
भूदेव, धर्म; अच्युत, हे कीं आश्रय तुम्हांसि आहेत ; ।
या चिंतारत्ना जो पूर्ण नव्हे, कोण तो वदा हेत ? ॥ १९ ॥
असतां आश्रय ऐसा, ऐसी जन कोण, काळजी वाहे ? ।
नसतां आश्रय ऐसा, प्रबळाही, होय काळ, जीवा हे. ॥ २० ॥
तुमचें अप्रिय झालें मागें; आतांहि सर्व जें कांहीं ॥
तें काळकृत असें मी म्हणतों; हें सत्य अन्यथा नाहीं. ॥ २१ ॥
तस्मात् सुखदुःखादिक हें सर्वहि होय ईश्वराधीन ; ।
जाणुनि असा करावा निश्चय कीं तत्प्रसाद साधीन. ॥ २२ ॥
व्हावें अनुवर्ती या प्रभुचें, याचि प्रभूत्तमा गावें ; ।
'स्वामी! प्रभुजी ! पाळा प्रजा अनाथा' असेंचि मागावें ॥ २३ ॥
हा साक्षात् नारायण भगवान् परपुरुष ; याचि जगदाद्या ।
म्हणति मुमुक्षु, 'गुरुवरा ! भवशमना स्वभजना सदगदा द्या' ॥ २४ ॥
'हा परमेश्वर ऐसें म्हणतां,' जरि वत्सहो ! म्हणाल मला, ।
'प्रभु तरि सारथ्यादि स्वीकारुनि नीचकर्म, कां श्रमला ? ॥ २५ ॥
नीचोच्च कर्म करितां मज योग्य अयोग्य हें असें कांहीं ।
रागादिदोषरहितप्रभुच्या, वैषम्य, बुद्धिला, नाहीं. ॥ २६ ॥
'हें कां ? म्हणसील तरी, ज्याला यत्नेंकरूनि कवि टाळी, ।
तो दुष्ट अहंकार प्रभुच्या हृदया कधींहि न विटाळी. ॥ २७ ॥
जे निरुपाधिक सेवक, देव करी त्यांवरीच फार कृपा ; ।
आला मरणावसरीं मज भेटाया पहा मुकुंद, नृपा ! ॥ २८ ॥
भक्तीनें मन, ज्याच्या पदपद्मीं, मधुप करुनियां, योगी ।
ज्याचें गातां नाम, त्यजुनि तनु भ्रमहि, मुक्तिपद भोगी. ॥ २९ ॥
तो देवदेव भगवान् हा यदुपति, या प्रमोदसन्निधिते ।
विनवितसें ; मज देव देहन्यासांत आत्मसन्निधिते. ॥ ३० ॥
हें सुप्रसन्नहास, प्रांतारुणनेत्र, वदनतामरस ।
मद्दृष्टिभ्रमरीला देवें प्राशावया प्रकाम रस ॥ ३१ ॥
चतुर चराचरचेतश्चोर[2] चतुर्बाहु चारु चारुरुची ।
अन्या संन्यासिजनें चिंतावें मात्र हें स्वरूप शुची. ॥ ३२ ॥

---

१ आनंदाचा उत्तम ठेवा अशातें, आनंदमयातें. २ स्थावर जंगमात्मक विश्वाचें चित्त हरण करणारा.

जेव्हां मानेल मना, तेव्हां टाकीन या शरीरा हो !
तोंवरि मद्ध्रभागीं हा गीतामृतनिधी हरी राहो ! ॥ ३३ ॥
प्रभुदृष्टि माय, भीष्मा वत्साला होय भव्यधारा हे ।
आलिंगी करुणार्द्रा, देहीं कांहींच न व्यथा राहे ॥ ३४ ॥
होय सतीस प्रेमें उत्सव, पाहोनि नित्य कांत, नवा ; ।
विधु पाहतां चकोरा, प्रभुमूर्तिविलोकनींहि शांतनवा " ॥ ३५ ॥
देहत्यागावसरीं, भीष्म प्रेम प्रभूत मागाया, ।
श्रीचरणीं स्थिरचित्त स्थापुनि, लागे प्रभूत्तमा गाया ; ॥ ३६ ॥
" माझ्या तीक्ष्णशरांहीं ज्याचें, खंडूनि कवच, वपु भग्न ।
केलें, त्या कृष्णीं हो मन, जैसें लवण सागरीं, मग्न. ॥ ३७ ॥
सर्वस्व वेचिती परि संरक्षिति नित्य जीप्रति, ज्ञाते, ।
त्यजिली, 'साहाय्य करिन, शस्त्र न धरितां,' असि प्रतिज्ञा ते ; ॥ ३८ ॥
'शस्त्राचें धारण हरिकरवीं करवीन मी,' असी माजी, ।
दुस्तरपणें प्रतिज्ञा, सत्याब्धिपरीसही असीमा जी, ॥ ३९ ॥
तीतें, निजप्रतिज्ञेहूनि अधिकता यथार्थता याया, ।
ख्यात कराया लोकीं गांगेया, भक्तभारताया या ; ॥ ४० ॥
जरि विजयपक्षपाती दिसला, लोकप्रतीतिनेंचि तदा, ।
परम अनुग्रह मजवरि करि हरि, जाणें असेंचि सद्धितदा. ॥ ४१ ॥
करुनि अकृत्यें शतही, जेंवि कुटुंबी कुटुंब संरक्षी, ।
पाळी तसा विजयरथ. जो आश्रितरक्षणींच शुभ लक्षी. ॥ ४२ ॥
ज्यातें 'गुरुवर' म्हणती श्रीवाल्मीक्यादि विप्र, तो दास ।
झाला धनंजयाचा ; सूतत्व करी धरी प्रतोदास. ॥ ४३ ॥
यासि विलोकुनि मेले जे त्यांचें भाग्य तें असीम रणीं ।
त्या पाहिले चतुर्भुज झाले ; गति पावले असी मरणीं ॥ ४४ ॥
त्या भगवंतीं माझी रति अतिशय बैसली सदा राहो, ।
साहे क्षणहि न विरह, श्री जैसी श्रीनिवासदारा हो ! ॥ ४५ ॥
तो हा जगदात्मा हरि झाला मद्दृष्टिला विषय, मरणीं ; ।
जो साक्षात् अमृतसखा, परि भासे दुर्जना विष, यमरणीं ॥ ४६ ॥
जे निर्मिले अनेक प्राणी, भोगावया स्वकर्मफळें, ॥
त्यांच्या हृदयीं, एकचि, परि भासे विविध, त्या उपाधिबळें ॥ ४७ ॥

---

१ कौरवांचा वडील पुरुष, आजा, जो मी त्या मला.

रवितेज विविध भासे प्रतिदृष्टि, जसें उपाधिभेदानें, ।
प्रतिपादिलें असें ज्या तत्त्वाचें अद्वयत्व वेदानें, ॥ ४८ ॥

त्या या मूर्तब्रह्मा, टाकुनि भेदभ्रमश्रमा आजी, ।
मी पावलोंचि ; झाली धन्या जननी जगत्रयीं माजी ;" ॥ ४९ ॥

ऐसें स्तवितां, भीष्म स्वमनोवाग्दृष्टिवृत्तिहि प्रवण ।
आत्मा करूनि, मिसळे श्रीकृष्णीं, जेंवि सागरीं लवण ॥ ५० ॥

भगवान् कृष्णचि साक्षात् ब्रह्म, म्हणुनि भीष्मराय तो यांत ।
मिसळे, जसें नभ नभीं, कीं तेजीं तेज, तोय तोयांत ॥ ५१ ॥

शुद्धब्रह्मीं योगी भीष्म मिळाला, असें कळे उशिरें ; ।
कांपविती, व्यासादि ज्ञाते तत्सद्गतिप्रहृष्ट, शिरें ॥ ५२ ॥

भीष्म ज्ञानी झाला मुक्तचि ; परि धर्म धरुनि आवडिला ।
संस्कार सर्व करवी ; मग फार रडे स्मरोनि त्या वडिला ॥ ५३ ॥

—भीष्मभक्तिभाग्य.

---

# ( १० ) पंतांचे आप्त इष्ट व समकालीन राजकीय पुरुष.

## १ स्वकुटुंबीय.

धन्य[१] **श्रीराम पिता** धन्या **लक्ष्मी प्रसू** जगीं झाली ।
आली सत्यवतीची कीं भारतकीर्ति सुतमुखीं आली ॥ १ ॥

मातेद्वानि बहु दया केली आदर करूनि **ओंकानें** ।
विष्णुपदा ! तारी, गुण घ्यावेचि इचे करूनि 'आ' कानें ॥ २ ॥

वदला प्रसन्न चित्तें साहित्य करूनि **बंधु आंबा** 'जा' ।
विष्णुपदा ! तारावा, याची **सगुणा** तशीच वा भाजा ॥ ३ ॥

मी जरि अशक्त निर्धन कोपी तरि बहु भली **रमा भार्या** ।
ईतें सद्गति दे तूं हेचि करि प्रथम बोध या कार्या ॥ ४ ॥

---

१ विनयशील, नम्र. २ या प्रकरणांतील बऱ्याचशा आर्या गंगावकिली व विष्णुपदवकिली या काव्यांतल्या आहेत. विठोबादादावरच्या आर्या मात्र अप्रसिद्ध आहेत. ३ महाभारतग्रंथ सबंध आर्यावृत्तांत आणल्यावर पंतांस कृतार्थता वाटली ती या आर्येंत त्यांनीं प्रकट केली आहे. ४ पंतांची बहीण. ५ धाकटाबंधु. हा व पंत एकत्र रहात. त्यांचा वडील भाऊ सोनोपंत नांवाचा होता तो मात्र विभक्त होता. पंढरपुरीं पंतलिखित 'गोवर्धनाचार्य सप्तशतीदीपन' नामक ग्रंथ आहे त्याचे शेवटीं 'लक्ष्मीरामात्मजनुषा स्वर्णदेवानुजन्मना मयूरेश्वरपंतेन' असा उल्लेख आहे. ६ पंतांची स्त्री रमाबाई मोठी सुशील होती, तिनेंच पंतांना काशीयात्रेस जाण्याला उद्युक्त केलें.

मद्बंधूचे माझे तारावे श्वशुर मेहुणे साडू ।
धाडूं चित्त तुजकडे गंगे ! नच मोह मजना नाडू ॥ ५ ॥
भ्रात्यांसि, मज अपत्यें[1], जेंवि दहांचीं तशींच आहेत ।
पुरवीं विष्णुपदा ! रत व्हावी हरिगुणरसींच हा हेत ॥ ६ ॥

## २ गुरु.

गुरु माझे **श्रीराम** श्रीमत्**केशव गणेश हरि** चवघे[2] ।
यांचा प्रसाद वदला 'गंगामृत पी यथेष्ट वरि चव घे' ॥ ७ ॥
श्रीमदुपाध्यायोत्तम कविवर केशवगणेशपादरजा ।
धरुनि शिरीं हें सयश लिहितों पीताति साधु सादर जा ॥ ८ ॥
माझ्या सद्गुरुवंशीं झाले आहेत पुरुष होतील ।
विष्णुपदा ! म्हण 'यांच्या श्रीगुरु कर्णांत अमृत ओतील' ॥ ९ ॥

महीसुरान्वामदेवप्रमुखानृत्विजः प्रभो ।
श्रीकेशवं श्रीगणेशं वंदे विद्यागुरुं हरिम् ॥ १० ॥

## ३ मित्र.

स्नेह करी, हृष्ट करी, तर्पी, रक्षी, सदैव संमानी, ।
पावे सुखें सुखहि तें मित्र असें म्हणाति सर्वहि ज्ञानी ॥ ११ ॥
मम बाळमित्र[3] सर्वहि गंगे ! तूं **अच्युत**प्रमुख तारी ।
वारी संसारभ्रम, सारीं प्राचीन पातकें सारीं ॥ १२ ॥
**[4]रघुनाथपंत कोशे** संप्रति गेले समीप सेवेला ।
प्रेमें सिंचित होते या कवमा ते सखे असे वेला ॥ १३ ॥
**श्रीनारायणभट्ट** ज्ञाते श्रीपांडुरंगपदभक्त ।
शेजारी मीं त्यांचा पुसतां कथितलि वृत्त तें व्यक्त ॥ १४ ॥
नित्य पुराणकथांचें यांस तुम्हांसहि असें समव्यसन ।
करितिल **अनंतनारायण** बाबा सर्व गुण समुल्लसन ॥ १५ ॥

---

१ पंतांस तीन पुत्र व तीन कन्या होत्या. आपलीं अपत्यें धनवान् किंवा विद्वान् होण्यापेक्षां भक्तिमान् व्हावी असें पंतांस वाटत असे. २ पंतांनीं गुरूंत अग्रस्थान आपल्या पित्यास दिलें आहे. केशव पाध्ये व गणेशपाध्ये यांजपाशीं पन्हाळगडावर बारा वर्षे संस्कृत पढले. हरि हे त्यांचे कुलोपाध्याय असावे. ३ पंतांना साठ वर्षांच्या वयांत सुद्धां आपल्या लंगोटी-मित्रांचें स्मरण झालें यावरून त्यांचें मन किती प्रेमळ होतें हें दिसतें. ४ रघुनाथपंत कोशे, नारायणभट्ट दात्ये, अनंत नारायण बाबा हे बारामतीस रहात, पंतांच्या आर्या वाचून त्यांना उत्साह देणाऱ्यांत हे प्रमुख होते. पुढील तिनही आर्या 'नामरसायनां'तील आहेत.

**श्रीविठ्ठल**[1] निजनिजजनसद्गुणकीर्तनसुखार्थ अवतरला ।
ज्याच्या सूक्तिश्रवणें जडही गोष्पद करूनि भव तरला ॥ १६ ॥
नेत्रांत मुखांत कृपा ज्याच्या हृदयांत सर्वदा बसली ।
शब्दांत मधुरता श्रीहरिच्या अंकीं जशी तशी बसली ॥ १७ ॥
प्रेमळ रसिकशिरोमणि दाता मृदुहृदय परमपटु शांत ।
कांतसुखश्री ज्याच्या उपदेशें बहुत जाहले दांत ॥ १८ ॥
संत विठोबा दादा लहानथोरांत सांगतां वाटे ।
टाकुनि खेळ मुलांनीं यावें पायां पडावया वाटे ॥ १९ ॥
गंगे ! देवि ! विठोबा दादा श्रीविष्णुभक्त शिवशील ।
एतद्गीतहरियशश्रवणें काशिसमेत निवशील ॥ २० ॥
याचा परमप्रेमळ नंदन **भैराळ**[2] तो तथापि कसा ।
येतो ? जो पंढरपुरचूतवनीं करितसे कथा पिकसा ॥ २१ ॥
भयभय जायास्तव त्या नमितों मीं सर्व काळ ***जीजीतें** ।
बहुभूतदया हृदयीं रंकाची सर्व काळजी जीतें ॥ २२ ॥
श्री गीतेच्या एकादशसंख्याचा जसा उपाध्याय ।
केवळ भक्तिरसमय श्री **मदनंताख्य**[3] जो **उपाध्याय** ॥ २३ ॥
तो होय शोभवुनि या कवनातें साधु विप्र भासविता ।
निजतेजें श्री देउनि पंकरुहा जेंवि विप्रभा सविता ॥ २४ ॥
विष्णुपदा ! दे दर्शन पुनरपि करुणा करूनि **बाबातें**[4] ।
हा बा तेंवि करितसे प्रेम करी जे द्रवोनि आबा तें ॥ २५ ॥
वरशील, सहाध्यायी, साधु **सदाशिव**[5] तयासि तूं गंगे ! ।
दर्शन दे, द्रवशिल तरि, विघ्न न करितील सर्वथा दंगे ॥ २६ ॥

---

१ विठोबादादाचातुर्मासे हे आठ मास मोंगलाईंत अनवे गांवीं रहात व चतुर्मास पंढरीस रहात. हे परम प्रेमळ भक्त व मोठे साक्षात्कारी असत. पंतांनीं यांना लिहिलेलीं पन्नास पत्रें सांपडलीं आहेत. हे फार सप्रेम कीर्तन करीत व कुणब्यामाळ्यांत मुलाबाळांत प्रिय असत. वारकरी सांप्रदायांत यांना फार मान आहे. २ यानां पंतांच्या आर्यांचा फार नाद असे. यांचीं हातचीं पंतकाव्यें पंढरीस आहेत. ३ बाबापाध्ये यांचे वडील अनंत पाध्ये हे मोठे साधु होते. ४ धर्मसिंधुकार पंतव्याही बाबापाध्ये. ५ केशव पाध्यांचे चिरंजीव. हे कऱ्हाडास रहात. * ही विठोबादादांची बहीण.

## ४ यजमान बाबूजी नाईक बारामतीकर.

**श्रीबाबुराय प्रभु** माझा अत्यंत सदय अन्नद हा ।
अर्थिजना न म्हणो दे जैसा तप्तांस जेंवि सन्नद ' हा ! ' ॥ २७ ॥
श्रीगायत्रीगंगागीतासिद्धेश्वरैकभक्तातें ।
या विष्णुपदा मुक्ति न वरिल कशी गुरुपदाब्जसक्तातें ॥ २८ ॥
श्रीमत्सदाशिवात्मज बाबूजी नायक प्रभु ज्ञानी ।
धन्य म्हणावे ज्याला शुद्धगुणश्रवणतृप्त सुज्ञांनीं ॥ २९ ॥
दाता वक्ता योद्धा तेजस्वी मानधन असा मान्य ।
अतुळें पितृप्रसादें मंडित देवव्रता असा मान्य ॥ ३० ॥
या साधुसंगमुदिरें मुदित श्रीरामसुत मयूर कृती ।
नरनारायणविजयग्रंथ करी व्हावया सुखी सुकृती ॥ ३१ ॥
जो धीर वीरहीर श्रीसिद्धेश्वरमहादयापात्र ।
श्रीमान् बाबूराय प्रभु ज्याचें शोभलें यशें गात्र ॥ ३२ ॥
भीष्मद्रोणसम गुणें शांडिल्य सुगोत्र पद्मरवि दे हा ।
आश्रय शंकर जैसा उपमन्युमना मयूरकविदेहा ॥ ३३ ॥
शीलाजितामरचंदन तन्नंदन **पांडुरंगरायहि** तें ।
यश मिरवितो प्रजांचीं करि दशरथसा न राम काय हितें ? ॥ ३४ ॥
ज्या बाबूरायाची तत्पुत्राचीहि साधली सेवा ।
विष्णुपदा ! तारावे ते सर्वहि विनिव तूं असें देवा ॥ ३५ ॥

## ५ अहल्याबाई होळकरीण.

देवि ! अहल्याबाई ! झालीस जगत्त्रयांत तूं धन्या ।
न न्यायधर्मनिरता अन्या कलिमाजि ऐकिली कन्या ॥ ३६ ॥

---

१ बाबूजी नाईक जोशी बारामतीकर हे पेशवाईंत अति श्रीमान् सावकार होते. पहिले बाजीरावाचे हे धनको. बाजीरावाचे मृत्यूनंतर यांनीं पेशवाईची खटपट केली ती निष्फळ झाली. हे ताराबाई पक्षाचे होते व पुढें राघोबाचे पक्षाचे झाले. नाईक व पेशवे यांचें वैमनस्य इतिहासप्रसिद्ध आहे. हिंदुस्थानांतील बहुधा प्रत्येक सरदार व राजा यांचा ऋणको होता. राज्यकारभारांत यांनीं पुष्कळ ढवळाढवळ केली पण यांना यश मिळालें नाहीं. हे सृष्टिसौंदर्याचे मोठे भोक्ते, उदार व गुणज्ञ होते. पहिल्या बाजीरावाची बहीण यांच्या बंधूला व राघोबादादांची कन्या दुर्गाबाई यांच्या द्वितीय पुत्राला–पांडुरंगरायाला दिली होती. हे कांहीं लढायांत गाजले होते. पंतांच्या कुटुंबांस यांचा उदार आश्रय मिळाला होता. २ इ. स. १७९० सालीं पंत काशीयात्रेहून परत येत असतांना चोळीमहेश्वर येथें त्यांनीं जगविख्यात अहिल्याबाईची गांठ घेतली. त्यांनीं अहल्याबाईचें यथार्थ गौरव केलें आहे.

धर्मार्थ गोत्रजन्या किंवा झालीस तूं धराजन्या[1] ।
तुज देवि भेटली जी सत्कीर्ति कधींच हे न राजन्या ॥ ३७ ॥
श्रीविष्णुपदा ! स्तविली त्वद्भक्ता हे तुलाच मानावे ।
विश्व जिला वानितसें कां न मयूरेंहि तीस वानावें ?

## ६ पेशवे व त्यांचे सरदार.

त्रि[2]भुवनराज्य प्रभुचें प्रतिनिधिनें त्वां स्वहस्तगत केलें ।
भोळ्या दिगंबराचें आक्रमिलें वतन जळ जैसें तैलें ॥ ३९ ॥
जो अमरसिंह[3] जाधव या धवल प्राज्य यश असें मातें ।
तोकहि लोकहितावह दे जें शिवभक्तिच्या रसें मातें ॥ ४० ॥
गंगे ! संदर्शन दे श्रीविष्णुस्वामिभक्त नानातें[4] ।
जग तोक, माय तूं, हें पूर्ण करुं मनोरथासि या नातें ॥ ४१ ॥
यावे, प्रभुप्रतापा करुनि पुढें, तुज नमावया फडके[5] ।
गंगे ! तव तेजें तों विघ्नांचें उर कठोरही तडके ॥ ४२
यावे, शुनदि ! खळांतें श्रीमाधवराय[6] पेशवे दमुनी ।
व्हावे श्रीरामजयें हृष्ट जसे सर्व देश वेद मुनी ॥ ४३ ॥

---

१ पार्वती किंवा सीता. २ पंतांचा पेशव्यांविषयीं ग्रह चांगला नव्हता. ही आर्या 'नामार्या' प्रकरणांत आहे. शाहू राजा भोळा होता, त्याचें राज्य पेशव्यांनीं गिळंकृत केलें असा या आर्येचा आशय आहे. ३ हा प्रसिद्ध धनाजी जाधवाचा नातू याच्या बरोबर पंतांनीं महायात्रा केली. ४ नानाफडणीस. ५ हरिपंत फडके. ६ सवाई माधवराव. पंतांचा पेशव्यांविषयीं ग्रह इ. स. १७९० च्या सुमारास बहुतेक नाहींसा झाला होता. नानासाहेब पेशवे व बाबूजीनाईक आटपून बरींच वर्षे झालीं होतीं. आपल्या राष्ट्राच्या अधिपंतीचें पंतांनीं या आर्येत अभीष्ट चिंतिलें आहे.

## ७ वरप्रसाद.

यावें हेंचि विभो ! अभीष्टवरदा ! देवा ! तुझीं पावलें
चित्तीं नित्य असोत, सर्व म्हणजे या याचका पावलें ।
प्रेमें गाइन युष्मदद्भुतयशें, नाचेन युष्मज्जनीं
पावो निर्वृति याद यादवपते ! पाथोधिच्या मज्जनीं ॥ १ ॥

तुमच्या आशीर्वादें जन्मोजन्मीं घडो असी सेवा ।
हें वाङ्मनःशरीरें करितों विज्ञापना सदा देवा ॥ २ ॥

दयामृतघन श्रीमान् कृष्ण लक्ष्मीपती हरी ।
करी भक्तमयूरातें सुखी हृत्ताप संहरी ॥ ३ ॥

REFBK-0002154

क्र. क्रं. 2148